म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १२२३
IRBK-0101223

IRBK-0101223
IRBK-0101223

समाजक्रांतिविषयक—

# सावरकरांच्या गोष्टी

## [ भाग पहिला ]

लेखक :

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर

१२२३ कथा

IRBK-0101223

IRBK-0101223

★

…रसंक्रांत १९४८ ] [ किंमत

★ एकमेव विक्रेते :

कुलकर्णी ग्रंथागार,
१८४ शनिवार, पुणें २.

★ मुखपृष्ठ :
चित्रकार मुळगांवकर

★ प्रकाशन ३५ वें

★ प्रकाशक :

पंडित अनंत कुलकर्णी,
मु. पो. लोहारा ( पायगा )
जि. उस्मानाबाद.

★ मुद्रक :

ह. मो. जोशी,
विश्वास प्रेस,
२९१ शनवार, पुणें २.

# आमचीं ललित प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १ अमृतकण : | वि. वि. बोकील, बी. ए. बी. टी. | ३ |
| २ ठिगळ : | वि. वि. बोकील, बी. ए. बी. टी. | ४ |
| ३ विझती ज्योत : | शांता ज. शेळके, एम्. ए. | ५ |
| ४ चंद्रज्योति : | सौ. मालती दांडेकर | २ |
| ५ भूकंप : | प्रो. गं. भा. निरंतर, एम्. ए. | २॥ |
| ६ मालकंस : | गोपीनाथ तळवलकर | ३॥ |
| ७ पहिलें चुंबन : | ग. ल. ठोकळ, बी. ए. बी. टी. | ३ |
| ८ त्रिवेंद्रमची सफर : | सौ. कमला फडके, एम्. ए. | ३ |
| ९ मला काय त्याचे ? : | वि. दा. सावरकर | २। |
| १० स्वराज्याचा अरुणोदय : | आचार्य प्र. के. अत्रे | ३ |
| ११ भेळ : | य. गो. जोशी | २ |
| १२ किशोरकुंज : | (संपादक) पंडित अ. कुलकर्णी | २ |

कुलकर्णी ग्रंथागार, पुणें २.

# आमचीं आगामीं ललित आकर्षणें !

१ झंझावात : प्रो. ना. सी. फडके, एम्. ए.

२ मंथन : प्रो. ना. सी. फडके, एम्. ए.

३ पूर्वेचा वारा : लीला देशमुख, एम्. ए.

४ विखुरलेलें मोती : सौ. शांता माडखोलकर, बी. ए.

५ कांटेरी मार्ग : सौ. मालती दांडेकर.

६ गुलमोहर : शांता ज. शेळके, एम. ए.

७ सावरकरांच्या गोष्टी : ( भाग २ रा )

८ वेबी ! : वि. वि. बोकील, बी. ए. बी. टी.

९ किशोरकुंज : ( भाग २ रा ) [संपा.] पंडित अ. कुलकर्णी.

१० खिरापत : आचार्य प्र. के. अत्रे

कु ल क र्णी ग्रं था गा र, पु णें २.

अ. क्र. २११६० ३५४ वाचनालय

# कुसुम

: १ :

वडगांव येथील शाळेचा आज पारितोषक-समारंभ.

अशा प्राथमिक मराठी शाळांचा पारितोषक-समारंभ म्हणजे मुलांच्या मेहनतीचेंहि चीज होण्याचाच काय तो दिवस नसून, शिक्षकांच्या मेहनतीचेंहि चीज होण्या न होण्याचा दिवस असतो. त्यांतहि गांवठी शाळेंत खिचपत पडलेल्या आजकालच्या आमच्या अर्धपोटी मराठी शिक्षकांना तर ह्या दिवसाचें फारच महत्त्व. कारण त्यांच्या पोटापाण्याच्या प्रश्नांशींहि ह्या असल्या वार्षिक पारितोषक-समारंभाचा थोडाफार संबंध पोंचण्याचा संभव असतो.

कारण गांवपंचांना, गांवांतील पालकांना आणि वेळीं डेप्युटी-महाशयांनाहि संतुष्ट करण्याची ह्या वेळीं त्या बिचाऱ्या शिक्षकाला एक सुवर्णसंधीच आलेली असते. अशा समारंभाच्या दिवशीं त्या गांवचे ते गांवपंच, दीडदमडीच्या भांडवलाचे गांवशेठजी, जन्मांत ज्यांना कोणी खुर्ची देत नाहीं असे ' पालक ' या थोर पदवीनें त्या दिवशीं शाळेंतील

खुर्च्यांवर बसविले जाणारे रेमेडोके गांवगृहस्थ, मुलें, मुली, जातीयेती बायामाणसें, ह्या साऱ्या जणांना अशा समारंभांतील त्या झिळमिळ्या, तासे-ढोल, गाणीं-संवाद, पेटी-तबला, 'या हो! या हो!' ची आर्जवी स्वागतें यांहीं त्या शाळेविषयीं मोठी आपुलकी वाटूं लागते आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षेपेक्षांहि ह्या असल्या पारितोषक-समारंभामुळेंच त्या शिक्षकाचें नांव गांवांत ज्याच्या त्याच्या तोंडीं ऐकूं येऊं लागतें; त्यामुळें वर डेप्युटीलाहि आपली शाळा आणि आपण स्वतः गांवकऱ्यांत किती लोकप्रिय आहों हें शिक्षकांना सहजासहजीं दाखवितां येतें.

या समारंभांचा गांवठी शाळांतील बापड्या सरकारी शिक्षकांना जर आणखी एक महत्त्वाचा उपयोग होत असेल तर तो आपल्या शाळेच्या प्रगतीच्या भाषणांत येनकेनप्रकारेण स्वतःच्या आबाळीचें दुःख वेशीवर टांगण्याची संधि त्या निमित्तानें मिळते, हा होय. ओढा-ताण करून शाळेच्या प्रगतीच्या व्याख्यानाच्या विषयांत स्वतःच्या पोटापाण्याच्या अधोगतीचा थोडातरी उल्लेख शिक्षकांना सहज घुसडून देतां येतो!

वडगांवचे शिक्षकहि असेच आबाळलेले, त्यांतहि जरा भोळसर. त्यांच्या त्या गांवांतील शाळेच्या या आजच्या पारितोषक-समारंभास गांवपंचांसुद्धां झाडून सारे लोकच नव्हेत, तर शेजारच्या त्या तालुक्याच्या मुख्य ठाण्यांत महिन्या दोन महिन्यांनीं एखादा अंक काढणाऱ्या 'जगत्समाचार' नांवाच्या साप्ताहिकाचे संपादक श्री. बंडोपंत हेच अध्यक्षपदीं विराजमान होण्यास्तव येणार होते. वर्तमानपत्राच्या संपादकां-सारखीं, आपलीं दुःखें जीवर जगतासमोर टांगतां येतील अशी उंच नि भव्य वेस दुसरी कुठें मिळणार? अशा विश्वासानें वडगांवांतील ह्या शाळेच्या दिगोजीपंत शिक्षकांनीं आपल्या होणाऱ्या व्याख्यानांत आपलीं दुःखाची कहाणी सांगोपांग गोंवून पगाराच्या नि तांदूळ, डाळ, भाजी, भांडें प्रभृतीसाठीं संसारास कमींत कमी जो खर्च येतो त्याच्या प्रमाण-शुद्ध प्रमाणशून्यतेचा पाढा वाचलेला होता. तें भाषण त्यांनीं स्वतः तर

पाठ केलेंच होतें; पण त्याच अर्थाचें एक पद रचून तें इतर पदांप्रमाणेंच मुलां-मुलींकडूनहि पाठ करविलें होतें.

याच पद म्हणणाऱ्या मुलींत कुसुम होती. ती दिसण्यांत चांगली, वयानें दहा वर्षांची, बोलण्यांत चुणचुणीत, गळयाची गोड. अर्थात् पद बसवितांना दिगोजीपंतांनीं तिलाच मुख्य गायिकेचें काम दिलें. तें पद तिला शिकवितांना आतांशीं तिच्याशीं दिगोजीपंत येतां-जातां इतकें बोलत कीं, इतर मुलांमुलींना मत्सर वाटून त्यांच्या-त्यांच्यांतच नव्हे, तर कांहीं गांवगुंड बायामाणसांतहि 'जुळतंसं आहे अं टिपण !' अशी टवाळी सहजासहजीं आंतून आंतून चालू लागली.

तसें म्हटलें असतां दिगोजी शिक्षक कुसुमपेक्षां इतर मुलांमुलींशींच पुष्कळ बोलत; पण शाळा-कॉलेजांतील शिक्षक–अध्यापक–प्राध्यापकांच्या विद्यार्थ्यांशीं आणि विद्यार्थिनींशीं बोलण्याची मोजणी ज्या कोष्टकानें गणली जाते, त्या कोष्टकाप्रमाणेंच काय तें बिचारा दिगोजीपंत कुसुमशींच अधिक बोलतो असें ठरे.

तें कोष्टक असें : शाळा-कॉलेजांतील कोण्या मुलाशीं शिक्षक शंभर वेळां बोलतो तर तें जितकें आक्षेपार्ह नाहीं तितकें तें वर्गातील एखाद्या गबाळ मुलीशीं दहादां बोललें तर आक्षेपार्ह समजावें; आणि गबाळ मुलीशीं दहादां बोलणें जितकें आक्षेपार्ह, त्याहून कोण्या चुण-चुणीत मुलीशीं एकदां बोलणें अधिक संशयास्पद समजावें; हा या प्रक-रणींचा दंडकच पडला ! त्यामुळें चुणचुणीत कुसुमशीं दिगोजीपंत शिक्षक एकदां बोलतांच साऱ्या शाळेस तें जितकें ठळकपणें ऐकूं जाई नि भडकपणें दिसून येई तसें शंभरदां कोणा इतर मुलांमुलींशीं बोललें असतांहि ऐकूं जात नसे; दिसून येत नसे.

* * *

शाळेचा पारितोषक-समारंभ चालू होतांच मुलांमुलींचीं पदें, संवाद झाले. कुसुमची भूमिका सगळयांत सुरेख वठल्यामुळें अध्यक्ष असलेल्या

' जगत्-समाचारा 'च्या संपादकांनींहि तिचें कौतुक केलें. ' पाघळले हां पाहुणे पण ! ' दोघे चौघेजण कोपऱ्यांत हातांवर हात मारून खिदळले. दिगोजीपंत मनांत सचिंत झाले ! ' माझें भाषणहि कुसुमच्या संवादा-सारखें वठेल का ? संपादक त्याचेंहि असेंच कौतुक करतील का ?— तों झालीच त्या भाषणाची वेळ—आणि मुलांमुलींच्या एकच गलक्याची ! दिगोजीपंतांनींहि मुलांमुलींचा तो गलका थांबविणाऱ्या शिक्षकाची नि शाळेच्या प्रगतीचा वृत्तांत वाचून त्यावर भाषण करणाऱ्या व्याख्या-त्याची अशा आपल्या दोन्ही भूमिका एकसहाच करण्यास कंबर कसली. उजव्या हातांत प्रतिवृत्ताचें ( रिपोर्ट ) तें पुडकें नि डाव्या हाताशीं टेबलावर ठेवलेली छडी घेऊन ते बोलावयास उभे राहिले. ' मुलांनो, मुलींनो ! ' असा पहिला शालेय भाषणांतील संवयीचा संबोधनी होकार दिगोजीपंतांनीं घसा खरडून देतांच त्या आज्ञाधारक मुलांमुलींनीं ' ओऽ ! ओऽ ! मास्तर ! ' अशा प्रत्युत्तरांची एकच ओरड चालविली ! ' हां चूप ! चूप ! नुसतं ऐका ! राम्या ! तूं, तूं, तिथं गोंद्या ! गप ! ' असें त्या दिगोजींनीं मुलां-मुलींना दटावीत डाव्या हातानें टेबलावर छडी दहापांच वेळां कडाकड आपटल्यानंतर मुलांमुलींच्या बरेंचसें ध्यानांत आलें कीं, ह्या वेळीं मास्तरांनीं आपणांस हांका मारल्या किंवा कांहीं विचारलें तरी आपण बरोबर उत्तरें न देतां चूप बसायचें आहेसें दिसतें.

दिगोजीपंतांच्या लक्षांत या वेळपर्यंत येऊन गेलें होतें कीं, शालेय भाषणांतील संवयीनें आपण सभेंतहि आरंभ ' मुलांनो नि मुलींनो ! ' असा करून गेलों, ही चूक झाली. यासाठीं आतां त्यांनीं सावधपणें पुन्हा पहिल्यापासून भाषण चालविलें—

' अध्यक्ष महाराज आणि बंधुभगिनींनो ! ( हं ! सोम्या, हुश्श ! ) आज आपल्या शाळेचं परमभाग्य कीं, ' जगत्समाचारा 'सारख्या थोर पत्राचे जगप्रसिद्ध संपादक श्रीयुत बंडोपंत हे अध्यक्ष म्हणून समारंभास लाभले आहेत ! ( थोरांच्या टाळ्या, त्यासरशीं चाणाक्ष पोरांना कळू

चुकलें कीं, वाक्याशेवटीं टाळ्या द्याव्या लागतात. त्याप्रमाणें पुढील वाक्य संपण्याची ते, हात टाळीसाठीं सजवून वाट पाहतात.) या शाळेचे संस्थापक श्री. दगडूजी पाटील या वर्षींच पटकीनें वारले—! (पोरांच्या टाळ्यांचा कडकडाट!! दिगोजीपंतांच्या रागाचून टेबलावर आपटल्या जाणाऱ्या छडीचा छमछमाट! आणि आज्ञांचा गडगडाट! हुश्श! ऐकून घ्या, तिथं चंद्या! चूप!) याविषयीं मी आरंभींच अत्यंत खेद प्रदर्शवितों. आतां शाळेच्या प्रगतीचं प्रतिवृत्त प्रथम वाचायचं; परंतु ('मास्तर! मास्तर! हा भिक्या मला कोंपरखळ्या मारतो आहे सारखा!' 'नाहीं मास्तर, ह्या सख्यानंच मला चिमटा काढला पहिल्यानं' असा गोंगाट! 'हां! उठा, दोघेहि उठा तिथून. तूं इकडे बैस; तूं जा मागं!' अशा शिक्षक दिगोजीपंतांच्या कडक आज्ञा!)—परंतु, ही पाहतांच आहां तुम्ही ह्या उनाड मुलांची गडबड! तेव्हां मी इतकंच सांगतों कीं, मी एक बापडा दरिद्री शिक्षक, कुटुंबांत मुलं-लेंकरं तर सारखीं वाढताहेत, पण दरमहाच्या बारा रुपये पगारांत मात्र गेल्या बारा वर्षांत एका दमडीचीहि वाढ नाहीं. बारा एके बारा, पण पुढं काय? (चाणाक्ष गोंद्याला वाटतें— पाढ्याचं पुढं काय, ही मास्तरांना अडचण पडली. तो ताडकन् ओरडतो— 'पुढं बारा दोनी चोवीस मास्तर!' राम्या म्हणतो— 'बारा त्रीक छत्तीस मास्तर!' त्यासरशीं अध्यक्ष वगैरे सर्वजण खो खो हंसतात. दिगोजीपंत आपल्या करुण कहाणीच्या भर शोकरसांत ह्या हास्यरसानें माती कालविल्यामुळें संतापून देहभान विसरतात. डाव्या हाताकडची छडी केव्हां उजव्या हातांत घेतली आणि त्या पायांपाशींच बसलेल्या गोंद्या-राम्याच्या अंगावर सपासप केव्हां लगावली तें तीं मुलें मोठ्यामोठ्यानें 'अयायाया! अयाय!' असें किंकाळून उठेतों दिगोजी शिक्षकांच्या स्पष्टपणें ध्यानांत सुद्धां येत नाहीं!) ह्या गोंगाटासरशीं त्या सभेच्या समयज्ञ अध्यक्ष-महाशयांनीं शेवटीं आपण मध्येंच उठून सांगितलें,

'दिगोजीपंत आतां असं करा. तुम्ही तें तुमचं प्रतिवृत्त नि हें

तुमचं लिहिलेलं मूळ भाषण दोन्हीहि माझ्याकडे धाडून द्या. मी तें 'जगत्समाचारां'त समग्र छापतों. मग इथं तें भाषण नुसतं बोलून दाखविण्यासाठींच काय तो हवा कशाला हा गोंधळ ! नाहीं तरी तुम्ही हें लिहिलेलं भाषणच पाठ केलेलं दिसतं— !"

"छे, तसंच नाहीं कांहीं रावसाहेब अगदीं ! पण आपण जर तें समग्र छापीतच असाल तर मागितला एक डोळा नि देवानें दिले दोन, असाच उपकार होईल या दीनावर !" लगेच अध्यक्षांनीं सारीं भाषणें रद्द करून दहापांच पारितोषकें तेवढीं स्वहस्तें वांटावयाचें ठरविलें.

'कुसुम !' पहिलेंच नांव अध्यक्षांनीं घेतलें— पहिल्याच क्रमांकाच्या पारितोषकास योग्य म्हणून !

कुसुमला जरीचा खण मिळतांच पहिली टाळी पडली दिगोजीपंतांची. त्यासरशीं मुलांमुलींनीं कुळसूत्री बाहुल्यांप्रमाणें कडकडाट चालविला. मध्येंच कांहींकांना खोकल्याच्या सांथीनें पछाडल्यासारखें होऊन खोड-साळपणें मोठमोठ्यानें खाकरल्यावांचून राहवलें नाहीं. बाकीचीं पारि-तोषिकें वांटून होतांच समारंभ संपला, मुलें सुटलीं आणि त्या गांवच्या वाटेवाटेनें आनंदाचा एकच गलका करीत वरोघर चाललीं.

शेतांतील मेंढवाडा झुंझुरक्याला उघडतांच एकादें कोकरूं जसें हिरवळीवर मोकाट बागडूं लागतें आणि उगीच उंच उड्याच उड्या मारीत इकडे तिकडे आनंदानें नाचूं लागतें तशी आपल्या घरच्या आंगणांत पाऊल टाकतांच कुसुम बागडूं लागली. बाहेर गेलेली आई परत येतांच तिला तो पारितोषिक मिळालेला जरीचा खण कधीं दाख-वीन असें तिला होऊन गेलें होतें ! आई परत येतांना दुरून दिसतांच ती धांवत सुटली. आई भेटतांच तिला तिनें मिठी मारली, खण दाखविला, सभेंतील काय काय गमती सांगितल्या, पदें पण म्हणून दाखविलीं. आईनें जों जों तिचें कौतुक करावें तों तों तिचा आनंद गगनांत मावेनासा झाला.

त्या दहा वर्षांच्या लेंकराला त्या क्षणीं काय ठाऊक कीं, तशा

मनमोकळ्या आनंदाचा तिच्या आयुष्यांतील तो बहुधा शेवटचाच क्षण होता ! !

* * *

कारण त्याच क्षणीं गोपाळभटजी—तिचे वडील—तिथें आले. ते एक उंच गोरेपान, रूढीलाच शास्त्र समजणारे, भिक्षुकी आणि दूधदही विकण्याचें दोन्ही परस्परविरुद्ध व्यवसाय एकत्रच करणारे, त्या तुटपुंज्या उत्पन्नावर कसाबसा चरितार्थ चालविणारे, बरेच कर्मठ, थोडे तापट नि फार हेकेखोर पुरुष होते. त्यांनीं अंगणांत पाय टाकतांच गंगाबाईला, कुसुमच्या आईला, हसडलें.

‘ काय, मनांत काय मुलीला नायकीण करायचं आणलं आहेस कीं काय ! किती मोठ्यानं म्हणते ही कारटी तीं पाचकळ पदं ! कुसुम, उद्यांपासून तू शाळेंत पाऊल टाकतां कामा नये ! ”

“ तें कां ? ” गंगाबाई रागावून यजमानांस हटकत्या झाल्या.

“ कां ! कुसुम काय आतां सातआठ-वर्षांचं कुक्कूबाळ आहे वाटतं ! दहा वर्षांची लग्नाची मुलगी झाली ती आतां ! शाळेंत आज कुचाळ लोक तिच्याकडे टकमक पाहत होते, माहीत आहे !. बाराबारा वर्षांच्या घोडनवऱ्या शाळेंत नाचविणाऱ्या उल्लूंतला मी नाहीं, समजलीस ? शास्त्रांनीं कांहीं उगीच ‘ अष्टवर्षा भवेत् कन्या ’ ही मर्यादा घातली नाहीं !

बाराबारा वर्षांच्या मुलींना घोडनवऱ्या म्हणणाऱ्या ह्या कर्मनिष्ठ गोपाळ-भटजींचें गंगाबाई हें तिसरें कुटुंब होतें. पन्नाशीच्या वयांत त्यांचें दुसरें कुटुंब वारलें, दोन मोठीं मुलेंहि होतीं. पण तरीदेखील त्यांनीं तिसरें लग्न करण्याचें ठरवून एका तेरा वर्षें वयाच्या कुमारीस पाणिग्रहिलें. त्याच गंगाबाई. त्याला आतां सोळा वर्षें झालीं होतीं. गंगाबाईंची वडील मुलगी चवदा वर्षांची होती. ती रानपाटच्या खोतांना दिली होती. दुसरी कुसुम.

आमच्या या गोष्टींतल्या समाजचित्रांपैकीं हें पहिलें समाजचित्र ! गोपाळ-भटजी पासष्टी उलटलेले, त्यांची तिसरी बायको गंगाबाई तिशीच्या वयाची, आणि तिची ही दुसरी धाकटी मुलगी कुसुम दहा वर्षांची !— ती तिच्या त्या वडिलांच्या शास्त्रमर्यादामतें घोडनवरी होत आलेली आहे ! !

*　　　　*　　　　*

गोपाळभटजी आपल्या बायकोला असें फटकारीत असतांच अंगणांत एक शिपाई येऊन ' तार ! ' म्हणून ओरडला. ' तार ' शब्द ऐकतांच ज्यांना नेहमीं तारा येतात, त्यांच्या देखील मनाची चलबिचल झाल्यावांचून राहत नाहीं. फार निकडीची, विशेष आनंदाची वा घोर संकटाची बातमी म्हणजे तार ! त्यांतहि खेडेगांवांत गोपाळभटा-सारख्या बापड्या कुटुंबाला तार येण्याचा प्रसंग जन्मांत दोनतीन वेळांच येणार ! स्वतः गोपाळभटांना त्या वेळपावेतों एकच तार आलेली आठवत होती. ती त्यांच्या पन्नाशीनंतर मोठ्या प्रयासानें गंगाबाईशीं लग्न जमलें तेव्हां तें ठरल्याची होती ! त्यानंतर तार अशी ही दुसरीच काय ती त्यांना आली ! या वेळीं लग्नाचा प्रश्नच नव्हता—अर्थात् कांहीं-तरी अरिष्टच असलें तर असणार ! ही शंका येऊन थरथरत्या हातानें गोपाळभटजींनीं तार घेतली नि शेजारच्या घरीं ती वाचून घ्यावयास ते घाईघाईनें चालले असतां त्याच शंकेनें तोंड सुकून गेलेल्या गंगाबाईनीं हात जोडून देवास प्रार्थिलें,

' इडापिडा टळो नि अमंगळ पळो ! '

गंगाबाईची वडील मुलगी रानपाड्याच्या खोतांना दिली होती. ती आजारी होती हीहि बातमी आधींच कळली होती. गंगाबाईच्या हृदयांत सारखी धडकी भरली—तार तिच्या घरची तर नसेल ना ? तिचेंच कांहीं वेडेंवांकडें तर—! तो भयंकर विचार मनाला देखील तिनें पुरता उच्चारूं दिला नाहीं. अर्धा उच्चारला म्हणून सुद्धां ती बिचारी मायाळु आई मनावर रागावली—' वैरी चिंती ना तें हें मेलं मन चिंतितं !'

गोपाळभट्टजी डोळयांतून ढिपें गाळीतच स्मशानांतून परतले. तार त्यांच्या वडील मुलीकडचीच होती ! रानपाढच्या खोतांनीं—त्यांच्या जावयांनीं—त्या तारेनें कळविलें होतें कीं,

' त्यांची वडील मुलगी अत्यवस्थ. सासूबाईंना नि कुसुमला जेवत असल्या तर हात धुवायलाच इकडे शुश्रूषेसाठीं धाडा ! '

' जेवत असले ' तर कशाला जेवण्यास सुद्धां न बसतां, पाण्याचा घोंटदेखील न देतां ताबडतोब गाडी करून कुसुमसह गंगाबाई रानपाढला लगेच निघून गेल्या.

पण त्या तिथें पोंचतात तोंच ती त्यांची वडील मुलगी मृत्यूच्या पाशांत न सुटेशी अडकत आली होती. आपल्या आईला नि कुसुमला तिनें डोळे भरून कांहीं वेळ पाहिलें, वाचा बंद म्हणून हात तेवढा कुसुमच्या तोंडावरून फिरवला, त्या दुःखासरशीं हंबरडा फोडलेल्या आईच्या मांडीवर आपली लटपटती मान एक वेळ टेकली आणि तिनें राम म्हटलें !

खोत सुस्वभावी नि समंजस गृहस्थ होते. तरुण पत्नी वारल्याचें त्यांना तीव्र दुःख झालें असतांहि तें गिळून ते आपल्या सासूबाईंचें नि लहानग्या कुसुमचें समाधान परोपरीनें करीत होते. ते घरचे सुखवस्तु; सासरची मंडळी निर्धन; यास्तव अडीअडचणीस त्यांनीं आपल्या सासऱ्यास हातभारहि लावलेला होता. कुसुमला तर त्यांच्याच आग्रहानें गोपाळभट्टजींना शाळेंत धाडणें भाग पडलें होतें. ती आपल्या वडील बहिणीसह खोतांकडे पुष्कळदां राहिलेली होती, असा ह्या दोन कुटुंबांचा जडलेला दाट लोभ नि प्रेमळ नातेंहि, त्या तरुण पत्नीच्या ज्या सांखळीनें तें जुळलें तीच अचानकपणें दुर्दैवानें तोडून टाकल्या-मुळें आतां तुटतें कीं काय ही शंकाहि त्या तरुणीच्या मरणा-इतकीच कुसुमच्या आईबापांना आणि खोतांना मनांतल्या मनांत व्याकुळवीत होती.

आपल्याच घरच्या माणसांसारख्या अगदीं जिव्हाळयाच्या वाटूं

लागलेल्या ह्या आपल्या सासरच्या माणसांची ममता तरी यापुढें अंतरूं नये, या सदिच्छेच्या पोटींच पत्नीच्या सुतकाचे दहा दिवस उलटतात न उलटतात तोंच त्यांना वाटलें कीं, कुसुमच्या शिक्षणाचा सारा भार आपण घ्यावयाचें सासूबाईंना आश्वासून तिला इथेंच ठेवून घ्यावें. सासूबाईंनीं परत घरीं जायचें नांव काढलें तेव्हां खोत म्हणाले,

"मला तुम्हीच आईच्या ठिकाणीं होतांत. ज्या आम्हांस अंतरल्या त्या अंतरल्याच; तिथं त्यांचा आमचा उपाय खुंटला. पण आपण जीं मायेचीं माणसं उरलीं आहोंत त्यांनीं तरी एकमेकांना अंतर देऊं नये. यापुढंहि मला आपण आईच्याच ठिकाणीं असावं. आपण जाऊं म्हणतां तें ठीकच. गोपाळभट्टजी कांहीं झालं तरी इकडं येऊन राहणार नाहींत. त्यांच्यासाठीं आपणांलाहि तिकडं जाणं भाग; पण हें लेंकरूं आहे तें तरी मायेचं माणूस म्हणून, आपल्या कुटुंबांतील ममतेची सांखळी म्हणून मजजवळ ठेवावं. सैंपाकी, गडी घरीं आहेतच तिच्या सेवेला. तिचं शिक्षण, लालनपालन मी तिच्या वडिलांइतक्याच ममतेनं करीन."

"क्वचित् अधिक ममतेनंसुद्धां कराल; बरं तें सगळं झालं तर तिचं शिक्षण होईल इकडंच, पण सध्यां मी तिला नेतें आणि मग वडिलांचा विचार घेऊन लवकरच धाडून देतें परत !" सासूचें हें बोलणेंच योग्य असें समजून खोतांनींहि त्यास अनुमति दिली.

गंगाबाईंनीं घरीं परत येतांच वेळप्रसंग पाहून गोपाळभट्टजींपुढें ती गोष्ट काढली. खोतांशीं जुळलेला नात्याचा संबंध नि त्यांचें पाठबळ तुटूं नये ही भट्टजींचीहि उत्कट इच्छा होतीच. कुसुमच्या शिक्षणाची नसली तरी लग्नाची चिंता त्यांना आधींच लागलेली ! तिला बारा वर्षांची होउनवरी करून कुळास बट्टा लावायचा नाहीं हा त्यांचा निर्धार ! त्या मनःस्थितींत खोतांचा हा बेत ऐकतांच गोपाळभट्टजींच्या मनांत अचानक एक योजना जुळून आली.

बहिणीवर खोतांनाच कुसुम देऊन टाकली तर ? सगळेंच मना-सारखें जुळणार ! शास्त्रमर्यादेचा प्रश्नच नव्हता. चालू शिटाचारास तें

अगदीं धरून होतें. 'असं ममतेचं, बिनहुंडयाचं, सुखवस्तु ठिकाण कुसुमला तरी कुठं पाहणार आम्ही ! मुलीचं भाग्यच म्हणायचं हें सगळं जुळलं तर !'

गंगाबाईनाहि तो बेत अगदीं आवडला. कुसुमच्या आवडी-निवडीचा प्रश्नच नव्हता. लग्न म्हणतांच तिला भीति वाटली; पण ती कसली, हें त्या दहा वर्षांच्या मुलीस स्वतःहि कळेना आणि कोणी विचारीहि ना !

गोपाळभटजींनीं अगदीं स्पष्ट नि आर्जवी शब्दांत ती योजना खोतांना कळवली. कुसुमसारखी देखणी मुलगी, लोभाची आधींचीच, धुंडतां सांपडायची नाहीं कोणा बिजवराला ! खोतांनीं कांहींएक आढेवेढे न घेतां कुसुमशीं लग्न करण्याचें वचन दिलें. पण आणखी दीडएक वर्ष तरी मध्यें जाऊं द्यावें नि तोंवर कुसुमनें खोतांकडेच राहावें, इतकें काय तें सुचविलें.

"लग्नाची मुलगी लग्नावांचून परक्या घरीं अशी ठेवणें हें आपणांस रुचणार नाहीं; दहा लोक हंसतील, तव्हां कुसुमचें लग्न करायचें तर तें लगेच करावें हें उत्तम. इतकेंच नव्हे, तर पुढें चातुर्मास, मुहूर्त नाहींत, म्हणून अगदीं याच महिन्यांत तें मंगलकार्य उरकल्यास ठीक. टिपण जुळतें आहे—' असें, जरा निर्वाणीचा झोंक असलेलें उत्तर गोपाळ-भटजींनीं धाडलें. त्यांना धास्ती होती कीं, दिवसगत लागल्यास न जाणो खोतांना दुसरें एखादें हुंडयाचें ठिकाणदेखील येईल, त्यांचें मन बदलेल ! कुसुमच्या तोंडचा घांस काढून घेण्यास टपलेल्या बारा वर्षांच्या 'घोडनवऱ्या' घरोघर त्यांना आढळत होत्याच ! या शंकेमुळें मुलीचें कल्याण व्हावें या सदिच्छेनेंच गोपाळभटजींनीं लग्नाची घाई चालविली. त्यांचा हा बेत त्यांच्या कक्षेंतील भट-भिक्षुक-शास्त्री मंडळींनीं शास्त्रोक्त आणि शिष्टांनीं शिष्टसंमत ठरविलेलाच होता. कांहीं बायाबापड्या 'इश्शऽऽ' म्हणत, कुचाळ लोक शीळ देत, पण शास्त्राची, टिपणांची वा शिष्टाचाराची अशी कांहीं अडचण नव्हती.

खोतांच्या कक्षेतील भट-भिक्षुक-आप्तेष्टांनींहि त्या योजनेस शास्त्रोक्त नि शिष्टाचारास धरूनच आहे, अशा प्रासकार्यांचा निर्वाह असा अनेक वेळां करावाच लागतो, बहिणीवर मेहुण्याला वहाण देतातच, असा अभिप्राय दिला. खोतांनींहि बेत पसंतिला, लग्न जुळलें, मुहूर्त ठरला, भट-भिक्षुक-आप्तेष्ट निःसंकोचपणें मिळाले. सर्व सोहाळे यथाशास्त्र, यथासांग होऊन अकरा वर्षांच्या आंत असलेल्या त्या मुलीचें—कुसुमचें, लग्न त्या तिच्या वडील बहिणीच्या विधुर झालेल्या प्रौढ नवऱ्याशीं. त्या वडील बहिणीस मरून एक वर्ष उलटतें न उलटतें तोंच, वाद्यांच्या आनंदी गजरांत, यथाशास्त्र लावलें गेलें—खोतांनीं नवा संसार थाटला !

जो तो मनापासून म्हणाला, मुलीचें चांगलें झालें. त्यांत कोणाचीहि इच्छा तिचें अनहित करावयाची नव्हती हेंहि खरेंच. एक पत्नी अकालीं मानवी उपायांना न जुमानतां मृत्यूनें ओढून नेली, त्यास काय उपाय ? पण मेल्यांगेल्यांसाठीं खोतांसारख्या वयांत असलेल्या पुरुषाचा सारा संसार थोडाच बुडूं द्यावयाचा ! जगाची रहाटी पाहून एकडाव उध-ळला तर पुन्हा दुसरा नीटनेटका मांडणेंच भाग, असा त्यांनीं जो विचार केला तो युक्तिसंगत नव्हताच असें कसें म्हणायचें ? हेंच साऱ्यांचें मत पडलें.

—आणि कुसुम ? तिला मत असें जवळ जवळ नव्हतेंच ! आवडलें नाहीं खरें तें सारें. वरवर चांगलें झालें म्हणून म्हणणाऱ्या आयावायां-पैकीं कांहीं मागेंमागें तिची टिंगलहि करतांना ती ओशाळेसुद्धां केव्हां केव्हां; पण चांगलेंवाईट काय बोलायचें तें तिला नक्की कळेना ! जें कळे तें बोलावयास तिला कोणी सांगेना, पुसेहि ना.

या गोष्टींतील हें दुसरें समाजचित्र पहा ! आपली पहिली तरुण पत्नी वारतांच एका वर्षाच्या आंतबाहेर तिचीच धाकटी दहा वर्षांची जी वहीण तिच्याशींच लग्न लावणारे तिशीपस्तिशीचे विजवर खोत ! पन्नाशीनंतर लावलेल्या आपल्या तिसऱ्या विवाहापासून झालेल्या त्या दहा वर्षाच्या मुलीचें तिच्या वडील बहिणीच्याच नवऱ्यास तसें कन्या-

दान करणारे शास्त्रमर्यादाभिमानी गोपाळभटजी ! आणि त्या सासऱ्या-जांवयाच्या तिसऱ्या दुसऱ्या विवाहाप्रमाणेंच त्या दहा वर्षांच्या अल्लड मुलीच्या विवाहासहि शास्त्रोक्त नि शिष्टाचारसंमत मानून तो यथासांग स्वतः पार पाडणारा भट-भिक्षुक-आप्तेष्ट-शिष्टादिकांचा समाज !

त्यांतहि हें समाजचित्र अवघ्या नऊ–दहा वर्षांपूर्वींचें–अगदीं ताजें !

* * *

लग्न लागल्यानंतर लगेच कुसुमला खोतांकडे पोंचविण्यांत आलें. त्यांनीं तिला शक्य त्या त्या उपायांनीं सुखांत ठेवण्याचा यत्न केला. लग्न झाल्यामुळें शाळेंत धाडण्याचा प्रश्नच राहिला नव्हता! पण कुसुमला खोतांनीं घरीं स्वतः मासिकें; कादंबऱ्या, नाटकें वाचण्याचा नि ऐकण्याचा चांगला नाद लावला. कुसुम बुद्धीची कुशाग्र, देहानें उफाड्याची नि स्वभावानें तरतरीत मुलगी होती. हळुहळु तिचें मनहि सासरीं रमूं लागलें; तिचे असे स्वतंत्र बौद्धिक विचार बनूं लागले; काय हवें काय नको कळूं लागलें. कामुक भाव जागूं लागले, रुजूं लागले. घरच्या संसारांतीलच नव्हेत तर सार्वजनिक उठाठेवीहि कराव्याशा वाटूं लागल्या. एकंदरींत खोतांशीं झालेल्या विवाहामुळें तिचा संसार सुखांतच जाईल असा रंग दिसूं लागला. गोपाळभटजींना आणि गंगाबाईंना आपल्या मुलीचें कल्याण झालेलें पाहून जी कृतकृत्यता वाटे तिला तर पारावारच नव्हता.

कुसुमच्या लग्नाला आतां वर्ष दीडवर्ष होऊन गेलें होतें. गंगाबाईंनीं पाहिलें कीं, गोपाळभटजी आज बरेच रंगांत दिसताहेत. पहाटेच स्नानसंध्या आटोपून गाईम्हशीचें दूध काढून त्या चरव्या गड्यांपाशीं सोंपवून ते सांगत होते– अमक्याला इतकें उकाड्याचें घाल, तमक्या-कडून दुधाचे पैसे येणें ते आण. दूध विकायला गडी जातांच भिक्षुकी-साठीं बाहेर जाण्याच्या आधीं ते एक स्तोत्र म्हणत गंगाबाईकडे आले नि सहजीं जिज्ञासले,

'काय, तुझ्या लाडक्या मुलीचं गुप्त पत्र आलं कीं काय एखादं— मला न सांगण्यासारखी आनंदाची बातमी सांगणारं ? इतकी गालां-तल्या गालांत हंसतशी आहेस ती ?'

'आतां अशी आनंदाची बातमी सांगणारं पत्र यायचं म्हणजे तुमच्या कुसूच्या गर्भदानाचं ! यायचंच आतां तेंहि आज ना उद्यां. कडोसरीला दोन पैसे लावून ठेवायचे बरं का ! या पाळीला मुलीचं तें मंगल-कार्य तरी अगदीं श्रीमंती हौसेचं झालं पाहिजे अं !' गंगाबाई उल्हासल्या.

तोंच अंगणांतून आवाज आला 'तार ! गोपाळभटजी, तुमची तार !!'

जळता निखारा पायांवर पडावा तसा तो भयंकर शब्द त्या बिचाऱ्या नवरा-बायकोच्या कानांवर पडला !

'तार !' गोपाळभटजींच्या जन्मांतली ती तिसरी तार ! मागची तार त्यांची वडील मुलगी अत्यवस्थ असल्याची होती. ही तार त्यांचा जांवई, कुसुमचा नवरा अत्यवस्थ असल्याची होती !

गंगाबाई तर तिथल्या तिथेंच खचून खालीं बसली. गोपाळभटजी तिला कसेंबसें उठवून गाडी करून स्वतःबरोबर घेऊन कुसुमच्या सासरीं ताबडतोब निघाले. तिथें पोंचतात तोंच घरांतून रडारडीचा एकच आक्रोश त्यांच्या कानांवर आला ! कुसुमचा नवरा वाखा होऊन तडकाफडकीं वारला !

बारा वर्षांची कुसुम बालविधवा झाली ! हें तिसरें समाजचित्र पहा ! वाचक, हीं समाजाचीं चित्रें नव्हेतच, छायाचित्रें आहेत तीं ! अगदीं यथावत् !

* * *

कुसुम मानवी शास्त्राधारें बालविधवा झाली; पण निसर्गाचें शास्त्र मानवी शास्त्राधाराला थोडेंच भीक घालणार ! दिवसेंदिवस यौवन तिच्या अंगांत

वहरूं लागलें, भोगेच्छा सळसळूं लागल्या; पण सासरहून तिला गोपाळभटजींनीं माहेरीं आणून जी कोंबली ती पुन्हां कांहीं अंगणाबाहेर जाऊं दिली नाहीं. तिच्या नात्यागोत्यांच्या घरीं लग्नकार्यें, गौरी-गणपती होत. तिची वयातीत आई समारंभांना, मिरवणुकींना, हळदकुंकवाला जाई; पण ती सोळा-सतराची, भर हौशीच्या वयाची नी मूळच्या खेळकर स्वभावाची कुसुम एकाद्या घातक अपराध्यासारखी घरांतच डांबून ठेवलेली राही. ती गोरी असतांनाहि नी तिचा कांहींएक अपराध घडला नसतांहि तिच्या तोंडाला कसली काय काळोखी फांसली गेली! समाजांत तिला एखाद्या अशुभासारखी, चोरासारखी, तोंड लपवून जगण्याची पाळी आली. एकदां तर टाळूपर्यंत भांग फाटलेल्या गांवसासूनें तिच्या तोंडावर तिच्या भरदार केंसाकडे बोट दाखवून नाक मुरडलें नी थोराऱ्या ठसक्याच्या आवाजांत म्हणाली,

'लाज नाहीं का ग वाटत कुसुम तुला या केसांच्या नख्याफस्याची! गोपाळभटजी तर लाज कोळूनच प्यायले म्हणा! नाहींतर विधवेच्या हातीं फणी पाहावली तरी कशी त्यांना!' पण गोपाळभटजींनीं शेवटपर्यंत तेवढी दया केली होती.

'आतांशीं घरोघर तोच प्रकार आहे. 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी!' कलियुगच आहे हें.' असें म्हणून त्यांनीं कुसुमच्या केसांकडे तेवढा कानाडोळा केला होता. कोणच्या शास्त्राधारें?—तर समाजांत आतांशीं तसे पुष्कळ लोक करतात ह्या! तेवढ्यासाठीं आतांशीं भटांवर कुणी बहिष्कार घालीत नाहींत ह्या!

पण यौवन सरसर अंगीं भरभराटत चाललेल्या त्या तरुणीच्या साऱ्या भावना एका वेणीफणीच्या पेटींत थोड्याच मावणाऱ्या होत्या! हिची ती वेणीफणीची पेटी तेवढी जरी कुणी हिसकून घेतली नव्हती तरी त्या बालविधवेची अंतःकरणाचीच पेटी जप्त झाली होती, मोहोरबंद केलेली होती; मन मनांतच गाडून टाकलें होतें. त्यांतल्यात्यांत तिला सोबत अशी पुस्तकांची तेवढी उरलेली होती—तीहि तिच्या आईच्या सवलतीनें.

'काय, तुझ्या लाडक्या मुलीचं गुप्त पत्र आलं कीं काय एखादं—मला न सांगण्यासारखी आनंदाची बातमी सांगणारं ? इतकी गालांतल्या गालांत हंसतच्री आहेस ती ?'

'आतां अशी आनंदाची बातमी सांगणारं पत्र यायचं म्हणजे तुमच्या कुसूच्या गर्भदानाचं ! यायचंच आतां तेंहि आज ना उद्यां. कडोसरीला दोन पैसे लावून ठेवायचे बरं का ! या पाळीला मुलीचं तें मंगलकार्य तरी अगदीं श्रीमंती हौसेचं झालं पाहिजे अं !' गंगाबाई उल्हासल्या.

तोंच अंगणांतून आवाज आला 'तार ! गोपाळभट्टजी, तुमची तार !!'

जळता निखारा पायांवर पडावा तसा तो भयंकर शब्द त्या बिचाऱ्या नवरा-बायकोच्या कानांवर पडला !

'तार !' गोपाळभट्टजींच्या जन्मांतली ती तिसरी तार ! मागचीं तार त्यांची वडील मुलगी अत्यवस्थ असल्याची होती. ही तार त्यांचा जांवई, कुसुमचा नवरा अत्यवस्थ असल्याची होती !

गंगाबाई तर तिथल्या तिथेंच खचून खालीं बसली. गोपाळभट्टजी तिला कसेंबसें उठवून गाडी करून स्वतःबरोबर घेऊन कुसुमच्या सासरीं तावडतोब निघाले. तिथें पोंचतात तोंच घरांतून रडारडीचा एकच आक्रोश त्यांच्या कानांवर आला ! कुसुमचा नवरा वाखा होऊन तडकाफडकीं वारला !

बारा वर्षांची कुसुम बालविधवा झाली ! हें तिसरें समाजचित्र पहा ! वाचक, हीं समाजाचीं चित्रें नव्हेतच, छायाचित्रें आहेत तीं ! अगदीं यथावत् !

* * *

कुसुम मानवी शास्त्राधारें बालविधवा झाली; पण निसर्गाचें शास्त्र मानवी शास्त्राधाराला थोडेंच भीक घालणार ! दिवसेंदिवस यौवन तिच्या अंगांत

वहरूं लागलें, भोगेच्छा सळसळूं लागल्या; पण सासरहून तिला गोपाळभटजींनीं माहेरीं आणून जी कोंबली ती पुन्हां कांहीं अंगणाबाहेर जाऊं दिली नाहीं. तिच्या नात्यागोत्यांच्या घरीं लग्नकार्यें, गौरी-गणपती होत. तिची वयातीत आई समारंभांना, मिरवणुकींना, हळदकुंकवाला जाई; पण ती सोळा-सतराची, भर हौशीच्या वयाची नी मूळच्या खेळकर स्वभावाची कुसुम एकाद्या घातक अपराध्यासारखी घरांतच डांबून ठेवलेली राही. ती गोरी असतांनाहि नी तिचा कांहींएक अपराध घडला नसतांहि तिच्या तोंडाला कसली काय काळोखी फांसली गेली ! समाजांत तिला एखाद्या अशुभासारखी, चोरासारखी, तोंड लपवून जगण्याची पाळी आली. एकदां तर टाळूपर्यंत भांग फाटलेल्या गांवसासूनें तिच्या तोंडावर तिच्या भरदार केसांकडे बोट दाखवून नाक मुरडलें नी थोगऱ्या ठसक्याच्या आवाजांत म्हणाली,

'लाज नाहीं का ग वाटत कुसुम तुला या केसांच्या नख्याफस्याची ! गोपाळभटजी तर लाज कोळूनच प्यायले म्हणा ! नाहींतर विधवेच्या हातीं फणी पाहावली तरी कशी त्यांना !' पण गोपाळभटजींनीं शेवटपर्यंत तेवढी दया केली होती.

'आतांशीं घरोघर तोच प्रकार आहे. 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी !' कलियुगच आहे हें.' असें म्हणून त्यांनीं कुसुमच्या केसांकडे तेवढा कानाडोळा केला होता. कोणच्या शास्त्राधारें ?— तर समाजांत आतांशीं तसे पुष्कळ लोक करतात ह्या ! तेवढ्यासाठीं आतांशीं भटांवर कुणी बहिष्कार घालीत नाहींत ह्या !

पण यौवन सरसर अंगीं भरभराटत चाललेल्या त्या तरुणीच्या साऱ्या भावना एका वेणीफणीच्या पेटींत थोड्याच मावणाऱ्या होत्या ! हिची ती वेणीफणीची पेटी तेवढी जरी कुणी हिसकून घेतली नव्हती तरी त्या बालविधवेची अंतःकरणाचीच पेटी जप्त झाली होती, मोहोरबंद केलेली होती; मन मनांतच गाडून टाकलें होतें. त्यांतल्यात्यांत तिला सोबत अशी पुस्तकांची तेवढी उरलेली होती—तीहि तिच्या आईच्या सवलतीनें.

खोतांकडे सासरीं असतां मासिकें, कविता, गोष्टी, वाचण्याचा तिला छंद लागला होता. तोच वाढत जाऊन तिनें आतां वाचनच वाचन चालविलें. संस्कृतचे श्लोकहि भाषांतराच्या साह्यानें ती वाचूं लागली. मराठी भाषांतराच्या आधारें अर्थ करून वाचतां वाचतां मेघदूत तिला इतकें आवडलें कीं, तिनें तें संस्कृत सरस काव्य तोंडपाठ केलें; तें म्हणत असतां आकाशांतील त्या मेघासारखा तिच्या नयनांतहि अश्रूंचा एक मेघ येऊन ज्याला नांव ना गांव अशा तिच्या कोण्या प्रियकराचे तेच व्याकुल संदेश तिलाहि देऊं लागे !

एक दिवस, त्यांच्या एका दूरच्या नात्याची जी तिच्याचसारखी बालविधवा मुलगी पुण्याकडे असे, ती शिकून मोठी होतांच तिचा पुनर्विवाह थाटानें पुण्यास लागल्याचें वृत्त एका मासिकाच्या ताज्या अंकांत तिनें वाचलें. ती बातमी तिनें धांवत जाऊन गंगाबाईंना सांगितली—त्यांनीं लगेच गोपाळभटजींना ! त्यासरशीं त्यांनीं पुनर्विवाह करणाऱ्या त्या मुलीला ज्या शिव्या हासडल्या त्या विचारूंच नयेत !

'माझी मुलगी अशी कुलटा निघेल तर मी तिचा तरी जीव घेईन नाहींतर माझा तरी देईन !' हा त्यांचा संतापलेला समारोप तर इतका कडकडीत होता कीं, कुसुम एका कोपऱ्यांत जाऊन थरथरत रडूं लागली. गोपाळभटजींनीं तिच्या खोलींतलीं सारीं मासिकें बिसिकें उचलून नेलीं; आणि आजकालचा बाष्कळ 'छापा' पुन्हां घरांत दिसतां कामा नये अशी सक्त आज्ञा सोडली. कुसुमची ती एकच एक मनमोकळी सोबतहि नाहींशी झाली ! सकाळ–संध्याकाळ गाईम्हशींचीं दूधदुभतीं काढणें, दुपारीं त्यांचेंच पाणीवैरण पाहणें, हा तेवढा तिचा कार्यक्रम वर्षानुवर्षे चालला !

'या गाईम्हशीप्रमाणें मीहि एक गोठ्यांतले गुरूंच नाहीं का— :' तिनें चिडून स्वतःशींच म्हणावें. तिचीं आजकालचीं पुस्तकें बंद झालीं; पण तिच्या आईनें पांडवप्रताप, रामविजय, हरीविजय तिला वाचायला द्यावें. पण त्यांत तरी काय ? रुक्मिणीहरण, सुभद्राहरण,



रासलीला, कुंती नी कर्ण, शंतनु नी गंगा! तिच्या आईनें नित्य म्हणावीं, तीं गवळिणींचीं रसभरित प्रेमगीतें, उदाहरणाचें 'पुण्यपावन' गाणें! मासिक पुस्तकांतील गोष्टींपेक्षांहि या पूज्य देवदेवींच्या नि राजर्षीं-ब्रह्मर्षींच्या सेवनानें पवित्रतरच वाढूं लागलेल्या कामवासना तिच्या अंतःकरणांतून अधिकच सळसळूं लागल्या. तिच्याबरोबर एकदोघी मैत्रिणी आपल्या पहिल्या छबुकड्या लेंकराचा चिमुकला हात हातांत खेळवीत जेव्हां त्याला पाजीत बसतांना ती पाही, तेव्हां कुसुमला वाटे, आपणहि झप्‌किनी त्या गोंडस तान्ह्याला घेऊन छातीशीं तसेंच पाजावें. पण ह्या कोणत्याहि उत्कट वासनांचा उच्चार म्हणून तिला उघडपणें करण्याचें लवलेश धैर्य नव्हतें. उलट त्या लपविण्यासाठीं ती वरवर त्यांचा तिटकारा दाखवी.

रमणीचें जीवन म्हणजेच रति आणि वत्सलता! ह्या दोन्ही जीवन-प्रवृत्तीच तिच्या जीवनांतून वजा झालेल्या, वर्ज्य झालेल्या! तिचें जीवन तिला असह्य झालें. आणि तें अगदीं सुसह्य आहे असें आई-बापांना धाकानें, त्यांना मुलगी बिघडली असें न वाटावें म्हणून, वरवर दाखविणें तर तिला भाग. त्यामुळें तिचा स्वभाव लपंडाव—निष्णात होऊं लागला. दहा बाया जमल्या कीं, गांवांतील वा जगांतील स्त्रीपुरु-षांच्या बऱ्यावाईट उठाठेवी हटकून करायच्या; तशा गोष्टी निघतांच कुसुमनें, 'इश्श ऽ ऽ! मला नाहीं बाई असल्या पाचकळ गोष्टी आवडत' असें म्हणत फणकारून तिथून उठून जावें; पण आडोशाला उभें राहून शक्य तोंवर त्या गोष्टी आवडीनें ऐकाव्या. अशा परिस्थितींतील अनेक तरुण कुमारिकांचा नि बालविधवांचा स्वभाव समाजभीतिमुळें इतका मिथ्याचारी बनतो कीं, असल्या ज्या विषयांचा त्या तिटकारा दाख-वितात त्या त्यांना नक्की हव्याशा असतात असें समजावें. 'हें मुळींच आवडत नाहीं मला अं!' असें त्यांचें फणकाऱ्याचें वाक्य 'हें मला फार आवडतें अं!' याच अर्थी बहुधा योजलेलें असतें!

मनांतल्या मनांत ती विचारी बालविधवा कुसुम अशी कुढतां

कुढतां तिला अठरावें वर्ष उलटत आलें ! गोपाळभटजींनीं पन्नासाव्या वर्षीं ज्या कारणाकरितां तिसरें लग्न केलें; त्यांच्या बिजवर जांवयाचा संसार पुन्हां थाटणें योग्य वाटून वडील मुलीच्या मृत्यूनंतर एकाच वर्षाच्या आंतबाहेर, ज्या कारणाकरितां आपली दुसरी दहा वर्षांची मुलगी त्या खोतांना देणें त्यांना माणुसकीचें, शिष्टाचाराचें नि शास्त्र-संमत वाटलें, त्यांपैकीं कोणच्याहि कारणासाठीं या यौवनानें मुसमुसत राहिलेल्या आणि आतां अतृप्ततेनें झुरणीस लागलेल्या आणि बाराव्या वर्षी बालविधवा झालेल्या मुलीचा पुनर्विवाह करणें किंवा तिला नुसतें मनमोकळें अंगणाबाहेर जाऊं देणेंसुद्धां माणुसकीचें वाटलें नाहीं !

होय, शेवटीं कुसुम झुरणीसच लागली. अतृप्त वासनांच्या मानसिक कळा तिला सोसवेचनात ! त्यायोगें तिची क्षीणता वाढत वाढत तिला चोरटा ताप येऊं लागला. तिनें अंथरूण धरलें. आई तळमळे, पण ती औषधपाणी काय करणार ? पैशाचें पाठबळ नाहीं आणि तितकी चिंताही नाहीं. म्हणून डॉक्टर पहाण्याचें नांव गोपाळभटजी कसलें काढणार ? गंगाबाई हें जाणूनच होत्या. पण तरीहि त्या माउलीनें एक युक्ति योजून कुसुमचा जो एक मावसभाऊ चांगला डॉक्टर झाला होता, त्याला घरींच कांहीं दिवस रहावयास बोलावून विनामूल्य कुसुमची प्रकृति परीक्षून घ्यावी असा घाट घातला नि मोठ्या मिनतवारीनें त्यास यजमानांची अनुज्ञा मिळविली.

कुसुमचे मावसभाऊ डॉ. गोविंदराव पत्र पावतांच आले. कुसुमची प्रकृति परीक्षतांच त्यांनीं ताडलें कीं, दुखणें मानसिक हृद्रोग काय तो ! गोपाळभटांच्या मागें गंगाबाईनीं गोविंदरावांशीं मनमोकळेपणें बोलण्या-हसण्याची सवलत कुसुमला देत असावें. दोनचार दिवसांतच गोविंद-रावांनीं तिच्या मनाची सारी व्यथा युक्तीप्रयुक्तीनें तिला हंसवून खेळ-वून समजावून घेतली. त्या हंसण्याखेळण्याचा तिच्या प्रकृतीवर तत्काल इतका चांगला परिणाम झाला कीं, ती दुसरीच कोणी ताजीतवानी कुसुम दिसूं लागली. डॉ. गोविंदरावांनाहि तिचें वाचन, बहुश्रुतता नि

बुद्धि पाहून कौतुक वाटे. त्यांनीं तिला तिच्या मानसिक व्यथेचें मूळ स्पष्टपणें समजावून दिलें आणि अशाच कांहीं बालविधवांनीं धीटपणें स्वतंत्र होऊन आपलें शिक्षण वा पुनर्विवाह करून सुखाचे संसार कसे थाटले त्याचीं उदाहरणेंहि सांगितलीं. शेवटीं तिला आश्वासिलें—

'तुझी इच्छा असल्यास मी तुझ्या शिक्षणाचा भार उचलीन. म्हणशील तर तुझा कुठल्यातरी चांगल्या स्थळीं पुनर्विवाहहि लावून देतां येईल. तुझ्यासारख्या सुबुद्ध, सच्छील, सुरेख नि निकोप तरुणीच्या उदरीं दोनतीन देवदूतांसारखीं बाळं उपजून तुझ्या कुसव्याला आणि आपल्या राष्ट्राला धन्यावितीलहि कचित् ! (उगीच कां झुरावं !) मग काढूं का हा विषय स्पष्टपणें तुझ्या वडिलांपाशीं ?'

'नको नको !' हात जोडून कुसुम म्हणाली, 'ते माझा तरी जीव घेतील नाहींतर त्यांचा तरी देतील !'

'छट् ! तसलं कांहींएक होणार नाहीं. मी समज घालीन. तशी त्यांनीं कधीं अनुज्ञा जरी दिली नाहीं, तरी तूं स्वतंत्रपणें शिक्षण केलंसच तर भलेतीच आडकाठी पण घालणार नाहींत. तुला तर त्यांत कांहींएक पाप किंवा वावगं वाटत नाहीं ना ?'

'मुळींच नाहीं. पण त्यांना सांगू नकोस. म्हणशील तर मीं तुझ्याबरोबर गुपचूप निघून येतें. नेशील का मला ? सोडीव रे मला एकदांची ! माझं जीवन अगदीं नीरस झालं आहे ! त्या मेल्या गाईम्हशी नि मी ! गेलीं सहा वर्षे मी ह्या अंगणाबाहेर पडलें नाहीं बरं ! आणखी सांगू का रे ?— मला कधी कोणाला तरी कडकडून भेटावंसं वाटतं. कोणीतरी मला ध्यावं आणि— ! गोविंदा, तूं खरंच का उद्यां जाणार ? नको रे मला सोडूंस !' असें हृदय हालवून सोडणाऱ्या केविलवाण्या शब्दांत बोलतांबोलतांच तिनें गोविंदरावांच्या गळयास घट्ट मिठी मारली. मनाचे सारे बांध फुटून, सारें भान सुटून त्याचे मटामट मुके घेतले आणि त्यांना घेऊन आपल्या खाटेवर महापुरांत लतामंडप उन्मळून पडावा तशीच ती पडली.

इतक्यांत मागें दार करकरलें. गंगाबाई उभ्या असाव्यातसें तिला वाटलें— आणि तिच्या मनानें भयंकर उचल खाल्ली! तिनें गोविंदरावांना दूर ढकललें. आईनें तें पाहिलें असल्यास आपल्यावर एका अक्षराचाहि बोल येऊं नये म्हणून ती ताडकन् तशीच आईकडे गेली नि रागाचें रडें रडूं लागून स्फुंदली—

'आई, गोविंदा वाईट मनुष्य आहे! मला सहज पाठमोरी पाहातांच त्यानें घट्ट मिठी मारली आणि—किती दुष्ट असतात हे पुरुष!!'

तोंड हातांत झांकून ती हुंदके देऊं लागली! तिच्या आईला ती इतकं खोटं बोलेल हें शक्यच वाटेना!

'गोविंदाला म्हणावं, तूं आतां घराबाहेर जा! मी त्याचं पुन्हा तोंड पहाणार नाहीं! बाबा येण्याच्या आधीं जा म्हणावं!'

कुसुमनें कपटी कोपाची पराकाष्ठा केली!— आणि ती किती सहज साधली तिला!— किंबहुना त्या वेळेपुरतें तेंच तिचें सगळें मन होतें. दुटप्पी कपटाला लागतें तसें तिचें दुसरें मन म्हणून जें होतें, तें त्या भीतीच्या धक्क्यानें तेवढ्यापुरतें तरी चक्काचूर होऊन गेलें होतें!!

आपल्यावर कुसुमनें रचलेलें हें अत्यंत खोटें नि खोडसाळ कुभांड गोविंदरावांना स्पष्टपणें ऐकूं आलें. ते मनांत म्हणाले,

'अरेरे! ह्याच भ्याड मिथ्याचारापायीं स्त्रियांची जगांत जी होते आहे ती पायमल्ली झाली! स्त्रियांच्या पायांतील बेड्या तोडण्यास येणाऱ्या पुरुषाला पहिली शिवी जर कोणीं हांसडीत असेल तर ती बहुधा स्त्रीच होय! स्त्रीस्वातंत्र्याचा खरा शत्रु आज तरी स्वतः स्त्री होच आहे! पण—स्त्रियांचा हा भ्याड मिथ्याचारसुद्धां पुरुषी समाजाच्या धाकदपटशाहीचीच पडछाया आहे हेंहि खोटें नाहीं! कुसुमचा तरी काय दोष! आतां जर मी असाच जाऊन खरें तें सांगेन तर ह्या बिचाऱ्या कुसुमचा सत्यानाश होईल! मला तें ओझें झेंपेल म्हणूनच तिनें हें कुभांड मजवर लादलें आहे, नाहीं का? आपण तिच्या आईच्या

दृष्टीनें दुष्ट ठरलों तरी चालेल— पण ह्या अनाथ मुलीला आणखी दुःख-भोग घडवूं नये हेंच कर्तव्य !’

असा विचार तो थोर मनाचा डॉक्टर करीत आहे तोंच त्याची मावशी गंगाबाई तिथें आली.

‘गोविंदा, झालं तें झालं ! मुलीसाठीं मी तुझ्या ह्या दुर्वर्तनाचा सुद्धां गाजावाजा करीत नाहीं. तिकडं देखील सांगणार नाहीं. पण तूं आतांच्या आतां येथून जावं हें बरं !’

डॉक्टर गोविंदराव पाणीसुद्धां न पितां त्या घरांतून पुढच्या दारांतून खरोखरच बाहेर पडतो आहे हें कुसुमला दिसतांच आपल्या देहांतून आपला जीवच बाहेर पडतां आहे अशा तीव्र वेदनेची तिच्या हृदयांत कळ आली.

‘गोविंदा ! नको ! नको जाऊंस रे मला सोडून ! अरे मला पण ने नं ! गोविंदा, ए गोविंदा ! ! !’ अशी अगदीं किंकाळयाच फोडीत ती जी धांवली ती त्या उन्मादाच्या झटक्यांत पुढच्या दाराच्या उंबरठ्याची ठेंच लागून धाडकन् अस्ताव्यस्त पडली !

ह्या गोष्टींतील हेंच तें शेवटचें समाजचित्र ! अगदीं ताजें—अगदीं गेल्या वर्षीचें ! ! !

—१९३६

★

# गोविंदा गवळी

: २ :

गोविंदा गवळी पूर्वी मुंबईस गिरणींत काम करीत असे. पुढें उतरत्या वयांत काम होईनासें झालें, शक्ति घटत नी ऋन चढत चाललें, तेव्हां एक दिवस स्वारी सहकुटुंब गुपचुप निघून, बेपत्ता होऊन, कोंकणांत समुद्रकाठीं असलेल्या आपल्या मूळच्या गांवच्या, मूळच्या झोंपडीवजा कंबळी घरांत येऊन राहूं लागली.

मुंबईहून त्या झोंपडीवजा घरांत परत येतांना त्यानें मुंबईची मिळकत म्हणून जी एकच गोष्ट आणली, ती लॉटरीचा नाद!

मनुष्यांनीं चालविलेल्या लॉटरीचीं तिकिटें त्यानें अनेकवार घेतलीं होतीं; पण त्यांत त्यास अजून केव्हांही यश म्हणून आलें नव्हतें. तथापि लॉटरीचा निकाल म्हणून जो प्रसिद्ध होई त्यांत कोणास तरी पांच हजार रुपये मिळाले म्हणून 'छापून' येईच. त्या कोणाचा गोविंदाला जरी पत्ता नसे, तरी 'छापांत' येईल तें खोटेंही असूं शकतें अशी त्याला

स्वप्नांतही शंका येत नसे. जुन्या शास्त्रीपुराणिकांचा, अमुक गोष्ट अगदीं खरी असलीच पाहिजे हें सिद्ध करण्याचा अमोघ पुरावा म्हणजे 'पोथींत' तसें आहे हा; तसाच कोणच्याही गोष्टीच्या अशंकनीय खरेपणाचा खेड-वळ लोकांचा पुरावा म्हणजे 'छापांत' तसें आलें आहे हाच. त्यामुळें अमक्याला पांच हजार मिळाले असें 'छापांत' वाचलेलें ऐकतांच गोविंदा त्या अमक्याच्या मुद्रेची कल्पना करीत आपल्या खोलींत पडे नी ही पांच हजारांची रक्कम अचानक त्या अमक्याच्या हातीं पडतांच त्याची मुद्रा कशी 'दारू प्यालल्यावाणी' तर्रर झाली असेल, तो गिरणी कामास लाथ मारून 'गिरणीच्या शेटावाणी' लगेच गाडीघोडा उडवीत, साऱ्या मुंबईंत हिंडत, बोलपट, नाटक, तमाशा पहाण्यांत कसा चूर झाला असेल, त्याचें चित्र, आपल्या तशा संभवनीय अनुभवाचें, भडक रंगतां चितारूं लागे. लगेच त्याचा निश्चय होई, 'शहाणे म्हणतात तेंच खरें! गोंद्या, चल, फिरून यत्न करून पहा!' त्यासरशीं शहाणा होऊन तो पुन्हा कोणाच्या तरी दुसऱ्या सोडतीचें रुपाया आठ आण्यांचें तिकीट घेऊन त्या पांच हजार रुपयांच्या त्याच्या हातांत अचानक पडणाऱ्या रकमेची नी छापांत अचानक झळकणाऱ्या त्याच्या 'गोविंदा गवळी' या नांवाची वाट पहात आशेच्या आनंदाची निशा भोगूं लागे.

त्यानें मुंबईहून आल्यावरही कोंकणांतल्या त्या गांवीं बसून स्वतः उपासतापास काढीत वांचविलेल्या रुपाया आठ आण्यांत दोनतीनदां लॉटरीचीं तिकिटें काढलीं होतीं. त्याला जर कोणी म्हटलें कीं, "अरे, तुला पोटापाण्याची ढंचाई कोण! तेव्हां कुठला तरी धंदा करावयाचा का कडोसरीस नसला तरी पोट मारून रुपाया काढायचा नी सोडतींत दवडायचा!" तर तो मनाशीं म्हणे कीं, धंदा करावयाचा तर त्याला हवें तें भांडवल कुठून आणूं! ही एक म्हैस मीं घेतली तर पांचपन्नास रुपये खाऊन बसली. तिचें दूध विकून दहापांच रुपये जेमतेम पदरीं बांधतां यतात, येतील; पण या जन्मांत तरी तिच्यावर पांच हजारांची रक्कम गांठीस बांधतां येईल का? ज्यांच्यापाशीं लाखों रुपये आहेत

त्यांनीं तर लॉटरींत दहापांच रुपये फेंकावेच. कारण त्यांना ते बुडाले तरी दहापांच रुपयांची क्षितीच वाटत नसते. पण ज्यांच्यापाशीं धंद्याला म्हणून भांडवलच नाहीं त्या दरिद्री बापड्यांनीं देखील ह्या लॉटरीच्या धंद्यांतच काय तें आपलें एका अर्ध्या रुपयांचें असलें नसलें भांडवल टाकणें हा शहाणपणा आहे. कारण एका रुपयाच्या भांडवलावर आज नाहीं उद्यां एकदम एकगांठी दहापांच हजार रुपये व्याज अचानक मिळवून देणारा धंदा ह्या जगांत जर कोणचा असला, तर हा लॉटरीचाच काय तो आहे! त्या अमक्याला नाहीं का मिळाली अशी रक्कम नी त्या तमक्याला सुद्धां! 'छापांत' काय खोटं छापतात वाटतं कधीं!! ज्याच्यापाशीं फार फार तर रुपयाच काय तें भांडवल असू शकतें त्यास लाभकारक धंदा असा एकच—लॉटरी!

असें विवंचून त्यानें पुन्हां लॉटरीचें तिकीट काढावें. असें कितीदां तरी झालें; पण कांहीं केल्या त्याला मनुष्यानें काढलेल्या लॉटरींत पारितोषक म्हणून मिळेना! तेव्हां त्यानें या पाळीला ज्या मनुष्यानें काढलेल्या लॉटरीचें तिकीट घेतलें त्याला यशाची निश्चिति लाभावी म्हणून देवाच्या नांवें पुरातन काळापासून चालत आलेल्या सुप्रतिष्ठित अशा दैवी लॉटरीचेंही दुसरें तिकीट काढलें, त्यानें नवस केला—कीं, जर या वेळच्या या मानवी लॉटरीच्या तिकिटाचा त्याच्या नांवाचा क्रमांक यशस्वी होऊन त्याला कांहीं तरी पारितोषक मिळालें तर "देवा मोरया, तुझ्या नांवें एकवीस ब्राह्मण जेवूं घालीन, मोदक वाढीन, संकष्टी चतुर्थीचें व्रतही करीन!"

* * *

नवस ही एक देवाच्या नांवें चाललेली दैवी लॉटरीच नाहीं काय? मानवी लॉटरींत शेंकडों वेळां फसगत होते; पण केव्हांतरी लागोभागो तीन टोले होऊन दहा हजारांत एखाद्याला एखादें पारितोषक मिळून जातें. नवसाचेंही तसेंच आहे. शेंकडों वेळां नवस खोटे ठरतात. जो जो मनुष्य आजारी पडतो त्याच्या बरे होण्यासाठीं बहुधा दहापांच



नवस होतच असतात. पण लाखांनीं माणसें मरतच असतात ! तितके लाखों नवस खोटे पडतातच कीं नाहीं ! लहान माणसांचे कोंबडीं बकरीं कापण्याचे नवसच नव्हत, तर मोठमोठ्या राजे–महाराजांच्या प्राणांतिक दुखण्यांच्या महादानांचे नवसही लटके पडतात. पहिले माधवराव पेशवे क्षयानें मरणीं टेकले तेव्हां गोपिकाबाईनीं साऱ्या महाराष्ट्र राज्यभर ठिकठिकाणीं हजारों ब्राह्मण बसवून देवळोंदेवळीं अधिकाऱ्यांच्या सक्त देखरेखीखालीं मृत्युंजय मंत्राचा कोटी जप करविला. पण ती कोटीची संख्या पुरी झाल्याची वातमी येते तोंच माधवराव पेशवे मरायचे ते मेलेच ! तो नवस व्यर्थ गेला ! पानपतची लढाई जिंकली गेली तर लाखो रुपयांच्या धर्मादायाचें नवस मोठमोठ्या जागृत देवदेवतांना पेशव्यांनीं केले होते. पण ते सारे विफल होऊन पानपतीं महाराष्ट्राची दोन लाख बांगडी फुटली ! पण हे लटके पडलेले लाखो नवस आपण विसरून जातों–आणि मुलगा व्हावा म्हणून जिजाबाईनें केलेला भवानीचा नवस योगायोगानें सफल होऊन शिवाजी जन्मला तर त्या एकस्यादुकस्या नवसावर कथा रचल्या जातात, पोवाडे गायिले जातात ! ज्या ज्योतिषांचीं लाखों भविष्यें खोटीं पडतात त्याचें काकतालीय न्यायानें एखादें भविष्य खरें ठरतांच तो तेवढेंच आपल्या प्रसिद्धकांत (जाहिरातींत) छापून प्रख्यात ज्योतिषी म्हणवितो, तसेंच ह्या नवसांचें प्रस्थ भाबड्या लोकांच्या विस्मृतीवर काय तें उभारलेलें असतें. खोटे पडलेले लाखो नवस विसरून सहजगत्या बोलाफोलास गांठ पडतांच, नवसावांचूनही जें कार्य ज्या साधनांनीं शेंकडों वेळां घडलें तेंच त्याच साधनांनीं धडधडीत घडलें असतांही त्या वेळीं केलेल्या नवसानेंच तें केलें असें भोळे लोक मानतात आणि तेवढ्याच नवसाचा काय तो चहूंकडे बोलबोला होऊन, देव नवसास कसा पावतो पहा, म्हणून जो तो म्हणूं लागतो. जो तो नवसाच्या दैवी लॉटरीचें तिकीट दर्शनीहुंडीच्या पतीसारख्याच अमोघ पतीचें मानून पुनःपुन्हा काढीत असतो.

एक वेळ मानवी लॉटरीला तरी थोडेंबहुत बूड असतें, पण ही नव-

साची दैवी लॉटरी अगदीं चकचकीत बिनबुडाची असते. मानवी लॉटरी निवळ फसवणुकीची ठरली तर सरकार कधींकधीं त्या भामटेगिरीच्या चालकांना दंड तरी करतें; पण देवाला दंड कोण करणार ? त्याच्या नांवें चाललेल्या या नवसाच्या दैवी लॉटरीचीं सारीं तिकिटें जरी खोटीं ठरलीं तरी कोणी विचारता ना पुसता ! एखाद्याचे सारे नवस खोटे ठरले तरी दोष कोणी कोणास दिलाच तर त्या फसलेल्यासच दिला जाणार ! 'तुझा भावच खोटा म्हणून तुझ्या नवसाला देव पावला नाहीं !' असेंच जो तो म्हणणार ! पण तरी देखील—

लाखो तिकिटें फुकट जातात तरीही जशा लॉटऱ्या चालल्याच आहेत, तसे लाखो नवस लटके पडतात तरीही लोक नवस करीतच आहेत ! !

गोविंदा गवळ्यानेंही त्या दोन्ही सोडतींचीं तिकिटें काढलीं. प्रथम लॉटरीचें तिकिट काढलें नी तें यशस्वी व्हावें म्हणून त्याचें कुलदैवत जें मोरया त्याला नवसही केला ! नुसतें लॉटरीच्या तिकिटांत यश यावें म्हणूनच नव्हे तर आपल्या कुटुंबावरचीं सारीं संकटें टळावीं यास्तव त्यानें संकटचतुर्थीचेंही व्रत केलें.

* * *

त्या गांवांत गोविंदा गवळ्याच्या ओळखीचा एक कासम नांवाचा मुसलमान मनुष्य होता. त्यानेंही लॉटरीच्या व्यसनांत कित्येक रुपये दवडले नी दमडीही कमावली नव्हती. त्यानेंही गोविंदाबरोबर एक तिकीट त्याच लॉटरीचें घेतलें. मोरयाच्या नांवें गोविंदानें नवस केला; तसाच आपणही खुदाचा वशिला लॉटरीकडे लावावा म्हणून कासमनेंही त्याच्या गांवीं गंडेदोरेखिचडी प्रभृति नवस पीराच्या नांवें घेणाऱ्या एका फकीराकडे जाऊन पीरास नवस केला. नवसाच्या लॉटऱ्या हिंदूंतच भरभराटलेल्या आहेत असें नाहीं. हिंदु एकपट धर्मभोळे तर मुसलमान सातपट धर्मभोळे. इतकेंच नव्हे, तर ते त्या व्यतिरिक्त बहुधा धर्मवेडे नी धर्मोन्मत्तही असतात. देव पावला नाहीं तर वैतागून हिंदु फार तर देवापुढें आपलेंच डोकें फोडील; पण मुसलमानांत खुदानें

पावावें म्हणून दुसऱ्याचें डोकें फोडण्याचा नवस देखील करणारे अल्ला-उद्दीन खिलजी किंवा 'माय ब्रेव्ह मोपला ब्रदर्स' कांहीं थोडेथोडके निवत नाहींत.

तेंच कशाला, वाटमारे नी ठग यांच्याही देवता असतात! आणि लग्नाचीं वऱ्हाडें लुटण्यांत जर आम्हाला या वर्षींच्या लग्नसराईंत खूप यश मिळेल तर कोणातरी वधूवरांचें रक्त तुला वाहूं, किंवा एखादा तरी नरबळी तुला देऊं म्हणून नवस ते करतात आणि त्या नवसालाही केव्हां केव्हां देव किंवा खुदा पावतो!! वास्तविक दरोडेखोरांना ज्या मानानें त्यांची तडफ, क्रूरता, शस्त्रास्त्रें, कारागिर असतात त्या मानानेंच दरवड्यांत यश मिळतें. देव वा अल्ला स्वतः कधींच दरवड्यांत भाग घेत नाहीं किंवा नवस करून झोंपी गेलेल्या दरोडेखोर भक्तासमोर, स्वतः दरोडा मारून देव वा खुदा दरवड्याचें द्रव्य आणून ओतीत नाहीं. पण दरवडेखोर यश पावतात त्यांच्याच प्रत्यक्ष प्रयत्नानें आणि समजतात तें नवसानें मिळालें म्हणून! त्यांचेही शेंकडों नवस लटके पडतात पण ते विसरून जो एखादा बोलाफोलास गांठ पडून खरा ठरल्यासारखा भासतो तेवढाच ते ध्यानांत ठेवतात नी नवसाच्या बिनबुडी लॉटरीचे अभिमानी बनतात!

* * *

लॉटरीच्या निकालाची तारीख उलटली. गोविंदा गवळी नी कासम दोघेही टपालवाल्याच्या वाटेकडे प्रत्यहीं सकाळपासून डोळे लावून वसूं लागले. तो दिसतांच 'आमचें कांहीं आहे का?' म्हणून धडधडत्या काळजानें विचारीत. त्या टपालवाल्यानें स्थितप्रज्ञ उपेक्षेनें नकारार्थी नुसती मान हालवून पुढें पाऊल टाकलें कीं त्यांस त्या टपालवाल्याचाच अगदीं मनापासून राग येई. गोविंदा लगेच मनाला म्हणे, 'दैवास दोष! तो टपालवाला काय स्वतःच मला हवें तें पत्र लिहून धाडणार होता कीं काय!' आणि चूप राही. पण कासमनें तिसऱ्या दिवसा-पासून आपल्या निराशेचा राग त्या टपालवाल्यावरच काढण्यास

आरंभिलें. ‘ क्या साला मगरूर है यह पोस्टमन ! हाथ में चिठ्ठी है या नहीं देखता भी नहीं ! इस काफरकोही लाठीसे जरा नरम करना पडेगा, तब यह डाकू जिसका खत उसको ठीक वक्तपर पहुंचायेगा ! ’

तीनचार दिवस आणखी गले तों गणेशचतुर्थी आली. त्या दिवशीं घरांतून गोविंदा म्हैस सोडूनबिडून बाहेर पडतो तों टपालवाला नीट त्याच्याच दाराशीं येतांना दिसला.

‘ गोविंदा; तुझी मनीऑर्डर आली आहे. ’ टपालवाला म्हणाला.

‘ काय आली ? मनीऑर्डर ? माझी ? ’

‘ होय शंभर रुपयांची ! ’

गोविंदा गवळयास उभ्या जन्मांत स्वतःच्या नांवें मनीऑर्डर येण्याचा हा पहिलाच प्रसंग ! त्यांत ती शंभर रुपयांची मनीऑर्डर ! खरी देखील वाटू नये इतकी चांगली ती बातमी ! गोविंदाचें ऊर धडधडूं लागलें. सहीवीही कुठें करायची तें टपालवाला सांगेल तसें सुन्नपणें सारें करून शंभर रुपये त्याच्या हातांत पडले, तरी त्याला तें नक्की काय घडतें आहे तें आकळेना. सोबतचें पत्रही वाचलें. लॉटरींत त्याचा क्रमांक कुठेंसा येऊन त्याला शंभर रुपये मिळाले इतकें अगदीं खरें !

शंभर रुपये ! एक रकमी ! अगदीं रोकड ! त्याचे हातीं ! ! ! मरे मरेतों खपून पांचपंचवीस रुपयांपलीकडे ज्याच्या घरांत कमाईची रक्कम म्हणून जन्मांत दिसली नाहीं त्याला काबाडकष्ट न करतां अचानक शंभर रुपये रोख मिळावे ! खरोखर लॉटरीसारखा धंदा नाहीं, मोरया-सारखा देव नाहीं, नवसासारखी सोडत नाहीं !

त्याच दिवशीं गणेशचतुर्थी. त्यामुळें मोरयाला केलेल्या नवसामुळेंच हें यश आलें, अशी त्याची पक्की निश्चिति झाली. त्याच्या बायकोचाही आनंद हृदयांत मावेनासा झाला. ती म्हणाली, “ तुमचा नवस लॉटरी-पुरता जसा खरा झाला तशीच संकष्टीचतुर्थीची प्रचीती येऊन तुमचा आजार, बेकारी, इडापिडा, समदीं संकटं आतां टळणार ! चांगले दिवस आणले वरं बाप्पा मोरयानं ! ”

ह्या वर्षी गोविंदा गवळ्यानें गणपतीचा उत्सव मोठ्या गाजावाज्यानें केला. साऱ्या गांवांत त्याला लॉटरीची रक्कम मिळाल्याची आणि तें यश -गणपतीला केलेला नवस सफळल्यामुळें आल्याची अद्‌भुत कथा ज्याच्या त्याच्या तोंडीं झाली.

कासमला लॉटरींत कांहीं मिळालें नाहीं. त्याचा पीराला केलेला नवस विफळला, हीहि टीका जो तो करूं लागला. त्यामुळें कासम नी पीराच्या नांवें नवसाची लॉटरी काढून बसलेला तो फकीर हे मात्र चिडून गेले. असले नवस या जगाच्या यशापयशाच्या प्रश्नीं फुकट असतात हें सत्य शिकण्याचें सोडून कासमनें नी फकिरानें गोविंदास नी त्याच्या मोरयास यथेच्छ शिव्या हांसडल्या. 'देख लेंगे तेरे को भी' म्हणून कासमनें मूठ वळवून गोविंदाच्या तोंडावर हातवारे करीत धमकावलें. गोविंदाही कच्च्या मातीचा नव्हता. 'जा रे! अशा कावळ्यांच्या शापानें ढोरें मरत नसतात! जा!' म्हणून कासमलाही धिक्कारिलें.

* * *

आज साऱ्या गांवभर गणपती बोळविण्याची धांदल चालू आहे. सारे मार्ग 'मोरया! मोरया'! अशा जयजयकारानें घुमत आहेत. त्या साऱ्या जयघोषाहून उंच जयघोष होता गोविंदा गवळ्याचा. त्याची चिमुकली गणपतीची मूर्ति आपल्याच हातीं उंच धरून 'मोरया! मोरया!' गर्जत तो पुढें आणि त्याचीं मुलें टाळया वाजवीत मागं, अशी त्या बापड्यानें आपल्यापरी मोठी थाटाची मिरवणूक काढून गणपती समुद्रावर आणला. अत्यंत भक्तिभावानें मनांत आभार मानलें-'देवा मोरया, मला लॉटरींत यश दिलेंस, माझ्या नवसास पावलास! संकष्टी चतुर्थीचें व्रतही सफळवून तूं माझीं सारीं संकटें निवारशीलच निवारशील! गणपतीबाप्पा मोरया; पुढच्या वर्षी लवकर या!!" असें गर्जून ती लहानशी मूर्ति हातीं घेऊन त्यानें समुद्रांत उडी घातली. आणखीहि दहापांच कसलेले पोहोणारे त्यांच्या मूर्ती सगळयांच्यापुढें बुडविण्यासाठीं पोहत निघाले. गोविंदा कसलेला पोहोणारा व तो सगळयांच्या पुढें निघाला, अंधार पडत आला होता.

तोंच समुद्राच्या दोन तीन लाटा अचानक इतक्या उंच उसळल्या नी इतकी चवताळलेली आपटधोपट करूं लागल्या कीं, ते पोहोणारे लोक मूर्ति झटकन त्या लाटांतच सोडून कसेबसे परत तीराला लागले.

पण गोविंदा ? तो कां रेंगाळला ? त्याचीं मुलें वाळवंटीवर खिरापत वांटीत बागडत होतीं. तीं त्या परतलेल्यांना विचारूं लागलीं 'बाबा कुठें आहेत ?' बोलतां बोलतां जो तो विचारूं लागला, 'गोविंदा कुठें ?' तोंच शेवटचा जो तटास लागला तो पोहोणारा ओरडला, 'अरे बुडाला ! गोविंदा बुडाला ! लाटांच्या कैचींत दबून–पुढें दिसला म्हणून नाहीं मला !' पोलिसांनीं मचवे सोडले, जिकडे तिकडे हांकाहांक झाली– पण पत्ता नाहीं ! गोविंदा आपला गणपती सगळ्यांत पुढें नेऊन बुडविण्याच्या धांदलींत समुद्राच्या वादळी लाटांत गडप झाला !

गणपतीचें घर जें कैलास–थेट तेथें गणपती गोविंदास घेऊन गेला ! गणपतीबरोबर शक्य तितकें पुढें जातां जातां गोविंदा थेट कैलासास गेला ! गोविंदा कैलासवासी झाला ! !

※ ※ ※

गोविंदाच्या ज्या अंगणांत तिसरे प्रहरीं ती आनंदाची मिरवणूक मातली त्याच अंगणांत तिन्हीसांजा उलटून जातात न जातात तोंच एकच रडारड माजली ! त्याची धायधाय रडणारी बायको; त्याची मुलें, समजावित्या शेजारच्या आयाबाया–एकच आकांत झाला ! आपल्या नवसास पावून आपलीं सारीं संकटें दूर करणारा म्हणून ज्या मोरयास मिरवत आणलें त्यालाच मिरवत नेतांना त्याच्याच पायीं आपल्यावर हें महासंकट गुजरावें 'असा माझा घात देवा, तूं केलास तरी कसा !' असें विचारून ती विचारी गोविंदाची बायको विवळत होती ! तिचा उपाध्याय पांडुभटजी तिथें येऊन शक्य तें समाधान करूं लागला तों ती अधिकच तळमळून हंबरली, 'भटजी, भटजी, माझ्या गोविंदानें किती हो कळवळून आतांच देवास विनविलें होतें–गणपतिबाप्पा मोरया

पुढच्या वर्षी लवकर या ! भटजी ! मोरया पुढच्या वर्षी येतीलच, पण माझा गोविंदा मात्र आता पुन्हां—! हाय रे दैवा, हाय ! '

पांडुभटजींच्या देखील डोळयांस टच्कन् पाणी आलें. तें उपरण्याच्या पदरानें टिपीत आहेत तोंच—

'क्यों. पांडुभट. अब रोते हो क्यों भाई ? अब तुम्हारे मोरयाके नामसे रडो—दैवके नामसे क्यों रोते हो !' त्या झोंपडीच्या अंगणांतील हिरवळीवर उभा असलेला आणि दंश धरून अचानक निघालेल्या नागासारखी त्याच्या मानेची फणा उर्मटपणें उभारलेला कासम होता तो ! 'मोरया नवसास पावतो ना ? या गोंद्याची सारीं संकटें तो हरणार होता नाहीं ? दिलें लॉटरीचें तिकिट नी हरून नेला प्राण ! ये तुम्हारे मिट्टीके देव देखो ! अब तो फेंक दो उनको और भजो हमारा पीर ! आमच्या खुदाला जो नवस करतो त्याचे निदान प्राण तरी जात नाहींत ! मोरयाला भजणारा गोंद्या मेला—पण मी ? मोरयाला दगड म्हणणारा हा मी कासम जिवंत आहे बघ ! सच्चा है मेरा पीर और—अबबव ! काटा ! या अल्ला ! तोबा !... '

पहिलें वाक्य अर्धेच सोडून कासमनें अकस्मात् असें मोठ्यानें ओरडून पाय फडफड झटकला. त्याच्या पायास विळखा मारून कडकडून डसलेला एक भयंकर नाग सटकन खालीं पडला आणि त्या हिरवळींतून फुसफुस करीत सपासप जो निसटून गेला तो मंद चांदण्याच्या एका किरणांतून जवळच्या शेतांतील बिळांत जातांना चक्क दिसला !

कासम तडफडत तिथें मेला !

देव कीं दैत्य ? कोणाचा नवस खरा ? कोणाचा खोटा ?

* * *

'प्रामाणिक लॉटरींत कांहीं तिकिटें यशस्वी व्हायचींच. गोविंदाचें तिकीट उचललें गेलें म्हणून त्याला पारितोषक मिळालें. कासमचें तिकिट उचललें गेलें नाहीं म्हणून त्याला कांहीं मिळालें नाहीं.

घडघडींत कार्यकारणभाव ह्या दोन घटना उलगडवून दाखविण्यास जितका पुरायचा तितका पुरतो. त्यापलीकडे नवसानें अधिक काय केलें ? कोणचा अधिक पटणारा कार्यकारणसंबंध उलगडला ? याचा नवस सफळला तर त्याचा विफळला! आणि नवसाचें थोतांड ज्या युरोपमधून आजकाल जवळजवळ नामशेष झालें आहे त्यांत शेंकडों लॉटऱ्यांत हजारों लोकांस नवसावांचूनही पारितोषकें मिळत आहेतच कीं नाहींत!

भर समुद्रांत पोहण्याची शक्ति संपली म्हणून गोविंदा बुडाला !— गुरुत्वाकर्षणाच्या नियमाला मोरया उलटवूं शकला नाहीं. सापाच्या शेपटीवर पाय पडतांच साप चावला नी तें विष उतरविणारें औषध वेळींच मिळालें नाहीं म्हणून कासम मेला !— शारीरिक नियमांस अल्ला उलटवूं शकला नाहीं. या दोन घडघडीत सृष्टिनियमांनीं या दोन घटनांचा जो कांहीं उलगडा होतो त्याहून कोणचा अधिक समंजस नी अव्यभिचारी कार्यकारणसंबंध नवसांच्या भाकड गृहीत कृत्यानें स्थापिला जातो !

मोरया मोरया करीत गोविंदा मेला ! या अल्ला, या अल्ला करीत कासम मेला ! देवाच्या म्हणा, वा दैत्याच्या म्हणा अशा कोणाच्याही भाकड नांवावर चालविलेला नवसाचा धंदा म्हणजे एक अगदीं अनवलंबनीय, पोकळ आणि बिनबुडाची सोडत आहे !! नुसत्या नवसानें कार्य घडतही नाहीं, बिघडतही नाहीं! 'नवसें कन्यापुत्र होती। तरि कां करणें लागे पति' असें तुकारामची विचारतात !

नवस फेडण्यासाठीं मक्केला जाणाऱ्या मुसलमानांचीं कित्येक जहाजें पश्चिम समुद्रांत ( अरबी समुद्रांत ) बुडतात. नवस फेडण्यासाठीं पंढरीच्या यात्रेला जाणारे शेंकडों वारकरी महामारीनें चंद्रभागेच्या वाळवंटावर पटापट मरतात !

ज्या घटनांचा कार्यकारणभाव स्थापिणारा सृष्टिनियम आपणास आज अवगत नाहीं त्यास कोणी 'चमत्कार' म्हणतात, कोणी त्यासच नांव देतात 'नवसास देव पावला !' 'चमत्कार' किंवा 'नवसास देव पावला' हीं दोन्हीं नांवें अज्ञानाचे प्रतिशब्द आहेत; ज्ञानाचे नव्हेत !

ना. के. ५-१-१-१६०.
वाचनालय शाखा

# पित्र्यांचें दुसरें लग्न कसें फिसकटलें ? : ३ :

सत्य म्हणजे जवळ जवळ जशी त्यांनीं स्वतः आम्हांस सांगितली तशीची तशीच; पण तरीहि 'कथा' एवढ्याचसाठीं म्हटली कीं, तींत नांवें गांवें तेवढीं, भाग पडलें म्हणूनच, बदललीं आहेत नी घटनेशीं घटना जुळवून घेतल्या आहेत.

ज्यांना जुन्या समाजस्थितींतील कांही गोष्टी टाकाऊ वाटतात ते जुन्या पात्रांची एक कल्पित कथा रचून तींत त्या गोष्टीचा विपाक किती हानिकारक वा हास्यास्पद झाला तें वर्णूं पहातात. उलटपक्षीं ज्यांना नव्या समाजस्थितींतील कांहीं पालट भयावह वाटतात तेही त्या पालटांची हिडीस वा अनिष्ट बाजू उठावदारपणें रंगविली जाईल अशी पात्रांची नी परिणामांची कल्पित जुळणी सहज करूं शकतात. अशा कल्पित कथा–कादंबऱ्यांचीही ती ती बाजू समाजाच्या मनावर ठसठशीतपणें अंकिण्यास पुष्कळ उपयोग होतोच होतो. परंतु नव्याचा वा जुन्याचा दुर्विपाक दाखविणाऱ्या कल्पित गोष्टींस झिडकारून जुन्याचे वा नव्याचे अभिमानी त्या कल्पितकथेच्या फुगलेल्या शिडांस

ज्या एका डोल्यासरशीं फाडून, त्यांतील सारा वारा काढून तें शीड अकस्मात ढिलावून सोडतात तो डोला ह्याच आक्षेपाचा असतो कीं "जा रे ! कल्पनाच करायची तर वाटेल ती करतां येईल ! 'एकच प्याला' नाटकांत दारू पिऊन बायकोला मारणारा नवरा जसा दाखविला आहे तसा दारू पिऊन बायकोला कडेवर घेऊन नाचणारा नवराही दाखवितां येईल ! सिंधूसारखी दारुड्या नवऱ्याची पतिव्रता बायको आज बामकांच्या कैवाऱ्यानें रंगविली, तशी स्त्री जात्याच कुलटा असते, 'पुमान्नित्येव भुंजते' हें पुरातन सूत्र समर्थिणाऱ्यांना जाराचे नादीं लागून, दारू पिऊन, नवऱ्याचा गळा कापणारी सिंधूही रंगविणें कठिण नाहीं ! बोलून चालून भाकडकथा ! विचारतो कोण तिला !"

कल्पितापेक्षां घटिताचा परिणाम नेहमींच शतपटीनें अधिक टिकाऊ, अधिक लागू, अधिक विश्वसनीय असणारच असणार. अर्थात् समाजांतील कोणत्याही रूढीचे सुपरिणाम वा दुष्परिणाम अखंडनीय पुराव्यानें सामाजिक मनावर ठसविण्यास सत्यकथांचा उपयोगही तितक्याच पटीनें अधिक होणार. त्यांच्या तात्पर्याला तितकें सहजासहजीं प्रतिपक्षालाही हेटाळतां येत नाहीं. उदाहरणार्थ—विवाहाचा विषय घेऊं. लेखकाच्या लहरीप्रमाणें विवाहाच्या प्रौढ वा बाल, सवर्ण वा अवर्ण, स्वतंत्र वा परतंत्र अशा वाटेल त्या प्रकाराचा सुखद परिणाम कादंबरीकारास सहज रंगवितां येईल. तो विवाह साजरा करावयास त्याला हवी ती घटनांची सामग्री कल्पनेच्या हाटांत वाटेल तितकी मागण्यावारी मिळूं शकते, त्यामुळें कल्पित प्रबंध इतर दृष्टीनें कितीही उपयोगी वा आकर्षक असले तरी विवाहांच्या जुन्या वा नव्या प्रकारांत समाज किती सुखी वा दुःखी असूं शके किंवा शकतो तें निर्विवादपणें ठरविण्यास तशा खरोखरच घडलेल्या विवाहांच्या आणि विवाहविषयक घटनांच्या वैयक्तिक सत्यकथा ह्याच, निर्भेळ वृत्तांताचे खालोखाल, उपयोगी पडणाऱ्या असतात; आणि केव्हां केव्हां कल्पिताहून अधिक आकर्षक नी रोमहर्षण असूं शकतात.

समाजाच्या वास्तव परिस्थितीवर लख्ख प्रकाश पाडणारी अशीच एक सत्यकथा आणि त्याच विवाहविषयक प्रकरणीं आम्हांस श्री. पित्रे ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळाली, ती पूर्वी त्यांच्या स्वतःच्याच होऊं घातलेल्या दुसऱ्या लग्नाची. त्यांच्या स्वतःचीच फसगत तींत असतांही ती त्यांनीं स्वतःच न लपवितां सांगितली ह्यावरून नी त्यांच्यासारख्या सरळ मनाच्या सद्‌गृहस्थानें ज्या निष्कपट सहजपणें ती सांगितली त्यावरून ती जवळजवळ अक्षरशः खरी आहे अशी ग्वाही आमचें मन देत होतें. पण तरीहि ती आम्ही त्यांतील दोघांतिघां महत्त्वाच्या शिष्ट पात्रांकडून पडताळूनही पाहिल्यामुळें तिच्या सत्यतेविषयीं आम्हांस शंकाच उरली नाहीं.

आजचा काळ तर बोलूनचालून शारदा निबंधाच्या कलियुगाचा ! पण जेव्हां 'अष्ट वर्षा भवेत्कन्या'चा अगदीं सत्ययुगीन काळ होता तेव्हां त्या सनातन सूत्राप्रमाणें चालणाऱ्या धर्मशील लोकांचीही विवाह नीति प्रसंगीं काय काय रूपें धरी हें यथातथ्य दाखविण्यासही सत्यकथा एखाद्या आरशासारखी कामीं येते. त्या संभाषणाचा महत्त्वाचा भाग असाः—

" म्हणजे ? तुम्ही पेशावरकडे नौकरीवर असतांनाच तुमचें पहिलें कुटुंब इकडे वारलें ? त्या कुठं असत ? "

" माझ्या पत्नी म्हणजेच सौभाग्यवती इंदिराबाई पित्रे ! तुमच्या शितूत डॉक्टरांच्या नातलग लागत त्या, आलें ध्यानांत ? त्या वारल्याचें कळतांच मी ती दीडशें रुपये दरमहाची पेशावरची नौकरी सोडून तडक महाराष्ट्रांत परत फिरलों. तिकडील मंडळींनीं पुष्कळ म्हटलें कीं ' पित्रे, तुम्ही असे बैरागी काय होतां एकदम ! नौकरी सोडूं नका.'—पण मीं कांहीं ऐकलें नाहीं. तडक पंढरपूरला परत आलों. पहिलें कुटुंब जें वारलें त्यापासून झालेलीं माझीं दोन लहान मुलें त्यांच्या आजोळीं पोंचविलीं आणि रामभाऊंनीं बोलावल्याप्रमाणें त्यांच्या भेटीस गेलों. जातांच रामभाऊंनीं मला स्पष्टपणें सांगितलें कीं

'तुमच्या मनांत असेल तर एक छान मुलगी कोंकणांत आत्ताचे आत्तां मिळण्यासारखी आहे. तेव्हां, पित्रे, तुम्ही ही लग्नसराई हातची जाऊं देऊं नये. तुम्हास दुसरी कांहीं एक उठाठेव करावयास नको. ज्यांनीं माझें दुसरें लग्न गेल्या वर्षी असेंच बिनबोभाट जुळवून दिलें ते धोंडभट जोशी हेच तुमचें हें लग्नही जुळविणारे ! मग चिंता काय ! त्यांनीं कोंकणांतल्या अशा अनेक मुलींचीं लग्नें देशावर जुळवून आपल्या घरीं पार पाडलीं आहेत. तुम्ही नुसते एकटे जरी तिकडे जाल तरी बाकीचे सगळे सोहाळे ते जोशीबुवा उरकून घेतील नी येतांना तुम्ही नवीन बायको खाकोटीस मारून जोडीनें याल ! माझें पहिलें कुटुंब निवर्तल्याचें ऐकतांच मला धोंडभटजींनीं असेंच एकटें कोंकणांत बोलावून नेलें आणि आठदहा दिवसांत सारा विधी उरकून मुलगी माझ्या पदरांत टाकून, माझी सहकुटुंब पाठवण करून दिली. या, आंत या असे ही पहा ती मुलगी. हें आमचें द्वितीय कुटुंब. गेल्याच वर्षी लग्न झालें आमचें !' रामभाऊंनीं असें उत्तेजन दिल्यावर मीहि विलंब न करतां लग्न ,उरकून घेण्याचें ठरविलें. रामभाऊ माझे बालमित्र. त्यांना स्वतःच्या अनुभवानें जो जितका कर्ता नी विश्वासार्ह वाटला तो कोंकणांतील ह्या धोंडभटजीसारखा सहाय्यक कांहीं वारंवार मिळणार नाहीं हें मी जाणून होतों. त्यांतही रामभाऊंनीं केलेली ती कोंकणांतील त्यांची दुसरी बायको चांगली चुणचुणीत, अकराबारा वर्षांची, त्या वेळच्या समजुतीप्रमाणें उपवर पोर दिसली. श्रीमान् विधुरांना अशा मुली कोंकणांत मिळूं शकतात असा त्यावेळीं भारी लौकिक असे."

"म्हणजे ही गोष्ट अशी घडली तरी किती वर्षांपूर्वी ? आपलें वय काय होतें तेव्हां ?"

"सरासरी वीस वर्षांपूर्वी. मी चाळिसाव्या वर्षाच्या आंतबाहेर असेन."

"बरें, पुढें ? तुम्ही मग काय कोंकणांत एकटेच गेलांत कीं धोंडभटजींशीं आधीं मुलीच्या माहितीविषयीं कांहीं पत्रव्यवहार केलांत ?"

" छे ! मला गाजावाजा नको होता. पुन्हा लग्नसराई जवळ आलेली आणि रामभाऊंचें यशस्वी उदाहरण डोळ्यांपुढें. यास्तव त्यांनीं सांगितल्याप्रमाणें पंधराशेंच्या नोटांचें पुडकें एका पैशाच्या कशांत घालून नी तो कंबरेस बांधून कोंकणांत निघालों, तों थेट धोंडभटजींच्या गांवीं जाऊन त्यांच्या घरीं उतरलों. रामभाऊंनीं सगळें कळवून ठेवलेंच होतें. धोंडभट माझी वाटच पहात होते. ओटीवर त्या खेड्यांतले कांहीं भंडारी होते. त्यांना मी कां आलों हें कळलेलें असावेसें दिसलें. कारण ते, मी थोडा इकडे तिकडे उभा राहिलोंसें पाहून आपसांत बोलत होते कीं, " मुळ्यांच्या मुलीचं बामणाशीं जमलं तर बेश होईल बुवा. धोंडभट काय म्हणतील ते करतील. त्या मुळ्याच्या बोडचं पाणी पळालं आहे. मुलगी तर गळीं लागली, आतां अकरावं वर्ष लागणार. समद्या बाया विचारतात लगिन कधीं करणार ! पण गांठीं दमडी नाहीं ! मुळ्या तरी करणार काय ! आतां हा आपला उपकारी भटजीबुवाच तारील तर तारील त्या मुलीला. पाहुणाबी सज्जन दिसतोया ! " त्यांच्या या माझ्यामागें बोललेल्या पण मला ऐकूं येणाऱ्या संवादानें मला बरीच तरतरी आली. धोंडभटजीविषयीं आदर, त्या कोणच्याशा मुळ्यांच्या मुलीविषयीं आतुरता, नी ह्या भंडारीबिंडारी गांवकऱ्यांविषयीं आपुलकी भासूं लागली.

" स्नानाची वेळ होतांच एका मोकळ्या शेतासारख्या आगरांत मोठमोठे धोंडे मांडून केलेल्या चुलीवर पाणी तापत होतें तिकडे नेण्यांत आलें. पाल्यापाचोळ्यांतच एक चिरा होता. तिथें अगदीं उघड्यावर स्नान करतांना मीं धोंडभटजींस पाहिलें—तसेंच मीहि स्नान करूं लागलों. कोंकणी खेडेगांवचें तें सगळेंच नवीन ठाण. हें पहा, तें पहा, करण्यांत मन बावचळलें होतें. त्यामुळें अंगावर उभ्याउभ्या तीनचार तांबे पाणी ओतून अंग हातानें घांसूं लागेतों नोटांचा कसा कंबरेला बांधलेला आहे याची मला आठवणच राहिली नाहीं. हात कंबरेला लागतांच चमकलों. घाईघाईनें कसा सोडला तों नोटा भिजत आलेल्या ! तसाच

पुढें होऊन, उन्हांत त्या नोटा पसरून, त्यावर दगड ठेवून स्नान उरकून मी धोतर नेसलों. तों धोंडभटांनीं दुरून, कोंकणांत जें सहज बोलणें म्हणतात पण ज्याला देशावर ओरडणेंच म्हटलें जाईल अशा उंच आवाजानें 'मुलीला पाणी भरायचेंय्, किंचित् इकडे यावें' असें घाई-घाईनें सांगितलें. मी झट्कन् तिकडे गेलों, तों संध्येचा पाट ठेवलेला पाहिला. त्यांच्या कोंकणी भावना दुखवूं नयेत म्हणून पाटावर बसून भस्म लावतों न लावतों तोंच एका मुलीनें धांवत येऊन सांगितलें कीं, 'ते कागद कोणाचे पडले आहेत, कावळ्यानें उडविला कीं एक!' मीं तिकडे दृष्टि ठेवली होती नी लगेच परतणार होतों नोटा उचलण्यास, तोंच ती मुलगी हें ओरडली. झटपट जाऊन पहातों तों शंभराची एक नोट नाहीं! अर्थात् कावळ्यानें नेली! कावळ्याचें काय धेणार! धोंड-भटानें, त्याच्या बायकोनें, त्या भंडाऱ्यापैकीं एकानें कावळ्यांच्या उपद्रवास शिव्या हांसडल्या; कावळ्यांच्या उपद्रवाचे प्रकार सांगण्यांत येऊं लागले, कोंकणचे कावळे नी देशी कावळे यांच्या जातीपातीपर्यंत गोष्टीवरून गोष्ट गेली; पण नोट कांहीं परत आली नाहीं.

"तरी देखील तीं खेडवळ माणसें किती हळहळलीं! एका भंडाऱ्याच्या डोळ्यांत तर ढिपें आल्यासारखीं दिसलीं. मोठ्या नगरांतील लोकांपेक्षां खेडेगांवचीं माणसें दयाळू, सरळ, साधीं असतात म्हणून कवी जे गोडवे गातात तें कांहीं खोटें नव्हे! मी मनांत म्हणूं लागलों— माझ्याएवढा प्रौढ बिजवर मिळेल ती मुलगी पदरीं पाडून घेण्यास आला असतां अजून एकानेंही मला खिजवलें नाहीं—नाहींतर नगरांतील ती हलकट सभ्यता! एवढ्यांत एक शंभरदां मजकडे बोटें दाखवून फिदी-फिदी हंसली असती! लागट बोलली असती!

"या विचारांत नोट गमावल्याचा मला जवळ जवळ विसरच पडला. सारखी आठवण होत होती ती एवढीच कीं, दोन दिवस उलटून गेले पण धोंडभटजी मुळ्यांच्या मुलीकडे मला अजून कसे नेत नाहींत."

" तोंच मजविषयीं प्रथमपासून कळकळ दाखविल्यामुळें ज्यासंबंधीं मला ममत्व वाटे तो शिदू भंडारी येऊन मला म्हणाला, ' महाराज आले कीं एकदांचे मुळे बाहेरगांवाहून परत ! आज धोंडभट तुम्हासनी नक्की नेणार बघा मुलगी बघायास. "

" मी म्हटलें, अरे ! धोंडभटजींना पसंत, ती मला पसंत आहेच कीं; बघायची कसली ! ठरवूनच टाकायचं एकदम ! "

त्यावर शिदू म्हणाला, ' तांदुळाचे गोण भारी सस्तावले आहेती. आमचा तोच व्यापार, आज खरेदीस्नी जाणार मी. तुमचेंभी लगिन-साहित्य सस्तांत घेऊन शानी येतों तर ! ' मीं म्हटलें, ' जाच तूं. ' तोंच धोंडभट आले नी मुलीकडे निघायचें म्हणाले. मी अगदीं प्रसन्न झालों. त्या निघण्याच्या लगबगींतच धोंडभट मला झटकन् थांबवून म्हणाले, ' शिदू जिवास जीव देणारा मनुष्य, तांदुळ खरेदीसाठीं नडला आहे. आज न गेला तर लग्नापर्यंत परतूं शकणार नाहीं. पण तो नसला तर साऱ्या गांवास वेळीं दटाऊं शकून कार्य पार पाडणारा दुसरा दंडम माणूस कोण मिळणार ! तर त्याला हवे ते २०० रुपये लगेच द्यावे. तो येतांच रुपये परत देईल. आपल्या लग्नाचे तांदूळ पण स्वस्तांत घेऊन येईल. हं चला; मुलीकडे लवकर गेलं पाहिजे. '

मुलीकडे जायच्या माझ्या धांदलींत यांच्या हिरमोडाची आड-काठी मुळींच नको, या विचारावांचून दुसरा विचार मला सुचूंच न शकल्यामुळें मीं २०० रुपयांच्या नोटा शिदूला देऊन लगबग मुळ्यांच्या घरीं गेलों.

" मुलगी ठीक होती. त्या खेडेगांवांत त्या काळापर्यंत ' अष्टवर्षा भवेत कन्ये 'चेंच युग नांदत होतें. त्यामुळें त्या अकरा वर्षांच्या मुलीस लोकांनीं घोडनवरी म्हणूं नये म्हणून मुळ्यांनाही लग्नाची घाई आहे, हें मी जाणून होतों. पण तरीहि माझ्यासारख्या बिजवराकडून मुलीच्या नांवें उलट हुंडा उपटणारे कित्येक आईबाप आमच्या नगरां-तून मला आढळले असल्यामुळें तशा ढग्यांशीं माझी गांठ पडते कीं

काय, अशी मला भीति वाढत होती; पण देण्याघेण्याची कोणचीही भानगड मुळ्यांनीं केली नाहीं. मी म्हणेन त्यांत त्यांचा संतोष! मला पुन्हा वाटलें, हे खेडवळ लोकच खरे धर्मभीरु! किती साधाभोळा व्यवहार यांचा! रामकृष्णपंत मुकदम नांवाचे कुणी गृहस्थ तिथें शेजारच्या गांवाहून सहजासहजीं आले होते. त्यांस बोलावून, त्यांचे समक्ष लग्न नक्की ठरून, मला एक गडंगनेराची जेवणावळही त्याच दिवशीं झाली.

"रात्रीं धोंडभटजींनीं पंधरा दिवसांवरचा मुहूर्त नक्की केला. माझे-बरोबर एक भंडारी माणूस देऊन ते म्हणाले, 'तुम्ही मुंबईस जाऊन ठरलेले दागिने घेऊन या; पण त्या आधीं लग्नाचीही तूपसाखरप्रभृति किराणा सामग्री ह्या भंडाऱ्याचे हातीं उलट बोटीनें धाडावी. दागिने झाले कीं तुम्हीं यावें. तोंवर शिदु भंडारीहि तांदूळखरेदीहून येईल.

"आम्ही दोघें मुंबईस आलों. शंभरसवाशेचें किराणा सामान नी कापड त्या भंडाऱ्याबरोबर बोटीनें लगेच धाडून दिलें. पांचसहा दिवसांत मनाजोगे दागिने घडवून मीहि परत धोंडभटजींकडे आलों.

"पाहतों तों माझ्यामागें धोंडभटजींच्या मुलाची मुंज साजरी झालेली आहे नी मीं लग्नासाठीं म्हणून धाडलेलें तूपसाखर, कापडचोपड त्या मुंजीसाठीं खर्च झालेलें आहे! आणि ही गोष्ट स्वतः धोंडभट मला साळसूदपणें अशी सांगते झाले कीं, 'तुम्ही गेल्यावर त्या भंडाऱ्याचे हातीं जें सामान धाडलेंत तें येतांच मी मुळ्यांना मांडवबिंडव घालण्याची विनंति करावयास जों गेलों तों त्यांनीं मुलगी देण्याचा बेत रद्द केल्याचें कळविलें; तेव्हां म्हटलें, हें सामान आतां उगीच सडवून कां टाका? यासाठीं त्यांतच मुलाची मुंज उरकून घेतली!' धोंडभटाचें हें बोलणें ऐकतांच मला राग आला. मीं म्हटलें, 'मला मुलगी तरी द्या. नाहींतर माझे पैसे तरी भरून द्या आणि तो शिदू भंडारी आला कीं नाहीं? त्यानें नेलेले दोनशें रुपयेही मला तुम्हींच दिले पाहिजेत!

"माझ्या या रागीट मागणीनें मुळींच न रागावतां अधिकच थंडपणें धोंडभट म्हणाला, 'तुमची दमडी न् दमडी आम्ही देऊं. इतकेंच नव्हे,



पण दुसरी मुलगीहि मी शोधीत आहें. तुम्ही कांहीं दिवस धीर धरून इथेंच रहावें. '

" मी पुन्हा गोंधळलों. क्षणभर वाटलें, हा मनुष्य लुच्च्या असता तर इतक्या न्यायाची गोष्ट बोलता ना ! पण आतां आपण थोडें सावध रहावें, आणि पुन्हा दमडी देऊं नये म्हणजे झालें. असा विचार करीत जेवून जों ओटीवर येतों तों माझी दागिन्यांची लहान ट्रंक तिथें नाहीं. माझ्या उरांत आतां मात्र धडकीच भरली. जवळ जवळ ओरडूनच मी उठलों, ' पण माझी ट्रंक कुठें आहे ! ट्रंक ! ' तोंच आंतून धोंडभटजी आले नी त्या पहिल्या शांतपणाहूनही शांतपणें म्हणाले, ' ओटीवर ट्रंक कशी ठेवावी ? आंत नीट माळ्यावर ठेवून देणेंच सुरक्षित ! पण तुम्हांस हवी तर इथें जवळ ठेवा. ' मी निक्षून म्हटलें, घेऊन या ती. ' त्यांनीं आणूनही दिली ती.

" माझ्या उरांत भरलेल्या धडकीसरशी माझ्या मनांत आतां मात्र एक चमत्कारिक अवसान आलें. पंजाबपर्यंत नाना देशचें पाणी प्यालेला मी मनुष्य– हा धोंडभट खरा असो खोटा असो; ह्याच्या हातांत इतकें मीं सांपडावेंच कां, कीं हा मला फसवील कीं काय ह्या शंकेनें मला असें सारखें व्याकुळ व्हावें लागावें ! जें गेलें तें गेलें समजून ती परत आलेली दागिन्यांची ट्रंक तरी इथें ठेवणें नाहीं, असा विचार करून आजूबाजूस पाहिलें तों धोंडभट मागें दूर आगरांत गेल्याचें नी जवळपास कोणी नसल्यानें आढळलें. तडक उठलों, ट्रंक चक्क डोक्यावर घेतली नी सपासप जो समोरच्या घाटीनें चढूं लागलों तों मागें म्हणून पाहिलें नाहीं.

" थोडीशी घाटी चढून एका दाट झाडींत वाट फुटलेली पहातांच तींत वळलों. दोनचार माणसांना—त्या मुळ्यांच्या घरीं झालेल्या गडंगनेराचे वेळीं जे रामकृष्णपंत मुकदम मला भेटले होते,—त्यांच्या गांवाचा पत्ता विचारला. तें गांव त्याच वाटेनें संध्याकाळपर्यंतच्या

चालीवर आहे, असें कळतांच तिकडेच जावें म्हणून चाललों. आमचें एक नातें त्या दिवशीं बोलतां बोलतां निघालें होतें.

" संध्याकाळीं मुकदमांचें वर गांठलें. त्यांनाही फार आनंद झाला. ते म्हणाले, 'बाबा! सुटलास का एकदांचा त्या धोंडभटाचे जबड्यांतून ? जाऊं द्यात हो जे गेले ते पैसे! हें वांचविलेंत तेंच विशेष समजा! अहो, कसला मुळ्ये, कसली मुलगी, कसला शिदू भंडारी नी कसले तांदूळ घेऊन बसलां आहांत, महाराज! ती एक चांडाळ चौकडी आहे नी त्या धोंडभटानें आजवर असे तुमच्यासारखे दहापांच उतावळे नवरे फसविले आहेत! तुमची नोट तुम्ही स्नान करतां करतां ज्या कावळ्यानें पळविली ना, तोच कावळा तुमची ही ट्रंक पळविण्याच्या बेतांत होता. पण उचलली नाहीं त्याच्या चोंचीला झटकन्, इतकेंच! आम्ही त्या गडंगनेराच्या दिवशींच तुम्हांस सावध करणार होतों. पण बोलावें कोणी! तुम्हीच तें खोटें मानतेत तर आमचेंच दांत पडते. कारण तो धोंडभट, तो मुळ्ये नी ते दोनचार भंडारी गुंड, गाजावाजा तर होऊं नये, शिकार पण गवसावी, अशा बेतानेंच, निर्बंधाचे कैचींत स्वतः न गवसतां, गळा कापतात दुसऱ्याचा! इतक्या सावधपणें कीं, त्यांस गळेकापू म्हणून जो कोणी म्हणेल त्यावरच उलट मानहानीचा खटला भरून कोर्टांत खेंचतां यावें!

" मुळ्याच्या माझ्या मुळावरच आलेल्या मुलीच्या पायीं मी पडत असलेल्या खड्ड्यांतून शिरसुरक्षित सुटलों ह्याचा आनंद मला होतो न होतो तोंच काय सांगूं राव, पुन्हां एक लग्नाचें नवें संकट तिथल्या तिथेंच दत्त म्हणून उभें राहिलें! कारण वरील भाषण संपतें न संपतें तोंच रामकृष्णपंत म्हणाले, 'आतां हें पहा, ही आमची मुलगी; ही आम्ही तुम्हांला देतों आणि कोंकणांत येण्याच्या तुमच्या श्रमांचें शेवटीं सार्थक करतों!' हें बोलतबोलतच त्यांनीं मुलीला मजसमोर उभी केली तरी ती माझ्या गुडघ्याहून फारशी कांहीं उंच दिसली नाहीं. त्या काळीं शिष्टसंमत असलेला 'अष्टवर्षा भवेत् कन्ये'चा परकर देखील तिला मोठा

होईलसें स्पष्ट दिसत होतें. मी देखील थोडें ओशाळतच विचारलें, ‘मुलीचें वय किती ? फारच लहान दिसते !’

“ रामकृष्णपंत निश्चित निश्चयानें उत्तरले, ‘वयच विचाराल तर सातवें लागलं आहे. पण आम्ही एकदोन वर्षे तिला माहेरींच सांभाळूं म्हणजे झालें. तुमच्या पहिल्या कुटुंबाचीं दोन लहान मुलें आहेत, त्यांतच हीहि वाढेल. मुलीची जात ! दोन तीन वर्षांत अशी उफाडेल कीं यंव !”

“ हंसतां काय महाराज ? आज मलाही त्या भाषेचें जरी तुमच्या-सारखेंच हंसू येतें तरी कोंकणांतील खेडेगांवांतून केवळ वीस वर्षांपूर्वी-पर्यंत ही भाषा अगदीं परिचयाची, अगदीं शिष्टाचाराची असे. अहो, गुजराथ राजपुतान्यांत जर मी अजूनही तीनतीन चारचार वर्षांच्या मुलींचीं लग्नें पहात होतो तर त्या काळीं मला ह्यांत काय विशेष आश्चर्य वाटणार ? त्यांतही कोंकणांत आल्यासरशी मुलगी मिळवायचीच असा मला एक अभिनिवेशच चढलेला. आतां हंसा वा हंसूं नका. त्या वेळीं तरी मी अगदीं आनंदानें लग्नास होकार भरला. म्हटलें, झाली आमची मुलगी ! जवळ दागिन्यांची ट्रंक होतीच. तें सारें दाखवून बोलतां बोलतां त्याच बैठकीवर मुहूर्त ठरविला. त्या मुळयाच्या मुलीशीं ज्या दिवशीं तो धोंडभट माझें लग्न लावणार होता ना, त्याच दिवशीं तिच्या सवाई ठिकाणची मुलगी वरणारच तर मी ! असा सूड उगविल्यासारखा एक आवेशच चढला मला.

“ अगदीं शेजारीं देखील फारसा गवगवा न होऊं देतां ठरलेल्या दिवशीं विवाह–संस्कारास आरंभ झाला. मला नी मुलीला हळदही लागली. तोंच—

“ दूरवरून दहापांच दांडगट लोक मोठमोठ्यानें बोलत येतांना दिसले. बोलतां बोलतां शिदू भंडारी त्या धोंडभटाच्या बैठकींतल्या इतर भंडाऱ्यांसह दाराशींहि येऊन ठेपलेला नी मला भेटण्यासाठीं दंडम हट्ट धरून उभा असलेला पाहिला. मनांत कसलीशी भीति वाटली,

पण रामकृष्णपंतांनीं याच म्हटलें म्हणून तसाच हळद लावलेला मी पुढें आलों. त्या शिदू भंडाऱ्याचे डोळे लाल, फिरलेले, माडी पिऊन तर्रर्र झालेले ! त्याच्या साथीदारांच्या तोंडांतूनही माडीच्या उग्रट गंधाचे भपकारे येत होते. मला पहातांच ते दटावून ओरडले, 'अरे बामणा, त्या मुळयाच्या मुलीशीं ठरलेलें लग्न मोडून, आमच्या गांवाला काळोखी लावून इथें आलास काय पळून !' मी शक्य त्या सौजन्यानें दादा-बाबा करीत म्हणालों, 'अरे, धोंडभटांनीं मला सांगितलें ना कीं, मुळयांनींच मुलगी देण्याचें नाकारलें म्हणून !'

" ते वेड्यावांकड्या शिव्या हांसडीत म्हणाले, 'चुलींत गेला तो पाजी धोंडभट ! आम्ही तुला या कोंकणांतली कोणाचीच मुलगी आतां करूं देणार नाहीं. चल, धुवून टाक ती अंगाला माखलेली हळद ! चल ! खंडोबा दिसतुया जसा !"

" इतक्यांत रामकृष्णपंतांनीं मधें पडून शिदूला बाजूला घेऊन कांहींसें गयावया करून सांगतांना मी दुरून पाहिलें. शिदूची नाडी त्यांच्या चांगली परिचयाची दिसली. तो थोडा थंडावल्यासारखा झाला. पण त्याच्या रोगावर कोणतें औषध इतकें तत्काळ रामबाण ठरलें ?

" आम्ही त्यांची समज काढण्यासाठीं पन्नास रुपये दंड द्यावा हें ! हूं कां चूं न करतां मी ते रुपये रामकृष्णपंतांसमोर त्या गुंडांच्या हातीं टाकले ! ते वाटेला लागले आणि मी तसाच तडक तापत असलेल्या स्नानाच्या पाण्याकडे जाऊन अंगावर भराभर लोटे ओतीत हळद धुऊन टाकली !

" बिचारी ती अर्भक मुलगी— आंत हळद लावून तशीच बसविलेली होती ! बिचारा रामकृष्णपंत ! 'अहो पित्रे, आतां त्या गुंडांची समजूत झाली आहे, आतां कांहीं वांधा नाहीं, हळद कां धुतां ?' म्हणून काकुळतीनें पुसूं लागले मला !

" मी म्हटलें, आतां त्यांचा नव्हे माझाच वांधा आहे ! त्यांची जशी एका अर्थी पटली—तशीच दुसऱ्या अर्थी माझीहि समजूत पटली !

आतां या जन्मांत पुन्हां लग्न म्हणून कर्तव्य नाहीं ! छे ! पाहिजे तर तुम्हांलाही लग्न मोडल्याचा म्हणाल तो दंड देतों, पण असें अपशकुनी लग्न आतां लावणें नाहीं ! ! !'

" पण रामकृष्णपंतानें मात्र माझ्याकडून कांहींहि दंड न घेतां माझे दागदागिने परत केले नी मी आल्या वाटेनें परत फिरलों ! तेव्हांपासून—

" खेड्यांतील लोक म्हणजे गोगलगाय, साळसूदपणाचें आगर म्हणजे खेडें, नागर तेवढा काय तो लुच्च्या ! अशी एक एक कविता ज्यावर लिहिलेली आहे आणि मी स्वतः, ते धोंडभट, तो शिदू भंडारी, ते त्या ओटीवरच्या बैठकींतले इतर सालस खेडवळ, ते मुळ्ये, आणि आम्हां सर्वांच्या पायदळीं त्या दोन आठदहा वर्षांच्या निरपराध अर्भक मुली वरमाला घेऊन ज्यामध्यें विवाहहोमाच्या पेटलेल्या कुंडांत उडी घेत आहेत, असें एक छायाचित्र काढून त्याची एकेक प्रत जुन्या नीतीच्या अमर्यादित अभिमान्यांना भेट द्यावी, अशी मला लहरीवर लहर येते ! ! "

— १९३५

★

# काळ आणि कसर !

: ४ :

साऱ्या प्रमुख इतिहास संशोधकांची एकच दाटी मंडपाच्या दाराशीं उडालेली होती, एकमेकां-वर वर्षांनुवर्षे नियतकालिकांतून तिखट नी प्रसंगीं शिवराळ टीका करण्या-पुरतीच ज्यांची परस्पर ओळख असे, असे दूरवरचे शेंकडों ऐतिह्य संशोधक आज येथें दाटलेले असल्यामुळें आज त्यांची परस्पर तोंड-ओळखही होणारी होती. हाही एक संशोधनाचा विषयच असल्यानें एक संशोधक त्याच कामावर नियोजिला होता. प्रत्येक आलेल्या संशोध-काची वंशावलि नी बिरुदावलि मोठ्यानें संकीर्तीत तो ज्यास त्यास मंडपांत प्रवेशवून योग्य स्थानीं बसवी.

ऐतिह्य संशोधक महामंडलाचें हें संमेलन अगदीं अपूर्व असल्यानें अनेक प्रख्यात इतिहासज्ञ आपले अगदीं अपूर्व तेवढेच निवडक निबंध घेऊन सभेस आलेले होते. अध्यापक चिंते यांनीं गेलीं चाळीस वर्षे ज्या शोधाविषयीं खर्चिलीं त्यांची गंभीर चर्चा त्यांनीं आपल्या निबंधांत

केलेली होती. त्यांचा तो विषय म्हणजे ' ग्रीकांवर चालून जातांना सम्राट चंद्रगुप्त ज्या घोड्यावर बसला त्याच्या शेपटीचे केस किती लांब होते ? ' हा होय. ती चंद्रगुप्ताच्या घोड्याच्या शेपटीच्या केसाची लांबी निश्चिणारे अनेक पुरावे त्यांनीं त्या निबंधांत गणनाच्या तक्त्यासह देऊन त्या पुराव्यांचा पुरावा म्हणून मौर्यकालच्या घोड्यांचीं चित्रें असलेलीं नाणीं, छायाचित्रें, कागद, ताम्रपटप्रभृति प्राचीन वस्तू सोबतच्या प्रदर्शनांतहि मांडलेल्या होत्या. प्रख्यात पुरातत्त्वज्ञ श्रीयुत रावणे यांनींहि त्याच प्रदर्शनांत एक अत्यद्भूत प्राचीन वस्तु धाडलेली होती. ती म्हणजे **त्राटिकेच्या चोळीची उजवी बाही** ही होय.

हजारों प्रेक्षक ती बाही पाहण्यास त्या गाळ्यांत दाटलेले असत. हा शोध जर खरा ठरला, तर पुराणकालावर, रामायणावर आणि एकंदर मनुष्यजातीच्या ज्ञानावर मोठाच प्रकाश पडून तिचें असीम हित साधणारें असल्यामुळें गेलीं चार वर्षें साऱ्या विद्वान् मंडळींनीं साऱ्या वृत्तपत्रांतून नी मासिकांतून उलटसुलट चर्चेचे लेखामागून लेख लिहून मोठी खळबळ उडवून दिलेली होती. त्यांतहि ते संशोधक रावणे नाशिक पंचवटीचे राहणारे असल्यानें खरी पंचवटी राजमहेंद्रीच्या बाजूला आहे असें मानणाऱ्या संशोधकांनीं त्या शोधाविरुद्ध कुचाळकीहि करण्यास कमी केलें नाहीं, असा श्री. रावणे यांच्या पक्षाचा आक्षेप होता. त्यामुळें त्या वादास नाशिककर विरुद्ध महेंद्रीकर असें स्वरूप येऊन जो जो नाशिककर तो तो त्या शोधास भराभर अनुकूल होत चालला आणि जो जो महेंद्रीकर तो महेंद्रीकर म्हणूनच त्या कुचाळकीसच खरा शोध म्हणून उचलून धरूं लागला. पुरातत्त्वज्ञ रावणे यांचें म्हणणें असें होतें, कीं पंचवटीच्या ज्या बाजूकडे क्षेत्रोपाध्यांच्या अखंड परंपरेप्रमाणें खडकावर खडक होऊन पडलेलें लक्ष्मणानें कापलेलें राक्षसिणीचें नाक नी कान अद्याप दाखविलें जातें, त्याच्या कांहीं अंतरावरच एक गुहेसारखें थोरलें भगदाड आहे. जशी सीतागुंफा तशीच ही त्राटिकागुंफा असली पाहिजे. राक्षसिणीसह त्राटिका तिथें केव्हां केव्हांतरी रमत असावी आणि रामचंद्र सीतागुंफेंत

जातां येतां येथूनच तिनें चोरून त्यांस पहात असावें नी त्यांच्यावर मोहत असावें. असा निश्चय होऊन त्या त्राटिकागुंफेचें सूक्ष्म निरीक्षण करण्यास श्री. रावणे जेव्हां गेले तेव्हां एका खबदाडांत खुपसून ठेवलेलें कांहींतरी वस्त्र त्यांस आढळलें. ओढून पाहतात, तों ती दणकट मळकट कापडाची बाही! अर्थात् ती त्राटिकेच्या चोळीचीच असली पाहिजे! चोळीसाठीं एक बाही ठेवून बाकी शिवायची तों त्याच दिवशीं रामाची शेवटची कटकट होऊन ती मारली गेली असावी! ह्या तर्कास त्या बाहीच्या लांबीचा, रामायणांतील राक्षसींच्या धिप्पाड देहांच्या वर्णनांचा प्रभृति अवांतर पुरावाही श्री. रावणे यांनीं आपल्या निबंधांत विस्तारशः दिला होता. पण महेंद्रीकर संशोधकांनीं तो तुच्छ मानून, त्या वस्त्राची उपपत्ति अशी लावली होती कीं, त्या बाजूस भटके पठाण वारंवार जातात, तिथेंच खाऊन पिऊन आपलें उष्टें खरकटें, फुटकें फाटकें सामान फेंकून निघून जातात, त्यांच्यापैकीं कोणा पठाणाच्या अघळपघळ फाटक्या तुमानीचा तो उजवा पाय तिथें पडलेला असावा नव्हे त्यांनीं एका पठाणाचें त्या अर्थाचें वक्तव्यही सहीसुद्धां प्रसिद्धिलें! त्यांत त्या पठाणानें सांगितलें, 'मी स्वतः अमक्या वर्षी त्या जागीं गूळ आणि शेंगाचे दाणे फांकीत बसलों असतां खबदाडांतून कीडमुंगी वर येऊं नये म्हणून माझ्या एका फाटक्या तुमानीचा जवळ असलेला पाय त्यांत कोंबून ठेवला होता!' अर्थात् ती त्राटिकेच्या चोळीची बाही नसून पठाणाच्या तुमानीचा पाय होता! ह्या महेंद्रीकरांच्या म्हणण्यानें संतापून श्री. रावणे यांनीं आपल्या ह्या संमेलनार्थ लिहिलेल्या विशेष निबंधाच्या शेवटीं असें विचारलें होतें कीं 'एका लफंग्या पठाणास लांच देऊन एका अत्यंत महत्त्वाच्या ऐतिहासिक सिद्धांतास खोटें पाडण्याचा यत्न करतांना महेंद्रीकरांना लाज कशी वाटली नाहीं!'

जपाननें चीनवर जी स्वारी केली आहे, तिचे हिंदुस्थानावर काय परिणाम होणारे आहेत, ह्या वा अशा क्षुल्लक विषयांस एक अक्षरही जागा न देतां वरील ज्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाची चर्चा करण्यांत सारीं वृत्तपत्रें नी विद्वान् गेलीं चार वर्षें गुंतले होते, तो प्रश्न

‘ त्राटिकेच्या चोळीची बाही कां पठाणाच्या तुमानीचा पाय ? ’ आजच्या संमेलनांत प्रमुखपणें चर्चिल्या जाणाऱ्या विषयांतील जसा एक विषय होता, तसाच दुसराही एक तितक्याच महत्त्वाचा विषय श्री. नार्वेकर ह्या सुप्रसिद्ध संशोधकांनीं निबंध लिहून संमेलनांत प्रस्ताविला होता. नार्वेकर हे देशभक्त नी स्वाभिमानी इतिहासकार म्हणून प्रख्यात होते. ते स्वतः वैश्य जातीचे; गोमांतकांत नार्वे येथील पेठेंतून त्यांच्या जातीची मंडळी देशावर पसरलेली होती. आर्य लोक हे उत्तर ध्रुवाकडून भारतांत आले या स्वाभिमानी देशभक्तीस लांछिणाऱ्या मताच्या ते अगदीं विरुद्ध होते. आर्यांची जन्मभू भारतच असून ते नंतर उत्तरध्रुवाकडे वसाहत करीत गेले, ह्या स्वदेशाभिमानी मतास ते पुरस्कारीत. इतकेंच नव्हे, तर साऱ्या जगांतील प्रत्येक राष्ट्र हें कोणातरी जयिष्णु भारतीय जातीनें बाहेर जाऊन वसविलें असलेंच पाहिजे, असा त्यांचा उपजत ठाम सिद्धांत होता. त्यास समर्थिणारें एक अत्यंत महत्त्वाचें गमक त्यांना अलीकडेच जें सांपडलें त्याचीच सांगोपांग सिद्धि करणारा निबंध या संमेलनाकरितां त्यांनीं धाडलेला होता. त्यांचा हा नवीन नी अत्यंत साधार शोध असा कीं, **नार्वे हा देश नार्वेकर वैश्यांचीच वसाहत आहे !** पुरावा ? भरभक्कम ! दुसरातिसरा सोडा—प्रत्यक्ष नांवाचाच ! गोमांतकांतील ह्या नार्वे पेठेच्या वैश्यांनीं जाऊन तो देश वसविला नसता तर त्यास नार्वे नांव ठेवण्याचें दुसऱ्या लोकाचें काय अडलें होतें ! पुन्हां भारतीय वैश्य सूर्योपासक, तर नार्वेचें राष्ट्रही मूळचें सूर्योपासक. पण श्री. नार्वेकर यांचा हा महत्त्वाचा शोध लागतांच देशाभिमानशून्य अशा एका दुष्टानें त्याच नामाभिधानाच्या पुराव्यास पुढें करून एक अगदीं उलट सिद्धांत मांडला तो असा कीं, नार्वे देशच्या लोकांनीं गोमांतकांत घुसून नार्वे पेठ स्थापली आणि नार्वेकर ही तीच परकी जात !—मुळीं भारतीयच नव्हेत ते; जसे चित्पावन ! ‘ आर्य लोक हे उत्तर ध्रुवाकडून हिंदुस्थानांत आले असें प्रतिपादणाऱ्या स्वाभिमानशून्य दुष्टपणाची ती प्रवृत्तीच, नार्वे देश हा आम्हां भारतीय

नार्वेकर वैश्यांची वसाहत होय हें माझें म्हणणें असें खोडून काढण्याचा निर्दयपणा करीत आहे; नार्वेच्या परक्या लोकांपासून भारतीय नार्वेकर वैश्यांची उत्पत्ति झाली आहे, असें म्हणणें निव्वळ देशद्रोह होय !' अशा कडक शब्दांत श्री. नार्वेकर यांनीं आपल्या निबंधांत ह्या आक्षेपकांचा खरपूस समाचार घेतला होता. तोच आज संमेलनांत चर्चिला जाणार असल्यानें तीही मोठी खडाजंगी उडणारच होती.

अशा अनेक अपूर्व ऐतिहासिक शोधांचा निर्णय ह्या संमेलनांत लागणार होता. त्यामुळें त्या संमेलनाचें महत्त्वही अपूर्वच आहे, असें जाणून जो तो ऐतिह्य–संशोधक त्या मंडपांत वेळेआधींच येऊन बसला आणि संमेलनाचा आरंभ होण्याची प्रतीक्षा आतुरतेनें करूं लागला.

शेवटीं ललकाऱ्यांच्या नी जयघोषांच्या दणक्यांत नियोजित अध्यक्ष रावसाहेब धुरंधर हे ज्ञानवृद्ध असल्यामुळें मुळींच न हंसतां आणि वयोवृद्ध असल्यामुळें लचकत लंगडत सभास्थानीं प्रवेशले. संमेलन आरंभलें.

## अध्यक्षांचें भाषण

अध्यक्ष रावसाहेब धुरंधर हे ज्ञानवृद्धास नी वयोवृद्धास शोभेल अशा गांभीर्यानें नी विलंबानें, गुळाची भेली काट्यावर चढवून, तोलून, उचलून फेंकावी तसा प्रत्येक शब्द थबकत थबकत तोंडाबाहेर टाकीत म्हणाले, 'जंटलमेन अँड लेडीज ! मला टाईम नसतांही केवळ तुमच्या फ्रेंडली प्रेशरसाठींच काय तें मी ही प्रेसिडेंटची चेअर अॅक्सेप्टतों. ह्या कॉन्फरन्सचं इंपॉर्टन्स अगदीं यूनिक आहे, हें तुम्हां सर्वांच्या मनावर इंप्रेसणें ही माझी डयूटी समजतों. माझें स्पीच आपण अटेन्टिव्हली लिसनावें. (हंशा होतो) व्हॉट ! सायलेन्स ! आचरटासारखे बिहेव्हतां ! (हंशाच हंशा) मी इंग्लिश व्हर्बस् यूजतो म्हणून ना ! अहो, मराठींत मुसलमानी आणि इंग्रजी नाउन्स अँड अॅडजेक्टिव्हस् यांची भर घालून

आपली मराठी लँग्वेज रिच करण्याचें महत्कार्य आजवर पुष्कळ जण करीत आले आहेत. बट, तुम्ही अगदीं फरगेटतां कीं, मराठी भाषा जर कशांत अगदीं पुअर असेल तर ती व्हर्वस्‌मध्येंच होय. आपल्या मदर लँग्वेजचा जर तुम्हांसि कांहीं अभिमान असेल तर तुम्ही इंग्रजीसारख्या क्रियापदांनीं समृद्ध असलेल्या कल्चर्ड लँग्वेजमधून शक्य तितकी व्हर्वस् मराठींत आणलीं पाहिजेत. तें महत्कार्य मी माझ्यासाठीं रिझाविलें आहे. जर इंग्रजी मदर, फादर, ब्रदर, वाइफ एट्सेट्रा अगदीं घरगुती नामेंहि तुम्ही वापरतां तर तीच यूसफुल प्रोसेस पुढें रेटून मी इंग्रजी व्हर्बस्‌ही मराठींत बोलूं लागलों तर त्यांत मराठीचें हितच नाहीं काय ? जसें आपण आपल्या मदरलँडमध्यें मुसलमान, ज्यू, इंग्लिश, पोर्तुगीज-प्रभृति जो येईल तो फॉरेनर बंधुप्रेमानें रिसीव्हिला आणि त्यायोगें आपलें नेशन म्हणजे जगताच्या धर्मशाळेसारखें शोभूं लागलें आहे,— आय नो विकेड पीपल त्याला जगताचा उकीरडा म्हणून हिणवितात; पण दॅट्स् ऑल नॉन्सेस ! तसेंच इंग्लिश, जर्मन, फारसी, अरबी, अंदमानी, नेग्रिटोप्रभृति झाडून साऱ्या लँग्वेजांमधील लाखो वर्डांची जर आमच्या मराठीमध्येंहि घालून आम्ही त्या आमच्या मदरटंगला वर्ल्डटंग करून सोडली पाहिजे ! ( टाळ्या ) मराठीचें नुसतें रक्षण केलें म्हणून जर चिपळूणकर मराठीचे शिवाजी ठरतात, तर आम्ही मराठींत ह्या व्हेरियस फॉरेन नाउनांना, अॅडजेक्टिव्हांना, अॅडव्हर्वस्‌ना, व्हर्वांना सामील करून, अनेक्सून, मराठीचे बाजीराव कां बनूं नये ? ( टाळ्या ) इंग्लिश व्हर्वस्‌ची भर मराठींत घालून ह्या माझ्या मदरटंगच्या क्रिया-पदांचे दारिद्र्य नाहींसें करण्याचें मी अगदीं रिझॉल्व्हिलें आहे. मग मला फूलिश पीपल वाटेल तितके रिडिक्युलोंत ! ( अवसानाच्या भरांत दम लागून धापा टाकीत खालीं बसतात, आणि आतां तुमचा मुख्य ठराव मांडा म्हणून श्री. तत्त्वे यांस हातानेंच खुणावतात. ) त्याबरोबर श्री. तत्त्वे उठतउठत उठून बोलूं लागतात. )

श्री. तत्त्वे— मी वायफळ बोलणारा माणूस नाहीं. कोणच्याही

प्रकरणीं तत्त्व तेवढें नेमकें सांगतों. आजचें समेलन अपूर्व कां ? अध्यक्षांनीं मराठीचें क्रियापद-दारिद्र्य निवारण्यासाठीं इंग्रजी क्रियापदें घ्यावीं असा जो उपक्रम केला त्यामुळें कांहीं हें संमेलन अपूर्व ठरत नाहीं. मराठी भाषा क्रियापदांच्या प्रकरणीं दरिद्रि आहे खरीच. साऱ्या प्राकृत भाषाच तशा आहेत. आपली संस्कृत भाषा ही इतर कोणच्याहि संपत्तीप्रमाणें क्रियापदांच्या संपदेंतही इंग्लिशला देखील हार जाणारी नाहीं. तेव्हां मराठींत क्रियापदें जीं घ्यायचीं ती आपल्याच संस्कृत भाषेच्या अगाध निधींतून घ्यावीं. ही कुबेराची संपत्ति घरीं असतां दुसऱ्यांच्या दाराशीं भीक मागत नी त्यांच्या उच्चारांनीं दांत विचकीत फिरण्यास आम्हांस लाज वाटली पाहिजे. ( अध्यक्ष–बॉश ! स्टूपिड ! ) तत्त्व हें कीं, स्वतःच्या संस्कृतप्राकृत भाषांत जे शब्द आहेत वा निर्मितां येतात, त्यांना लाथाळून, मारून, नामशेष करून, फादर, मदर, कायदा, तहहयात, कबूल प्रभृतिसारखे अनवश्यक परकी शब्द घेऊं नयेत, वापरूं नयेत. पण आपल्यांत जे मुळींच नसतील तसे विशिष्ट प्रकारांचे शब्द जसे बूट, कोट, जाकीट, पुडिंग, गुलाब प्रभृति सुखेनैव घ्यावे. पण ( अध्यक्ष– तो विषयच ड्रापा ! स्टॉपा ! ) बरें तर; मी तत्त्व तेवढेंच सांगतों. आमच्या ह्या ऐतिहासिक संशोधक महामंडळाची आजवर अवघ्या भूतलावर कोणाही ऐतिह्य मंडळानें न केलेली जी विशिष्ट कामगिरी ती ही कीं, आजवर सर्व इतिहाससंशोधक मंडळें आणि सरकारें ऐतिहासिक कागद, ताम्रपट प्रभृति साधनें संरक्षण करण्याची एकांगी कामगिरीच काय ती करीत आलीं आहेत. पण आपल्या ऐतिह्यसंशोधक मंडळानें ती सामान्य कामगिरी एका बाजूला करीत असतांच दुसऱ्या बाजूला. **ऐतिहासिक साधनांचें निर्दालन करण्याचें सत्कार्यहि पार पाडीत राहिलें पाहिजे !**

जगाच्या आरंभापासून ही क्लृप्ति कोणासही सुचली नाहीं. या कामीं मुसलमानी विजेत्यांनीं आणि कांहींजणांच्या मतें ग्रँड डफ साहेबांनींहि थोडी कामगिरी केलेली आहे. पण त्यांना त्याचें तत्त्व

उमगलें नाहीं. त्यांच्या स्वतःच्या कायसाधु अप्पलपोटेपणासाठी त्यांना जुने ग्रंथ, कागदपत्रादिक नाशिलें. पण संशोधनाचें कर्तव्य म्हणून निरपेक्ष निष्काम बुद्धीनें तें कार्य त्यांनीं केलें नाहीं. तें तत्त्व मलाच कळलें. हा माझा इतिहास-संशोधन-शास्त्रावर आणि कलेवरच उपकार झालेला आहे. तेव्हां थोडक्यांत माझा ठराव हा कीं, आपण 'ऐतिहासिक–साधन–निर्दालक–समिति' ह्या नांवाचा आपला एक स्वतंत्र विभाग स्थापून आज प्राचीन ठरणारे जुने कागदपत्रच नव्हेत, तर उद्यां प्राचीन ठरणारे आजचे महत्त्वाचे कागदपत्र–पट्ट–वस्तु–ग्रंथ–वास्तु प्रभृति ऐतिहासिक महत्त्व पावणारे पदार्थ फाडून, तोडून, जाळून, पोळून, निर्दाळण्याची मोठी मोहीम आरंभावी ! ( शेम ! ब्रेव्हो ! स्वीकार ! धिक्कार ! बोला ! बसा ! अशा गर्जनांची उलट सुलट सरबत्ती सभेंत चालू होते. अध्यक्ष घंटा वाजवीत बजावतात; 'हां, हां, स्पीकरला मध्येंच इंटरप्टता कामा नये ! ) मला वायफळ बोलण्याची संवय नाहीं. तत्त्व तेवढें मी सांगितलें. बाकी उलगडा अनुमोदक करतील. संपलें माझें भाषण !'

अनुमोदक श्री. उलगडे म्हणाले, 'सभ्यहो, आपणापैकीं कांहींजणांस श्री. तत्त्वे यांचा ऐतिह्यसाधननिर्दालकमंडळ स्थापण्याचा ठराव ऐकून बरें वाटलें नाहीं, तें साहाजिकच आहे. पण 'इतिहास–साधन–संरक्षण–कार्य' सोडावें असें कांहीं हा ठराव म्हणत नाहीं, हें आपण विसरूं नये. आपल्या महामंडळानें प्राचीन वस्तुसंरक्षणार्थही किती खटपट केली आहे तें ध्यानीं आणा ! प्राचीन कागद–ताम्रपट साधनें अग्निजलवायुप्रभृतींच्या उत्पातांतही सुरक्षित रहावीं म्हणून आजवर जगांतील ऐतिह्यसंशोधकांनीं फारतर चिरेबंदी संग्रहालयें बांधलीं, पोलादी कपाटें ठेवलीं तीही धडझड पावतात यास्तव कित्येकांनीं कोणच्यातरी प्रचंड पर्वताच्या पोटांत भुयार पाडून त्यांत जगांतील सर्व महत्त्वाच्या प्राचीन वस्तू जतन कराव्या अशी युक्ति सुचविली. पण प्रचंड भूकंपासारख्या उत्पातांत त्या पर्वतांतील ती गर्भस्थ भुयारेंही हदरून कोसळतात, ती

देखील आपत्ति टळावी म्हणून आम्ही सध्यां विमानासारखा सदैव तरता असा एक मोठा नभोदुर्ग आकाशांतच अधांतरीं बांधून त्यांत वेदकालीन वस्तूंपासून तों थेट आजकालच्या वाण्यांच्या चोपड्यांपर्यंत सारीं ऐतिहासिक कागदपत्रें पटादिसाधनें संग्रहावीं, अशी योजना जगापुढें मांडली आहेच कीं नाहीं ! तेव्हां ऐतिह्यसंशोधन संरक्षणाचें कार्य एका बाजूस आपण करीत राहण्यांत कांहीं बाकी ठेवली नाहीं हें उघड आहे. पण तें काम एका बाजूस करीत राहूनही आतां आपणांस त्याबरोबरच ऐतिहासिक साधनें कांहीं प्रमाणांत तरी विनाशविण्याचेंही कार्य करावयास पाहिजे; नाहींतर पुढच्या पिढ्यांतून ऐतिहासिक संशोधनाची प्रगति साफ खुंटून जाण्याचें संकट कोसळल्यावांचून कधींही राहणार नाहीं, हें आपण कसें विसरतां ? समजा, कालिदासानें आपलें जन्ममृत्यूचें ठिकाण नी मिति नक्की सांगितलेला एखादा श्लोक जर लिहिला असता नी तो आजपर्यंत निश्चितीनें उपलब्ध असता तर, महाराज, आपल्या त्या ऐतिह्यसंशोधनशास्त्राची केवढी मोठी हानि झाली असती बरें ! मग कालिदासाची जन्मभू एकानें काश्मीर, दुसऱ्यानें बंगाल, तिसऱ्यानें उज्जयनी, तर चवथ्यानें रामटेक अशी सांगून तें तें कोडें सोडविण्यास जो आपणांस आनंद वाटतो, त्यास आपण आंचवलों असतों, नव्हे का ? आपण अशा एका श्लोकानें केवढें तरी बुद्धिस्वातंत्र्य गमावून बसतों ! पण त्या कविकुलगुरूनें दूरदृष्टीनें तसा श्लोक लिहिला नाहीं किंवा तसा श्लोक इतरांनीं जिवंत राहूं दिला नाहीं, त्यामुळें आज आमची बुद्धि त्या प्रकरणीं इतकी स्वतंत्र आहे कीं, उद्यां कालिदासाची जन्मभू लंका होती असें प्रतिपादण्यासही आम्हां संशोधकांच्या प्रतिभेस मज्जाव करण्याची कोणाचीही छाती नाहीं ! पेशव्यांचें दप्तर जितकें अजून अक्षुण्ण आहे, तितकें जरी राजगृहांतील बिंदुसार प्रभृति राजांचें वा मौर्यांचें दप्तर आज अबाधित राहतें तरी साऱ्या बुद्धकालीन संशोधक मंडळांचीं दिवाळीं निघतीं दिवाळीं ! बुद्ध हा मनुष्य असा कोणी नव्हताच—त्याची ती सारी कथा सूर्यावरचें एक रूपक : असा

जो प्रतिभाशाली पाश्चिमात्य इतिहाससंशोधकानें प्रश्न काढला आहे तसा प्रश्न विचारून तो सोडविण्यांत संशोधनतज्ञांस जो अत्यद्भुत आनंद होतो, त्यास आपण सर्वस्वीं पारखे झालों नसतों काय ? चंद्रगुप्त हाता नी त्याचा घोडाही होता, येवढीच माहिती प्रचलित ठेवून बाकी गहाळ केली म्हणूनच ना आजच्या संमेलनांत चंद्रगुप्ताच्या घोड्याच्या शेपटीची लांबी किती हा रम्याद्भुत वाद आपणास उपभोगतां येतो आहे ? अहो, इतिहास—साधनांचा सारखा नाश होत आला म्हणूनच इतिहास—संशोधनशास्त्र नाश पावलें नाहीं ! इतिहासाचीं साधनें जर विनाशिलीं नाहींत तर इतिहास संशोधनशास्त्र ठार झालेंच म्हणून समजा ! ज्ञानेश्वर एक कीं दहा, शिवाजीची जन्मतिथि कोणती, शिवाजीला लिहितां येत होतें कीं नव्हतें, या कोड्यांस सोडवितांना जो आनंद मनुष्य जातीस होतो त्या काव्यमय आनंदास शिवाजीचें नक्की हस्ताक्षर नाना फडनाविसांच्या अक्षरासारखें पैशापासरीनें मोकाट सांपडतें तर आपण वांचवतों नाहीं का ? रामदास नांवाच्या दुसऱ्या कोणा साधूची संशयास्पद चरित्रें त्या पिढीनें लिहून ठेवण्याचा शहाणपणा केला नाहीं म्हणून आज आपणास रामदास एक कीं एकवीस ह्या वादाच्या हृदयंगम व्यवसायास मुकावें लागतें; याचा तुम्हां इतिहाससंशोधक मंडळींस राहून राहून खेद नाहीं का वाटत ? इतिहाससंशोधनास सर्वस्वीं जतन करणें म्हणजे ज्या फांदीवर आम्हां इतिहाससंशोधकांचें अस्तित्व तग धरून आहे, तीच तोडण्याचा आत्मघातकी मूर्खपणा करणें होय ! यास्तव माझें ठाम मत आहे कीं—

**प्रत्येक शतकाच्या शेवटीं त्या शतकांतील ऐतिहासिक कागदपत्रादि साधनांचा आंशिक नाश करावा.**

उदाहरणार्थ, लोकमान्य टिळकांसारखा महापुरुष घ्या. येवढा थोर पुरुष या शतकांत निपजून जर आम्ही त्याच्याविषयींच्या इतिहाससंशोधनास पुढील पिढीस कांहींच वाव ठेवला नाहीं तर त्या पुढील

पिढ्यांस, ज्ञानेश्वर एक कीं दोन प्रभृति कोडीं सोडवितांना आम्हांस जो रम्याद्भुत आनंद होतो तशा आनंदास नागविल्यासारखेंच होणार नाहीं काय ? पण टिळकांचें केळकरकृत विस्तृत चरित्र तसेंच स्थिर ठेवल्यास पुढील इतिहाससंशोधकांना आपली प्रतिभा चालविण्याला म्हणण्यासारखी जागाच उरणार नाहीं ! यास्तव त्या केळकरचरित्राचा या शतकाच्या अंतीं नाश करावा. टिळकांच्या कुंडल्या चार पांच तरी निरनिराळ्या करून ठेवाव्या. सन बरोबर तर शक चुकलेला, शक बरोबर तर महिना निराळा, शक महिना जुळेल तर भलत्याच तिथीस भलताच वार लिहिलेला, तसेंच कुठें केसरीकार टिळक कवि होते, असा उल्लेख तर कुठें कवि टिळक बंदिवासांत पडले अशा उल्लेखांच्या वखरींचीं दहावीस पानें लिहून जतन करून ठेवावीं. टिळकांच्या पुतळ्यावरील कांहीं अक्षरें ठेवून कांहीं घासून नासावीं. सन १८ शें ठेवून ५६ आंकडा खरवडून टाकावा, म्हणजे आज शिवजन्मतिथीच्या कोड्याची जी मौज आम्हां संशोधकांस उपभोगितां येते तशीच रेव्हरंड टिळक नी लोकमान्य टिळक एक कीं दोन, जन्मतिथि ही कीं ती, टिळकांचा 'केसरी' म्हणजे एक वृत्तपत्र होतें कीं त्यांनीं खरोखरच एक सिंह पाळलेला आणि गाइकवाडवाड्यांत बांधलेला होता, अशा अनेक प्रकारचे मनोरंजक प्रश्न पुढील पिढ्यांच्या इतिहाससंशोधक प्रतिभेस उद्भवितां येऊन इतिहाससंशोधक नी इतिहाससंशोधनशास्त्र बेकारीपायीं मरूं शकणार नाहीं. फार काय सांगावें, जर आपण कुशलपणें इतिहासाचीं कांहीं नांवें–गांवें–आख्यायिका नी आख्यानें यांची चलाखीची पिसणी करून बाकीचीं साधनें गहाळ करूं शकूं, तर कालिदास कोणत्या विक्रमाच्या पदरीं होता हें जसें आज मनोरंजनाचें कोडें पडलें आहे, तसें पंचवीस पिढ्यांनंतर टिळक हे कोणत्या छत्रपति शिवाजीराजांचा पक्ष घेऊन लढले. रायगडचे सतराशेंतील प्रथम शिवाजी कीं कोल्हापूरचे एकोणवीसशेंतील शिवाजी, हीच एक जटिल समस्या होऊन बसेल नी त्या भावी पिढींतील कोणीतरी जदुनाथ सरकार आज रामदासासंबंधीं

कांहीं संधोधक म्हणतात तसें, अट्टाहासानें प्रतिपादूं लागतील कीं, टिळकाला राजकारण कशाशीं खावें हें देखील उमजत नसून तो बिचारा एक ज्ञानेश्वरासारखा गीताभाष्य लिहिणारा, वेदाभ्यासजड, पुराणिक, छत्रपती शिवाजींच्या पदरीं रहात असे. याला निर्विवाद आधार म्हणजे गीतारहस्यावरील ( त्याची प्रस्तावना फाडून नाहींशी केली आणि वरचे टिळककृत श्लोक तेवढे ठेवले तर ) स्वतः टिळकांनींच सांगितलेले स्वतःचे उल्लेख ! 'बालोगांगाधरीचाहं तिलकान्वयजो द्विजः । महाराष्ट्रे पुण्यपुरे वसन् शांडिल्य गोत्रभृत् '; 'श्रुतिरत' अशी स्वतःची माहिती त्या श्लोकांत भाष्यकार टिळक देतो, पण त्यांत आपण राजकारणाचें मुळाक्षरदेखील पाहिल्याचें तो पुराणिक सांगतो आहे का ? 'राजकारणी टिळक' हा अर्थातच ह्या 'गीताभाष्यकार पुराणिक टिळका'हून दुसराच असला पाहिजे !

तेव्हां अशा अत्यंत रम्याद्भुत गमतीस पुढील पिढ्यांनीं पारखें होऊं नये असें जर तुम्हांस वाटत असेल, आणि आम्हां इतिहाससंशोधकांचा यापुढें निर्वंशच व्हावा अशी जर तुमची दुष्ट इच्छा नसेल तर तुम्ही ठरावास संमतावें नी प्रत्येक इतिहाससंशोधक मंडळानें आपल्या एका उपमंडलाकडे इतिहाससाधननिर्दालक विभागाची कामगिरीहि सोंपवून द्यावी.'

टाळयांच्या कडकडाटांत ठराव एकामतानें सभेनें संमतिला. लगेच श्री. तत्त्वे ह्यांनीं दुसरा ठराव मांडला.

तत्त्वे—मी प्रत्येक प्रकरणांतील तत्त्व तेवढें पाहणारा माणूस, इतिहाससंशोधनशास्त्राची शक्यताच जगांत कशी झाली ? इतिहासाचीं साधनें वारंवार नाश पावतात ह्यामुळें. अगदीं पहिला मनु राजा म्हणतात त्याच्यापासून जे लक्षावधी राजे झाले—सारे सूर्यवंशी, रघुवंशी, चंद्रवंशी, यादववंशी, पंडुवंशी, मौर्यवंशी, काण्ववंशी, आंध्रवंशी, शालिवाहनवंशी, राष्ट्रकूटवंशी, पांड्य, चेर, चोळ, कदंब, राठोड, गुहिलोत—रामा रामा ! नुसत्या वंशांचीं नांवें घेतां घेतां श्वास उखडून जातो !—

त्या त्या वंशांतील शंभर शंभर पिढ्या ! त्या लाखों राजांचीं चरित्रें

जर प्रत्येकीं नेपोलियनचें जसें विस्तृत चरित्र उपलब्ध आहे तितकी जरी विस्तृत चरित्रें आज अनष्ट असतीं आणि मोर्लेनें ग्लॅडस्टनचें लिहिलें तसें बाडचें बाड त्यांच्या दशलक्षावधी प्रधानांच्या चरित्राचें जर आज उपलब्ध असतें, तर त्या पुस्तकांच्या भाराखालीं शेष देखील मट्कन् मोडून बसता. त्यांची नुसती वंशावलि प्रथमपासून शेवटपर्यंत म्हणतां म्हणतां आयुष्य संपून जातें. एक आवृत्ति करायला देखील आयुष्य पुरतें ना! मग अभ्यास कुठला? त्यांतच त्या त्या पिढीचे प्रमुख कवि, ज्योतिषी, शिल्पी, वैद्य, ऋषि, पुराणिक यांचींहि आत्मचरित्रें जिवंत रहातीं, प्रत्येकीं लक्ष लक्ष ग्रंथ लिहिणाऱ्या ग्रंथकारांच्या ग्रंथांचीं बाडें, साम्राज्यांचीं दप्तरें, शतकोटि रामायणें, कोटिकोटि अभंग, रामा रामा! तर ती सारी मेलेल्यांची इतिहास—सामग्री ठेवण्याला भूमि कमी पडून जिवंतांना रहाण्यास अंगुलीभर स्थलही उरतें ना! तेव्हां वरचेवर जुने ग्रंथ, चरित्रें, ताम्रपट, कागद, वस्तु, वास्तु सारखीं नाश पावत गेलीं ह्याविषयीं आपणां ऐतिहासिक संशोधकांनीं महोत्सव करावयास हवा महोत्सव! पण तत्त्व पाहतो कोण? ह्या जीर्ण ताडपत्र्यांचा चुराडा करून इतिहासाचा नाश करून, आमच्या इतिहाससंशोधनशास्त्राचें अस्तित्व कोणी शक्य केलें? काळानें! त्या विनाशशक्तीनें! ह्यास्तव आपल्या ठरावांत ज्या अर्थीं इतिहासनिर्दालन हेंही इतिहास संशोधनाचें प्रमुख कर्तव्य आहे हें तत्त्व आपण मान्य केलें आहांत त्या अर्थीं त्या विनाशाची देवता जी काळ तिचेच आभार सर्वांआधीं आपण इतिहाससंशोधकांस मनःपूर्वक मानावयास नकोत काय? इतिहाससंशोधकांचें काळ हाच कुळदैवत आहे. आजवर तत्त्व न जाणल्यामुळें कोणाही इतिहाससंशोधक मंडळानें काळाचे उपकार स्मरले नाहींत. यास्तव तें अपूर्व काम आज आपण केलें पाहिजे. आणि ऐतिह्य साधनांचा सपाटून विनाश करणाऱ्या काळाचे ह्या ठरावानें आभार मानून अनृणी झालें पाहिजे! (टाळ्या)

अध्यापक चिं०—आणि केसरीनेंही! काळाप्रमाणेंच केसरीचेंही आमच्यावर अनंत उपकार झाले असल्यानें तिचे आभार मानून तिचेही

आम्ही अनृणी होणें अवश्य आहे !' काळ हा राजा पण त्याचा ह्या कार्यी अतिकुशल कामदार कसर हीच ! इतिहासाची मुख्य साधनें म्हणजे राज्यांची सुविशाल दप्तरें—जसें पेशव्याचें. तीं दप्तरें तुम्ही काळालाही कठिण जाईल अशा वज्रप्राय दुर्गांत, पोलादी कपाटांत, शंभर शंभर कुलुपें लावून ठेवलींत तरी पहारेकऱ्यांस पत्ता न लागू देतांही काळाचा कुशल नी चिमुकला कामगार त्या दप्तरांत केंव्हां घुसेल नी रुमालांची फडकीं, कागदांचीं बाडें, वर जशींचीं तशीं दिसू देऊन आंतून त्यांचें कसें पीठ पाडील हें सांगूनही सांगतां येणारें नाहीं, टाळूं म्हटलें तरी सम्राटांनाही टाळतां आ॑ नाहीं ! खरोखर, ही कसर ऐतिहासिक कागपत्रांचा जो नाश करते तोही आपणां ऐतिहासिक संशोधकांस हवा तसाच ! सगळा कागद नासणार नाहीं. मधलींच अक्षरें खाऊन टाकील—पण अशी कीं, जिज्ञासेनें विंचू चावल्याप्रमाणें खाडकन् जागें व्हावें, ओरडून उठावें. बाजीराव प्रभृति वाक्यांतील बाकी सारे शब्द खाईल पण 'बाजी' ठेवील; म्हणजे ह्या कागदांत तो बाजी घोरपडे कीं देशपांडे कीं पहिला बाजीराव कीं दुसरा—उमगूंही नये ! कोड्यांत जसें थोडें तर सांगावें पण पुरतें तर सांगू नये, तसें ही कसर करते. इतक्या मार्मिकपणें कीं, कसरीचा हा किडा पूर्व जन्माचा कोणी मर्मज्ञ ऐतिहासिक संशोधकच असावा असें वाटावें !

ह्यास्तव मी म्हणतों कीं, पराक्रमाची मूर्ति जशी सिंह तशी ऐतिहासिक साधननिर्दालक जो काळ ह्याची प्रत्यक्ष मूर्ति कसरच असल्यानें कसरीच्या स्वरूपाचा एक पुतळा उभारून त्याची आमच्या या आज स्थापिलेल्या नव्या नी ऐतिह्य साधननिर्दालक उपमंडळाची देवता म्हणून नित्य पूजा होत जावी. ( टाळ्या )

हे दोन्ही प्रस्ताव संमत होतांच अध्यक्ष महाशय आळस देत उठले नी म्हणाले, 'आतां फार लेट झाला आहे. बाकी काम आपण दुमारोच्या मीटिंगमध्यें रिझ्यूमूं ! मी आजची मीटिंग आतां क्लोजतों ! '

★

## नारदाची पृथ्वीस पुन्हां भेट !* :५:

**स्व**र्गामध्यें इसवीसनाप्रमाणें ता. १९ जुलै सन १९३५ शुक्रवारीं, सुरसम्राट इंद्रानें झाडून साऱ्या देवदेवतांची राजसभा बोलावली. सारे देव आपापल्या आसनांवर बसल्यानंतर देवाधीश इंद्र म्हणाला, " नारद कुठें आहे ? "

तोंच अत्यंत श्रुतिमनोहर अशा संगीतानें वातावरण मंजुळ झालें आणि—

वीणा ज्याची डुलवित दिशा घे वहावा वहावा ।
पायीं, ज्यांच्यावरि जडविल्या चांदण्या, त्या खडावा ॥

असे नारदमुनि देवसभेच्या मध्यभागीं आविर्भवले.

---

* सन १९३५ व्या वर्षी बिहारमध्यें मोठा भूकंप झाला. त्यावेळीं गांधीजींनीं एका लेखांत असें लिहिलें कीं अस्पृश्यतेच्या पापासाठीं देवानें ही भूकंपाची शिक्षा दिली ! या खुळचटपणाचा या गोष्टींत खरपूस समाचार घेतला आहे.

# ☆ नारदाची पृथ्वीस पुन्हां भेट ! ☆

सुरपति इंद्र—" नारदा, त्रिभुवनांत एकसारखें संचरत प्रत्यहींचें वृत्त सुरसभेस निवेदिणें हें तुमचें पूर्वापार कर्तव्य असतां, गेलीं हजार दीड हजार मनुष्यवर्षें तरी आपल्या पृथ्वीकडील कांहीं एक प्रतिवृत्त (रिपोर्ट) धाडले नाहींन् हें कसें ? पृथ्वीचा स्वर्गाशीं संबंध जवळ जवळ सुटत आल्यासारखें झालें आहे. आमची बातमी त्यांना नी त्यांची आम्हांला कांहींच कळेनाशी झाली आहे. देवांमाणसांत पूर्वीं किती दाट संबंध असे. पृथ्वीवरील मोठमोठीं युद्धें तर काय, पण साधारण गृहकृत्येंदेखील आम्हां देवांना सुपारी दिल्यावांचून होत नसत. आमच्या स्वर्गांतील उलाढालींचाहि त्यांस वारंवार पत्ता मिळे. मनुष्यांच्या—त्यांतहि त्या यज्ञीय भारताच्या—कोणच्याहि प्रकरणीं तुम्हांला किती ममत्व वाटे ! विशेषतः मोठमोठ्या लढायांपासून तों लहान मुलांच्या परस्पर बोचकऱ्यांपर्यंत आपण स्वतः उपस्थित राहून सारीं भांडणें यथाशास्त्र भांडलीं जातात कीं नाहींत तें पर्य्यवेक्षित (सुपरिंटेंडत) असां आणि त्या कथा आम्हांस सुरेख संस्कृत अनुष्टुपांत येऊन सांगत असां. आम्हां देवांची ती किती करमणूक होई ! देवां—मानवांतील तो जिव्हाळ्याचा संबंध पुन्हां जुळावा यास्तव आमची अशी इच्छा आहे कीं, आपण पूर्वींप्रमाणें पृथ्वीला पुन्हा प्रत्यहीं भेट देत जावी आणि मानवांकडील प्रत्येक वृत्त आम्हांला येऊन निवेदित असावें, पृथ्वीवर देवांविषयीं कोण काय बोलतें, तें तर बिनचूक कळवीत रहावें."

सुरेश्वर इंद्राचें हें भाषण ऐकून दोन—चार रुद्र रागावून म्हणाले,—" देवांचा त्या मानवांशीं संबंध तुटत आहे तोच बरा ! त्यांचा आम्हांला आतां एवढा कोणचा उपयोग होतो आहे ! मानव उर्मट झाले आहेत, देवांची त्यांना आठवणदेखील होत नाहीं. पूर्वीं आमचे हविर्भाग व्यवस्थित पोंचत, आम्हीहि त्यांची वास्तपुस्त ठेवीत असूं. पण आतांशीं त्यांनीं आमची खंडणी साफ बंद पाडली आहे. ना चौथाई ना सरदेशमुखी ! ग्रीकांचीं स्थंडिलें कधींच विझून गेलीं; पारसिकांचा अग्नि उध्वस्त; आर्यदेखील अनार्य झाले. अहो, ज्या भारतवर्षांतून प्रत्यही

देवांचें मुख जो अग्नि त्यांत सुगंधी नी स्निग्ध अशा ताज्याताज्या तुपाचे हौद आणि रुचिर मांसाचे ढीगच्या ढीग अर्पिले जात, त्या भारतांतून गेल्या उभ्या वर्षांत कुरुंदवाडच्या टपालांतून एक बोकड काय तो धाडला गेला! चारपांच माणसांना देखील जें मांस अपुरें पडावें त्यांत तेहतीस कोटी देवांची भूक भागेल असें कां त्यांस वाटलें? त्यांनीं आमची चेष्टा चालविली आहे दुसरें काय? अशा मानवांशीं यापुढें जिव्हाळ्याचा संबंध कसला ठेवतां? इंद्रा, भारतवर्षाकडून अजून वर्षाकांठीं थोडातरी आज्याच्या आहुतींचा नी अजमांसाचा पुरवठा आम्हां देवांस होतो, पण त्या उद्दाम, उर्मट नी नास्तिक यूरोप अमेरिका, विशेषतः तो रशिया, त्यांनीं तर ज्या देवमुखास्पद अग्नीमध्यें प्रत्येक जन्ममृत्यु-प्रवासयुद्धप्रभृति प्रसंगीं सुरुचिर आज्य नी अजमांस अर्पावयाचें त्यांत दडकून कोळसे आणि पेट्रोल ओतीत बसावें कां! इंद्रा, जिव्हाळ्याच्या संबंधाचें नांव सोड. देवांची खंडणी गेलीं हजार वर्षें तुंबली ती उगवून घेण्यासाठीं या मानवांशीं जर कोणचा संबंध आतां ठेवायचा तर तो केवळ युद्ध, प्लेग, भूकंप, जाळपोळ यांचा."

रुद्रवंशांतील देवांचें हें रागीट भाषण ऐकून इंद्र शांतपणें म्हणाला, "काहीं झालें तरी मानव आपलीं लेंकरें आहेत. त्यांच्यावर अगदीं रागावूनच कसें चालेल? असें अगदीं सोम प्यायल्यासारखें काय चवताळतां?

**नारद**—"इंद्रा, तुम्हांला खरें सांगायचें म्हणजे आपल्या ह्या खंड-णींच्या आणि दंडणींच्या स्वभावास आम्हां देवांनीं आतां सोडण्याची वेळ आली आहे. त्यांतहि त्या रशियादिक लोकांमध्यें विज्ञान नांवाचा एक नवीन देव अवतरला आहे. तो आमच्या विद्युत्, मरुत्, वरुण, भैरव, मरीआई, म्हसोबा प्रभृति दैवतें करीत, त्या बहुतेक करामती लांचबीच काहीं एक न घेतां, अगदीं नियमितपणें नी निरपेक्षपणें घड्याळाप्रमाणें करून दाखवितो. आपण देव असलों तरी सृष्टीच्या ज्या नियमांनीं बद्ध आहोंत, त्या नियमांसच त्या विज्ञानानें मानवांस

हळूहळू शिकविण्यास आरंभिलें आहे. आपलीं अनेक बिंगें त्यानें फोडलीं आहेत. हळुहळु साऱ्या मानवजातीस त्या विज्ञानाच्याच प्रभुत्वाखालीं सोंपवून तुम्हां जुन्या देवांस स्वर्गापुरतें काय तें वसूं द्यावें, असा श्रीविष्णूचा हेतु दिसतो. तेव्हां ग्रीकांच्या देवांनीं जसा पृथ्वीचा निरोप कधींच घेतला, तसा आतां तुम्हीं घ्यावा. जुन्या परिचयाचा स्नेहसंबंध तेवढा मानवांशीं ठेवल्यास ठेवावा."

इंद्र—"हेंच आतां योग्य. बरें नारदा, तुम्ही गेलीं हजार वर्षे तरी पृथ्वीवर फारसे गेलां नाहींत; तें कां ?"

नारद—"त्यांचें कारण असेंच एक होतें. मजविषयींहि त्यांचा एक गैरसमज झाला होता कीं,

'हा तो सारा कलह करवी !' भांडखोरा जनांनीं ।
पूर्वीं कंडी पिकाविलि तिला लोक तो सत्य मानी ॥

त्यांच्या भांडाभांडी पूर्वीं चालत तेव्हां मी थोडी गंमत पहात उभा असे खराच ! पण—

मातेची का ? कलह बघतां मौज कोणा न वाटे ? ।
तीचेंही मी परि अलिकडे काढि कां नांवही तें ! ॥
लोकार्थी म्यां सतत झटतां नारदानें, पुराणें ।
गाती थोडें ! चुकुनि कळहि लागतां लांब गाणें ! ! ॥

म्हणून मी त्यांच्यांत जाणेंच सोडोन दिलें. तरीहि ज्या अर्थी त्यांच्या भांडाभांड्या नी लठ्ठालठ्ठी सारखी चालूच राहिली त्या अर्थी 'नारद येतो म्हणून आमचीं भांडणें होतात' असें म्हणण्यास त्यांना तोंडच राहिलें नाहीं. जर्मन महायुद्धांत मी एवढ्याचसाठीं चकार शब्दसुद्धां उच्चारला नाहीं. कैसरला भेटलों नाहीं, कीं झारला, कीं लेनिनला. अंतर्ज्ञानानें आपली सगळी लाथाळी पहात होतों, पोट धरधरून हंसत होतों."

इंद्र—"आतां त्यांना तुमच्यावांचूनहि चांगलें मरेमरेतों भांडतां यावयास लागलें असल्यामुळें तुम्हीं कळ लावी तों ते थांबतच नाहींत

म्हणतां ? असो. आतां तुम्हीं पृथ्वीवर पुन्हा संचारार्थ नित्य जावें, देवांविषयींचे मानवांचे गैरसमज शक्य तों दूर करावे. पृथ्वीवरील लोक देवांविषयीं काय बोलतात तें सारें वृत्त आम्हांस सांगत चलावें. आपण आणलेल्या माहितीचें एक परिपत्र ( सर्क्युलर ) आम्ही सर्व देवांस धाडलें जाण्याची व्यवस्था करूं. भगवान् विष्णूनें घेतलेला नवयुगप्रवर्तक नवावतार जो विज्ञान त्याचें वर्चस्व मानव्यावर स्थापण्याच्या पुण्यकार्यींहि आपण झटालच."

* * *

अहिंसानंद नी शब्दशास्त्री वादाच्या भररंगांत आले होते. वाद रंगतां रंगतां आतां अगदीं एकेरीवर आला. भूकंप देवाच्या रागानें येतो हें दोघांसहि मान्य होतें. पण ह्या वर्षीं एकदम दोन भयंकर भूकंप लागोपाठ बिचाऱ्या भारतावर धाडण्याइतका देव रागावला कां, हा त्यांच्या मतभेदाचा मुख्य प्रश्न होता.

शब्दशास्त्री—"अहो अहिंसानंद, अस्पृश्यता ही शास्त्रशुद्ध, सनातन; प्रत्यहीं कोट्यवधि लोक ती पाळतात, सर्व भारतवर्षभर ती पाळली जाते, पण हा बिहारमधील भूकंप तर ह्याच वर्षी झाला. अर्थात् देवाला मनुष्यांचा इतका विशेष राग येण्यासारखी कोणतीतरी विशेष पापमय घटना ह्याच वर्षांत घडलेली असली पाहिजे. अस्पृश्यतेची शास्त्राज्ञा सनातन असतांहि उच्छेदून त्या हीन जातीचा सारा विटाळ समाजांत कालवावा, इतकेंच नव्हे, तर देवाच्या देवळांत देखील अस्पृश्यांना येऊं द्यावें ही तुमची पाखंड चळवळ ज्या अर्थी याच वर्षी चालू झाली, त्या अर्थी तीच ती पापी विशेष घटना असली पाहिजे कीं, जी योगें देवाला आम्हां मानवांचा हा विशेष राग येऊन आमचे डोळे उघडण्यासाठीं हा दंड त्यानें द्यावा! अहो, देवाचा न्याय किती सत्वर नी किती काटेकोर असतो पहा. गुरुवायुपूरच्या देवालयांत त्या कुत्र्याहूनहि ओंवळ्या नी अमंगळ असणाऱ्या अस्पृश्यांस नेण्यासाठीं तुम्ही पापी लोक त्या देव-



ळाच्या दरवाजाशीं जातां न जातां तोंच देवानें भयंकर भूकंपाच्या जब-ड्यांत सारा बिहार प्रांत ढकलून दिला. गंगामाय रागानें फुगून या पापी भूलोकास सोडून स्वर्गांत परत जाण्यासाठीं अंतराळांत अर्धी उंच चढून गेली ! तेव्हां हें स्पष्ट आहे कीं, महारांधेडांना देवळांत नेण्याचा जो पापी उपक्रम तुम्हीं केलांत त्यामुळें चवताळून देवानें हा दंड मनुष्यास दिला आहे. भूकंप नको असतील तर एकच उपाय कीं, धर्म-शास्त्रानुसार नी सनातन रूढीप्रमाणें अस्पृश्यता पाळावी नी मंदिर-प्रवेशाचा हा भ्रष्टाकार तत्काळ बंद करावा ! ”

अहिंसानंदः—“अहो शब्दशास्त्री, ती सुधारणाचळवळ आम्ही तात्काळ बंद केली तर आज एकट्या बिहारला भूकंप झाला तो साऱ्या भरत-खंडभर पसरेल. नुसती गंगाच नव्हे तर गोदा, कृष्णा, कावेरी, प्रत्येक ओहोळ, फार काय नगरसंस्थेचें प्रत्येक गटार रागानें तुडुंब फुगून वर उसळून यच्च्यावत् नगरसंस्थांतील आधींच नाकास असह्य झालेली घाण शतपटीनें अधिक वाढवील. सुधारणा ही या वर्षींची भूकंपकारक विशेष घटना नव्हे; तर आजवर अस्पृश्यता हें महापाप आहे असें तुम्हांस कोणी शिकवीत नसल्यामुळें तुमचें तें पाप अहेतुक नी अज्ञानजन्य म्हणून जें थोडेसें क्षम्य होतें तें, आतां आम्ही तुम्हांस तें पाप आहे असें या वर्षी सांगत असतांहि तुम्ही ऐकत नाहीं त्यामुळें, अक्षम्य ठरलें. ही ती भूकंप-कारक विशेष घटना होय. अस्पृश्यता ठेवणारच, मद्रासला गुरुवायुपूरचें मंदिर अस्पृष्यांना उघडणार नाहींच, असा हट्ट धरलात म्हणून बिहारला भूकंपाचा भयंकर दंड देवानें दिला ! ”

शब्दशास्त्रीः—“ पण जर अस्पृश्यता ठेवतों म्हणून भूकंपाचा दंड असता तर तो त्या शास्त्रांस धुमधडाक्यानें उपदेशिणाऱ्या वर्णाश्रमधर्मा-भिमानी अशा आम्हां पुढाऱ्यांस झाला असता ! पण आमच्या चारी शंकराचार्यांपैकीं भूकंपांत एकहि कसा सांपडला नाहीं ? त्यांच्या मठाचा एक दगडहि कोसळला नाहीं ! मद्रासला जें गुरुवायुपूर अस्पृश्यास उघ-डलें नाहीं म्हणून भूकंप झाला म्हणतां, तें देऊळहि नुसतें डुलकी

आलेला मनुष्य कळतो, तितकें देखील कललें नाहीं. प्रत्यक्ष झामोरिन—त्या कट्टर मंदिरप्रवेशविरोधी महाराजांच्या तोंडावरील माशीदेखील दचकून उडावी इतकादेखील भूकंपाचा धक्का त्यांना बसला नाहीं !

**अहिंसानंदः**—अहो शब्दशास्त्री, जर गुरुवायुपूरच्या आणि इतर देवमंदिरांस भ्रष्टविण्यासाठीं आम्ही सुधारक धडपडतों म्हणून भूकंप झाला, हें तुमचें म्हणणें खरें असतें तर तो भूकंप जे सुधारक त्या वेळीं त्याच गुरुवायुपूरच्या देवलांत वळेंबळें– नव्हे नव्हे– सत्याग्रहानें घुसत होते त्यांच्या छावणींत व्हावयास हवा होता. पण अस्पृश्यतानिवारणाची नी मंदिरप्रवेशाची घोरप्रतिज्ञा करून गांधीजीप्रभृति जे सुधारक त्या देवळाजवळ ठाण मांडून बसले होते त्यांच्या समोरील त्या साधुशील दरिद्रिनारायणास शोभेशा द्राक्षलोणी, मोसंबीप्रभृति वापड्या आहारांचा ढीगसुद्धां डळमळूं नये आणि डळमळून कोलंडला तरी नेमका त्यांच्या तोंडांत यथाप्रमाण पडावा अशाच बेतानें कोलमंडावा, असा उलट देवानें त्यांचा यावदिष्ट पाहुणचार केला तो कसा ? अस्पृश्यतानिवारक पुढारी मद्रासमध्यें पाप करतात म्हणून बिचाऱ्या बिहारला हजारों बायकामुलें गंगेच्या भूकंपीय महापुरांत गळचुंडी देऊन बुडवून टाकण्यास हा तुमचा देव म्हणजे कोणी ठकांचा सरदार होता कीं काय ?

इतक्यांत—

त्या वेळपावेतों अदृश्य रूपानें तो संवाद ऐकत असलेले नारदमुनि आविर्भवून त्या दोघांच्यामध्यें उपस्थित झाले. त्यासरशीं विस्मयाचा पहिला धक्का ओसरतांच त्या दोघांनींहि त्यांना सादर उत्थापन दिलें. नारदानेंहि उभयांस आशीर्वादून विचारलें कीं, 'तुमच्या वादांतून शेवटीं काय सिद्धान्त निघाला ?'

**शब्दशास्त्रीः**—"माझें म्हणणें हेंच कीं, माझा सिद्धान्त हाच कीं, सनातन वर्णाश्रमधर्माच्या मर्यादा उल्लंघून अस्पृश्यांना शिवावें इतकेंच नव्हे. तर त्यांना देवमंदिरांत न्यावें या पाखंडमताचा प्रचार या सुधा-

रकांनीं चालविल्यामुळें देवांचा कोप झाला, आणि त्यानें ही भूकंपाची भयंकर आपत्ति बिहारवर कोसळविली ! ”

अहिंसानंदः— “ आणि माझा सिद्धान्त असा कीं, आज पिढ्यान्‌पिढ्या अस्पृश्यांच्या होत असलेल्या अमानुष छळामुळें संतापून आतां यापुढें तरी या स्पृश्यांचें डोळे उघडावे नी तो छळ त्यांनीं बंद पाडून अस्पृश्यता काढून देवमंदिरें त्या अस्पृश्यांस मुक्तद्वार करावीं; यास्तव देवानें बिहारला भूकंपाचा भयंकर दंड दिला, स्पृश्यांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घातलें ! ”

नारदः— “ पण अहिंसानंद, अस्पृश्यता साऱ्या भरतखंडभर पाळणाऱ्या कोट्यानुकोटि स्पृश्यांच्या पापासाठीं बिचाऱ्या बिहार प्रांतांतील अस्पृश्यांनाच कांहींएक अगाऊ सूचना न देतां रातोरात कत्तल करून टाकणारा आणि तरीहि त्या स्पृश्यतेच्या पापाचे सर्वांत मोठे अपराधी जे हे शब्दशास्त्र्यांसारखे काशी ते रामेश्वरपर्यंतचे पंडित, राजे, महाराजे, अहिताग्नि, धर्मवीर, शंकराचार्य, वैष्णवाचार्य प्रभृति त्यांच्या मात्र केसासहि धक्का न लावणारा, आणि त्या अस्पृश्यांचाहि बिहारमध्यें त्याच भूकंपांत तशाच निर्दय निष्ठुरपणें प्राण घेऊन या सनातनी धर्माभिमानी स्पृश्यांनीं त्यांचा कधींहि केला नव्हता असा घोर छळ करणारा—हा तुमचा देव म्हणजे एका चोराच्या अपराधासाठीं सावसंन्याशासुद्धां साऱ्या नगराची कत्तल करणारा आणि ज्या बापड्याला त्या चोरानें लुटलें त्या बापड्यालाहि फांशी देणारा कोणी सवाई नादिरशहाच असला पाहिजे, नव्हे काय ? ”

शब्दशास्त्रीः— “ वा ! नारदा वा ! भली खोड मोडली या सुधारकांची ! अगदीं असेंच मीहि विचारलें होतें ! काय अहिंसानंद, बोला, आतां चूप कां ? ”

नारदः—“ आणि काय हो शब्दशास्त्री, ‘ अस्पृश्यतानिवारक सुधारकांच्या पाखंडानें रागावूनच मी देव, बिहारचा भूकंपानें फडशा पाडतों ’

अशी देवाची स्वहस्ताची बोटभर चिठ्ठी तरी तुम्हांस आली होती काय? जर आली असली वा शास्त्रार्थानेंच देवाचा तसा निश्चय तुम्ही अनुमानीत असलां तर बिहारच्या भूकंपांत मूठभर सुधारकांबरोबर हजारों वर्णधर्माभिमानी स्पृश्यांसहि देवानें ठार मारलें, इतकेंच नव्हे, तर जीं शेंकडों स्पृश्य मंदिरें आंत अस्पृश्यांची सांवलीदेखील पडूं न देतां शेंकडों वर्षें शुद्ध राहिलीं तींच देवमूर्तींसुद्धां भूकंपीय लाथेच्या ठोकरीसरशीं धुळीस मिळविली; आणि अस्पृश्य थेट गाभाऱ्यांत जाऊन ब्राह्मणांसह रुद्र पढत ज्यांत स्वहस्तें देवास अभिषेकूं शकतात, शेंकडों चांभार-महार-ब्राह्मण-मराठे ज्यांत प्रकट सहभोजनें झोडतात, ज्यानें अस्पृश्यांचें 'पूर्वास्पृश्य' करून सोडले तें जातपाततोडक असें रत्नागिरीचें पतितपावन-मंदिर मात्र सुरक्षित ठेवलें! अशी शास्त्रार्थांची निव्वळ ढर उडविणाऱ्या ह्या तुमच्या देवाहून कोणचा अस्पृश्यतानिवारक सुधारक अधिक पाखंड आहे सांगा बरें? सुधारकाइतका पाखंड पण अस्पृश्यता पाळतां म्हणून तुम्हां सनातनी मंडळींवर कोणताहि सुधारक जो कहर कधींहि करूं इच्छिणार नाहीं अशी जाळपोळ, हत्या, यांनीं तुम्हां बिहारी सनातन्यांचाहि चक्काचूर उडविणारा आणि म्हणूनच सुधारकांहून सहस्रपटीनें अधिक क्रूर असा हा तुमचा देव— दैत्य कीं देव!!"

**अहिंसानंदः**—"भले, नारदा भले! चांगली खोड मोडलीत या वावदूक, शब्दनिष्ठ, अस्पृश्य-छळकांची! मी तेंच सांगत होतों कीं, देवास अस्पृश्यता प्रिय नाहीं, तो पतितपावन; पण हे अस्पृश्यांना छळून देव-मंदिरीं येऊं देईनात यासाठीं देवाचा संताप होऊन त्यांनीं बिहारच्या भूकंपाचा भयंकर दंड या लोकांस दिला. बायकामुलांम्हाताऱ्यांसुद्धां भूमींत जिवंत गाडून टाकलें, कोसळत्या दगडाच्या माऱ्याखालीं शेंकडों सनातन्यांना ठेंचून काढलें, शेंकडोंना आगींत भाजून कोळसा केला— देवाचाच कोप तो!!"

**नारदः**—"अरेरे! अहिंसानंद! दारू पिऊन झिंगलेल्या नी चवताळलेल्या दारुड्यांचें बोलणेंदेखील इतकें विसंगत, रक्ताळ नि क्रूर नसतें!

अहो तुम्ही अहिंसानंद ना ? आणि तुमचा देव इतका हिंसाळ ? गर्भांतल्या लेंकरांनीं तरी अस्पृश्यांचा छळ केला नव्हता ना ? मग तशा शेंकडों गर्भवती, आसन्नप्रसव मातांना जन्मून दुधाची पहिली धार पीत असलेल्या शेंकडों लेंकरांना ज्या भूकंपानें बकासुरासारखा आपला रक्तबंबाळ जबडा उघडून कचाकच खाऊन टाकलें त्या भूकंपाच्या भयंकर संकटास दंड म्हणून जो देव देऊं शकतो, त्याचे भक्त म्हणवून घेण्यास हिंस्र राक्षसदेखील कचरतील ! अशा हिंस्र देवाचे भक्त म्हणविणारे तुम्ही अहिंसावादी एक मिथ्याचारी तरी आहांत नाहीं तर महामूर्ख ! त्या बापड्या सनातन्यांची बुद्धि पालटून त्यांना अस्पृश्यतानिवारणाची सद्‌बुद्धि द्यावयाची शक्ति त्या देवास— तो देवच असला तर—होतीच होती ! क्षमाशील देवानें तें न करतां प्रथम त्यांना अस्पृश्यांचा छळ करणाऱ्या स्मृत्या पढवून त्यांना दुर्बुद्धि दिली आणि नंतर त्या दुर्बुद्धिसाठीं, त्यांच्या हजारों जीवांच्या सपासप माना कापल्या. गळे घोटून प्राण घेतले !— हा देव कीं दैत्य ! बरें, केट्टयाच्या मुसलमानांत, जपानमध्यें दक्षिण अमेरिकेंत अस्पृश्यता हिंदुस्थानासारखी नाहीं ना ?"

**दोघेही:—**" नाहीं ! "

**नारद:—**" मग तेथेंहि असेंच भूकंप कां झाले ? "

**अहिंसानंद:—**" त्यांच्या परिस्थितीचा मीं अद्याप फारसा अभ्यास केला नाहीं, पण—पण त्यांनीं कांहींतरी दुसरीं पापें केलीं असतील."

**शब्दशास्त्री:—**" बहुधा सर्वरोगप्रतिबंधक पंचगव्य ते लोक नियमानें पीत नसावेत; आणि सर्वारिष्टशांतिप्रीत्यर्थ 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र एक कोटी वेळां जपतहि नसावेत ! रामनामाचा प्रताप अरिष्टशामक आहे ! "

**नारद:—**" तुम्ही प्रत्येक मढें नेतांना "राम बोलो भाई राम" म्हणून राममंत्र सारखा उच्चारीत स्मशानापर्यंत जातां; पण स्मशानांत तिरडी ठेवतांच तीं सारीं मढीं तें अरिष्ट टळून जिवंत होतात काय ?

हिंदुस्थानांत हा मंत्र युगोयुगें जपतां--हिंदुस्थानावरच, आज जगांत कुठेंहि नाहींत इतकीं अरिष्टें आज कोसळलीं आहेत! भूकंपाची सांथच्या सांथ आली आहे!"

अहिंसानंदः—"पण तथापि भूकंपविद्येचा मी आजवर जो खोल अभ्यास केला, त्यावरून एक सिद्धांत मात्र मी निश्चितपणें सांगू शकतो कीं, त्या क्वेट्टा, जपान, दक्षिण अमेरिकाप्रभृति ठिकाणीं देवांची प्रार्थना वेळच्या वेळीं होत नसावी, म्हणून तिकडे भूकंप होतात. आमच्या अस्पृश्यता-निवारक मंडळींच्या केंद्रांत जिथें जिथें देवाची प्रार्थना वेळच्या वेळीं होते तिथें तिथें भूकंप आला नाहीं. साबरमती, वर्धा, अहिंसाळू झाल्यापासून राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें जिथें जिथें भरलीं तीं ती स्थळें--भूकंपाची छाती झाली नाहीं डिंवचायची! प्रार्थनेमुळें प्रसादून देव भूकंप घाडीत नाहीं. भूकंप नकोत तर प्रार्थना करा! मग देव रागावून भूकंप कां बरें धाडील?"

नारदः—"अहिंसानंद, एखाद्या गव्हर्नराला तुम्ही मानपत्र दिलें नाहींत म्हणून त्यानें राजधानींतील बायकांमुलांमाणसांची सरसहा कत्तल केली तर त्या गव्हनरला तुम्ही न्यायी, सत्वशील, नि दयाळू म्हणाल का?"

अहिंसानंदः—"केव्हांहि नाहीं! आम्ही त्या क्रूराविरुद्ध प्रथम त्याच्या दारांत आडवे पडण्याचा सत्याग्रह पुकारूं; शेवटीं अन्नसत्याग्रह पुकारून स्वतःच उपाशी मरूं!"

नारदः—"तर मग जो देव त्याची प्रार्थना करण्यास, त्याची स्तुति गाण्यास कांहीं लोक विसरतात म्हणून जे प्रार्थना करतात त्यांसुद्धां, जीं लेंकरें पुरते दोन शब्दहि अजून बोलूं शकत नाहींत, नव्हे जीं अपत्यें अजून गर्भांतच आहेत, त्यांसुद्धां हजारों जणांचे जीव भूकंपादि भयंकर अरिष्टांच्या गदेखालीं चेंदामेंदा करून टाकतो, तो देव कीं दैत्य? अहो, तुम्ही त्या दयाळू सत्त्वमय परमकारुणिक पतितपावन भगवंताच्या ठायीं

अशा कल्पना आरोपून त्याची नकळत कां होईना, पण कोण विटंबना करतां आहां, पहा बरें !"

**शब्दशास्त्रीः**--"मग नारदमुनि ! वेद, अवेस्ता, पुराण, कुराण, बायबल, तालमदप्रभृति यच्चावत् ईश्वरी धर्मग्रंथांत देवाची प्रार्थना न केली, तर तो रागावून त्या लोकांवर रोग, दुष्काळ, भूकंप, जलप्रलय, अग्निप्रलय प्रभृति संकटें आणतो असें जें ईश्वरानेंच ग्रथिलें वा कथिलें आहे, तें काय सारें लटकें आहे ? सांगा, हीं धर्मरहस्यें आम्हांहून आपणांस अधिक बिनचूकपणें कळतात यांत आम्हांस कांहींच शंका नाहीं."

**नारदः**--"तर मग सांगतों ऐका ! हे सारे ग्रंथ ईश्वरग्रथित वा ईश्वरकथित नसून मनुष्यकृत आहेत. आपला "आंतला आवाज," "अंतःस्फूर्ति" हीच देवाची प्रत्यक्ष वाणी, इच्छा, स्फूर्ति, आज्ञा होय, अशा प्रामाणिक भावनेनें कांहीं थोर पुरुषांची स्वतःच फसगत झाली. कांहींनीं स्वतःचें स्तोम माजविण्यासाठीं जाणूनबुजून दुसऱ्यांस फसविलें. या विशाल विश्वाचे सृष्टिनियम ठरलेले असून त्यांचा, तुम्ही मानव तुमच्या अत्यंत तुच्छ आवडीनिवडीप्रमाणें तुमच्या त्या धर्मग्रंथांत ज्यांस पाप वा पुण्य समजतां त्यांच्याशीं लवलेशहि संबंध नाहीं. मुसलमान-ख्रिस्त्यांना गाय मारणें पाप नसून बहुधा पुण्यहि वाटतें; हिंदूंना तें महापाप ! नियोग एकदां ब्राह्मणांनाहि पाप नव्हतें; आज तें महापाप ! असा तुमचा तुम्हीच ज्या पापपुण्यांचा बोटावरच्या थुंकीप्रमाणें, परत्यांच्या पिसणीप्रमाणें खेळ करूं शकतां, त्यांच्या लहरीप्रमाणें या प्रचंड विश्वाचे आबाधित सृष्टिनियम बदलूं शकतील हें मानणें म्हणजे देव हा माणसांचा गुलाम आहे असें मानण्यासारखेंच आहे ! तुमच्या घराची कलती भिंत धाडकन् कोसळली किंवा जुन्या किल्ल्याचा भक्कम बुरुज धडाडला वा नवीन बांधलेल्या कच्च्या पायाचा प्रचंड पूल कोलमडला तर तो, पाया खचल्यामुळें वा जीर्ण बांधकाम हदरल्यामुळें होय. पण त्या भिंतीवर, बुरजावर वा पुलावर रेंगाळणारे बागुरडें जर समजलें कीं, आमच्या

हातून कांहीं पाप घडलें म्हणून हें घर, बुरूज वा पूल कोसळला, भूकंप झाला, त्यांचीं अंडीं-कच्चींबच्चीं चक्काचूर झालीं; तर तुम्ही हंसाल! त्याचप्रमाणें तुम्ही माणसें जेव्हां भूकंपांत पर्वत कोसळले, समुद्र उफाळले, नद्यांचे डोहच्या डोह आचमनासारखे भूगर्भांतील उसळत्या अग्नीनें पिऊन टाकले, तेव्हां हा सृष्टिक्षोभ तुम्हां चार सुधारक बागुरड्यांनीं 'देव-मंदिरें अस्पृश्यांस उघडा' म्हणून सांगितलें असतां इतर सनातनी बागुरड्यांनीं तें ऐकलें नाहीं यास्तव झाला, असें समजतां तेव्हां मला हंसूं येतें! प्रार्थना केली नाहीं तर देव रागावतो म्हटल्यानें देवच दैत्य ठरतो इतकें मीं तुम्हांस सांगितलें; आतां आणखी असें सांगतों कीं, सृष्टिव्यवहारापुरतें तरी जे कोणी देवाची प्रार्थना न करतां सृष्टिनियमांच्या अबाधित क्रमांसच तोंड देतात आणि त्यांतील अनुकूल ते नियम पाळून प्रतिकूल नियमांस तोंड देतात ते प्रार्थना न करणारे लोकच देवास अधिक आवडतात. तो रशिया पहा! तुम्ही देवालाच दैत्य बन-विणाऱ्या ज्या भावड्या कल्पना करून खऱ्या देवांचें विडंबन न करतां तसें करण्याचें रशियानें सोडून तशा देवाचें अस्तित्वच नाकारलें. मानव्याला एकंदरींत ज्या परिस्थितींत जें उपयुक्त तें चांगलें, तें पुण्य, जें अनुपयुक्त तें त्या परिस्थितींत वाईट पाप! हा मानवांचा मानवधर्म! और सब् झूट! त्या मानवी पापपुण्याचा, बागुरड्याच्या पापपुण्याचा मनुष्याच्या हालचालीशीं नसतो तसा, सृष्टिनियमानुसार होणाऱ्या सृष्टीच्या प्रचंड भूकंपापासून तों यःकचित् कोथिंबिरीच्या पर्णकंपापर्यंतच्या हालचालीशीं कांहींएक संबंध नसतो; म्हणून प्रार्थना, अनुष्ठानें प्रभृति तदर्थक भावडे उपाय अज्ञान वा थोतांड! असें म्हणणाऱ्या त्या रशियावर खरा देव उलट प्रसादला आहे! रशियांत प्रजा वाढत आहे, त्यांना पुरून उरेल इतकी धनधान्यसमृद्धि पिकत आहे, रोगराई घटत आहे! प्रार्थना करणाऱ्या तुमचीं घरेंदारें—देवळेंसुद्धां एक वर्षांत दोन भूकंपांत गडप करणाऱ्या देवानें तिकडे या वर्षीं एकसुद्धां भूकंप धाडला नाहीं! इतकेंच नव्हे, तर तुम्हीं भूकंप थांबविण्यासाठीं अस्पृश्यता निवारावी का ठेवावी,

प्रार्थना कुराणानुसार मशिदींत करावी कीं वेदमंत्रांहीं देवळांत, या भावड्या चर्चा करीत असतां तिकडे ते रशियांत भूकंपविद्येस अध्ययून त्याचे सृष्टिनियम समजावून घेत भूकंप कुठें, कसे, क्व्हां होतात ह्याचे कित्येक अबाधित नियम आविष्कारूनहि बसले आहेत. नक्की ओळखलेले भूकंपाचे पट्टे टाळून ते आतां नगरें वसवूं शकतात ! ”

शब्दशास्त्रीः—“ पण ते रशियन नि युरोपियनहि ख्रिस्ती आहेत; आणि ख्रिस्ती लोकहि चर्चांतून प्रार्थना करतात असें आम्ही ऐकतों ! ”

नारदः—“ तुम्हां हिंदु-मुसलमानांप्रमाणें ते रशियनादिक युरोपियन पूर्वी बायबलास ईश्वरकृत मानून तसाच वेडगळपणा करीत, तेव्हां भूकंपाविषयीं त्यांच्या तुमच्यासारख्याच दुधखुळ्या कल्पना असत. त्यांचा एक ऐतिहासिक दाखला ( पूर्वींप्रमाणें पौराणिक भाषेंत नव्हे तर––) ऐतिहासिक भाषेंत सांगतों तो ऐका––

## लिस्बनचा भूकंप आणि युरोपियनांचा धर्मभोळा मूर्खपणा !

इसवी सन १७५५ त लिस्बनला भयंकर भूकंप होऊन लिस्बन नगरीची नगरी गडप झाली ! पंधरा हजार माणसें चुटकीसरशीं चक्काचूर झालीं ! सारा युरोप हादरला ! तेव्हां या भयंकर अरिष्टास टाळण्यासाठीं त्या भावड्या ख्रिस्ती लोकांपैकीं जे प्रॉटेस्टंट सुधारक होते ते म्हणाले, ‘ या रोमन कॅथोलिक सनातन्यांच्या धार्मिक रूढि देवाला आवडत नाहींत म्हणून देवानें हा दंड दिला. यास्तव आतां प्रॉटेस्टंट सुधारकांच्या धर्मासच सर्वांनीं आचरावें, म्हणजे भूकंप येणार नाहींत. ’ हें ऐकतांच रोमन कॅथोलिक सनातनी खवळून प्रतिपादूं लागले कीं, ‘ सनातन ख्रिस्ती धर्मरूढींना तोडण्याचें पाप जे हे प्रॉटेस्टंट सुधारक करीत आहेत त्यानेंच देव रागावून लिस्बनला उच्छेदिलें ! ह्या प्रॉटेस्टंटासच नामशेष करणें हाच एक भूकंपापासून जगतास बचावण्याचा उपाय आहे. ’ कॅथोलिक सनातनी बहुसंख्य असल्यामुळें त्यांनीं नुसतें बोलूनच न थांबतां लिस्बन नगर पुन्हा उभरण्याच्या आधीं जे भूकंपांतून

उरलेसुरले प्रॉटेस्टंट त्यांच्या हातीं लागले त्यांची त्या कॅथोलिकांनीं कत्तल केली आणि ते बळी दिल्यानें देव प्रसादेल असें समजून त्यांच्या कत्तलीच्या पायावर नगरग्रामें पुन्हा उभारलीं आणि हे पुण्यकृत्य देवास निवेदण्यासाठीं ह्या कॅथोलिक सनातन्यांनीं एक मोठी सामुदायिक प्रार्थना केली ! परंतु त्यानंतर झालेल्या अनेक भूकंपांत हजारों कॅथोलिक लोकहि सांपडले, तिथें जिवंत गाडले गेले–जाताहेत ! "

शब्दशास्त्रीः— " मोठे दुधखुळे होते हे युरोपियन ख्रिस्ती लोक ! "

नारदः— " होय; फरक इतकाच कीं, ते युरोपियन ख्रिस्ती पूर्वीं दुधखुळे होते नि तुम्ही हिंदु-मुसलमान अजूनहि या प्रकरणीं दुधखुळे आहांत ! अस्पृश्यतेच्या पापानें -कीं, अस्पृश्यतानिवारणाच्या पापानें भूकंप झाला हें तुम्ही हिंदु तुमच्या अपुऱ्या अर्धवट नि आंधळ्या " आंतल्या आवाजास " विचारीत बसलां आहांत आणि तो भूकंप मशिदींत सामुदायिक निमाज पढले म्हणजे तो टळेल म्हणून मुसलमान अल्लाच्या प्रार्थना करीत आहेत ! तरी बरें कीं त्या भूकंपांत बिहारमधलीं शेंकडों देवळें जशीं चकाचूर झालीं तशाच केट्टयाला प्रत्यहीं निमाजांनीं निनादणाऱ्या शेंकडों मशिदी मातीस मिळाल्या ! "

अहिंसानंदः— " मग हा दुधखुळेपणा त्या युरोपियनांनीं केव्हां सोडला ? कोणीं शिकविलें तें त्यांना ? "

नारदः— " जेव्हां त्यांनीं बायबलाची स्मृति मिटून विज्ञानाची स्मृति उघडली तेव्हां !–विज्ञानानें शिकविलें हें त्यांना. "

शब्दशास्त्रीः— " हा विज्ञान कोण ? "

नारदः— " हा विष्णूचा नवा अवतार ! सृष्टिव्यवहारापुरतें तरी तुम्ही आतां ह्या विज्ञानाचीच स्मृति अनुसरा ! तिच्या बळेंच युरोप दूरदर्शन, दूरश्रवण, पृथ्वीचें साम्राज्य, समुद्राच्या खोल तळापासून तों आकाशाच्या विरल स्तरापर्यंत अव्याहत गति प्रभृति अत्यद्भुत आश्चर्यें युरोप करूं शकत

आहे. हा विज्ञानदेव लांचलुचपत, पूजानैवेद्य, बळी–बोकड, निमाज-कुरवानी, मंततंत्र, स्तुतिनिंदा, कशासहि अपेक्षित नाहीं, कशानेंहि प्रसादत नाहीं, रागावत नाहीं; तो कोणाच्या गळ्यांतील ताईत होत नाहीं, कोणास गंडा घालीत नाहीं ! अबाधित सृष्टिनियमांन्वयें त्याचा सारा कारभार चालतो. तुम्ही माणसांनीं त्याच्या स्मृतींत भूकंप कां होतो नी त्याच्या उत्पातापासून माणसांचें रक्षण कसें नी किती प्रमाणांत करतां येईल तें शिकावें. ह्या विज्ञानानें आणलेली ही स्मृति तुमच्या बायबल–कुराण–पुराणाप्रमाणें मनुष्याच्या कोत्या ज्ञानाच्या नी अज्ञानाच्या आंतल्या आवाजाचे पडसाद नसून ती खरोखरच ईश्वरकृत आहे, सनातन आहे; कारण ती त्रिकालाबाधित सृष्टिनियमांसच काय ती सांगते–तुमच्या मानवी कल्पनांनीं कल्पिलेले देवहि त्या स्मृतींतील नियमांस उल्लंघूं शकत नाहींत ! कारण ती मनुष्याच्या देवानें कुजक्या ताडपत्रावर वा खजुरांच्या पानांवर लिहिलेली नसून विश्वाच्या देवानें आकाशाच्या नीलपत्रांवर तार्‍यांच्या जाज्वल्य अक्षरांत मुद्रिली आहे ! त्यांतल्या त्यांत कशास म्हणावयाचेंच तर, मनुष्यास तरी, तिलाच सनातन धर्म म्हणतां येईल !”

शब्दशास्त्रीः–– “ ह्या स्मृतींतून भूकंप टाळण्याचा आमच्यापुरता आत्तांच्या आतां आपण कोणता उपाय सांगूं शकतां ?”

नारदः––“ (हंसून) भूकंपविद्येचे जे नियम आहेत त्या सृष्टिनियमांचा शोध लावा, जें कळलें आहे त्याच्या आधारें भूकंपाचे पट्टे भूगर्भांत कुठें कुठें आहेत ते निश्चित करून त्या त्या कक्षेंत वसति करूं नका, नगरें वसवूं नका, आणि भूकंपांत आपण दगावलों तर आपल्या कुटुंबांतील जीं कोणीं मुलें-माणसें वांचतील त्यांना कांहीं तरी अन्नवस्त्राचा आधार असावा म्हणून सांपडण्याच्या आधींच शक्य तितक्या मोठ्या रकमेचा विमा उतरून ठेवा. महाराष्ट्रापुरतें बोलायचें तर मुंबईची नवभारत किंवा पुण्याची कॉमनवेल्थ ह्यांत विमा उतरावयास येत असाल तर माझ्याचबरोबर कां चलाना ! मी तिकडेच चाललों आहें.”

नारदाच्या तोंडचीं हीं वाक्यें ऐकतांच शब्दशास्त्री सविस्मय वर पाहात म्हणाले, "नारदा, आपण या विमा मंडळ्यांची अडती (एजन्सी) घेतलेली आहे कीं काय आजकाल? एवढ्या गंभीर सनातन विभ्रमाचा हा असला भिकार उपसंहार? अरेरे! या परम भगवत्भक्त भगवान नारदांचा शेवटीं एक विमा मंडळीचा अडत्या व्हावा ना? कोण अधःपात!"

पण हीं वाक्यें संपण्याच्या आधींच नारद अंतर्धानले होते!

— १९३५

★

१२२५
८५धा

# एक घडलेला चुरचुरीत संवाद

: ६ :

जसा धार्मिक भाबडेपणा असतो तसाच एक बौद्धिक भाबडेपणा असतो. धर्मभोळा वर्ग जर एखादी गोष्ट धर्म म्हणून करूं लागला नी त्याला विचारलें कीं, अहो, ह्या गोष्टीचा काय लाभ ? हें कां करतां असें ? तर तो बिचारा सरळपणें सांगतो, ‘ पोथींत असें आहे, हें देवाला आवडतें, हा आमचा धर्म आहे ’—इतकेंच काय तें ! कोणचें तरी कारण सांगून माझी तशी श्रद्धा म्हणून मी करतों एवढेंच काय तें म्हणतो. त्याचें तें म्हणणें आपल्याला पटलें नाहीं तरी समजतें. पण कांहीं लोकांना नुसतें पोथींत आहे म्हणून आपण एखादी गोष्ट करतों, ती तर्काला टिकते कीं नाहीं, उपयुक्त आहे कीं नाहीं, हें आम्हीं पाहिलेलें नाहीं, असें मान्य करून स्वतःला धर्मभोळे म्हणवून घेण्याची तर लाज वाटते, पण ती धर्मभोळी गोष्ट, आचार वा समजूत तर संवयीमुळें सोडवत नाहीं. पोथींत सांगितलें म्हणून काय तें तें खरें असें म्हणून न थांबतां, तो आचार

वा समजूत आजच्या बुद्धिवादाच्या कसोटीसही पूर्णपणें उतरते आणि विज्ञानाच्या प्रत्यक्षसिद्ध प्रयोगांत ती तशी कसास उतरते म्हणूनच आम्ही त्यां समजुतीस उचलून धरून तसें आचरतों; आम्ही भोळे नसून बुद्धिनिष्ठच आहोंत, असें सिद्ध करण्याचा त्यांचा यत्न चालतो, त्यांना धर्मभोळेपणा तर सोडवत नाहीं आणि बुद्धिवादी पण म्हणून घ्यावेंसें वाटतें. त्यामुळें निर्भेळ धर्मभोळेपणाहूनहि त्यांचा हा बौद्धिक भाबडे-पणा केविलवाणा वाटूं लागतो. ज्या आचाराचे ते समर्थन करूं जातात तो अधिकच हिणकस ठरूं लागतो. आजच्या सुधारकांतहि अशा अर्धवट वृत्तीचे किती तरी लोक आढळून येतात ! त्यांतहि कांहींजण केवळ दुष्पीपणामुळेंच किंवा मिथ्याचारीपणामुळेंच असे वितंडवाद करतात असे नाहीं. त्यांच्यांतील कांहींची एक निरपेक्ष नी निःस्वार्थी अशी पूर्वजाभिमानाची सद्‌भावनाहि त्यांस आपल्या धर्मभोळ्या नी आज टाकाऊ ठरणाऱ्या आचारास असें येनकेन प्रकारेण समर्थिण्यास प्रवृत्त करते. त्यास असें भय वाटतें कीं, जर आपले पोथीगत आचार आजच्या विज्ञानाच्या वा तर्काच्या कसोटीस उतरत नाहींत असें सिद्ध होऊं दिलें, तर आपले ऋषि त्रिकालदर्शी, आमचीं शास्त्रें त्रिकालाबाधित, नी आमचा धर्म सनातन नाहीं असें मानावें लागेल. पूर्वज मूर्ख होते असें ठरेल ! या चुकीच्या समजुतीमुळें ते ते जों जों त्या धर्मभोळेपणाचें समर्थन बुद्धिवादानें नी विज्ञानानें करूं जातात, तों तों तो आचार वा रूढि अधिकच धर्मभोळी ठरूं लागते, नी पूर्वजांच्या पदरीं नसता मूर्खपणा अधिकाधिकच पडूं लागतो.

मागच्या परिस्थितींत एखादी रूढि उपयुक्त असली किंवा त्या काळच्या भौतिक ज्ञानाच्या मानानें एखादा सिद्धान्त बरोबर वाटला; पण जर ती रूढि आज समाजास हानिकारक ठरत असेल वा तो सिद्धांत वाढत्या भौतिक नी प्रयोगासिद्ध ज्ञानानें खोटा पडत असेल तर ती रूढि बदलण्यांत वा तो सिद्धांत असिद्ध मानण्यांत पूर्वजांचा कांहींहि अपमान होत नसून उलट त्यांत आमचा नी त्यांचा गौरवच आहे.

कारण त्यांनीं मानवी ज्ञानाची सीमा त्या काळीं तितकी वाढविली, त्या भांडवलाचा योग्य उपयोग करून, त्यांच्याच् भांडवलाच्या बळावर आम्ही आपली मानवी ज्ञानाची संपत्ति अधिकाधिक वाढवीत चाललों आहों, असेंच त्यायोगें सिद्ध होतें. वडिलांचें राज्य वंशजांनीं वाढविलें, 'बापसे बेटे सवाई' निघावें हेंच पूर्वजांना नी वंशजांना भूषण. पण कांहीं लोकांना वडिलांहून आम्ही अधिक मूर्ख होत आहोंत, बापाची मिळकत आम्ही बुडवीत आहों, असें सिद्ध करण्यांतच स्वतःची धन्यता, वडिलांचा गौरव, नी त्यांच्या पोटीं आपण जन्म घेतल्याचें सार्थक वाटतें !

स्वतःस धर्मभोळे म्हणवून घेण्यांत कमीपणा मानणाऱ्या आणि बुद्धि-वादास टिकेल तेंच स्वीकारूं असें म्हणणाऱ्या प्रामाणिक सुधारकांतहि हा बुद्धिभोळेपणा कसा त्यांना नकळत दबून बसलेला असतो तें स्पष्ट व्हावें यासाठीं आणि " आपली प्रत्येक रूढि आणि आचार आजच्या परिस्थितींत आपल्या हिंदु राष्ट्राच्या उदाहरणास उपयुक्त आहे कीं नाहीं, तो बुद्धिवादास टिकतो कीं नाहीं, तें कोणत्या कसोटीवर कसें पारखावें, याची पद्धत ध्यानीं यावी म्हणूनहि " " पंचगव्य " या विषयावर आमचा एका सुधारक मित्राशीं झालेला संवाद खालीं देत आहों. संवाद शक्य तों स्मरणपूर्वक घडला तसाच दिलेला आहे.

आमचे हे मित्र हिंदुसंघटनाचे पूर्ण अभिमानी; अस्पृश्यताच नव्हे, तर जातिभेदहि न मानणारे आणि प्रकट सहभोजक आहेत. प्रामाणिक, चिकित्साप्रवण, बहुश्रुत नी आर्यवैद्यकाचे अभ्यासू असलेल्या ह्या आमच्या वैद्यशास्त्रीय मित्रांनीं गेल्या गणेशोत्सवीं आमची भेट घेऊन पंचगव्याचा आचार टाकाऊ नी भाबडा होय ह्या आमच्या मताविषयीं त्यांचा निषेध व्यक्तविण्यासाठीं ती तो आचार आजच्या विज्ञानाच्या कसोटीसहि कसा पूर्णपणें उतरतो तें बुद्धिवादानेंच आम्हांस पटवून देण्यासाठीं आमच्याशीं बुद्धया चर्चा केली. तिचा वेंचक भाग असा---

**वैद्यमहाशय**—" आमच्या त्रिकालदर्शी पूर्वजांनीं आपल्या ज्या अनेक आचारांना धर्म म्हणून पाळावयास सांगितलें आहे, तें त्या आचारांनीं

लोकांचें भौतिक कल्याणहि व्हावें अशाच हेतूनें सांगितलें आहे. पंचगव्य पिणें हाहि आचार असाच ऐहिक दृष्टयादेखील हितकर आहे. अशा आचाराविषयींची धर्मभावना नाहींशी करणें हेंच उपयुक्ततावादाच्या दृष्टीनेंहि घातुक ठरतें."

वैद्यबुवांस यावर आम्ही विचारलें, "प्रथम हें सांगा कीं, तुम्ही आम्हांशीं पोथीवाद घालणार आहांत कीं बुद्धिवाद? म्हणजे अमुक वचन शास्त्रांत आहे म्हणून तें सत्य असें म्हणणार कीं, मानवी तर्काला नी उपयुक्ततेला तें धरून आहे म्हणून ग्राह्य असें म्हणणार? तें ठरलें म्हणजे तसें आम्हांस बोलतां येईल."

वैद्यमहाशय—"मी बुद्धिवादानेंच हें सिद्ध करणार कीं, शास्त्रवचनें निदान या पंचगव्यप्रकरणीं तरी अगदीं ग्राह्य आहेत. धर्म म्हणून तो आचार–जो आमच्या त्रिकालदर्शी पूर्वजांनीं सांगितला, तोच तर्काला नी उपयुक्ततावादालाहि धरून आहे."

आम्ही—"ठीक. जें मनुष्यहितास ऐहिक दृष्टया उपयुक्त आहे तें कसें उपयुक्त आहे हें न सांगता नुसतें तें कृत्य पुण्य, उलट कृत्य पाप, त्या कृत्यानें देव पावतो, उलटपक्षीं रागावतो, इतकेंच काय तें सांगण्याची, धर्माच्या पारलौकिक अवडंबरांत तो आचार गुरफटून टाकण्याची पद्धत पूर्वीं कितीहि आवश्यक असली तरी ती आतां त्याज्य नी अहितकारकच ठरविणें भाग आहे. कारण अमुक एक गोष्ट उपयुक्त म्हणून न सांगतां तो त्रिकालाबाधित सनातन धर्म आहे एवढेंच सांगत राहिल्यानें, तो आचार वा ती वस्तु स्वरूपतःच स्वयमेवच धर्म्य आहे असा लोकांचा बुद्धिभ्रम होतो आणि त्यामुळें ज्या परिस्थितींत त्या वस्तूपासून वा आचारापासून मनुष्याचें अहित होतें, त्याहि परिस्थितींत ती वस्तु वा आचार धर्म्य मानला जाऊन लोक अनुसरूं लागतात. गायीचेंच पहा. ती उपयुक्त पशु म्हणून पालनीय ठरली; त्यायोगें हळुहळू तिला देवता, परलोकीं स्वर्गति देणारी देवी, असें समजूं लागतांच ती गाय वस्तुतःच पूज्य, पवित्र, मनुष्याहूनहि श्रेष्ठ वाटूं लागली. त्यामुळें ज्या परिस्थितींत

ग्रं. सं. ९९९५.



गाय ही राष्ट्रास ऐहिक दृष्ट्या अनुपयुक्त ठरते वा गोवध हेंच मनुष्य-हितसाधक कृत्य ठरतें त्याहि परिस्थितींत गाय ही वस्तुतःच पूज्य देवता, माता अशी धर्मभावना दृढ झाल्यानें तिला मारण्याचें 'पातक' करण्यापेक्षां राष्ट्राच्या लढाया हरून राष्ट्र देखील लोक मरूं देतात! शत्रूच्या गायी, केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीनें आपल्या शत्रूच, हें तत्काळ पटतें; शत्रूच्या दाणावैरणीप्रमाणें त्यांच्या गायींचाहि नाश करणें अवश्यमेव सत्कृत्य ठरतें. पण गाय ही वस्तुतःच पूज्य देवता मानली जाऊं लागली म्हणून, वस्तुतःच अवध्य ठरली म्हणून, शत्रूच्या गायींदेखील मारावयास हिंदु सैनिक सहसा सिद्ध होत नाहींत. कित्येक परदेशी वेळ्यांत शत्रूच्या गायींचे मांस खाण्यास नाकारून हिंदी शिपाई उपाशी मरत, पण तें गोमांस खाइनात. कारण गोमांस हें धर्मतः निषिद्ध ही त्यांची भावना केली गेली होती. पण जर केवळ गाय ही उपयुक्त म्हणूनच रक्षणीय असें स्पष्ट ज्ञान त्यांना दिलेलें असतें तर ते हिंदु लोक युरोपियनाप्रमाणेंच परशत्रूच्या गायी चापून कापून काढून त्यांवर जगते. अन्नहि परब्रम्हच. पण शत्रूची दाणावैरण आपण जशी अवश्य तर जाळून पोळून टाकतों, तशीच शत्रूंच्या गायींचीहि वाट लागती. परंतु गाय ही वस्तुतःच धर्म्य ठरली, पवित्र ठरली; त्यामुळें तिचें दूधच नव्हे, तर गोमय, गोमूत्रहि पवित्र ठरलें! कारण तिच्या शरिरांतील दुधाच्यास्थानीं जसे देव स्थापिले गेले तसेंच गोमय–गोमूत्रांतहि त्यांची स्थापना पोथींत सांगितली, व्यवहारांत शपथेवर प्रत्येकास शिकविली! अगदीं गोसूक्तांत शास्त्रोक्त श्लोक सांगतो, 'मूत्रे गंगा!' गाईच्या मूत्रांत गंगा निवसते! मग काय आश्चर्य कीं, लाखों लोक गोमूत्रप्राशनें पाप जातें, मनुष्य पवित्र होतो म्हणून ते पिऊं लागले!"

**वैद्यमहाशय**—"नाहीं! गोमूत्र जें आही पितों तें पाप जातें म्हणून पीत नाहीं. पंचगव्य पिण्याचा आचार वैद्यशास्त्राला अगदीं धरून आहे. ही आमची रूढि मुळींच भाबडेपणाची नाहीं. मी वैद्यशास्त्राच्या आधारें पंचगव्य पिणें कसें अवश्य तें सिद्ध करून देतों."

आम्ही—" वैद्यकीचें आधार थोडे मागून बघूं. प्रथम आज गोमय-गोमूत्र हें पापक्षालनार्थच लोक पंचगव्यांत घालून, फार काय, गोमूत्र तर नुसतें देखील पितात; त्यांत आपण एखाद्या रोगावरचें हें औषध घेत आहोंत, ह्याचें भान देखील त्यांना नसतें ही गोष्ट खरी कीं खोटी ? जे हजारों ब्राह्मण श्रावणीच्या दिवशीं गोमूत्र-गोमय पितात, त्यांतील बहुतेक लोक तो एक पापक्षालक धर्म्य संस्कार म्हणूनच करतात—हें नाकारणें निवळ खोटें बोलणें होईल. विटाळलेल्या कपड्यावर जेव्हां म्हातारी माणसें गोमूत्राचे उगीच चार शिंतोडे टाकतात, सहभोजनाचें प्रायश्चित्त म्हणून गोमूत्र पळीभर प्या नी मोकळे व्हा, म्हणून जेव्हां भट म्हणतात, महारांनीं एखाद्या महाडाच्या तलावांत पाणी भरलें म्हणून तो ' शुद्ध ' करण्यासाठीं जेव्हां सारें गांव त्या विहिरींत वा तलावांत गायीचें शेणमूत्र ओतून त्यास अधिक घाणेरडें करीत असतांना समजतात कीं, तें पाणी पुन्हा ' शुद्ध ' करून घेतलें—अशा प्रत्यहीं हजारों प्रसंगीं गोमूत्र जे आम्ही वापरतों, तें गोमय गोमूत्रानें ' पाप ' जातें, पवित्रता येते, ह्याच भावनेनें होय—रोग जावा ह्या भावनेनें नव्हे, हें कसें नाकारतां येईल ? प्रत्येक प्रायश्चित्तांतच पंचगव्य असतें, प्रत्येक रसायनांत नव्हे; या एकाच गोष्टीवरून हें सिद्ध होतें ' मूत्रे गंगा ' असें गोमाहात्म्यांत शास्त्रवचन आहे, ' मूत्रे औषधयः ' असें नाहीं. फार काय, पंचगव्य पितांना जो श्लोक मंत्र म्हणून आपण म्हणतों तोच हें निर्विवाद सिद्ध करतो. तो मंत्र हाच ना कीं ' यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामकं ! प्राशनात् पंचगव्यस्य दहत्यग्निरिवेन्धनं ॥ ' आतां बोला ! यांत पंचगव्यानें हाडींमासीं खिळलेलें ' पाप ' जळलें जातें असें सांगितलें आहे, रोग बरे होतात असें नव्हे, हा धार्मिक श्लोक आहे का वैद्यशास्त्रीय ? "

वैद्यमहाशय—" धर्मशास्त्रांत जरी तो श्लोक असला तरी वैद्यशास्त्रास अगदीं धरून आहे. आमच्या धर्मशास्त्रांतील प्रत्येक श्लोकांत गूढ अर्थ भरलेला असतो. "

आम्ही—"ती नुसती धमकी नको! कोणाचा गूढ अर्थ तो ह्या श्लोकापुरता काढून वैद्यशास्त्रीय कसा तें सांगा."

वैद्यमहाशय—"ह्या श्लोकांत 'पाप' असा जो शब्द आहे त्याचा अर्थ 'रोग' असा घ्यावा. म्हणजे 'हाडींमांसीं खिळलेले रोग बरे होतील' असा अर्थ होईल; हा श्लोक वैद्यशास्त्राच्या कसोटीस उतरेल."

आम्ही—"आतां गंमत पहा अं. हा श्लोक धर्मशास्त्रीय होता, तोंवर फार तर उपेक्षणीय ठरता. पंचगव्यानें पाप जातें ही श्रद्धा होती, श्रद्धेला कशाला तर्काची करवत लावा, असें एक वेळ म्हणतां येतें. पण जुन्या भोळ्याभाबड्या श्लोकांना तर्कशुद्ध ठरविण्याच्या हौसेनें तुम्ही त्यांच्यांत नसता गूढ अर्थ दडपून जेव्हां तर्काच्या कसोटीला लावतां तेव्हां धांवण्याच्या स्पर्धेस हांवभरी होऊन भाग घेऊं लागणाऱ्या पंगूसारखे ते निव्वळ हास्यस्पद होतात! 'पाप' याचा अर्थ 'रोग' असा घेणें हेंच विपरीत नाहीं काय? रामकृष्ण परमहंस रोगानें मेले ही खरी गोष्ट सांगतांना रामकृष्ण परमहंस पापानें मेले म्हणून जर कोणी म्हणाला तर त्यास तुम्ही दीडशहाणाच म्हणणार नाहीं का? आमच्या औषधांनीं रोगी तात्काळ रोगमुक्त होतात, अशी पाटी न लावतां जर एखाद्या वैद्यानें अशी पाटी लावली कीं, 'आमच्या औषधानें पापी पापमुक्त होतात!' तर तुम्ही त्याची हुर्यो उडविणार नाहीं का? डॉक्टरच्या घरीं जाऊन जर आपण म्हणालांत, 'आमच्या घरीं एक पापी आहे; त्यास आपण पापमुक्त कराल काय?' तर डॉक्टर तुम्हांस सांगणारच कीं, 'गृहस्था, तूं पत्ता चुकलास, शंकराचार्य इथें रहात नाहींत!—' इतका गैरसमज वाढविणारा शब्द वैद्यकशास्त्रासारख्या कांटेकोर विज्ञानांत वापरणारा ह्या श्लोकाचा कर्ता किती गबाळ्या मनुष्य असला पाहिजे बरें! वैद्यकांत पांडुरोग, क्षयरोग वैद्यानें रोग चिकित्सा करावी, असें प्रयोग शब्द आम्हीं शतावधि पाहिले आहेत; पण पांडुपाप, क्षयपाप, वैद्यानें पापचिकित्सा करावीं, असे प्रयोग कांहीं पाहिलेले नाहींत!"

वैद्यमहाशय— “ पण ? ‘पाप’ ह्या शब्दाचा ‘रोग’ असाहि अर्थ असलेला मी तुम्हांला दाखवून दिला तर !”

आम्ही—“ तरी काय ? रोग हा सुनिश्चित शब्द वैद्यकविज्ञानाच्या परिभाषेंतलाच योजण्याचें सोडून अनेक घोटाळे उत्पन्न करणारा ‘पाप’ हा शब्द त्या अर्थी योजणाऱ्या ह्या ग्रंथकाराची चूकच ठरेल, नाहीं काय ? रोग शब्द काय त्या वृत्तांत बसला नसता ? तें वैद्यकविज्ञानांतलें मोजकें वचन लिहावयाचें होतें— ‘प्रत्यक्षरश्लेषमयप्रबंधा’ चें एखादें काव्य नव्हे !”

वैद्यमहाशय—(हंसून) “ त्यांना काय नाहीत कीं, तुमच्यासारखें अश्रद्ध लोक पुढें त्यांच्या शब्दाचे असे धिंडवडे काढतील म्हणून !”

आम्ही—(हंसून) “ आतां पुन्हां श्रद्धेचें नांव कां मध्यें आणतां ? श्रद्धेच्या दृष्टीनें तो श्लोक निरुपद्रवी, फार तर भोळसर म्हणून आम्हीं कधींच बाजूस सारला होता. तुम्हींच त्याला अगदीं काढेकोर पारिभाषिक वैद्यकशास्त्रीय कसोटीस लावूं निघालेत ! दुसरें असें कीं, त्या पंचगव्य-महात्म्याच्या कर्त्यास आमच्यासारखे ‘पाप’ शब्दाचा ‘रोग’ हा अर्थ न समजण्याइतके अज्ञानी लोक पुढें निघणार आहेत हें काय माहीत असणार म्हणून जें म्हणालांत तें तर त्याहूनहि आश्चर्य होय ! अहो, मघांपासून तुम्ही ह्या शास्त्रकार अशा ज्या आमच्या पूर्वजांना ‘त्रिकाल-दर्शी’ म्हणून ठांसून दहादां म्हणालांत, त्यांना पुढें सन १९३५ त अश्रद्ध लोक निघूं शकतील हें कळलें नाहीं, असें होईल तरी कसें ? का त्यांच्या त्या त्रिकालदर्शी ज्ञान-पंचांगांत हें १९३५ सनाचें पान तेवढें फाटलेलें होतें ?”

वैद्यमहाशयः— “ बरें आम्ही तुमचा हा आक्षेप मान्य करतों कीं, पंचगव्य हें वैद्यकीय औषध म्हणून ग्राह्य असें न सांगतां आमच्या धर्म शास्त्रांत ते पापक्षालक म्हणून सांगितलें आणि त्यामुळें आज लक्षावधि लोक श्रावण्यांतून, प्रायश्चितांतून नी व्यवहारांतून जे पितात ते मूळचा वैद्यकीय हेतू साफ विसरून जाऊन निव्वळ धार्मिक भावनेनेंच काय ते

पितात. पण आम्ही म्हणतों कीं, त्यामुळें त्यांचा वैद्यकीय उपयोग अधिकच व्हावा, औषध घ्या म्हणून सांगितलें म्हणजे लोक इतके नियमानें तें पिणार नाहींत, पण धर्म म्हणून सांगितल्यानें पाप जाण्याच्या अभिप्रायामुळें तें पंचगव्य लाखों लोक अधिकच साक्षेपानें पितील, असाच शास्त्रकारांचा त्या पंचगव्याच्या धर्मीकरणांत सद्धेतु नव्हता का? आणि त्याचा परिणामहि एकंदरींत चांगलाच झाला नाहीं काय?"

आम्हीः— "चांगला परिणाम तर झाला नाहींच, पण उलट एकदरींत पहातां अगदीं वाईट परिणाम झाला. त्या भाबड्या काळीं जो कांही उपयोग अशा धर्मीकरणाचा असेल नसेल तो आतां तर अगदींच दुर्घट, कसें तें पहा. अमुक औषध अमक्या रोगावर रामबाण आहे इतकीच यथार्थ प्रशंसा वैद्यक ग्रंथांत शेंकडों औषधांची केली असतांहि आणि त्या औषधानें पाप जातें, पुण्य लागतें प्रभृति भाकड वशिले लावले नसतांहि तीं औषधें हजारों रोगी वैद्यांना पैसे देऊन देऊन घेतातच ना? धडधडीत बाटलेला महार डॉक्टर असलेल्या औषधालयांत त्याच्या हातानें बाटल्या पितात, त्याला बुद्धासुद्धां घरांत आणतात! रोग रोखठोक बरा करणारें औषध घेणें 'पाप' आहे म्हणून निषिद्ध केलें तरी रोगी घेतातच! तव्हां गोमूत्र—गोमयानें अमुक रोग बरे होतात असें नुसतें सांगितलें असतें नी तसा रोखठोक अनुभव येता तर वैद्यकांतील ओवा, शोपा धर्माचा वशिला नसतांनासुद्धां जशा घरोघर वापरल्या जातात, तसें ते पंचगव्यहि त्या त्या रोगावर वापरलें जातेंच! पण त्या गोमूत्रानें पाप जातें, गाय म्हणून तिची शेपटी शिवली तरी विटाळ जातो, तिचें गोमूत्र म्हणजे गंगा, अशी वाह्यात् स्तुति केल्यानें त्या गोमूत्र—गोमयांचा जो खरा औषधी गुण तो उलट लुप्त होऊन कुचकामाचा झाला. रोग घालविण्याऐवजीं बुद्धिभ्रंशाचा नी भाबडटपणाचा एक नवा रोग फैलावण्यास मात्र हें गोमूत्र—गोमय कारण होऊं लागलें."

वैद्यमहाशयः— "ही मात्र तुम्ही अतिशयोक्ति करतां!"

आम्ही— "मुळींच नाहीं! उलट त्या पंचगव्याच्या मंत्रांत 'हाडीं-

मांसीं खिळलेलें पाप—तुम्ही म्हणतां त्या अर्थी रोग—पंचगव्य पितांच ‘अग्नींत सर्पण जळावें तसें जळून भस्म होतात—‘दहत्यग्निरिवेंधनम्’ ही मात्र अतिशयोक्ति आहे खरीच ! येतां जातां भावडे गोरक्षक बोलून जातात, गोमूत्र—गोमय खाल्ल्यानें, पंचगव्यानें सर्व रोगांचा मुळांतच उच्छेद होतो ! अहो, जर पंचगव्यानें सर्व रोग प्रतिबंध होतो किंवा सर्पण अग्नि जाळतो तसा यच्चावत् रोग तितका पंचगव्य पितांच देहाग्नींत राख होऊन जातो, तर मग वाग्भट्ट-चरकांना वैद्यक ग्रंथाचें पुढें एक पानदेखील लिहिण्याची आवश्यकता नव्हती ! सारीं औषधें, शल्यें, रसायनें, मात्रा, डॉक्टर, वैद्य, क्षकिरणें, जंतुघ्न टोंचणीं—निरर्थक ठरतीं. सारीं रुग्णालयें बंद करून गोमूत्रालयें तेवढीं उघडीं ठेवलीं कीं आरोग्यखात्याचें काम आटोपतें ! जिकडे तिकडे पी हळद नी हो गोरी, पी पंचगव्य नी हो वरी !!—हा धडाका सुरू झाला असता ! असली मूर्खपणाची अतिशयोक्ति तुम्हांस खपते तरी कशी ? नी अशा भावडट मंत्रांत तुम्ही वैज्ञानिक अद्यावत् औषधीय पाठ म्हणून आजच्या वैद्यकांत लिहूं धजणार तरी कोणच्या तोंडानें ! जर गोमूत्र अशी सवाई संजीवनी असती, तर त्याच्या हौदांत शतकोशतकें डुंबत रहाणारे आम्हीं आज प्लेग—महामारीचें राखीव रान कसें झालों आणि सात पिढ्यांत त्या पशूच्या शेणामुताचा थेंबहि तोंडांत न घालणारे ते युरोपियन असे लालबुंद, गलेगठ्ठ, निकोप नी निरोगी कसे ? अगदीं आमच्याच वायुमानांत आमच्या शेजारीं रहाणारे मुसलमान गोमूत्र पीत नाहींत म्हणून पटापट मरत नाहींत कसे ? गोमूत्राच्या वैद्यकीय उपयोगांची ही अवाच्य नी भरमसाट स्तुतीच त्यांची विटंबना करते—आणि त्यास कारण त्या पदार्थांचें धर्मीकरणच नव्हे काय ? पशूचे मूत्र प्याल्यानें म्हणे मनुष्य ‘पवित्र’ होतो ! अशा भाकड गोष्टीवर विश्वसणाऱ्या बुद्धिभ्रंशाचा रोग मात्र ह्या पंचगव्यानें फैलावला खरा !”

**वैद्यमहाशय**— “आपण ह्या भावड्या धार्मिक अतिशयोक्तीविरुद्ध हत्यार उपसलेंत हें अगदीं ठीक केलेंत. पण शास्त्रशुद्ध पद्धतीनें लिहिलेल्या

आपल्या वैद्यक–ग्रंथांत अशी अतिशयोक्ति नाहीं यं ! गोमूत्राचें औषध कोणकोणच्या रोगावर लागू पडतें तें जसें त्यांत दिलें आहे, तसेंच गोमूत्र कोणच्या प्रकृतिपरत्वें अपायकारक होतें तेंहि दिलें आहे. उदाहरणार्थ, गोमूत्र हे पित्त प्रकृतींच्या माणसानें प्यालें असतां अपाय करते असें स्पष्ट सांगितलें आहे. पित्तप्रवण साऱ्या रोग्यांना तें वावडें आहे."

आम्हीः—" कशी लाखाची गोष्ट बोललांत ! पित्त विकारांना गोमूत्र औषध नाहीं, अपायकारक; या एकाच उदाहरणावरून तें सर्वरोगपरिहारक वा प्रतिबंधक असें म्हणणें मूर्खपणाचें ठरत नाहीं का ? पण गोमूत्राचें धर्मीकरण केल्यामुळें आज बायाबापड्या तें वाढेल त्यास पाजतात, पितात. प्रायश्चित्तांत भट तें पंचगव्य सरसहा सर्वांना देतात; श्रावणींत जमणारे धष्टपुष्टादि सारे लोक कांहीं रुग्णालयापुढें दाटी करणारे रोगी नसतात !! गोमूत्रानें जे रोग बरे होतात त्यांनींच पीडलेल्यांना तेवढें पंचगव्य द्यावें. पित्तप्रकृतीचें ब्राम्हण निवडून त्यांना तें देवूं नये अशी कांहीं एक पद्धत त्या संस्कारांत नाहीं. अर्थात् हें संस्कार नी पंचगव्याची ही रूढि निव्वळ धार्मिक म्हणजेच निव्वळ भाबडट आहे, वैद्यकशास्त्रानें तिचें समर्थन होऊंच शकत नाहीं. उलट सर्वांस सरसहा गोमूत्र–गोमय देणें वैद्यकाच्या दृष्टीनें अपायकारकच होतें. तसें म्हटलें तर गायीचेंच कां, गाढविणीचें मूत्रहि औषधीयच आहें !"

वैद्यमहाशयः—" होय, आठ प्रकारचीं मूत्रें औषधीकर्मांत सांगितलीं आहेत. शेळीचें, उंटिणीचें, गाढवीचें, घोडीचें—"

आम्हीः—" फार काय 'नास्ति मूलमनौषधम्, ह्या सूत्राप्रमाणें 'नास्ति मूत्रमनौषधम्' असें म्हटलें तरी चालेल ! नृमूत्रहि औषधीय आहे ! मग गोमूत्राचेंच एवढें प्रस्थ कां ? गाय ही देवता म्हणून ! पुन्हा असें पहा, वैद्यकांत वाटेल त्या गाईचें शेणमूत कांहीं औषधीय मानलेलें नाहीं."

वैद्यमहाशयः—" मुळींच नाहीं. उलट अन्नें, पक्वान्नें खाणाऱ्या

गाईच्या शेणामुतास निषिद्ध मानलें आहे. कालवड, रानांत हिरवेगार गवत खाणारी, अशा गायीचें गोमूत्रच औषधीय."

आम्ही:— "असे नियम आहेत पण तेहि एकरुप नाहींत ! आणि व्यवरांत तर त्यांचा मागमूससुद्धां उरलेला नाहीं ! ठाणबंद, जख्खड, ओखढवाणीखाऊ, ज्यांच्या शेणास दुर्गंध; रोगीट, क्षयी, गाय म्हटली कीं देवता ! गोमूत्र म्हटलें कीं गंगाजल ! अशा ह्या ओंगळ रूढीचें समर्थन वैद्यकाच्या आधारें कधींतरी करतां येईल कां ? धर्मीकरणानें आमचें वैद्यकदेखील गोमूत्राच्या प्रकरणीं थोडें अंधळेंच झालें आहे. म्हणून त्यांत जे रोग गोमूत्रानें बरे होतात म्हणून लिहिलें आहे, त्यांची अद्यावत् चिकित्सा नी रसायन यांच्या कसोटीनें प्रयोगशाळेंत पुन्हां एकदां परीक्षा व्हावी. औषध म्हटलें म्हणजे त्यांचे पाठप्रमाण–पात्र–परिस्थितिपरत्वें नियमबद्ध-कोष्टक हवें, नुसतें आपलें 'दहत्यग्निरिवेन्धनम्' काय कामाचें ! तशा अद्यावत् प्रयोगशाळेंतील वैद्यकीय आणि रासायनिक कसोटींत गोमूत्र–गोसयाचे जे औषधीय किंवा कृषिकर्मीय उपयोग ठरतील त्या मानानें तें सेव्य समजण्यास यत्किंचित्‌हि हरकत नाहीं. हा प्रश्न एक गोमूत्राचा, गायीचा वा पंचगव्याचाच नाहीं. प्रत्येक पदार्थ मनुष्याला ज्या प्रमाणांत उपयुक्त त्याच प्रमाणांत सेव्य. त्याचें धर्मीकरण केलें कीं, तो वस्तुतःच देवता होऊन पडतो. आणि ह्या भाबड्या वृत्तीनें राष्ट्राची बुद्धीच मारली जाते. ह्या भाबड्या प्रवृत्तीस उच्छेदण्यासाठीं गाय, वड, तुळस गोमूत्र हीं कांहीं उपलक्षणें म्हणून निवडून त्यांच्या चर्चेत इतका वेळ आम्ही दवडतो."

— १९३५

★

# आतां मात्र दिवाळींत दुष्काळाची भीतीच नको ! : ७ :

दिवाळीचा सण किती गोड ! किती प्रेमळ ! त्याचा ज्याला त्याला आनंद !

दिवाळी आली रे आली कीं लहान लेंकरांना, मुलांमुलींना, कुमारी-कुमारांना नव्यानव्या छानछान वेषांची, जरीच्या टोप्यांची, रेशमी पोलक्यांचीं, गुलाबी पातळांचीं, ऐटदार नव्या घाटाच्या कोट—जाकिट—सदऱ्यांचीं, सुरेख धोतरजोड्यांचीं आणि फुलबाज्या, हवया, सापतारा, तोटे लवंगी फटाके इत्यादि नाना प्रकारच्या गमतीदार दारूकामांचीं स्वप्नें पडूं लागतात! वडिलापाशीं 'मला हें हवें अं, तें हवें अं' 'घ्याल नं बाबा' असा सादर अर्जाग्रह, आणि तो अमान्य होणार अशी भीति पडली तर आईपाशीं 'घेतलंच पाहिजे अं आई—हवंच तें मला !' असा गोड हट्टाग्रह मुलांमुलींचा घरोघर चालू होतो. इतक्यांत नाना मोहक खेळण्यांचें, वेषांचें, फटाक्यांचें, अत्तरें, उदबत्त्या, सुगंधी तेलांचें सामान एकेक घरांत येऊं लागतें. आईच्या हातीं त्यांतील जें पडेल त्याची

'पाहूं ग पाहूं ग!' म्हणून मुलांची ओढाताण चालू होते. त्यांत लहान रांगती मुलेंहि हातास येईल तें उचलूं लागतात. त्यांना आई इकडे आवरते आहे; तिकडे मोठ्या मुलाच्या ओढाताणींत एखादी सुगंधी तेलाची वा अत्तराची कुपी खाली पडून फुटल्यामुळें तीं ओशाळीं होता आहेत. तोंच तो सुगंध जिकडे तिकडे दरवळून तें वातावरण इतकें आनंदमय होतें कीं आईला रागावूं म्हटलें तरी रागावतां येतच नाहीं!!

घरोघर झाडसारव, साफसफाई, रंगरंगोटी चालली आहे. तिकडे बंगल्यांत बैठका, टेबलखुर्च्या, चित्रें, तसबिरी, पुष्प-पात्रें यांची थाटदार मांडणी होत आहे. इकडे सैपाकघरांत पुऱ्या करंज्या, कडबोळ्यांचें खमंग तळण सळसळत आहे. मुलें आशाळभूतपणें डोकावून डोकावून पळत आहेत. एखादादुसरा अचपळ मुलगा लग्गा लागला तर त्यांतील कांहींतरी पळवून तोंडांत घालून रागावणाऱ्या आईला, आजीला वहिनीलाच उलटा हंसत आहे!

सासरीं सासरीं नववधू आपल्या भावाकडच्या भाऊबीजेसाठीं येणाऱ्या आमंत्रणाची सोत्कंठ वाट पहात आहेत माहेरीं माहेरीं माऊलीचे डोळे आपल्या आमंत्रणाप्रमाणें मुलगी दिवाळीला घरीं येते कीं नाहीं, अशा धुगधुगीनें वाटेकडे लागलेले आहेत!!

दिवाळींत सारें हिंदु-राष्ट्र आनंदाची लूट करीत असतें! गृहींगृहीं मिष्टान्न, नगरोनगरीं दीपोत्सव, जिकडे तिकडे लखलखाट, स्वस्थता, संगीत, प्रियजनांच्या भेटी, भावांस बहिणी ओंवाळीत आहेत, मित्रांना मित्र, आप्तांना आप्त प्रीतिभोजनें देत आहेत, प्रमोपहार वाटीत आहेत, सारी जनता चंद्रज्योतींच्या, फटाकेफुलबाजांच्या गमतींत रंगून गेली आहे. दिवाळीचा सण हीच एक आनंदाची फुलबाजी आहे!!!

* * *

राष्ट्रेंचीं राष्ट्रें जीं एकजीव होऊन शतकोशतकें नांदतात, तीं कांहीं त्यांच्या पुस्तकी वा तार्किक व्याख्येनें नव्हे! हिंदु-राष्ट्र हें एकजीव

आहे कीं नाहीं, तें हिंदुत्वाची शाब्दिक व्याख्या पाहून कितीसें ध्यानांत येणार ? गंगा नदीच्या व्याख्येवरून तिची जितकी कल्पना येईल किंवा आलेख्यांतील ( नकाशांतील ) तिची केसासारखी आंखलेली रेषा पाहून तिच्या प्रवाहाची गंभीरता, शीतलता वा गोडी जितकी पटणार, तितकीच राष्ट्राच्या रुक्ष नी शाब्दिक व्याख्येनें त्याच्या जिवंतपणाची कल्पना येणार ! गंगा खरोखर कशी आहे, तें जसें गंगेला प्रत्यक्ष पाहिल्यावांचून यथावत् कळत नाहीं, त्याप्रमाणेंच हिंदु–राष्ट्राच्या जीवनौघाची जिवंतपणाची, एकात्मकतेची खरी खरी कल्पना त्यांच्या कोटि कोटि हृदयांना सुखदुःखांच्या एकाच भावनेची एकच ऊर्मी कशी थरथरून सोडते, तो साराचा सारा प्रचंड राष्ट्रपुरुष, एका व्यक्तीसारखा, ह्या दसऱ्याला, रंगपंचमीला, दिवाळीला, ह्या रामनवमीला, ह्या कृष्णाष्टमीला, एकच भावनेनें कसा उचंबळून जातो, तें प्रत्यक्षपणें पाहिल्यावांचून यथावत्पणें ध्यानीं येणार नाहीं ! पुस्तकी नी तार्किक व्याख्यांचाहि उपयोग आहेच. जसा आलेख्यांतील तिळाएवढ्या दाखविलेल्या हिमालयाचा ! पण हिमालयाची कांहींतरी यथावत् कल्पना हवी तर निदान काश्मीर तरी पाहिलें पाहिजे ! तसेंच या हिंदु-राष्ट्राच्या अखंडित परंपरेची नी सामाजिक एकात्मकतेची कांहींतरी यथावत् कल्पना हवी असेल तर हा दिवाळीचा एक सण तरी पहा ! दिवाळी हिंदुत्वाची एक सांकेतिक व्याख्याच आहे !

* * *

निदान मौर्यकालापासून तरी, म्हणजेच गेलीं दोन हजार वर्षें, ही दिवाळी ह्या आपल्या हिंदुसमाजांत प्रतिवर्षीं अशीच लखलखाटत आलेली आहे. त्यांचा त्यांचा ऋतु आला कीं कमलवनें जशीं आपोआप फुलून उठतात तसा तो दिवाळीचा दिवस आला कीं आपोआप हिंदुहिंदूंचीं मुखकमलें आपोआप फुलूं लागतात. त्याला राष्ट्रसभेचे किंवा हिंदुमहासभेचे ठराव नकोत, प्रचार नको. हिंदुहिंदूंच्या रक्तांतच ती दिवाळीची जाणीव

जागून उठते. काश्मिरांतील अत्युच्च पर्वतश्रेणीवरील एकदुकट हिंदु देवालयापासून, नेपाळतराईतील घनदाट जंगलांतील रानटी छपरीपासून, भिल्ल-गोंड-कोळ्यांच्या पर्णकुट्यांपासून तों मोठमोठ्या राजामहाराजांच्या प्रासादापर्यंत दिवाळीचे दिवे जणुं काय आपणच पेटावे तसे लखलखाटूं लागतात! अशी हिंदु झोंपडी नाहीं, दूरवरच्या घनदाट रानावनांतील निबिड अंधारांतील एकट्या रानटी पहारेकऱ्याचीहि झोंपडी नाहीं कीं जिथें ह्या दिवाळीच्या रात्रीं दहापांच पंत्या तरी तेवत नाहींत! हे सामाजिक सणच आमच्या राष्ट्रीय एकतेच्या नाड्या होत. राष्ट्रीय जाणिवेचे हिंदुत्वाच्या ममत्वाचे ज्ञानतंतु होते.

* * *

त्यांतहि जे कांहीं थोडे सण आजसुद्धां जातीपातीपंथनिर्विशेषपणें यच्चावत् हिंदूंना एकाच भावनेनें, एकाच संस्कारानें एकजीव करून सोडीत आहेत, त्यांतहि दिवाळीच प्रमुख आहे. आमच्या हिंदुत्वाच्या वैजयंतीतील सारे मणि, माणिक, मौक्तिक ह्या दिवाळीच्या सूत्रांत आपण होऊन ओंवले जातात. वैदिक हिंदूंची कोटि कोटि जनता तर दिवाळीस आपला एक राष्ट्रीय सण समजतेच समजते. पण महावीरांची स्वर्गारोहण जयंती म्हणून आमचे जैन हिंदूहि हा सण पाळतात, आमचे शीख हिंदूहि हा सण पाळतात, लिंगायत हिंदू, आर्यसमाजी हिंदु, ब्राह्मसमाजीय हिंदु, देवसमाजीय हिंदु—हिंदुमात्र तितका हा सण स्वकीय स्फूर्तीनेंच पाळीत आहे. काश्मीर ते सिंहलपर्यंत ह्याला अपवाद नाहीं. गेलीं दोन हजार वर्षें तरी हा सण आपण पाळीत आलों. आजहि अखिल हिंदुराष्ट्राचा तो अत्यंत आवडता सण आहे आणि आणखी एक हजार वर्षे तरी—नव्हे, हिंदु-राष्ट्र राष्ट्र म्हणून जगतें आहे तोंवर ती दिवाळी, ते फटाके, तें सुंदर आगकाम, ते नळे, तो फुलबाजा, तो वीजदिव्यांचा लखलखाट, तीं मिष्टान्नें, त्या भाऊबीजा—ती आनंदाची दिवाळी अशीच चालू राहाणार!—अशा तर्कसंगत विश्वासानें तिचा

विमा अत्यंत सावध अशी विमामंडळीदेखील काढण्यास सहसा कचरणार नाहीं !

* * *

परंतु केवळ ती एकदोन हजार वर्षांची परंपरा आहे म्हणूनच कांहीं ह्या सणास आम्हीं चिकटून राहाणें योग्य होय असा अर्थ नाहीं. राष्ट्रीय जीवनांत परंपरेला एका अंशीं महत्व असलें तरी उपयुक्ततेला नी स्थलकालविवेकाला त्याहूनहि अधिक महत्व दिलें पाहिजे. प्रस्तुत परि-स्थितींत जर एखादी रूढि हानिकारक ठरत असेल किंवा मानवी ज्ञानाच्या उज्ज्वलतर प्रकाशांत एखादी समजूत किंवा सिद्धान्त चुकीचा ठरत असेल, तर त्याच्या मागें कितीहि लांबलचक परंपरा असली तरी तो त्याज्यच गणला जावा. पण हा दिवाळीचा आमचा राष्ट्रीय सण स्वतःच इतका गोड, प्रेमळ, सामाजिक संघटनेस सर्वथैव अनुकूल, आजच्या बुद्धिवादाच्या कसोटीसहि उतरणार आहे कीं, त्याची परंपरा खंडिण्याचें कांहींहि कारण त्यांत आढळत नाहीं; इतकेंच नव्हे, तर दिवाळीसारख्या ज्या सणांची परंपरा गौरवास्पद आणि उज्ज्वल आहे त्यांची सामाजिक उपयुक्तताहि त्यां परंपरेनेंच उलट अधिक वाढत असते. नाना प्रकारच्या ऐतिहासिक स्मृति आणि आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सत्वाचा नी सातत्याचा आत्मविश्वास अशा परंपरेनें जागत राहतो. सुदैवानें कोण-त्याहि धार्मिक भारुडांच्या दलदलींत दिवाळीचा सण रुतलेला नाहीं. भाबड्या नी बुद्धिविहीन लोकभ्रमांचीं पुटें त्यावर म्हणण्यासारखीं चढ-लेलीं नाहींत. नरकचतुर्दशीला पहांटेच स्नान न केलें तर अंगावर घाण पडते प्रभृति लोकभ्रम लेंकरावांचून कोणी खरे मानीत नाहींत—आणि लेंकरांनाहि तसल्या अमंगळ थापा ह्यापुढें कोणी देऊं नयेत, म्हणजे झालें. दिवाळीच्या सणांत मंत्रतंत्र, जादूटोणा, होमहवन गोमूत्रगोमय प्रभृति कोणत्याहि धार्मिक जंजाळाचें प्रस्थ लवलेश नसतच म्हटले तरी चालेल. दिवाळी एक निर्भेळ सामाजिक सण आहे. आपल्या निवृत्ति-

प्रधान राष्ट्राचाहि तो एक प्रवृत्तिप्रधान आनंदोत्सव आहे. त्याचे सारे संस्कार प्रेमळ, सभ्य, समाजसंघटक, श्रवण–नयनानंदक, आरोग्यप्रद, आल्हादक आणि सर्वस्वी निर्मळ आहेत. घरेंदारें, गोपुरें, नगरें रंगवून, शृंगारून जिकडे तिकडे आरोग्यप्रद वातावरण निर्मावयाचे, सुगंधी तेल लावून अभ्यंग स्नान करावयाचे, शोभिवंत नवें वर्ष ल्यावयाचे, स्निग्धरुचिर, मिष्टान्नें खावयाचे, स्नेहीमंडळ पाचारायचे, प्रमोपहार परस्परांना द्यायचे–घ्यायचे, दीपोत्सव करावयाचे, साऱ्या जनतेनें दारूकामाच्या, संगीताच्या संगतीच्या सभ्य होशीत निमग्नावयाचे, शब्दरसरूप–गंधस्पर्शांचा आनंदीआनंद लुटावयाचा; असा हा सण ! त्याची देवतांच मुळी लक्ष्मी आणि संस्कार आनंद ! !—आणि परंपरा श्रीकृष्णमहावीरादि अनेक राष्ट्रपुरुषांच्या ऐतिहासिक विजयोत्साहानी गजबजलेला ! ! !

* * *

असे राष्ट्रीय सण राष्ट्रास एकजीव नी एकरूप करण्यास फार उपयोगी असतात. म्हणूनच आसेतुहिमाचल हिंदुमात्र तितका गेला दोन हजार वर्षे ज्या ह्या सणांत रंगत आला आहे त्या ह्या दिवाळीच्या सामाजिक सणास आपणा सर्व हिंदूंना आपलें एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून अत्यंत उत्साहानें साजरें करीत राहावें. आपल्या पूर्वपरंपरेंत आपल्या हिंदु राष्ट्राच्या अभ्युदयास आजहि जे कांहीं उपयुक्त, बलप्रद नी संघटक सणवार आहेत आणि जे समाजमानसाच्या ( सोशल सायकॉलॉजि ) बुद्धियुक्त कसोटीसहि उतरतात, त्यातच हा दिवाळीचा राष्ट्रीय सणहि गणता येतो. दिवाळींतील बहुतेक संस्कार-उपचार हिंदुसंवर्धनास पोषकच आहेत, प्रत्यक्षनिष्ठ समाजमानसासहि धरूनच आहेत.

* * *

दिवाळीचा सण आम्हांस असा अगदीं मनापासून आवडत असल्यामुळें आम्ही तो या वर्षीहि आनंदानें पाळणार होतो. पण दुष्काळ

पडल्याच्या बातम्या जशा वरचेवर येऊं लागल्या तसतसे आमच्या आनंदावर विरजण पडूं लागलें. अशा उद्विग्न मनःस्थितींत आम्ही होतों, तोंच आमच्या ओळखीचें एक भाटिया गृहस्थ—मुंबईकडे धर्मप्रचारक म्हणून कार्य करीत असतात ते आमच्या खोलींत आले. येतांच त्यांच्या गळ्यांतील धर्मार्थ दानाची एक पेटी होती ती आणि हातांतील पत्रकांचा एक गठ्ठा बैठकीवर ठेवून नी, लोडाशीं टेकून ते विचारते झाले, ' काय वाचतां आहा तें ? काय बातमी आहे त्यांत एवढी ? '

' वऱ्हाडांत दुष्काळाचें ठाणें बसलें आहे ! कांहीं बापडे लोक तर आतांच इतक्या अन्नान्नदशेस पोंचले आहेत कीं, झाडाचा पाला ओरबडून खाता आहेत ! या बिचाऱ्यांना कसली दिवाळी ! या वर्षांची दिवाळी म्हणजेच बोलून चालून दुष्काळांतील दिवाळी. तुम्ही आम्ही साजरी केली तरी एक रुक्ष कर्तव्य म्हणून ! दुःखातलें सुख म्हणून ! '

' छे छे, असें उद्विग्न होण्याचें कांहींच कारण नाहीं ! हें पत्रक पहा ! अहो आतां या दिवाळींत दुष्काळाचं भय कशाला हवें ? दिवाळीच्या आधीच दुष्काळास पिटाळून लावू. धो धो पाऊस पडून जिकडे तिकडे या महिन्याच्या आंत धान्यसमृद्धि झालीच पाहिजे ! अहो, वेद्‌भगवान् आमच्या पाठीशीं असतां आम्हांला दुष्काळ कसा गांजू शकणार ? पण काय करावें ! आम्हीच जर त्या वेदभगवानाकडे पाठ फिरविली तर आमच्या कर्माचे कटू फळ आम्हांस चाखावेच लागणार ! यासाठींच दुष्काळाचें संकट येतें न येते तोंच आम्ही त्यावर तोडगा करण्याचा निश्चय केला आहे. आतां या दिवाळींत दुष्काळाच्या भयाचं नांव कशाला घेतां ! एवढा रामबाण उपाय मात्र वेळींच योजला गेला पाहिजे त्या कार्यास सहाय्य योजण्यासाठींच मी आपल्याकडे आलो आहे ! '

' कोणचा बुवा तो उपाय ? एवढा अमोघ, दुष्काळास दिवाळीच्या आंत पिटून घालविणारा—पर्जन्याचा शिळधार भूमीवर कोसळविणारा ?' आम्ही अश्रद्धपणें हंसलों.

'अहो, कोणचा म्हणजे काय विचारतां? पर्जन्यसूक्ताचा जप!!' आणि लोकांनीं हवें तितकें द्रव्यसहाय्य दिलेंच तर पर्जन्यसूक्तात्मक एक महायज्ञ!!' इतकें बोलतां बोलतांच त्यांनीं अत्युत्साहानें झटपट त्या पत्रकाच्या पुडक्यांतील दोनचार पत्रकें ओरबाडून आमच्या हातीं दिलींहि! त्यांतील एकांत बातमी होती; ती अशी कीं—

> "मुंबई अषिकूल आश्रम दहिसर या संस्थेचे संचालक विद्यार्थि-गणासह मुंबई, आंग्रेवाडा, काळबादेवी रोड येथें पुरुषोत्तम मासानिमित्त आले असून सर्वत्र पर्जन्याच्या अभावामुळें दुष्क-ळाचीं चिन्हें जीं भासत आहेत त्यांच्या निवारणार्थ त्यांनीं पर्जन्यसूक्ताचें जपानुष्ठान चालू केलें आहे! सनातनी धर्माभिमानी सद्गृहस्थांची सहाय्यता मिळाल्यास पर्जन्यन्सूक्ताचा यज्ञ करण्या-चाहि त्यांचा विचार आहे!"

हें पत्रक आम्ही वाचतो आहों न वाचतों आहों तोंच भाटियामित्र म्हणाले, 'ही बातमी केसरींतहि प्रसिद्ध झाली आहे. आमची वरील ऋषिकुल-संचालकाशीं कांहीं ओळख नाहीं तरी आम्ही स्वयंस्फूर्तीनेंच त्यांस वरील यज्ञाच्या कार्यार्थ कांहीं द्रव्य मिळवून धाडण्याचें मनांत आणलें. नी ही दान-पेटी गळयांत बांधून आज बाहेर पडलों. प्रथम आपला विचार घ्यावा म्हणून इकडे आलों आहोंत.'

'आपल्या सद्हेतूविषयीं आभार! ऋषिकुलाच्या वरील संचालकांचा हेतूहि सार्वजनिक कल्याण असेल; पण साऱ्या भारतांत बोकळलेला प्रखर दुष्काळ मुंबईच्या एका कोपऱ्यांत पांच हजार वेळां 'पाऊस पडो' म्हणून जप केल्यानें किंवा यज्ञाची होळी पेटवून त्यांत तूप जाळीत बसल्यानें जाईल ह्या खुळया कल्पनेचें मात्र आम्हांस हंसू आल्यावांचून राहात नाहीं! अहो, माझा विचार घेतां म्हणून सांगतों, हा माझा टांक नी ही दौत इथं पडली आहे. मी जर एखादें दौतसूक्त किंवा टांकसूक्त लाख वेळां जपत बसलों—'हें टांका, या दौतींत तूं आपण होऊन बूड, हे दौती, तूं शाई दे, आणि तुम्ही दोघें मिळून हा माझा



लेख लिहून टाका ! सरस्वती तुम्हांला बुद्धि देवो ! ' तर त्या माझ्या दौतसूक्तानें वा टांकसूक्तानें ह्या वस्तु, हा लेख, झटपट उठून कधींतरी लिहून टाकतील का ? किंवा तो पलीकडे पाण्याचा तांब्या नी भांडें आहे. जर मी एखादा जलसूक्ताचा यज्ञ करीत बसलों आणि प्रार्थिलें ' हे तांब्या, हे पंचपात्री, प्रसन्न व्हा ! तांब्या, तूं आपलें पाणी आपण होऊन त्या पंचपात्रींत न सांडेल इतकें कांठोकांठ भर ! मग हे पंचपात्री तूं येऊन अलगत माझ्या तोंडास लाव ! मला भयंकर तहान लागली आहे ! जलदेवतांनो, प्रसन्न व्हा, नी तांब्यांतलें जल कधींहि आटूं देऊं नका ! ' तर हा निर्जीव तांब्या नी ही पंचपात्री आपण होऊन मला तहान लागतांच लगबग उठून मला पाणी पाजतील का ? तुम्हांला हें पहा ह्या कल्पनेचें हंसूं आलें; पण पर्जन्यसूक्तांचा मुंबईस नुसता जप केल्यानें वा यज्ञ केल्यानें आकाशांतील असले-नसलेले मेघ सारे एकत्र होऊन, जे ह्या तांब्यासारखेच निर्जीव ते, जिवंत माणसांप्रमाणें जप ऐकून, संतोषून, आपल्या ह्या साऱ्या अफाट राष्ट्रांतील हजारों योजन शेतीवर धों धों वर्षाव करतील अशा कल्पनेचें मात्र तुम्हांला हंसूं येत नाहीं ! नुसत्या प्रार्थनेनें एक पंचपात्रीभर पाणीदेखील जर माझ्या तोंडांत आपण होऊन जलदेवता पाडीत नाहींत तर त्या तशाच नुसत्या प्रार्थनेसरशीं धों धों पाऊस हजारों कोसांच्या शेतीवर पाडतील हें संभवतें का तरी ? '

' पण पर्जन्यसूक्त ही तुम्हीं तांब्यापंचपात्रीच्या केलेल्या ह्या टवाळखोर प्रार्थनेसारखी नुसती प्रार्थना नाहीं ! परमपूज्य वेदांतील तो मंत्र आहे ! त्यांत कोण गंभीर नी दिव्य अर्थ भरलेला आहे ! '

' अशीच कांहींतरी गूढ नी भ्रामक समजूत ह्या वेदांतील मंत्रासंबंधीं लोकांची झालेली असते, म्हणूनच त्यांना त्या मंत्रांतूनच कांहींच्या-बाहीच अशी रहस्यमय शक्ति भरलेली आहे असें वाटतें ! पण मी सांगतों कीं, त्या पर्जन्यसूक्तांतून, मी आतां टांकसूक्त वा शाईसूक्तांत जी प्रार्थना केली ती अगदीं तशी एक प्रार्थना साधी काय ती केलेली

आहे ! तुम्हीं तीं पर्जन्यसूक्तें सार्थ वाचलीं आहेत का ? ऋग्वेदांतील मूळ सूक्तें पाहिलीं वा ऐकिलीं तरी आहेत ? '

' नाहीं. ऋग्वेद समजण्याइतकें संस्कृत येतें आहे कोणास ! ऋग्वेदाचा अर्थ कोणीं सांगितला आहे का कधीं ? '

' हो, आहे. आम्हीं कोणीं सांगितला तर तो चुकला म्हणून म्हणतां येईल; पण अगदीं वैदिक वर्गानेंच अत्यंत अधिकृत म्हणून मानलेल्या, आणि ज्याच्या आधारानेंच आजवर परंपराभिमानी विद्वान् वेदशास्त्रसंपन्न गुरुजी शतावधि वेदशाळांतून तो शिकवीत आले आहेत, त्या सायनाचार्यांच्या भाष्यांतच जो ऋग्वेदाचा अर्थ सांगितला आहे, तो तरी अमान्य करतां येणार नाहीं. वेद अर्थशून्य आहेत असें जर म्हणावयाचें नसेल तर सायनभाष्यांतील अर्थ जो परम भाविक ब्राह्मण वैदिकहि मानतात तो तरी मानला पाहिजे. तुम्हांस संस्कृत येत नसलें तरी मराठी चांगलें येतें. सायनभाष्याच्याच मुख्याधारें चित्रावशास्त्र्यांसारख्या विद्यानिधि ब्राह्मणानें केलेला त्या पर्जन्यविषयक सूक्तांपैकीं एकदोन प्रमुख सूक्तांचा अर्थ मी तुम्हांस वाचून दाखवितों म्हणजे तुम्हांस माझ्या ब्राईसूक्ताहून त्यांतील प्रार्थना फारशा निराळ्या वाटणार नाहींत. मंडूकसूक्तांचें तर हंसूच कोसळेल! अशा प्रार्थनांनीं खरोखरच देवदेवता संतोषतात अशी भावना ज्या काळीं प्रामाणिकपणें साऱ्या मनुष्यजातीस वाटे, तेव्हांच्या मानवी मनाच्या प्राथमिक अवस्थेंत आणि मानवी जीवनाच्या प्राथमिक अनुभवांत त्या प्रार्थना अगदीं साहाजिक नी सन्मानार्ह होत्या. दोष त्या कालांच्या त्या ऋषींचा नाहीं; पण आतां युगोयुगींच्या अनुभवानें त्या प्रार्थना फोल ठरतात, हें प्रत्ययास आल्यानंतरहि आणि ग्रहणें, पाऊस, ऋतु कसे नी कां घडतात याचे निसर्गनियम कळून चुकल्यावरहि, ह्या वैज्ञानिक ज्ञानाच्या पूर्वीहून अधिक झालेल्या विकासाच्या ह्या युगांतहि, तशा खुळचट उपायांनीं दुष्काळ टाळूं पहाणें हें आजचें आपल्या लोकांचें खुळचटपण होय;

हास्यास्पद आहे तें आपलें भावडेपण होय ! हें ऐका त्या एका प्रमुख पर्जन्यसूक्ताचें थोडेंसें भाषांतर—

देवापि ऋष्टिषेण पुत्र म्हणतो—'हे बृहस्पते, माझ्याकडे पाऊस पाडणाऱ्या देवतेला पाठीव...तूं शंतनूकरितां पाऊस पाड ! हे बृहस्पते, तूं आमच्या स्तोत्रांत निर्दोष आवाज, सारखा प्रवाह नी ओज उत्पन्न कर. ज्या स्तुतीनें आम्ही शंतनूकरितां पाऊस पाडण्याची मागणी करीत आहोंत, त्या स्तोत्रांत स्वर्गांतून मधुर पाझर प्रविष्टोत ! देवांची स्तुति जाणणारा आर्ष्टिषेण ऋषि बसला आहे तो वरच्या अंतरिक्षाखालील जलमय भागांतून उत्कृष्ट पावसाचें पाणी उत्पन्न करो ह्या जलमय भागांवर वरचा जलमय भाग देवांनीं अडवून ठेवला आहे तें उदक त्यांच्या इच्छेनुसार योग्य भूमीवर पावसाच्या रूपानें पडेल ! हे अग्ने, तूं पाऊस पाडणाऱ्या मेघांना प्रेरणा कर. हे अग्ने, ह्या नव्याण्णव गाई तुला समर्पितो द्युलोकांतून आमच्या इच्छेनुसार पाऊस पडूं दे. हे अग्ने, नव्याण्णव सहस्र गाई पाऊस पाडणाऱ्या इंद्राला त्याचा भाग म्हणून दे. हे अग्ने, शत्रूंचे किल्ले फोड, रोग दूर कर, राक्षसांना लांब सार. ह्या अफाट पसरलेल्या अंतरिक्षांतून विपुल उदक पर्जन्यरूपानें सोड ! ( ऋग्वेद, मं. १०, सू. ९८ )

हें सूक्त शंतनूच्या राज्यांत बारा वर्षे पाऊस पडला नाहीं तेव्हां म्हटलें गेलें अशा पीठिका आहेत ! एवढे दुष्काळ वैदिक ऋषींच्या काळांतहि पडत ! अशा सूक्तांनीं जर पाऊस हटकून पडतो, तर प्रत्यक्ष ऋषींच्या काळांत, कीं जेव्हां इंद्र, अग्नि ये म्हणतांच येत नी पाव म्हणतांच पावत, तेव्हां कसे पडले ? बारा वर्षांत ज्या इंद्र—अग्नींना त्या सहस्रावधि लोकांच्या भयंकर यातनांची आपण होऊन करुणा आली नाहीं अशा निष्ठूर देवता ह्या एका सूक्तासरशीं पाऊस पाडण्याइतका स्तुतीला हपापलेल्या होत्या कीं काय ? पाडावा ह्या सूक्तांत देऊं केलेल्या नव्याण्णव वा सहस्र गाईंची लांच मिळतांच त्यांनीं पाऊस नाहींतर ती लांच उपटण्यासाठीं बारा बारा वर्षे सहस्रा-

वांचि जीवांना तहानभुकेने तडफडत मारीत रहावें, अशी त्या देवतांची कल्पना, ही देवपणाची नसून दैत्यपणाचीच नव्हे काय ? ही देवांची स्तुति कीं विटंबना ? बरें, बारा वर्षांनंतर तरी राजानें करविलेल्या यज्ञांतील ह्या सूक्तानेंच पाऊस पडला असें कशावरून ? दुर्गादेवीच्या बारा वर्षांच्या कलियुगीन दुष्काळांत मुसलमान राजा होता त्यानें यज्ञ करविलाच नाहीं— ध्वंसिला मात्र ! — पण तरीहि पाऊस पूर्ववत् चालू झालाच कीं नाहीं ? बारा वर्षांच्या दुष्काळानंतर पाऊस सृष्टिक्रमानें केव्हांतरी पडणारच; तसा पडतांच तें त्या काळच्या धर्मभोळ्या लोकांना राजाच्या यज्ञाचें वा ह्या सूक्ताचें फळ वाटणें कितीहि साहजिक असलें, तरी हे यज्ञ राजानें न करतांहि दुर्गादेवीसारख्या प्रदीर्घ दुष्काळा-नंतर निसर्गाची प्रतिक्रिया होऊन पाऊस पर्जन्यसूक्ता वांचूनहि पडतातच, असा अनुभव शंभरदां येऊन गेल्यानंतरहि आम्हीं अशा प्रार्थनांना दुष्काळांवरील रामबाण उपाय मानावा हें साहजिकहि म्हणतां येत नाहीं, शहाणपणाचें तर नाहींच नाहीं. हा निव्वळ खुळचटपणा आहे !'

'पर्जन्याच्या प्रार्थनेविषयींची आणखी एका वैदिक सूक्ताची गोष्ट ऐका. मं. ७ सू. १०१ हें सूक्तहि पाऊस पाडण्यासाठीं म्हटलें जातें. 'जो औषधींना वाढवितो आणि जो पाण्याची लयलूट करतो, तो पर्जन्य आम्हांस सुख देवो ! ह्या पर्जन्याचें एक रूप वांझ गाईसारखें आहे नी दुसरें उत्पादक. हें स्तोत्र तो स्वयंसिद्ध पर्जन्य ऐको, तो संतोषी, आम्हांस पाऊसाचा लाभ होवो ! तो पर्जन्य बैलाप्रमाणें अनेक औषधींना उत्पन्न करणारा, तोच स्थावर जंगमांचा मूलाधार, तें उदक मला लाभो. देवांनो, माझें कल्याण करा !' असें वशिष्ठांचें 'पाऊस-देवतें'चें सूक्त आहे. त्याच्याच पुढचें १०३ वें सूक्त हें 'बेडुक-देवते'च्या प्रार्थनेचें आहे !

'पर्जन्यसूक्त ऋषींनीं म्हटलें तेव्हां त्यांना बेडुकांनीं अनुमोदिलें

यास्तव वशिष्ठानें मंडूकसूक्त गायिलें अशी याची पीठिका दिली आहे तें सूक्त असें---

व्रताचरणी ब्राह्मणाप्रमाणें वर्षभर पडून राहिलेले बेडुक पर्जन्याला प्रिय असणारे शब्द बोलूं लागले ! सुकलेल्या पखालीप्रमाणें पडून राहिलेल्या ह्या बेडकांकडे जेव्हां स्वर्गीय उदक आलें, तेव्हां वासरासाठीं हंबरणाऱ्या गाईप्रमाणें ह्या मंडुकांचें शब्द कोलाहलूं लागतात. वर्षाकाळ आल्यावर तृषार्त बेडकांवर जेव्हां वृष्टि होते तेव्हां मूल बापाकडे बोबडे बोल बोलत जातें, तसें एक मंडूक दुसऱ्या मंडुकाकडे शब्द करीत जातो. पाऊस पडल्यामुळें आनंदलेला चित्रविचित्र एक बेडूक दुसऱ्या हरितवर्ण बेडकाशीं आपला आवाज मिसळतो; एक जाऊन दुसऱ्याला धरतो. शिक्षकाचा शिष्य अनुवाद करतो तसा एक बेडूक दुसऱ्याचा अनुवाद करतो. उन्हाळ्यांत मातीला मिळून गेलेले बेडूक पाऊस पडतांच पुन्हां जिवंत होऊन शब्द करीत फुगून जातात. एक बेडूक गाईसारखा ओरडतो तर एक शेळीसारखा. अनेक रंगांचें पण एकाच 'मंडूक' नांवाचे हे बेडूक शब्द करीत आहेत ! अतिरात्र नांवाच्या सोमयागांत ब्राह्मण ज्याप्रमाणें मंत्र म्हणतात त्याप्रमाणें भरलेल्या सरोवरांभोंवतीं मंडूक शब्द करीत आहेत. सोम पिऊन वार्षिक स्तोत्र म्हणणाऱ्या ब्राह्मणांप्रमाणें शब्द करणारे, प्रवर्ग्य ऋत्विजांप्रमाणें घामानें डबडबलेले कांहीं बेडूक पाऊस पडतांच बाहेर प्रकटतात ! हे सर्वश्रेष्ठ मंडूक देवांची आज्ञा पाळतात ! ह्या बेडकांनीं आम्हांस संपत्ति दिली. वर्षाऋतुनंतर मंडूकांनीं शेंकडो गाई आणि दीर्घायुष्य आम्हांस दिलें ! ! ( ऋग्वेद, मं. ७, सू. १०३ )

'ऐकलेंत का ? वास्तविक हें सूक्त छान आहे. त्यांतील विनोद गोड, स्वाभावोक्ति चटकदार ! पण अशा सूक्तांना ईश्वरोक्त समजणें किंवा त्याचा जप केल्यानें पाऊस पडतो असें मानणें म्हणजे निव्वळ भाबडेपणा नाहीं का ? आम्हांस तर असें वाटतें कां, पर्जन्यसूक्तें म्हटल्यानें पाऊस पडतो या भाबडेपणाची चेष्टा करण्यासाठींच वशिष्ठानें 'बेडूक देवतेवर'

हें सूक्त रचलेलें असावें ! कारण पर्जन्यसूक्ताचे मंत्र म्हटल्यानें पाऊस पडतो ही धर्मभोळी समजूत बेडकें ओरडतात म्हणून पाऊस पडतो अशा स्तुतीइतकीच खुळचट आहे असें त्यांत मोठ्या गमतीनें सुचविलेंलें दिसतें ! निदान नकळत तरी त्यांत तसा ध्वनि उमटला गेला खरा !'

'बरें, वैदिक प्रार्थना नी सूक्तें युगायुगें म्हणत असतां आपल्या इकडे युगायुग दुष्काळ नी अवर्षण पडतच आली आहेत हें खोटें आहे काय ? उलटपक्षी पर्जन्यसूक्तें कशाशीं खातात हेहि माहीत नसलेल्या नी वेदनिंदक अशा अनेक म्लेंच्छ देशांतून दुष्काळाची आवृत्ति आपल्या इकडच्यासारखीं प्रतिवर्षीं न निघतां तें धनधान्यही आपणाहून अधिक समृद्ध आहेत हेहि खरें नाहीं काय ? एखादे वेळीं पर्जन्यसूक्त म्हणावयास नी पाऊस पडण्यास बोलाफुलाची गाठ शंभर वर्षांत एकदां पडली असेल; कावळा बसायला नी फांदी मोडायला जशी पडते तशी ! पण म्हणून फांद्या मोडायच्या कीं त्यावर एक कावळा बसवावा असा नियम कां त्यायोगें बांधतां येतो ? कुऱ्हाडीनें हटकून फांदी तुटतें तशी कावळा बसल्यानें जोंवर बहुतेक प्रसंगीं तुटत नाहीं तोंवर तसा नियम बांधणें मूर्खपणाचेंच होय, नव्हे काय ? आमच्या स्वतःच्या आठवणींत पंचवीसदां लहानमोठे दुष्काळ आले, पंचवीसदा पर्जन्यसूक्तांचें लहान-मोठे यज्ञ झाले, पण एकदांहि दुष्काळ हाटल्याचें किंवा तत्काळ भरगच्च पाऊस पडल्याचें आठवत नाहीं ! तुम्हासहि अशीच आठवण नाहीं काय ? इतिहासांतहि हेंच आढळतें, नव्हें काय ? '

'खरें सांगायचे तर माझाहि अनुभव हाच. इतिहासाविषयीं म्हणणें मला पटतें. आजकाल ह्या कलियुगांत मंत्राचेहि सामर्थ्य लोपले खरेंच; पण वैदिक काळीं तें मंत्र—'

'मी मघाच तुम्हास दाखवून दिलें कीं, आजकालच नव्हे तर मंत्र जिवंत होते असें तुम्ही ज्या युगीं समजतां, त्या वैदक युगांतहि अशा प्रार्थनांनीं पाऊस पडत होताच होता ही गोष्ट मूळांतच सर्वस्वी असंभवनीय होय. आणि वेदांत पुरावा तसाच सांपडतो. ह्या वरील सूक्ताच्या

पूर्वपीठिकेंतच बारा वर्षांच्या दुष्काळाचा उल्लेख आहे. अहो, इतर जनांना सोडाच. पण प्रत्यक्ष मंत्रद्रष्ट्या ऋषींनाहि पर्जन्यसूक्तांच्या घोकण्यानें अन्नाचें शीत मिळालें नाहीं; दुष्काळानें फटफजिती केली ! तो तपोभास्कर विश्वामित्र पहा ! वेदपाठक चतुर्वेदीच नव्हे तर वेदमंत्र-द्रष्टा ! पण त्याच्याहि काळांत असाच एक भयंकर दुष्काळ पडला. पर्जन्यसूक्त काय विश्वामित्राला किंवा त्या भर वैदिक काळांतील मंत्र-द्रष्ट्याच्या पिढींत कोणालाहि येत नव्हतें ? पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रत्यक्ष विश्वामित्र ऋषि अन्न अन्न करीत स्वपचाच्यासुद्धां घरीं भीक मागत शिरले, तेथेंहि कांहींच खावयास मिळेना, तेव्हां कुत्र्याच्या मढ्याची तंगडी त्यांनीं तिथून चोरून पळविली आणि भुकेनें कासावीस झाल्यामुळें मिटक्या मारीत चघळली ! तेव्हां हीं पर्जन्यसूक्तें वा प्रार्थना वैदिक काळींसुद्धां ' पड पावसा ' म्हणतांच पाऊस पाडीत ही समजूत अगदीं निर्मूल आहे ! '

'पण ही असमर्थता कांहीं वेदपुराण यांतील प्रार्थनांची किंवा सूक्तांचीच आहे असें नव्हे, तर कुराणांतील आयतांत वा प्रार्थनांतहि पाऊस पडण्याचें सामर्थ्य नाहीं, न बायबलांतील, न अवेस्तांतील. दुर्गादेवीचाच बारा वर्षांचा दुष्काळ घ्या. त्यांत हजारों हिंदूंच्या देवांच्या नांवांनीं केलेल्या पर्जन्यसूक्तांदि प्रार्थना जशा फोल ठरल्या, तशाच त्या काळीं मशिदी मशिदींतून अल्लाच्या नांवानें केलेल्या शेंकडों प्रार्थनाहि फोल ठरल्या; आणि मुसलमानी राज्यांतच लाखों मुसलमान अन्न अन्न करीत तडफडून मेले ! आजहि प्रत्येक दुष्काळांत जसे पुराणाचे अनुयायी हिंदु तसेंच कुरा-णाचे अनुयायी मुसलमान दोघेहि दुष्काळाच्या जबड्यांत चिरडून जात आहेत. बायबलच्या जुन्या करारांत तर, ज्यांना देव येतां जातां भेटे अशा पैगंबरादिकांना, सहकुटुंब दुष्काळांत उपासमारीनें छळल्याच्या आणि जेहाव्हाचे भक्त असणारे ते राष्ट्रचे राष्ट्र अन्नावारी इजिप्तच्या फरोहाचे दासानुदास झाल्याच्या कथा आहेत ! तेव्हां वैदिक वा पौरा-णिक, कुराणीय वा बायबलीय प्रार्थनाही वा मंत्रजपाहीं पाऊस पडतो,

वा दुष्काळ हटतो ही निव्वळ भाबडेपणाची समजूत, अनमानधपक्याचा बाजार ! पाऊस पाडण्याचा किंवा दुष्काळांना नामशेष करण्याचें जें कांहीं सामर्थ्य मनुष्याच्या अंगीं येणें शक्य आहे, ते ह्या दैविक अज्ञानाच्या मार्गे लागून नव्हे, तर प्रात्यक्षिक विज्ञानाच्या ! अबाधित सृष्टि-नियमाच्या ज्ञानानें आजहि आपल्या इच्छेप्रमाणें पाऊस पाडण्याचें कांहीं प्रयोग रशियाकडे सफळत आले आहेत. आणि ते पूर्णपणें सफळ होईतांपर्यंतहि दुष्काळाची नांगी ठेंचणें इतर मानवी मार्गांनींहि शक्य आहे. हे पहा, जर का राष्ट्रसत्ता प्रबळ, प्रयत्नशील, नी प्रज्ञ असेल तर ज्या हिंदुस्थानांत दुष्काळाच्या वर्षांतहि ठिकठिकाणीं यथेच्छ पर्जन्य पडतो नी अफाट पाणी वायां जाते त्याचा योग्य उपयोग करून, शेती-सुधार कार्यवाहीत आणून नी जेथें धान्याची मागणी तेथें झटपट धान्याची वहातुक करून दुष्काळाची नांगी ठेंचली जाऊं शकेल ! पण आपला इथं तो विषय नाहीं.'

'आपलें म्हणणें सर्वस्वी खरें आहे. पण आतां आजच्या आज मी माझ्या व्यक्तीपुरतें ह्या प्रकरणीं काय करूं तेवढें सांगावें.'

'प्रार्थना–पर्जन्यसूक्तांच्या खुळांपायीं भर दुष्काळांतहि आहे तें तूप नी धान्यसुद्धां अग्नयें स्वाहा करण्याचा हा खुळचट उपाय त्यागून या दिवाळींत हीच पेटी गळयांत बांधून इतर प्रचारकासह घरोघर हिंडावें. दिवाळी साजरी कशीतरी होणारच–पण उदाहरणार्थ, फटाक्या सारख्या दारूकामापायीं जे हजारों रुपये अगदीं थेट परदेशी जातात तेवढे तरी वाचवून प्रत्येक कुटुंबानें ती रक्कम दुष्काळग्रस्त बंधूसाठीं दान द्यावी अशी भीक मागावी आणि जे जमेल त्या द्रव्याचें धान्य घेऊन स्वहस्तें प्रत्यक्ष दुष्काळांत जे भुकेनें व्याकुळ, त्यांच्या तोंडीं दोन घास घालावें. ठीक ना, चला तर लागा कामाला–अकरणान्मन्दकरणाः श्रेयः ! ही माझी वर्गणी पहिल्यानें घ्या ! !'

— १९३६

★



## नंदीबैल आणि माणूसबैल : ८ :

'घे ग बाई एवढ्या भाऱ्या!' लांकडांच्या मोळीवाल्या बाया नानूशेठजींच्या पत्नीला गळ घालून म्हणत होत्या.

'टाका तर मग. पण अडीच आण्यांपेक्षां मी एकेका मोळीला दमडीसुद्धां अधिक देणार नाहीं.' शेठाणी म्हणाल्या.

'नको ग ताई असं करूस! अग, चार चार आणं येतात बरं ह्या एकेका मोळीचे! आम्ही घरीं मुलंबाळं टाकून झुंजुरक्याला जें निघालों, तें ह्या नगरांत ही दोनप्रहरची वेळ येईतों बोजा डोक्यावर घेऊन भटकत आहों ग दारोदार! अडीच आण्यांत मिरची, मीठ, दाणं काय नेणार घरीं? साडेतीन आणं मोळीमागं दे वया नी घे साऱ्या मोळ्या!'

'तुला सांगितलं न् एकदां! अडीच आणे मोळी टाकायची तर टाक, नाहींतर जा आपली कशी! तुला चार नाहीं आठ आणे कोणी दिले

भाऱ्यामागं तर मी नको का म्हणतें! तुला परवडेल तिथं दे आपली तूं! अं? छे, तीन आणे नाहीं नी दोन आणे नाहींत! अडीच आणे मोळी परवडलं तर साऱ्याजणी ढाका! काय? जा पाहूं आपल्या! उगीच ताईबाई करीत बसूं नका! मला किचकिच करायला वेळ नाहीं. नसलं पडत तर चालूं लागा पुढं!'

'पुढं कुठं जाणार आतां? दोनप्रहर दिवस डोक्यावर आला, घरीं लेंकरं! बरं एकेक पैसा जास्त—'

'मीं धरून का ठेवलें आहें तुम्हांला? जास्त पैसा देईल तिकडे जा! अडीच आणे मोळी मिळाली तरच मला हवी. माझ्यावर तरी तुझं बळ का?'

सौद्याच्या दृष्टीनें शेटाणीचें हें बोलणें सरळच होतें. तिलाहि तिचा संसार होताच!

शेवटीं आंबट तोंड करून जळफळत बडबडत त्या भारेवाल्या बायांनीं अडीच आणे मोळीप्रमाणें भाऱ्या ढाकण्याचें मान्य केलें. त्या बायांच्या कटींना एकेक लहानसें लुगडें त्यांतल्या त्यांत कांचा मारून गुंडाळलेलें, कटीखालीं मांड्याची वीतदेखील पुरती न झांकणारें! वर एक फाटकीतुटकी चोळी, अंग घामांत डबडबलेलें, हातांत पितळी, कथली नी कांचेच्या राकट बांगड्या तेवढ्या भरपूर! अशा त्या चार-पांच मोळीवाल्या बाया शेटाणीनें दाखविलेल्या बोळांत वळून त्या घराच्या मागच्या दाराकडे त्या मोळ्या टाकण्यास गेल्या. धडाधडा एकावर एक मोळ्या पडल्या. शेटाणीनें गणन करून पैसे त्यांच्या हातीं टाकलें. तोंच त्या भारेवाल्या बायांनीं ठराविक भांडण काढलें. आणि जिनें अडीच आणे मोळीला 'हो' म्हटलें होतें, ती सोडून बाकीच्यांनीं मोठा गलका केला.

'नाय! नाय! आम्ही नाय म्हटलं अडीच आणं! तीन तीन आणं म्हणालीस बाई तूं, म्हणून आम्हीं आमच्या मोळ्या टाकल्या. तिची अडीच आण्यांची असेल, नाय, नाय. नाय! नगत आम्हास्नी

तुझं पैसं ! मोळया दे परत आमच्या ! ' असा कोलाहल करीत दोघीं-तिघींनीं आपले पैसे फेंकले नी भाऱ्या उचलूं लागल्या ! अर्थातच शेटाणी संतापली. तिचा वडील मुलगा दारांत होता त्याला ओरडून म्हणाली, ' गंप्या ! उचल ते पैसे नी हात लावूं देऊं नको या लुच्च्या बायांना त्या मोळयांना ! '

गंप्या हा हायस्कुलांत शिकणारा उंच नी दंडम पोऱ्या होता, तो लगेच धांवला.

पैसे उचलीत गंप्यानें दटावलें, ' हट्ट् दूर ! हात लावशील मोळीला तर ध्यानांत धर ! हो, हो ! देत नाहीं जा ! पैसे नाहींत नी मोळया पण देत नाहीं जा ! लबाडी करतां काय ? '

शेवटची युक्ति पण फसली ! ' बुडव बाई आम्हां बापड्यांना : ' ' लूट केलीस बया आमच्या मोळयांची ' असे शाप तोंडानें देत त्या भारेवाल्या बायांनीं शेवटीं फेंकलेले पैसे अडीच आण्यांच्या भावानेंच परत घेतले, ते वांटून घेण्याच्या अवधींत मागचा सगळा रागलोभ त्या विसरल्या आणि नेहमींच्या प्रघाताप्रमाणें मोळयांच्या सौद्यांत भांडणापायीं उणावलेलें उत्पन्न गोडीगुलाबीनें भरून काढण्याचा ठराविक असा दुसरा अंक चालू झाला.

' पाणी तरी दे बया थोडं ! ' ' लोणचं दे ग ताई लेंकराला एक फोड. ' ' शिळा घांस हाय का एखादा ? थोडा भात-भाकर तरी द्वलीशी ! दे ग मावली. ' असें गयावयां करूं लागल्या. ' जात कोण ' तें आधीं विचारून शेटाणीनें जातींच्या कोष्टकानुरूप कोणाला ओंजळीनें कोणाला तपेली देऊन- पण यथेच्च पाणी पाजलें. थोडी शिळीताजी भातभाजी हातांवर टाकली. त्या भारेवाल्या बायांनीं सौद्यांत लबाडी केल्याचा शेटाणीसहि राग उरला नाहीं- मोळया फार स्वस्तांत गेल्याचें दुःख भारेवाल्याहि विसरल्या. दोघांनाहि त्या ठराविक बाचाबाचीची नी हो-नाची संवयच होती- रीतच होती ती- शिष्टाचारच होता तो मोळयांच्या व्यवसायामधला !

थोडेसें हुश्श करून त्या बाया तो भाकरतुकडा खात नी पाणी पीत बसल्या. झुंजुरक्यापासून ते भारे डोक्यावर वहात आपल्या खेडेंगांवाहून त्या नगरांनगरांतून घरोघर भर दुपारपर्यंत हिंडत हिंडत त्यांचीं कंबरडीं बसलीं होतीं, नाकीं नव आले होते ! आणि शेवटीं तो लांकूडफाटा तोडून आणून विकीतों झालेल्या कष्टांची मिळकत झाली अडीच आणे ? !

* * *

त्या शेठजींच्या घरासमोरच आपल्या माडीच्या खिडकींत रामभाऊ उभे होते. त्या मोळीवाल्या बापड्या बाया शेठजींच्या पुढच्या दारीं मोळ्यांच्या अडीच आणे कीं तीन आणे दराविषयीं घासाघीस करीत असतांना ती ते पाहत होते, त्या बाया शेठजींच्या मागच्या दारीं मोळ्या टाकण्यासाठीं बोळांत वळेतों त्यांना दिसल्या नी त्यांच्या कष्टाळूपणाविषयींचे विचार रामभाऊंच्या मनांत घोळत होते, शेठ-जींच्या मागल्या दारीं शेठाणींची नी त्या बायांची तिकडे गडबड चालली असतांच इकडे शेठजींच्या पुढच्या दाराशीं, हातांतील एक डमरू 'डुम डुम डुमुक्, डुम डुम डुमुक्' असें वाजवीत एक बुवाजी आणि त्यांच्या मागें एक नंदीबैल नी एक गाय असें लटांबर येऊन ठेपलें. सारी वाट अडवून तो बुवा शेठजींच्या पुढच्या दाराशीं तळ ठोकून डमरू वाजवीत ओरडूं लागला—

'गोमातेला धर्म करा बाई ! अहो बाई, नंदीबैलाची पूजा करा ! !'

त्या बुवाच्या गळ्यांत एक पायघोळ भगवी कफनी होती, वर एक रुद्राक्षाची माळ, डोक्याला भगवा फेटा, रंगानें काळा, उच्चारांचा अडाणी, दिसण्यांत जन्मदरिद्री नी अजागळ पण चिंता किंवा विनय असा कांहींच नव्हता त्याच्या चर्येवर वा ध्वनींत ! भीक म्हणून तो कांहीं मागत होता असा कोणचाहि भाव त्याच्या त्या ओरडण्यांत नव्हता. उलट, त्या दारांत तो येण्याच्या आधींच कोणीतरी 'धर्म' घेऊन आपल्या स्वागतास उभा नव्हता, बरें नव्हता तर नव्हता, पण आतां मी दाराशीं ओरडत

असतां अजून कुणी लक्षहि देत नाहीं याचा त्याला राग येत चाललेला दिसत होता. तो याचना करीत नव्हता तर 'धर्माची' मागणी करीत होता! नंदीबैल आणि गोमाता दोन दैवतांचा पुरोहित तो!

'काय? कुणाला ऐकू येतं कीं नाहीं? नंदीबैलाची पूजा नाहीं करायची का? डुम डुम डुमुक डुमुक! अहो बाई! धर्म करा!'

त्या आरडाओरडीनें एकदांची घरांतील दोनचार मंडळी येतातशी पाहून त्यानें धर्मोपदेशाचें संगीत छडलें; पण तें देखील कसें? कोणचाहि भिकारी निदान एखादा अभंग, श्लोक, गाणें तरी पाठ करण्याचें श्रम घेतो. पण त्या नंदीबैलाच्या नी गोमातेच्या भांडवलावर चरितार्थ चालविण्याचें भाग्य पदरीं असलेल्या साधुपुरुषास तेवढेदेखील कष्ट करावयाची आवश्यकता नव्हती! त्याचा धर्मोपदेश, शीघ्रकवित्व, छंद—मुक्तछंद!! तो साधें गद्य जें सूचे तेच एका कोणच्या तरी सुरांत मनांत येईल तिथें मनास येईल तो शब्द ताणीत वा आंखडीत बोलणेंच गाऊं लागला! त्यांतील प्रकार साधारणतः असा—

"द्या ऽऽ हो बाई। द्या गोमा ऽ ऽ तेला कपडा कु ऽ ऽ डता द्या। हळदकुंकू गो ऽ ऽ मा ऽ ऽ तेला महादेवाचा। चा ऽ ऽ नंदीबै ऽ ऽ ल देवाचा ऽ। नंदीरा ऽ ऽ जा। पैसा ऽ पैसा। गोमाता तेतीस ऽ ऽ कोटी देवांची। ची ऽ ऽ पैसा चारा घाला ऽ हो बाई। ध ऽ र ऽ म करा ऽ बाजी॥ डुम् डुम् डुमुक्। डुम् डुम् डुमुक। द्या हो बाई। नंदी माग ऽ ऽ तो पैसा ऽ दानाचा। महादे ऽ ऽ वाचा ऽ॥"

तो गोंगाट ऐकून शेटाणीहि पुढल्या दाराशीं आली. तिला पहातांच साधुबुवा धर्मोपदेशकाच्या अधिकारी स्वरांत म्हणाला,

'माई! दारीं नंदीराजा आला, महादेवाला दान दे! ही आदिदेवी गोमाता कामधेनु दारीं आहे, तिच्यावर दया कर! चाऱ्यासाठीं धर्म कांहींतरी कर!—काय मागतोस नंदीबा? पाठीवर एक कपडा?' हातांतले दावें प्रश्नार्थकपणें बुवानें खेंचतांच नंदीनें मान हालविली! पोरें

हंसली. शेटाणीहि हंसल्या नी चार आण्याचा तुकडा त्यांनीं गायीवरून ओवाळून त्याला दिला !

रामभाऊहि हंसले—पण उपहासानें ! महादेवाचा जो नंदी, त्याला म्हणे फाटकातुटका कपडा पाठ झांकायला हवा ! त्यासाठीं महादेव माणसापाशीं दान मागतो ! आणि जिला हा आदिदेवी कामधेनु म्हणतो, त्या गायीला म्हणे चाऱ्यासाठीं भीक घाल ! कामधेनु चाऱ्यासाठीं दारोदार भटकते !! ह्या भीकाऱ्यांना भीकदेखील सुसंगतपणें कशी मागावी, तें कळत नाहीं !! भीकमागणारे एकपट मूर्ख, तर भीक घालणारे दसपट मूर्ख ! धार्मिक भाबडेपणानें साध्या शब्दांचा अर्थहि कळेनासा होतो. इतर सर्व व्यवहारांत जे डोळस नी चाणाक्ष तेहि आंधळे नी मूर्ख होतात. कधीं न फसणारे हौसेनें स्वतःस फसवून घेतात ! मघा त्या कष्टाळू मोळीवाल्याशीं-सुद्धां अडीच कीं तीन आणे दर, इतकी बारीक घासाघीस ज्या ह्या शेटाणीनें केली, तिनें घसदिशी या ऐतखाऊ भिकाऱ्याला नंदीबैलाची नुसती ओवाळणी म्हणून चार आणे देऊन टाकले ! जी कामधेनु, ती भीक मागेल तरी कशी, हा प्रश्नसुद्धां तिच्या मनांत आला नाहीं !

शेटाणीनें खुणावल्यावरून तिच्या मुलीनें हळदकुंकू आणून त्या गाईला लावलें, नंदीलाहि लावलें नी नमस्कार केला. इतके झालें, तरी तो गलेलठ्ठ साधु आपलें डमरू डुमुक् डुमुक् वाजवीत भिकेचा पाल्हाळ करीतच होता. 'चारच आणे दिले, ते गोमातेला पुरेसे नाहींत, हा नंदी कपडा मागतो, देवाच्या घरीं तूं देशील त्या दानाच्या शंभरपट तुला परत मिळेल ग बया !' म्हणून मागतच होता, नी डमरू वाजवून नी दावें हिसडून आपल्या मागण्या नी वचनें महादेवाच्या नंदीदेवाचीच आहेत, असें प्रमाणपत्र देण्यासाठीं त्या नंदीबैलाची मान हालवून त्याचा होकार घेतच होता. त्याची कामधेनु ही काडी खा, त्या कचऱ्याच्या ढिगांत तोंड खुपस अंगणाच्या बाहेर आलेल्या झाडाचा फांदीपाला ओरबाड, अशी मागेंपुढें वाट अडवून ती वावरत होती.

* * *

इतक्यांत त्याच वाटेनें नगरसंस्थेची ( म्युनिसिपालिटी ) मोठी मैलागाडी आली. त्या गाडीवर नगराच्या मैलानें भरलेला गाडीवर आडवा ठेवलेला एक बंद अवजड बंब होता. त्या जड ओझ्यांना दिवसभर वाहणारा एकच बैल जुंपलेला होता नी नगरसंस्थेचाच भंगी तिला हांकीत होता. माध्यान्हपर्यंत घामट, ओंगळ नी अवजड ओझें उचलीत, फेकीत, बबांत भरीत, गाड्यावर चढवीत, उतरीत तो भंगीहि त्या बैलासारखाच मेटाकुटीस आलेला होता. निढळाच्या घामाच्या, काबाडकष्टांच्या, रक्ताच्या केलेल्या पाण्याच्या धारा त्या बैलाच्या नी त्या भंग्याच्या डोक्यावर नी तोंडावर निथळत होत्या. बारा वाजण्याच्या आंत तो मैलागाडी कशीबशी ठिकाणावर पोंचवून भाकरीच्या मधल्या सुट्टीत घरीं जातों कधीं नी थोडा मोकळा होतों कधीं, असें त्या भंग्याला होऊन गेलें होतें. आपली गाडी तो मार्गांतून शक्य तितक्या सावध वेगानें जरी हांकीत होता, बिचारा बैल हूं कां चूं न करतां जरी ती ओढीत होता, तरी त्या भंग्याच्या मैलागाडीच्या घाणीनें आलेल्या शिसारीचा राग आजूबाजूच्या घरांतील लोक नी मार्गावरील साबणचुपट लब्धप्रतिष्ठित त्या भंग्यावरच काढीत होते ! त्याला अद्वातद्वा बकत नी तिरस्कारीत ' हट जावो ! ' ' वाट काय अडवतो आहे हा गाढव ! अरे रामा ! आली ह्या चंडाळाची गाडी ! ' ' अरे लैजाव साला जलदी ! घाणीनें जीव नकोसा करतात हे हरामखोर ! ' अशा अपशब्दांचा नी धमक्याचा मारा जो तो त्या बिचाऱ्या काबाडकष्ट करीत मेटाकुटीस आलेल्या भंग्यावर करीतच होता ! जणुं काय ज्या घाणीनें त्या दूषक नागरिकांचा जीव त्यांना नकोसा होत होता, ती त्या मैलाबंबांतील गाडाभर घाण त्या भंग्यानेंच केली होती ! जणु काय ती ह्या दूषक नगरसभ्यांनीं केलेलीच नव्हती ! पण जे घाण करणारे, तेच नागरिक नाकास स्वच्छ रुमाल नी उपरणीं लावून ती त्यांची नगरघाण काढणाऱ्या नी नेणाऱ्या भंग्यालाच नेहमीं अत्यंत तिटकाऱ्यानें हिडिसफिडीस करतात, हा किती अधम अन्याय आपल्या हातून

प्रत्यहीं घडत असतो, हें आपल्या बहुधा ध्यानांत येत नाहीं ! भंग्याची गाडी पहातांच आपण जेव्हां चटकन् आपल्या घाणीचा राग त्या बिचाऱ्यावर काढतों, नी त्याची चहूंबाजूंनीं हिडीसफिडीस होते– 'घाणीनं जीव कसा नकोसा करतो हा गाढव, भर वाटेनं मैलागाडी नेऊन !' तेव्हां आपण ध्यानांत धरावें कीं, कोणत्यातरी वाटेनें ते घरोघरच्या मैल्याचे डबे नी शेवटीं गाडी नेण्याची त्या भंग्याला कांहीं हौस नसते ! तुम्ही विमानांतून, वरचेवर अलगत ती मैलागाडी नेवविली वा खालून पाताळांतून, तर तो ती तशी नेईल; आणि विशेष हें की, तो गाढव तसें अत्यंत घाणेरडें काम करून ती मैलागाडी दाखवील त्या वाटेनें तशी हांकीत असतां तुम्हांला क्षणभर तुमचा जीव नकोसा करतो–– म्हणूनच तुम्ही दीडशहाणे सभ्यजन तुम्हांला हवा तो जीव जन्मभर सुखरूपपणें उपभोगूं शकतां, नगराचें स्वास्थ्य नी आरोग्य निर्वेध राहूं शकतें !

ती भंग्याची गाडी तिकडून जों येते, तों ह्या भीकमाग्या साधूचें तें लटांवर ती वाट अडवून उभें होतें. भंग्यानें दोनतीनदां ओरडून सांगितलें कीं, 'ते गायबैल बाजूला घ्या ! ए बुवाजी !' पण भीक मागण्याच्या त्या त्याच्या रडगाण्यांत तो बोवा मग्न होता. त्याच्या त्या गायबैलालाहि त्या भंग्यानें हॅट हॅट करून पाहिलें. पण त्या पशूंना नंदीबैल नी कामधेनूपणाचें भीकमागें पावित्र्य आल्यापासून त्यांना सहसा कोणींहि वाटेंत हिडिसफिडीस करीत, हुसकीत वा चपराकीत नसल्यामुळें आपण एक अवध्यच नव्हे, तर अताड्य दैवी जीव आहोंत, अशीच जणुं काय जाणीव असलेली दिसली. मारील तर हा आपला साधु धनीच आपणास मारील–बाकीचे लोक पूजाच करणारे–त्यांचें काय ऐकायचें, अशी संवयीनें जणुं त्यांना निश्चिति पटलेली असल्यामुळें त्या भंग्याच्या हॅट्‌हॅट्‌ला न जुमानतां ती गाय नी तो नंदीबैल वाटेंतून दूर म्हणून होईनात. तो साधूहि ऐकेना. हा घोळ पडला आहे, तोंच त्या भुकेल्या गाईला तो मैलाचा वास येऊन ती बंबाच्या पुढच्या टोंकाला

खेटून जिभेनें चाटूं लागली. तिला जरी म्हटली आदिदेवी जगज्जननी गोमाता—तरी होता तो एक पशूच !

निरुपायानें ती गाडी थोपवून तो भंगी थोडा थांबतो तोंच आजूबाजूच्या घरांतून, वाढसरांतून नी प्रत्यक्ष शेटाणीच्या तोंडातून एकच धिःकार उठला ! ' ए भंगडा, हांक ती गाडी ! घाणीनें जीव नकोसा केला या गाढवानं !— अरे, हांक ! ने ती ब्याद एकदांची येथून !'

भंगी ओशाळला. जसा कांहीं तो कोणी चोर चोरी करतांना धरला जातो आहे, असा घाबरला ! त्यानें गाडीच्या बैलाला एक चाबूक हासडून गाडी पुढें घातली. भैलाबंबाचें पुढील ढोंक चाढणारी गाय मधें लुडबुडूं लागली, म्हणून तिला त्यानें चाबकाच्या काठीनें मागें ढोसली.

' हें पहातांच तो गलेलठ्ठ भीकमाग्या ' साधू ' एखाद्या सैतानासारखा खवळून— ' ए साल्या ! त्या माझ्या पवित्र गोमातेला शिवलास ? मारलंस ? तुझ्या... ' अशा आईमाईवरून शिव्या हासडून त्या साधूनें एक धोंडा उचलून भरकन् त्या भंग्याला मारला. थोडें चुकलें म्हणून तो भंग्याला लागला नाहीं. यासाठीं दुसरा ढोला उचलून तो साधू त्या भंग्यावर फेंकूं पहात आहे तोंच सारा प्रकार पाहून खवळलेले रामभाऊ माडीवरून ओरडले, ' हां ! ध्यानांत धर ! ए भिकारड्या, जर त्या भंग्याला मारलंस तर—! थांब आलोंच मी खालीं ! ' असें ओरडत रामभाऊ मागच्या पायीं जिना धडधड उतरले आणि वाढेशीं आले.

' टाक तो दगड खालीं ! वाटेतून दूर हो ! भिकारड्या ! ऐतखाऊ ! तो बिचारा भंगी काबाडकष्ट करून आपल्या निढळाच्या घामादर पोट भरतो. तो आपली गाडी हांकीत असतां त्याची वाट अडविलीस ती अडविलीस नी उलट त्यालाच शिक्षा देतोस, मारतोस ! ' रामभाऊ गरजले.

' मग माझी पवित्र गोमाता त्यानं विटाळली, तिला ढोसलं तें नाहीं का दिसलं तुम्हांला ? ' भिकारडा साधू दटावूं लागला, ' गाईला तो



सा...८

शिवला, ती मला शिवली, मलाहि विटाळ झाला! हें कसं पहात नाहीं तुम्ही ?'

'तेवढंच पहात नाहीं मी, तर मघांपासून मी हेंहि पहात आहे कीं; तुझी ही पवित्र गोमाता आघण होऊन मोठ्या आवडीनं तो मैलाबंब चाटीत होती! मग तेव्हां नाहीं कां ती बाटली ? आणि त्या भंग्याचा विटाळ तुला झाला म्हणून जें म्हणतोस ना, त्याचं असं कीं, जर कोणीं शिवलं म्हणून विटाळ होत असेल, तर स्वतःच्या काबाडकष्टांवर स्वतःचं पोट भरणारा नी अत्यंत किळसवाणं काम तेंच आपल्या वांट्याला घेऊन समाजाची घाण स्वच्छ करून समाजाच्या आरोग्याची साधना करणारा हा भंगीच तुझ्यासारख्या ऐतखाऊ साधुड्यापेक्षां अधिक पवित्र आहे; त्याच्या शिवण्यानं विटाळ होत नाहीं. होतच असेल, तर तुझ्या-सारख्या ऐतखाऊलाच जो शिवतो त्याला विटाळ होतो!'

'मी ऐतखाऊ काय ? मी दिवसभर आमच्या ह्या नंदीबैलाचं दर्शन लोकांना घडविण्याचे कष्ट करीत नाहीं कीं काय ? आज तीन पिढ्या आमचा हा धंदा आम्हीहि करीत आहों!'

'तर मग तूंच एक ऐतखाऊ नसून तुझ्या तीन पिढ्या ऐतखाऊ आहेत म्हणायच्या! समाजाचं कोणतंहि उपयुक्त काम न करतां दारो-दार भीक मागत फिरायचं ह्याला का बाबा धंदा म्हणतात ? कष्ट म्हण-तात ? भीक मागणं हाहि एक धंदाच आहे, अशी तुम्हां भीकमाग्या लक्षावधि लोकांची सोयिस्कर समज असते हें खरं. त्याचा दोष जितका तुमच्यावर तितकाच तुम्हांसारख्या ऐतखाऊंना पोसण्यांतच धर्म घडतो, असं मूर्खपणानं समजणाऱ्या ह्या आम्हां भीक घालणाऱ्या लोकांचाहि आहे हेंहि खरं! पण म्हणूनचं आतां यापुढं अशा ऐतखाऊंना भीक घालणं हा धर्म नसून अधर्म आहे, असं लोकांना शिकविणं आम्हांस भाग आहे हेंहि खरंच!'

गंप्याला तें म्हणणें तात्काळ पटलें! तो होकार भरूं लागला, 'अगदीं खरं आहे बरं भाऊंचं म्हणणं. मी मघांच ताईला म्हणालों कीं,

देऊं नकोस चार आणे टचकन् ह्या ऐतखाऊला म्हणून. त्या बिचाऱ्या कष्टाळू भंग्याच्या डोक्यांत दगड घालण्यापेक्षां या आळशी भिकारड्यांच्या डोक्यांत दगड घालायला हवा बरं का ताई !' शेटाणीला गंगूनें बजावलें !

'दगडच नको कांहीं घालायला ! त्याची खोड मोडायची म्हणजे त्यांना कोणी भीक घालू नये म्हणजे झालें ! भीक मिळते आयती म्हणूनच ते भीक मागण्यालाच धंदा म्हणतात ! आपण ती भीक अशा नंदीबैल घेऊन भिरवत रहाणाऱ्यांना न घातली कीं बसतोच त्यांचा हा भिकेचा धंदा !' रामभाऊंनें शेटाणीकडे पाहिलें.

शेटाणीताई आपली बाजू सांवरूं लागल्या, 'अहो भाऊ ! पण त्या नंदीबैलानं नी ह्या गोमातेनं काय केलं आहे पाप ? ह्या भिकाऱ्यावर कांहीं मी दया केली नाहीं, तर त्या नंदीबैलावरून नी गाईवरून ओंवाळून टाकली ती पावली ! तें तर दैवत आहे ना ?'

'पशूला दैवत म्हणणंहि पापच ! पण जर म्हणायचंच ना, तर ह्या भंग्याच्या गाडीचा हा बैलच ह्या नंदीबैलापेक्षां अधिक पूज्य, दयार्ह नि देवलसी म्हटला पाहिजे बरं ताई. हा भंगीबैल पहा बरं समाजाचे काबाडकष्ट किती करतो आहे! हे घाणीचे जिवापाड बोजे सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो वहात असतो. त्याला एक सोडून चार पेंढ्या चारा घाला. त्या चाऱ्यावर समाजाचं केवढं हित साधतां येईल ! पण ह्या भिकारड्या साधूनं समाजाच्या कष्टावर स्वतःसच ऐतखाऊ बनविलं नाहीं, तर ह्या त्याच्या बैलालाहि 'नंदी' नि गाईला 'आदिदेवी' बनवून ऐतखाऊ करून सोडलं आहे ! समाजाचं शेती-गाडी-भाडं असं कोणतंहि उपयोगी काम न करणारा हा बैलहि ह्या भिकाऱ्यानं ऐतखाऊ करून सोडला ! हा माणूस बैल नि तो ह्याचा नंदीबैल ! दोघांच्याहि श्रमांना समाज अंतरतो ह्या भाबडेपणापायीं ! एक रिकामटेकडा ऐदी मनुष्य नि एक रिकामटेकडा ऐदी बैल ! दोघांना समाजाला म्हणजेच तुमच्या-आमच्यासारख्यांना, व्यर्थ पोसावं लागतं ! त्यापेक्षां

ह्या नंदीबैलाला जुंपावा नांगराला नि ह्या माणूसबैलाला धरावा समाजाच्या वेठीला, हेंच योग्य नव्हे काय ? तोच खरा धर्म ! '

'आणि ह्या गाईचं तरी काय ! अहो भाऊ ! ' गंप्या हंसला, ' मी दोन दिवस धर्मशाळेपाशीं पहातों आहे कीं, हा बुवा तिला नांवाचा चारा घालतो; तिचं दूध कांहीं पितो व कांहीं विकतो ! दुसऱ्याच्या पैशाचं गवत नि दूध पितो हा ! ' गंप्या खो खो हंसला !

' खरं काय रे साधुबुवा ? ' शेंढाणी पण थोड्या तिरस्कारानें हंसली. ' इश्श, मला हें मला माहीत असतं तर मीं पावली तर काय पण गवताची काडीदेखील घातली नसती ह्याला ! पण नंदी पूजावा हा धर्म—'

' ह्या धर्मछापानंच डोळयाला अंधेरी येते ताई आपल्या ! नाहींतर त्या मोळीवाल्या बायांच्या चार आणे मोळीच्या थापांना कसं डोळसपणानं परीक्षून पाहिलंत ! त्या मोळीवाल्या बायांनीं जर तुम्हांला सांगितलं असतं– ' बाई, ह्या सोन्याच्या मोळया आहेत, तेव्हां ह्यांना चार आणे देशील तर तुला देवाच्या घरीं सोन्याच्या मोळया मिळतील, ' तर तुम्ही हंसला असतांत ! त्यांना म्हणालां असतांत, ' ह्या मोळया एवढ्या सोन्याच्या आहेत तर तूं कां दारोदार चार आण्यावारीं विकीत फिरतेस ? ' पण हा लुच्चा जेव्हां म्हणाला, ' बैल नंदी देव आहे, ही गाय कामधेनु आहे ' तेव्हां तुम्हीं त्याला कांहीं हांसडलं नाहींत कीं, ' जर ही कामधेनूच तुझ्या घरीं तूं पाळतोस तर तूं दारोदार भीक कां मागतास ? गाईला, नंदीला चारा घालणं हा धर्म आहे तर तूं आपल्या दहास कष्टीव, चार पैसे मिळव नि त्यांतून त्या गाईनंदीला पोसून स्वतःच त्या धर्माचं पुण्य कां जोडीत नाहींस ? ' पण तो कांहीं विचार तुम्हांला सुचला नाहीं. कारण गाईला चारा द्यावा, नंदीला पुजावं हा धर्म आहे. हें पोथ्यांतून तुम्ही ऐकलेलं ! मोळीवाल्यांना दान द्यावं, मागतील त्या दरानं मोळया घ्याव्या, हा धर्म आहे, असं पोथीनं शिकविलं नाहीं ! ताई आतां यापुढं तरी मोळी घेतांना जसे डोळे उघडून वस्तु पारखून घेतां, तसाच धर्म पण पारखून घ्यावा ! नाहींतर

आंधळेपणानं केलेला धर्मच असा अधर्म होतो. कोणत्याहि भिकाऱ्याला पारखल्यावांचून ' धर्म ' करणं हें पाप आहे, तेंच दान, काबाडकष्ट करून समाजाचीं कामं करतात, दुसऱ्यानं मिळवावं नि यांनीं खावं, असे आळशी, ऐतखाऊ नाहींत, अशांनाच जें देणं तें दान द्यावं. पोटचा मुलगा जर न मिळवितां घरबशा झाला, तर त्यालाहि आपण सांगतों कीं, धंदा कर तर जेवायला मिळेल! पण नुसती एक कफनी किंवा रुद्राक्षमाळ किंवा ढाळ विकत घेण्यापुरतं तेवढं भांडवल हे लुच्चे लोक खर्चतात आणि त्या भांडवलावर जन्मभर ' साधू ' ' बुवा ' बनून, समाजाचा पैसा उकळून, चरितार्थ चालवितात! ते आळशी, लुच्चे, ऐतखाऊ बनतात! समाज त्यांना पोसण्यांत त्या मानानं दरिद्री बनतो! दोन्हीं पापं अशा आंधळ्या दानानं आपणां स्वतःस न कळत लागतात! न्यूनांत न्यून दहा लक्ष भिकारी आपल्या समाजाचं धनरक्त असं गोचिडांसारखं आज शोषीत आहेत!'

'भाऊ, आतां पुन्हां कोणीहि असा नंदीबैल्या वा मरतुकडी गाय घेऊन लोकांच्या धर्मभावनेवर धंदा करीत, तिच्या नांवें मिळालेल्या पैशावर स्वतःचं पोट भरीत, नी तिचं दूध स्वतःच गट्ट करून गलेलठ्ठ बनत फिरणारा भोंदू माझ्या दाराशीं आला ना, तर बघा मी त्याला एक दमडी तरी देतों का तें! ए ताई, तुला गाईला धर्मच करायचा ना, तर एक छान गाय स्वतःस विकत घेऊं, तिला खूप चारापाणी घाल, नि स्वतःच पाळ! नंदी देव म्हणशील, तर शेतींत राबणारा बैलच खरा नंदी. कारण त्याच्या कष्टानं नांगर-ओखर करून जो धान्य उगवतो नि घरींदारीं सगळ्यांना जो आनंदवितो, तोच खरा नंदी! त्याला शेतावरून थकून जातांना हिरवीचार गवताची पेंढी सोडीत जा, त्या शेतकऱ्याला चवलीपावली त्या नांवें देत जा!–' गंप्या धर्मोपदेशक बनला!

'आणि त्या घरीं पाळलेल्या गाईचं दूध एकदोन निर्धन पण सच्छील विद्यार्थ्यांना प्यायला देत जा हवं तर! किंवा गाईची वीण नि

समाजाला प्रत्यक्ष उपयोगी असे गुण वाढविणाऱ्या ज्या गोरक्षण संस्था असतील, त्यांतील गाईंच्या खिल्लारांना तें दान देत जा हवं तर ! '

' पण ऐकलंत का ताई, गाय नि बैल पशु आहेत— समाजाला उपयुक्त पशु आहेत— म्हणून त्यांचा समाजाला उपयोग होईल, अशा पद्धतीचं दान दिलं तर पुण्य, ही दृष्टि धरा कीं, मग तुमचं दान आपोआप डोळस होईल नि त्या पशूंची उपयुक्तता वाढेल. अशाच प्रकारं पारखून दान देण्याची तुमच्यासारख्या व्यवहारचतुरांना बुद्धि होईल. पण गायबैल ह्या स्वयमेवच देवता आहेत, असा धर्मछाप डोळ्यांवर मारून ठेवलात कीं तुमच्या दानबुद्धीचे डोळे फुटून हा असा आंधळा धर्म तुमच्याकडून अधर्म घडवीत गेलाच म्हणून समजा !

' आणि गंप्या, नंदीबैलवाले हे असे आले म्हणजेच नव्हे, तर कोणीहि भिकारीं दाराशीं आला कीं त्यालाहि हेंच सांगत जा कीं, समाजाला उपयोगी असा कांहीं तरी उपार्जक कष्ट तूं करतोस कीं नाहीं तें आधीं बोल ! काम कर नी पोट भर ! काम नसलं तर मी तुला झेपेल तें देतों. तें काम देणं एवढंच खरं दान ! कामाचं प्रतिमूल्य त्याला दयेनं योग्य वाटलं तर थोडं अधिक द्या, पण ऐतखाऊ भिकाऱ्याला नुसती कफनी वा रुद्राक्ष वा शंख फुंकतो म्हणून दमडीची देखील भीक घालूं नका ! '

इतक्यांत रामभाऊंना घरांत कोणी हांक मारली. ' आलों अं ' असें म्हणून ते लगबग घरांत निघून गेले. ते दिसेनासे झाले, असें पहातांच तो नंदीबैलवाला तावातावानें म्हणाला, 'तो मैलागाडीवरचा एक भंगी तर हा बामन सवाई भंगी दिसतो ! देतेस ना एखादा कपडा नंदी राजाची पाठ झांकायला ? ' डुम डुम डुमुक् डुम डुम डुमुक् !—त्याचें भिकेचें डमरू पुन्हा वाजूं लागलं !

' चल चालता हो इथून ! ' दंडम् गंपा ओरडला !

ताई म्हणाली, ' गंप्या भांडतोस कशाला ! फार तर देऊं नये त्याला कांहीं ! तूं जा अ बाबा आतां ! पावली दिली न तुला ! '

ताई अजून बोटचेपी आहे असें तर्कून त्या साधूनें आपलें त्रागयाचें शेवटचें अस्त्र सोडलें! भावड्या लोकांपुढें त्रागा केला कीं अधिक दान हट्कून मिळतें, निदान दिलेलें कोणी परत घेत नाहीं, हा ह्या भिक्षेकऱ्यांचा नेहमींचा बहुधा अचूक अनुभव असतो. 'घे ताई घे! तुझी ही पावली पण घे परत! देव बघून घेईल ह्या तुझ्या पोराला! गोमाता, नंदीराजा, महादेव—'

तोंच त्यानें फेंकलेली ती पावली पटकन् उचलून गंप्यानें अक्राळ विक्राळ अवसानानें त्याच्यावर चालून जाऊन दटावलें, 'चल, होतोस कीं नाहीं येथून चालता! होतोस कीं नाहीं?'

त्याबरोबर तो नंदीबैलवाला एकदम दबला आणि नंदीचें दावें ओढून दहा पावलें चुपचाप मागें हटला: पण तेथून पुन्हा एकदां अगदीं गयावया करीत 'माझी पावली तरी दे रे दादा ती परत!' म्हणून त्यानें हात पसरला! पण गंप्याचा तो 'चालता हो!' पुन्हा गडगडतांच पुन्हा चुपचाप पुढें चालता झाला, गंप्या पण कांहीं बडबड करीत घरांत परतलेला जेव्हां त्या साधूजींना दिसला, तेव्हां एकदां त्यांनीं स्वतःच्या मनासमोर तरी स्वतःची पत राखण्यासाठीं झालेल्या अपमानाचा सूड उगवला—ओंठांतल्या ओठांतच त्या गंप्याला एक शिवी हांसडून, 'हा एक तिसरा भंगीच दिसतो! ह्या आळींत भंग्याचेच बेटे रहातातसे दिसतात सगळे!'

* * *

तिथेंच ती आळी संपली होती आणि गंप्याच्या मागच्या दाराशीं जाणारा बोळ लागला होता. गंप्याचें मागचें दार त्या बोळांतच उघडतें ही कल्पनाच नसल्यानें, नवी वाट म्हणून साधु, त्याचा नंदा नी ती कामधेनु असें तें सार लटांबर त्या बोळांत घुसलें इतक्यांत त्या दारांतून त्या मोळीवाल्या बाया हातांत मोळयाच्या सुट्या घेऊन, त्यांना मिळालेल्या त्यांच्या काबाडकष्टाच्या त्या अडीच अडीच आण्यांच्या प्राप्तींत किती मीठ—मिरची—तेल विकत घ्यायचें ते बेत

समाजाला प्रत्यक्ष उपयोगी असे गुण वाढविणाऱ्या ज्या गोरक्षण संस्था असतील, त्यांतील गाईंच्या खिल्लारांना तें दान देत जा हवं तर !'

'पण ऐकलंत का ताई, गाय नि बैल पशु आहेत– समाजाला उपयुक्त पशु आहेत– म्हणून त्यांचा समाजाला उपयोग होईल, अशा पद्धतीचं दान दिलं तर पुण्य, ही दृष्टि धरा कीं, मग तुमचं दान आपोआप डोळस होईल नि त्या पशूंची उपयुक्तता वाढेल. अशाच प्रकारं पारखून दान देण्याची तुमच्यासारख्या व्यवहारचतुरांना बुद्धि होईल. पण गायबैल ह्या स्वयमेवच देवता आहेत, असा धर्मछाप डोळ्यांवर मारून ठेवलात कीं तुमच्या दानबुद्धीचे डोळे फुटून हा असा आंधळा धर्म तुमच्याकडून अधर्म बडवीत गेलाच म्हणून समजा !

'आणि गंप्या, नंदीबैलवाले हे असे आले म्हणजेच नव्हे, तर कोणीहि भिकारी दाराशीं आला कीं त्यालाहि हेंच सांगत जा कीं, समाजाला उपयोगी असा कांहीं तरी उपार्जक कष्ट तूं करतोस कीं नाहीं तें आधीं बोल ! काम कर नी पोट भर ! काम नसलं तर मी तुला झेपेल तें देतों. तें काम देणं एवढंच खरं दान ! कामाचं प्रतिमूल्य त्याला दयेनं योग्य वाटलं तर थोडं अधिक द्या, पण ऐतखाऊ भिकाऱ्याला नुसती कफनी वा रुद्राक्ष वा शंख फुंकतो म्हणून दमडीची देखील भीक घालूं नका !'

इतक्यांत रामभाऊंना घरांत कोणी हांक मारली. 'आलों अं' असें म्हणून ते लगबग घरांत निघून गेले. ते दिसेनासे झाले, असें पहातांच तो नंदीबैलवाला तावातावानें म्हणाला, 'तो मैलागाडीवरचा एक भंगी तर हा बामन सवाई भंगी दिसतो ! देतेस ना एखादा कपडा नंदी राजाची पाठ झांकायला ?' डुम डुम डुमुक् डुम डुम डुमुक् !—त्याचें भिकेचें डमरू पुन्हा वाजूं लागलें !

'चल चालता हो इथून !' दंडम् गंपा ओरडला !

ताई म्हणाली, 'गंप्या भांडतोस कशाला ! फार तर देऊं नये त्याला कांहीं ! तूं जा अ बाबा आतां ! पावली दिली न तुला !'

ताई अजून बोढचेपी आहे असें तर्कून त्या साधूनें आपलें त्राग्याचें शेवटचें अस्त्र सोडलें ! भावड्या लोकांपुढें त्रागा केला कीं अधिक दान हडकून मिळतें, निदान दिलेलें कोणी परत घेत नाहीं, हा ह्या भिक्षेकऱ्यांचा नेहमींचा बहुधा अचूक अनुभव असतो. ‘ घे ताई घे ! तुझी ही पावली पण घे परत ! देव बघून घेईल ह्या तुझ्या पोराला ! गोमाता, नंदीराजा, महादेव—’

तोंच त्यानें फेंकलेली ती पावली पढकन् उचलून गंप्यानें अक्राळ विक्राळ अवसानानें त्याच्यावर चालून जाऊन दटावलें, ‘ चल, होतोस कीं नाहीं येथून चालता ! होतोस कीं नाहीं ? ’

त्याबरोबर तो नंदीबैलवाला एकदम दबला आणि नंदीचें दावें ओढून दहा पावलें चुपचाप मागें हटला. पण तेथून पुन्हा एकदां अगदीं गयावया करीत ‘ माझी पावली तरी दे रे दादा ती परत ! ’ म्हणून त्यानें हात पसरला ! पण गंप्याचा तो ‘ चालता हो ! ’ पुन्हा गडगडतांच पुन्हा चुपचाप पुढें चालता झाला, गंप्या पण कांहीं बडबड करीत घरांत परतलेला जेव्हां त्या साधूजींना दिसला, तेव्हां एकदां त्यांनीं स्वतःच्या मनासमोर तरी स्वतःची पत राखण्यासाठीं झालेल्या अपमानाचा सूड उगवला—ओंठांतल्या ओठांतच त्या गंप्याला एक शिवी हांसडून, ‘ हा एक तिसरा भंगीच दिसतो ! ह्या आळींत भंग्याचेच बेटे रहातातसे दिसतात सगळे ! ’

* * *

तिथेंच ती आळी संपली होती आणि गंप्याच्या मागच्या दाराशीं जाणारा बोळ लागला होता. गंप्याचें मागचें दार त्या बोळांतच उघडतें ही कल्पनाच नसल्यानें, नवी वाट म्हणून साधु, त्याचा नंदा नी ती कामधेनु असें तें सार लटांबर त्या बोळांत घुसलें इतक्यांत त्या दारांतून त्या मोळीवाल्या बाया हातांत मोळयाच्या सुट्या घेऊन, त्यांना मिळालेल्या त्यांच्या काबाडकष्टाच्या त्या अडीच अडीच आण्यांच्या प्राप्तींत किती मीठ—मिरची—तेल विकत घ्यायचें ते बेत

योजीत तिकडून येत होत्या, त्या त्याला भेटल्या. त्या नव्या गिऱ्हाई-कांना पहातांच साधूचें डमरू पुन्हा वाजूं लागलें—

'डुम डुम डुमुक्, डुम डुम डुमुक् ! !

'गोमाता ! कामधेनु ! द्या ऽ वा हो चारा पैसा द्यावा ऽ ऽ हो। कांहीं दान नंदी ऽ ऽ राजाला। घाला ऽ ऽ हो। पै ऽ सा पू ऽ ऽ जा ऽ। हो नंदी रा ऽ ज्क ! डुम डुम डुमुक् ! डुम डुम डुमुक् !'

साधूची चर्पटपंजरी सुरावर चालू झाली. त्या मोळीवाल्या बायांनीं नंदीला नमस्कार केला. गाय तर अगदींच आडवी आली. साधु हात पसरून पसरून 'ध ऽ र ऽ म गायी ऽ ला ! गायी ऽ ला।' म्हणून पिच्छा पुरवूं लागला. गायीच्या नांवें त्या बायांना नाहींच म्हणवेना. त्या आपसांत कुजबुजून एक दोन पैसे काढून आतां त्याच्यापुढें फेंकणार तोंच—

'ए बायांनो, थांबा ! दमडीसुद्धां देऊं नका त्या लुच्च्या भिकार-ड्याला !' असा दरडावणारा आवाज आला !

गंप्याचाच तो आवाज ! पण ही ब्याद बोलते आहे कुठून, असें गोंधळून त्या साधूनें बोळाच्या तोंडाकडे वळून पाहिलें, तों गंप्या तिथें नाहीं ! पुढें पाहिलें—तों गंप्या त्याच्या मागच्या दारांतून खवळून बाहेर पडतांना दिसलाच त्या भयभीत साधुजींना !

'बायांनो, देऊं नका कांहींएक ह्या असल्या भोंदू भिकाऱ्याला ! हा माणूसबैल नी हा त्याचा नंदीबैल दोघेहि ऐतखाऊ आहेत ऐतखाऊ। आणि तुम्ही ? कुठें रानांवनांत श्रमून तीं लांकडें तोडलींत, फोडलींत, पहांटेसच भाऱ्या बांधून खेड्यांतून नगरांत अनवाणी येऊन तो बोजा माध्यान्हीं दिवस येईतों डोक्यावर वाहून दारोदार भटकल्यांत, तेव्हां कुठं अर्डीच आणे पदरांत पडतात ! ते तुमच्या निढळाच्या घामाचे पैसे हा ऐतखाऊ आतां आयते उपटणार ? देऊं देणार नाहीं मीं ते त्याला ! त्या अडीच आण्यांत तुमच्या घरच्या मुलांलेकरांना मीठ, मिरची, तेल तें तुम्ही काय नेणार ! ए साधु. अरे, तूं त्यांना या पशूंवर 'दयाधरम'

करायला सांगतोस. पण त्यांच्या लेकरांची दया तुला नको का यायला? आपल्या मुलांलेकरांच्या तोंडची घांस हिसडून, बायांनो, कशाला ग देत होतात तुम्ही त्याला पैसे?' गण्यानें कळवळून विचारलें.

'गोमातेच्या पायाचा अंगारा देत होता तो साधु आम्हांला!'

'साधु? भोंदु आहे तो भोंदु! पशूच्या पायाचा अंगारा माणसांना विकतो! बायांनो, तुमच्या घरीं शेतीचे बैल नी गायी, गुरंढोरं असतीलच ना? मग त्या कष्टाळू गुरांढोरांचा अंगारा आपल्या माथीं लावीत जा जर कांहीं लावायचंच तर! कारण ते पशु तुमच्या कामास तरी येतात! हें पहा, ह्या ऐतखाऊ साधूला मघां माझ्या आईनें चार आणे दिले होते दान म्हणून! तें कुपात्रीं दान मी देऊं दिलं नाहीं सत्पात्रीं द्यावं म्हणून! जा, हे घ्या ते चार आणे! तुमची तीं मुलंलेकरं नी तुमचीं तीं गुरंढोरं दानाला खरीं सत्पात्र! घ्या हे.'

'नग नग आम्हांसनी तें, दादा!' त्या बाया अगदीं कळवळून म्हणाल्या, 'तुझं पैसं आम्ही कशापायीं घेणार! काबाडकष्ट करून खातों दादा आम्ही दोन घांस, आंधळ्यापांगळ्या थोड्याच आहोंत? आम्हांसनी कशा हवं दान!'

'ए साधु! ऐकलंस का? दिसतं आहे का हें तुला? बघ ह्या कष्टाळु बायांचीं थोर हृदयं! अरे तुझ्या त्यांच्यांत खऱ्या साधु ह्या मोळीवाल्या आहेत, नि तू निव्वळ भोंदु! आतां तरी सोडून दे हा ऐतखाऊपणा आणि हें अंगारा विकणं! अरे, जर कोणाच्या पायाचा अंगारा लावायचाच ना, तर त्या तुझ्या ऐदी पशूच्या पायाचा अंगारा ह्या बायामाणसांना लावण्यापेक्षां ह्या काबाडकष्ट करून समाजाच्या कांहींतरी उपयोगी पडणारीं कामं करून त्यावर पोट भरणाऱ्या त्या भग्याच्या, ह्या मोळीवाल्या शेतकरणी कामकरिणींच्या—पायांचा अंगारा तुलाच लावावयास हवा! समाज जो अजून जीव धरून आहे तो ह्यांच्याच काबाडकष्टांवर होय! तुझ्यासारखे माणूसबैल, नि हा पशुपूजा, नि हे अंगारे, नि ही ऐतखाऊ साधुता, नि हे तुझे नंदीबैल ही समाजाच्या भाबडेपणाची

मैलागाडी आहे—त्या भंग्याच्या मैलागाडीहूनहि तिरस्कार्य, टाकाऊ! कारण त्या भंग्याच्या मैलगाडीचें शेतांना तरी खत होतें—पण ह्या भावडेपणाच्या मैलागाडीनें बुद्धिभ्रंशाची रोगराईच काय ती जिकडे-तिकडे फैलावते! उपयोग असा कांहीं नाहीं! बायांनो, दान म्हणून नाहीं, पण तुमच्या लेंकरांना खाऊ म्हणून फुटाण्यासाठीं मी देतों हे चार आणे वर! ओशाळूं नका! घ्या ते अं!'

गंप्यानें बळें बळें ती पावली मोळीवालीच्या हातीं टाकली. त्या भिकाऱ्याच्या तावडींतून सुटून त्या बाया बोळाबाहेर पडेतों गंप्या तिथें उभा राहिला. तो बावा त्या बोळाच्या दुसऱ्या तोंडाकडे जात आहे असें पाहिलें, तेव्हांच काय तो गंप्या घरांत परतला.

* * *

गंप्या दिसेनासा होतांच त्या साधूच्या पोटांत सांचलेला गंप्यावरचा सारा राग एकदम वर उसळला आणि त्याचा वचपा ज्या एकाच वस्तू-वर त्या भिकारड्याला काढतां येण्यासारखा होता, त्या वस्तूवर, म्हण-जेच त्याच्या नंदीबैलावर त्यानें हातांतील काठीचा एक रट्टा असा बळानें हाणला कीं, तो बिचारा बैल धूम पुढें पळाला. आणि लगेच मागें वळून गवतकाडी वेंचून खात रेंगाळत चालणाऱ्या त्या बिचाऱ्या गाईच्या नाकावरच त्यानें दुसरा रट्टा हाणला कीं, गाईला देवता न मानतां केवळ एक उपयुक्त पशु म्हणूनच काय तें मानणाऱ्या मनुष्या-चेंहि हृदय त्या निष्कारण क्रूरतेनें कळकळून यावें! ज्या नंदीला देव आणि गाईला देवी म्हणून लोकांनीं पोसावें असें ढोंग तो लोकांना शिकवी, त्यांनाच तो भोंदु स्वतः पशुइतक्या देखील दयेनें वागवीत नव्हता! असे हे नंदीबैल कांहीतरी दहा हजार आणि ऐतखाऊ रुद्राक्षे-टाळकुटे, भोंदू दहा लाख गांवगन्ना भटकत आहेत! समाज जर गंप्या-सारखा होईल, तर अशा दहा लाख ऐतखाऊंना काम करून पोट भरणें भाग पडेल! भोंदूपणाचा नि भावडेपणाचा रोग प्लेगासारखाच समाजाला पोंखरीत आहे!

—१९३७

आ.
पा. क्र. ३११७...
वाचनालय शाखा

# चातुर्मास्य !

: १ :

( रांगोळीची करंडी घेऊन रखमाबाई येतात आणि " वनवासी राम माझा। सांगा कुणी पाहिला ॥ " हें गाणें गुणगुणत गोपद्में रांगोळीनें काढीत बसतात. इतक्यांत सकुताई, लीला, शालिनी, मालिनी, सीता प्रभृति स्त्रिया येतात, त्यांस रखमाबाई स्वागतितात. )

रखमाबाई—या या सकुताई, लीला–या अशा, कुणी इथं बसा, कुणी इथं बसा. या ! ( पुन्हा गोपद्में काढूं लागतात. )

सकुताई—हें काय चाललं आहे रखमामावशी ?

रखमाबाई—अग, या चातुर्मास्यांत मीं कनी गोपद्मांचं व्रत धरलं बरं. अग, पण ती कमला नाहीं आली ती कुठं तुमच्याबरोबर आज ? किती बातरी आहे ग ती ! आली कीं कुठलं मेलं तें हिंदुसंघटण कां कायसं आहे नं तें काढलंच तिनं !

सकुताई—मग त्यांत हो वाईट तें काय आहे रखमामावशी ? ती जरी वयानं लहान असली नं तुमच्याहून, तरी तिचे विचार किती पोक्त असतात ! तुमचं हो वय काय रखमामावशी आतां ?

रखमाई—आमचं काय बाई ! दहा गेले नी पांच राहिले ! ( बोटें मोजून ) बघ, तीन सिंहस्थ मला अगदीं चांगले आठवतात. मग तूंच पहा आपली आतां माझं वय काय असेल तें !

सकुताई—आतां मला जर तिशी उलटली, तर तुम्ही साठीच्या जवळ असणारच मावशी ! अहो, आलीच वाटतं ती कमला ! हांक मारते आहे ! ओ ! —या या, दार लोटलेलं आहे हो नुसतं. उघडा, या आंत. ( कमला येतांच ) या शिक्षकीण बाई ! बसा अशा.

कमला—काय रखमामावशी, कसं काय आहे ? हें काय करतां आहां ?

रखमाबाई—अग, हीं गोपद्मं काढतें आहे मी. चातुर्मास्यांत गोपद्मांचं व्रत फार पवित्र. १०८ गोपद्मं प्रत्यहीं रांगोळीनं काढावीं, मग त्यांची पूजा करावी, स्वतः सोंवळयानं सैंपाक करून पक्कान्नांचं पान वाढून गोठ्यांत जावं, गाईला हळदकुंकू लावून फुलांची माळ घालून सोंवळयानं आपल्या हातीं गोग्रास घालावा आणि मग जेवावं अशीं १०८ गोपद्मं—अग, म्हणजे गाईच्या खुरांचीं हीं अशीं चित्रं—चार महिने काढलीं नं, म्हणजे गोलोक नांवाचा स्वर्ग १०८ वर्षे जिवाला भोगायला मिळतो ! हो पण व्रत संपतांच दहा तरी भट जेवायला बोलावून प्रत्येकाला एकेक सोन्याचं गोपद्म दिलं पाहिजे हो !—नाहींतर नाहीं स्वर्ग मिळणार ! अग कमळे, तुला कांहीं व्रत नको का धरायला आतां ! शिक्षकीण झालीस म्हणून काय झालं ! अग, देवाची सेवा कांहीं करावी, कांहीं धर्म आचरावा ! तूं पण हें गोपद्मांचंच व्रत धर पाहूं.

कमला—पण प्रत्यहीं गायीसारख्या एका पशूच्या खुराची १०८ चित्रं काढल्यानं आणि भटांना सोन्याचीं गोपद्मं दिल्यानं देवाची सेवा ती काय साधणार ? धर्म तो काय घडणार ? धर्म म्हणजे परोपकार. परोपकारः पुण्याय ! तेव्हां ह्या लोकीं कांहीं प्रत्यक्ष असा परोपकार घडेल

असं व्रत करणं बरं. तसं एक व्रत मीं धरलं तर त्यांत नाहीं का देवाची सेवा घडत ?

**रखमाबाई**—लागलीच पाचकळपणा करायला ! अग, गायीची सेवा तीच देवाची सेवा. भाव ठेवावा तिथं देव आहेच ! पोथींतच आहे हो हें सारं !

**कमला**—होय ना ? मग जर पशूंत भाव ठेवला तरी देव पावतो, तर आपल्या ह्या हिंदुराष्ट्राच्या भावाबहिणींची, माणसासारख्या माणसांची सेवा देवाच्याच नांवें केली तर काय तो पावणार नाहीं ? नरांची सेवा तीच नारायणाची सेवा, हेंसुद्धां पोथीच सांगते !

**सकुताई**— हें अगदीं खरं हो कमलाताई, मी तसं व्रत धरतें. या लक्ष दूर्वांपेक्षां तोच खरा परोपकार, खरी देवसेवा, कोणचं धरूं ?

**कमला**—असं बघा सकुताई, एका बिहारच्या भूकंपांत अनाथ अशीं हिंदूंचीं तीन हजार बाळं मिशनरी मौलवींनीं नेलीं, बाटवलीं, त्यांचे आईबाप त्यांना मुकले. इतकंच नव्हे, तर हे तीन हजार वंश पुढील पिढीपासून हिंदूंचे कट्टर शत्रु होणार. आपल्या हिंदुराष्ट्राचं संख्याबळ अशा प्रत्यहींच्या धुडगुसापायीं कोटीकोटींनीं घटत असतां, हिंदुधर्माचं खरं व्रत म्हणजे लाख लाख दूर्वांच्या गवताचे भारे देवाच्या नांवं बांधीत बसणं नसून अशी एकेक अनाथ हिंदु बालबालिका वांचविणं हेंच होय. पण यासाठीं हिंदुसभेनं काढलेल्या अनाथालयांना भीकदेखील कोणी घालीत नाहीं ! आम्ही देखील दरिद्रि; अशा हिंदु अनाथालयांस पैसा कुठन देणार ! पण आपलं शरीर तरी हिंदुसंघटनाच्या अशा पवित्र कार्यांसाठीं कष्टविणं आपल्या हातचं आहे, हेंहि तपच आहे, अशा हेतूनं आम्हीं दहापांच मैत्रिणींनीं असं व्रत धरलं आहे कीं, प्रत्यहीं आमच्या येथील हिंदुसभेच्या अनाथालयांत दोन तास जाऊन तेथील लेकरांना अंगेजणीनं आंघोळून, जेववून, त्यांचे कपडे घरच्या साबणानं धुऊन परीटघडीसारखे चक्क करून ठेवायचे आणि दर रविवारीं त्यांना

हिंदु वीर पुरुषांच्या सोप्या कथा सांगायच्या. विज्ञानाचे चमत्कार, खेळीव विमान, यंत्र, ध्वनिक्षेप यांचीं खेळणीं देऊन, समजून सांगायचं. झाडझूड करून मळ देखील आम्हीच काढतों.

**रखमाबाई**—इश्श ! कुठलीं मेलीं तीं बिनवारशी पोरटीं ! ना जात ना पात ! त्यांचा मळ काढायचा नी गदळ कपडे धुवायचे : भंगिणी आहांत का धोबिणी !

**सकुताई**— असं कां म्हणतां रखमामावशी ? अहो, आपण आपल्या घरच्या लेंकरांच्या मळानं लडबडलेलीं चिरगुटं नाहीं का धूत ? कुटुंबांतल्या लेंकरांचा मळ काय सोन्याचा असतो ? हिंदुराष्ट्र हेंहि आपलं एक मोठं कुटुंबच आहे हो ! मी तरी असंच हिंदुसंघटनाचं कांहीं सेवाव्रत धरणार. त्या अनाथालयासाठीं सांगा ना कमलाताई मी काय करूं ?

**कमला**— तुम्ही ? अहो खरंच. तुम्हाला फक्कड शिवणकाम येतं नाहीं का ? बस्स. तर तुम्ही असं करा कीं, चातुर्मास्यांत निदान शंभर झबलीं नी सदरे त्या अनाथालयास धर्मार्थ शिऊन द्या फुकट ! तें साहाय्य त्या संस्थेची केवढीतरी चिंता दूर करील !

**सकुताई**— हो, हो ! पण बाई कापड कुठलं विकत आणूं मी इतकं !

**रखमाबाई**— मी देतें बरं तुला कापड. या माझ्या १०८ गोपद्मांमागं १०८ मुलांच्या झबल्यासदऱ्यांचं कापड मी देईन हो धर्मार्थ. मग तर पावेल ना मला सुद्धां तो तुझा हिंदुसंघटन-देव ! अग हंसतां काय अशा! हिंदुसंघटन हाहि एक देवच आहे बरं. गणपति म्हणजेच गणांचा पति, संघटनाचा देव. अग, आम्हांला कळत कां नाहीं हें ? पण आम्ही आपलीं जुनीं माणसं. तुमच्या नव्या कल्पना आम्हांला आमच्या जुन्या भाषेंतच सांगितल्या म्हणजे लवकर पटतात हो. मी हीं आपलीं १०८ गोपद्मं पुजीनच, पण अनाथालयांतील १०८ लेंकरांना कापड पण धर्मार्थ दिल्यावांचून व्रताची सांगता झाली असं मानणार नाहीं बरं. म्हणजे जुनं व्रत पण झालं, नी नवंहि झालं. काय कमला ?

**कमला**— आभार आहेत हो मावशी तुमचे. तुम्हां वडीलधाऱ्या माणसांनीं आम्हांला इतका आशीर्वाद नी सहकार्य दिलं तरी पुरें आहे ! बरं लीला, शालिनी, मालिनी तुम्ही साऱ्या जणींनीं कोण-कोणचीं व्रतं या चातुर्मास्यांत धरलीं आहेत ?

**लीला**— आम्हीं दहा जणींनीं प्रत्येकीं लक्ष लक्ष वातींचं व्रत धरलं आहे. प्रत्यहीं शंभर दोनशें वातींचा काकडा सकाळीं देवघरांत वा देवळांत जाळायचा. अशी लाखोली प्रत्येकीनं जाळली कीं दहा भट बोलावून त्यांना दहा सोन्याच्या वाती द्यायच्या. ( सगळ्या हंसतात )

**कमला**—भटांच्या घरीं सोन्याच्या वाती जाळतात होय ? लीले, पूर्वी विजेचे, गॅसचे, रॉकेलचे दिवे नसत; तेव्हां घरीं, देवळीं पणत्यांतून वातीच लावीत. तेव्हां त्या काळीं लाख वाती फुकट जात नसत. घरीं, देवळीं त्यांचा उपयोग होई. पण आतां जिकडे तिकडे रॉकेलचे कंदील, गॅस व विजेचे दिवे झगझगाटत आहेत. आतां त्या झगझगाटांत लाख वातीं-पायीं तुम्हां दहापांच जणींच जें मणभर तरी तूप नुसतं जाळून टाकायचं त्यांत काय अर्थ आहे बरं ! पुन्हां वाती पेटवायच्या त्या म्हणे सकाळीं उजाडल्यावर पेटवायच्या. किती व्यर्थ कष्ट ! म्हणून म्हणतें, तुम्ही तें मणभर तूप असं उगीच जाळून टाकण्यापेक्षां त्या अनाथालयांतील लेंकरांच्या तोंडीं घाला. नुसत्या कापसाच्या वाती पेटवून पडलेल्या उजेडांत आपल्या राष्ट्रांतील दास्य, दारिद्र्य, दुष्काळ, दुर्दशा यांचा अंधेरच काय तो दिसतो ! पण आपल्या हिंदुराष्ट्राच्या त्या लेंकरांच्या जीवनाची विझती वात जर तेवविली ना तरच तो अंधेर घालविणारा खरा उजेड आपल्या घरीं पडेल !

**सकुताई**—आणि प्राणदानाचं तेंच कृत्य देवालाहि जास्त आवडेल ! अग, माझ्या मुलीनं मुलालेंकरांच्या तोंडीं पडणारं तूप जर चुलींत उगीच ओतून दिलं तर मी तिच्यावर रागावेन कां प्रसादेन ? तसंच देवाच्या लेंकरांच्या तोंडीं पडणारं हें मणोगणती तूप असं नुसतं जाळून टाकल्यानं देव उलट रागावतच असला पाहिजे. त्यापेक्षां तें मणमण

तूप देवाच्याच नांवं त्या अनाथ लेंकरांस पोसण्यासाठी खाऊं घातलं तर त्यांतच खरा परोपकार घडेल ! इहलोकीं प्रत्यक्ष लाभ, परलोकीं पुण्य !

**शालिनी**— मी कनी चातुर्मास्यांत केळीच्या पानावर जेवायचं व्रत धरलं आहे. चार महिने केळीच्या पानावर जेवायचं नी मग भटांना जेवायला घालून एकेक चांदीचं केळीचं लहानमोठं पान दान द्यायचं.

**मालिनी**— मी कनी भेंडीव्रत धरलं आहे. या चातुर्मास्यांत भेंड्यांची भाजी खायची नाहीं आणि शेवटीं भटाला बोलावून एक चांदीची भेंडी दान द्यायची. आमच्या गोपाळ भटजींनीं सांगितलं आहे कीं, इथं अशी चांदीची भेंडी दान दिली कीं मेल्यावर स्वर्गात सोन्याच्या भेंड्या मिळतात हो जिवाला. ( सगळ्या जणी पुन्हां हंसतात ) हंसतां ग काय सारख्या ?

**रखमाबाई**— अग, हंसूं नको तर काय करूं ! मला म्हातारीला देखील ही भटांची लुच्चेगिरी पसंत नाहीं बरं पडत ! कोण ग हा गोपाळभटजी ? तो का ? वा ग वा ! लोकांची घरं मक्त्यानं बांधायचा त्याचा एक धंदा आहेच. घरीं गाईम्हशीं बाळगून दूध गांवभर विकतोच. अग परवां मीं मनुस्मृतींत ऐकलं कीं जो ब्राह्मण दूध विकतो तो तत्काळ पतित होतो म्हणून ! त्याचा मुलगा पोलिस खात्यांत मोठा कारकून आहेच. तीन मजली नवं घर त्यानं अलीकडेच बांधलं आहे. तिकडे तीं आपल्या हिंदूंचीं शेंकडों लेंकरं भुकेनं मरताहेत, मिशनरी, मुसलमान त्यांना वाढवून हिंदु राष्ट्राचे कट्टर शत्रु बनविताहेत नी आम्ही इ .डे मणमण तूप आगींत जाळतों आहोंत नी अशा पैसेवाल्या धंदेवाईक भटांना चांदीचीं केळीचीं पानं नी सोन्याच्या भेंड्या धर्म म्हणून दान देत आहोंत ! हा कसला मेला धर्म– अधर्म आहे हा ! कमल, तुझं म्हणणं अगदीं खरं आहे. हे भट मोठे लुच्चे आहेत. देवाच्या नांवं भावड्या लोकांना मनास येतील तशा थापा मारून स्वतःची तुं डी भरत आहेत !

कमला—पण रखमामावशी, मी म्हणतें, कीं ह्याचा सारा दोष भटांवरच टाकणंहि अन्यायाचं होईल. आजच्या भटांच्या बायाहि तींच व्रतं करून दुसऱ्यांना तशींच दानं देतात. भट तरीं आपलेच भाऊबंद. त्यांनाहि सुधारावं तर तेहि सुधारतील ! खरा दोष आपल्या सगळयांच्या भाबडेपणाचा आहे. भट बळेंबळें लाठी घेऊन कांहीं आपल्या घरीं येत नाहींत. आम्हींच त्यांस बोलावतों, भट आला नाहीं तर जेवत देखील नाहीं. मग आम्हीं देऊं तितकं दान तो नेतो ! तेव्हां मूळ दोष आपल्या भाबडेपणाचा ! आपण आपल्या विवेकानं पोथींत खोटं काय, खरं काय तें ठरवावं. बरं सिताबाई, तुम्हीं कोणचं व्रत केलंत ?

सीताबाई— मी काय बाई व्रत करणार ! घरीं मुलांना गोडधड-देखील मिळत नाहीं. मधुकरीदेखील मागावी लागते बिचाऱ्यांना, म्हणून मी आपल्या वडाभोंवती लक्ष प्रदक्षिणा तेवढ्या गेल्या वर्षी घातल्या. या चातुर्मास्यांत गोग्रास कानवल्याचं व्रत धरलं आहे. दर सोमवारीं नऊ गुळाचे कानवले करतें, पैकीं आठ कानवले गायीला घालते नी एक तेवढा प्रसाद म्हणून मुलांना देतें. मी स्वतः उपास करतें. असे सोळा सोमवार करायचे !

सकुताई— इश्श ! ह्या तर निव्वळ आचरटपणा नाहीं का ? अहो, घरीं मुलांना गोडधोड मिळत नाहीं म्हणून एकीकडे म्हणतां आणि गुळाचे नऊ कानवले करून गायीसारख्या एका पशूला आठ चारतां नी मुलांच्या तोंडीं एक घालतां ! अहो, मुलांमाणसांना दूध देते म्हणून जी गाय हवी, तिला, मुलांमाणसाना उपाशी ठेवून तुपाशीं जेववायाचं काय ? पशूची जोपासना करायची तर पशूसारखी करा. पशूला हिरवं गवत पेंढीभर आणून घाला, पाहिजे तर ओखदवाणी घाला आणि कानवले मुलांना द्या ! गोठ्यांतला पशु देव आहे, तर तुमचीं पोटचीं लेंकरं काय भुतं आहेत ? माणसांहून पशु श्रेष्ठ आहे हें सांगणारं व्रत देवाचं नसून दैत्याचं आहे दैत्याचं ! /

लीला—तसंच तुझ्या त्या वडाच्या भोंवतीं लक्ष वेळां गरगर फिरायचं व्रत देखील भाबडद्पणाचं नाहीं का ? त्यांत परोपकार असा ग कोणचा केलास ?

रखमाबाई—तुम्ही सगळयाजणी कमलेच्या पट्टशिष्यिणी झाल्यातसं दिसतं मला. खरंच बरं, तिचं जें म्हणणं कीं, अशींच व्रतं करावीं कीं ज्यांत या लोकीं प्रत्यक्ष परोपकाराचं कांहीं कृत्य, राष्ट्राची कांहीं सेवा घडेल, तें अगदीं बरोबर आहे हो. अमुक भाजी खायची नाहीं, केळीच्या पानावर जेवायचं, उगीच लाख वेळां गरगर फिरायचं, असा व्यर्थ देहदंड करण्यापेक्षां देहदंडाचं तपहि घडावं आणि राष्ट्राची प्रत्यक्ष सेवा, या लोकीं कांहीं तरी प्रत्यक्ष परोपकार करावा, असं मी एक व्रत तुम्हांला सांगतें अं. तुम्ही निर्धन असल्यात तरी देखील पुष्कळ दान दिल्याचं पुण्य तुम्हांला कसं जोडतां येईल बघा अं. माझ्या अंगणास लागून माझी ही केवढी तरी मोकळी जागा आहे. तींत नुसतं रान उगवत. तर तुम्ही दहावीस जणी प्रत्यहीं तिथं येऊन स्वहस्तानं खणून पेरून या चातुर्मास्यांत वांगीं, अळू, मिरच्या, कोथिंबीर प्रभृति शाक-भाजी लावा. त्या अनाथालयास चारसहा महिने पुरल इतक्या भाज्या आपण स्वतःच्या मेहनतीनं पुरवूं या !

कमला—ठीक ठीक ! दूर्वांचे भारे बांधीत भटकण्यापेक्षां वा वाती करीत वा हीं अशीं गाईच्या खुराचीं चित्रं काढीत वा झाडाभोंवतीं लाख वेळां गरगर फेऱ्या घालीत राहण्यापेक्षां असा आपल्या धर्म-बांधवांच्या, या हिंदुराष्ट्राच्या सेवेंत देह झिजवावा हेंच उत्तम. जर देव झाडपशूंच्या सेवेनं संतोषत असेल, तर तो नराच्या सेवेनं अधिक संतोषत असला पाहिजे आणि त्या त्या व्रतांनीं पारलौकिक फळं मिळत असतील तींहि मिळत असलींच पाहिजेत ! आतां बघा अं, रखमाबाई त्या अनाथ शंभर लेंकरांना वाढ देतील, सकुताई त्यांचीं झबलीं नी सदरे शिवून देतील, तुम्ही मणभर तूप द्याल, ह्या सगळयाजणी मिळून

चार महिन्यांच्या भाज्या पुरवतील, म्हणजे आपण त्या एका अनाथालयाचा केवढा खर्च भागवूं बरं ? —हिंदु धर्मांची, राष्ट्राची, केवढी सेवा नी केवढा परोपकार करूं शकूं बरं ! मग घेतां ना हीं सगळीं व्रतं ?

साऱ्या जणी—अगदीं आम्हीं सगळ्यांनीं हींच व्रतें या चातुर्मास्यांत करायचा संकल्प हा आतांच केला बरं. तुम्ही जा नी त्या अनाथालयाच्या संचालकांना द्या हें वचन इतक्या धर्मार्थ सहाय्याचं.

कमला—त्यांना कितीतरी आनंद होईल. त्यांची केवढी चिंता दुरावेल हें ऐकून ! जाऊं या आपण साऱ्याजणीच तिकडे. चला ! ( जातात ).

★

# ताबूतांची गोष्ट

: १० :

आपल्याला ताबूतांची गोष्ट माहीत आहे काय ? तुम्ही प्रतिवर्षं मुसलमानांचा ताबूताचा सण पहातच असतां. लाखों मुसलमान त्यांत जरी खूप नाचतांबागडतांना दिसतात तरी तो सण आनंदाचा नसून त्याचें मूळ एका अत्यंत हृदयद्रावक शोककथेंत आहे. मुसलमानी धर्मसंस्थापक जे महंमद पैगंबर, त्यांच्या प्रत्यक्ष नातवांच्या झालेल्या क्रूर कत्तलीची ती वार्षिक स्मृति आहे.

पण अशी एखादी करुणरसानें थबथबलेली गोष्ट नुसती कल्पनेनेंच कोणीं रचिते तर तिनें भावना खळबळून सोडल्याच असत्या हें जरी खरें असलें तरीही तिच्यापासून शिकण्यासारख्या ज्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्यांचा परिणाम वाचकांवर व्हावा तितका सहजच झाला नसता; कारण मन म्हणतें " ऊंः ! ही नुसती कल्पकथा आहे ! असें कांहीं खरोखर थोडेंच घडलें आहे ! प्रत्यक्षाच्या व्यवहारांत अशा

भाकडकथांचा तो काय उपदेश घ्यायचा! स्वप्नांत तीन फुटांच्या खोलींत तीन हजार शिपाई शिरलेले दिसतात, बिछान्यावर असतां स्वतःला डोहांत फेंकलेलें दिसतें; पण म्हणून जागे होतांच त्या डोहांत आपण पडलों आहोंत, असेंच समजून तरण्यासाठीं कोणी पोहूं लागतो थोडाच! स्वप्नांतला धुडका सर्वस्वीं स्वप्नापुरताच! काल्पित गोष्टींचा चटका मुख्यतः मनोरंजनापुरताच!"

यासाठीं व्यवहारांत घेण्यासारखा उपदेश मनावर पक्का ठसविण्याच्या कामीं नुसत्या भावना खळबळून सोडणाऱ्या अरेबियन नाइटसारख्या काल्पित कथांचा जरी थोडाबहुत उपयोग होतो तरी त्यांच्याहून किती तरी पटीनें इतिहासांत तशा ज्या घटना खरोखरच घडलेल्या असतात त्यांची पकड भावनेवरच नव्हे, तर बुद्धीवरही अधिक पक्केपणीं बसते. कोणतेंही सत्य मनावर बिंबवावयाचें झालें तर तें मूळतःच बव्हंशीं असत्य असलेल्या काल्पित कादंबरीपेक्षां, तितकीच भावनोद्दीपक असतांही अक्षर नि अक्षर सत्य असणाऱ्या ऐतिहासिक घटनेनेंच अधिक परिणामकारकपणें बिंबविलें जाऊं शकतें.

ही ताबूतांची गोष्टही कादंबरीसारखीच अत्यंत चित्तवेधक असतांही इतिहासाइतकीच सत्य आहे.

त्यांतही गिबन, सेल प्रभृति अनेक इंग्रजी इतिहासकारांच्या नि कुराणशरीफच्या अभ्यासकांच्याकडे न जातां आपण ही ताबूतांची गोष्ट, हेतुतः जस्टिस अमीरअल्लीसारख्या निष्ठावंत पण सुविद्य मुसलमानी लेखकाच्याच तोंडून ऐकूं म्हणजे त्यायोगें ती सांगतांना बिनमुस्लीम लेखकांनीं ती जाणूनबुजून चुकलेली सांगितली अशी शंका आपणांस वा दुसऱ्यास घेण्याचें फारसें कारण उरणार नाहीं.

* * *

महंमद पैगंबरांनीं, ज्या वेळीं ते अत्यंत हीन स्थितींत होते आणि त्यांच्या गांवींहि ते पैगंबर–ईश्वरदूत–म्हणून जेव्हां बहुतेकांस माहित

नव्हते त्या वेळीं, एक होतकरू, देखणा नि प्रामाणिक मुलगा पाळला होता. त्याचें नांव अल्ली. त्यासच पुढें महंमद पैगंबर यांनीं आपल्या पुत्राच्या ठायीं मानलें, कारण पैगंबरास पुत्र नव्हता. पुढें महंमदांनीं आपली मुलगी फातिमा हीस त्या तरुण अल्लीलाच देऊन त्यास आपला जांवईहि केलें.

महंमदावर आलेल्या अनेक संकटांत अल्लीनें त्यांस सोडलें नाहीं. अरबांनीं महंमदाचें पैगंबरत्व मान्य केलें तेव्हां त्याच्या वाढत्या वैभवासह अल्लीचेंही महत्त्व वाढत गेलें. पण महंमद पैगंबर सन ६३२ त वारले, तेव्हां त्यांच्या गादीवर अल्लीचाच हक्क आहे असें त्याच्या पक्षाच्या लोकांचें मत असतांही त्या खलीफापदावर दुसऱ्याच गृहस्थाची निवड विरुद्ध पक्षानें केली.

येथूनच या दोन पक्षांत तुमुल युद्धास आरंभ झाला. अल्लीच्याविरुद्ध असलेल्या पक्षाचें पुढारीपण मोआविया नांवाच्या बलाढ्य सेनानीनें स्वीकारून अल्लीला रणांगणांत हतवीर्य केलें आणि शेवटीं मुसलमानांतील कांहीं कट्टवाल्यांनीं ह्या मुसलमानी पैगंबराच्या अत्यंत विश्वासू आणि पुत्रवत् मानलेल्या जांवयाची सन ६६१ त क्रूरपणानें हत्या केली! आणि तीही केव्हां? तर तो सत्पुरुष अल्ली, पैगंबराचा कृतकपुत्र, मुसलमानांचा खलिफा, मुख्य मशिदींत ईश्वराची प्रार्थना करीत असतांना! मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें निष्ठेनें वागणाऱ्या मनुष्याचा देव पाठीराखा असतो, त्यास विजयच मिळतो, अशा समजुती, या जगांतील विजयाच्या अर्थीं तरी, किती पोकळ आहेत हें या घटनेवरून स्पष्ट होत नाहीं काय? कुराण अल्लीच्या बाजूस होतें; पण यश, निदान भौतिक यश तरी, मारेकऱ्याच्या सुऱ्यास मिळालें! कुराणाचे प्रार्थनामंत्र त्या अल्लीच्या ओंठावर असतांच मारेकऱ्याचा सुरा त्याच्या हृदयांत घुसला. ते कुराणाचे मंत्र त्यास ह्या जगांत तरी वाचवूं शकले नाहींत!

## राजपुत्र हसन–हुसेन

अलीला, महंमद पैगंबरांच्या फातिमा नांवाच्या ज्या मुलीशीं त्याचें लग्न झालें होतें, तीपासून हसन आणि हुसेन हे दोघे पुत्र झाले. अलीला वर सांगितल्याप्रमाणें मारेकरी चालून ठार मारल्यानंतर त्याच्या प्रतिपक्षानें मोअवियांचें खलिफापद मान्य केलें. परंतु अलीच्या पक्षाच्या मतें खलिफापद हें महंमद पैगंबराच्या वंशांतच रहावें असें असल्यानें आणि अलीचे जे वरील दोन पुत्र तेच महंमद पैगंबराच्या वंशाचा उरलेला अंकुर असल्यामुळें त्या हसन–हुसेनांच्या हातींच खलिफापद ठेवण्याची अलीच्या पक्षानें पराकाष्ठा चालविली. अली ठार मारला जातांच त्यांनीं हसनला खलिफा म्हणून घोषित केलें. पण तिकडे मोअविया हा प्रबळ सैन्य घेऊन त्यांच्यावर चालून येत आहे असें कळतांच त्यांची गाळण उडाली. पैगंबराचा हसन हा नातू असला तरी तें दैवी नातें ह्या मानवी जगांत प्रबळ असलेल्या सैन्यावांचून अगदीं दुबळें ठरलें; आणि हसनला खलिफापदावरील आपला अधिकार सोडून देऊन मोअवियास एका वर्षाच्या आंत शरण रिघावें लागलें. दोन्ही पक्षांचा करार झाला तो इतकाच कीं, मोअवियानेंच खलिफा व्हावें. पण त्याच्या मृत्यूनंतर मात्र पैगंबराचा दुसरा नातू जो हुसेन त्याला खलिफा नेमावें.

अशा रीतीनें मोअविया हाच शेवटीं मुसलमानी साम्राज्याचा एकमेव नि अप्रतिरथ खलिफा झाला. यश त्याला आलें ! तो कोणी मोठा धर्मभिरु, कुराण निष्ठेनें पाळणारा, न्यायी, सदाचारी होता म्हणून कां त्याला हें अप्रतिम यश येऊन तो कुराण मानणाऱ्यांचा मुख्य राज्याध्यक्षच नव्हे तर धर्माध्यक्षही झाला ? मुळींच नाहीं ! यच्च्यावत् मुसलमानांचा अगदीं निर्विवादपणें झालेला आणि अत्यंत प्रबळ ठरलेला असा जो पहिला खलिफा, तो हा मोअविया कसा होता याविषयीं अमीर अलीच म्हणतात:—

“ज्याचें मित्रत्व राखतां येणें कठिण जाई किंवा ज्याचें शत्रुत्व

डोईजड होई त्याचा त्याचा विषानें वा खंजीरानें त्या मोअवियानें घात केला आणि करविला. हत्या हे त्याच्या अंगवळणीं पडलेलें एक प्रबळ हत्यार होतें. त्याच्या सत्तेला अडथळा करूं लागेल अशी वाटेल ती कुराणांतील देवा वा व्यवहारांतील मानवा आज्ञा वा आचार झुगारून देण्यास तो कमी करीत नसे. पण सोइस्कर असल्यास कुराणांतील आचार बाह्यशः पाळण्याचें सोंगही असें वठवून देई कीं यव ! हा केवढा दैवदुर्विलास होय कीं, ज्यांनीं प्रत्यक्ष महंमद पैगंबराचा छळ केला तेच त्याच्या वंशजांच्या पैतृक संपत्तीचे नि राज्याचे वारस ठरावे ! आणि ज्यांनीं मूर्तिपूजकांचा पक्ष घेतला तेच महंमदाच्या मूर्तिभंजक मुसलमानी धर्माचे खलिफा—धर्माध्यक्ष—व्हावे !" (हिस्टरी ऑफ दि सारासेन्स पृ. ७१ नी ८२).

पण ऐहिक दृष्टीनें पाहतां मोअवियाला हें यश कसें आलें तें अगदीं सूर्यप्रकाशाइतकें स्पष्टपणें दिसूं शकतं ! तो अत्यंत धाडशी, राजनीति-पारगत, शूर, कारस्थानी पुरुष होता. ऐहिक राज्यें जिंकण्यास जे गुण अवश्य ते त्यांत होते. त्याचें सैन्य झुझार असून, शस्त्रास्त्रें उत्कृष्ठ असत, म्हणून ऐहिक राज्य जिंकण्याच्या कामीं यश आलें. आणि पैगंबराचा दैवी वंश तिकडे धुळीस मिळत असतां मोअवियानें स्थापिलेलें दमास्कसचें मुसलमानी साम्राज्य नि धर्माध्यक्षत्वाचें तें खलिफापद त्याच्या साध्या मानवी वशांत शंभर वर्षे अव्याहतपणें नांदत राहिलें ! !

हसनच्या हातून खलिफापद नि साम्राज्य हिसकावून घेऊनच मोअविया स्वस्थ बसला नाहीं थोड्याच अवधींत त्याचा मुलगा येझिड याच्या कारवाईनें हसनला विष पाजून ठार मारण्यांत आले ! पैगंबराचा—देवदूताचा—तो प्रत्यक्ष नातू पण त्यालाहि वांचविण्यासाठीं महंमद पैगंबर देवापाशीं मध्यस्थी करू शकले नाहात—देवानें माग अलीला कढवाल्यांच्या खंजिरास मारूं दिलें तसेंच आतां त्या मुग्ध हसनलाही विषाच्या पेल्यास पिण्याआधीं एकवार देखील सावध न करतां दुष्टांच्या घातास बळी पडूं दिलें !

राहतां राहिला महंमदाचा दुसरा नातू हुसेन. खलिफा मोअवियानें पूर्वी करार केला होता कीं, त्याच्या मागें खलिफापदावर नि साम्राज्यपदावर हुसेनला स्थापिलें जाईल! पण त्याचा वडील भाऊ जो हसन त्याला विषप्रयोगानें ठार केल्याबरोबर हा करारही मोडून खलिफा मोअवियानें आपल्यामागें आपला पुत्र येझिड ह्यासच खलिफापद मिळावें म्हणून निश्चिलें आणि मुसलमानी साम्राज्यांतील मशीदीमशीदींतून येझिडलाच खलिफा करण्याची ग्वाही दिली गेली. सैन्यानें नि राजधानीनें तीच शपथ घेतली. पराक्रमी मोअविया सन ६८० मध्यें वारतांच त्याचा हा सवाई पराक्रमी पुत्र येझिड, राजधानी दमास्कसमध्यें, आपल्या पित्याच्या विस्तीर्ण साम्राज्याचा धनी नि मुसलमानी धर्माचा धर्माध्यक्ष झाला!

## खलिफा येझिड

ह्याच येझिडनें महंमद पैगंबराच्या एका नातवास, हसन यास, विषप्रयोग करवून मारलें हें वर दिलेंच आहे. महंमद पैगंबराचा दुसरा नातू हुसेन, त्याला खलिफा नेमण्याचा झालेला करार लाथाडून आतां तोच येझिड खलिफा झाल्यामुळें हुसेनच्या जातीचे नि पक्षाचे लोक अर्थातच फार चिडले. त्यांच्यापैकीं इराकच्या लोकांनीं तर हुसेनला बंड करून उठण्यास खूपच भर दिली, "आपण आमच्या प्रांतांत पाऊल टाकतांच सारी जनता एका माणसासारखी बंड करून उठेल! आपल्या येण्याचा काय तो अवकाश!" असे उत्क्षोभक निरोप हुसेनला येत राहिले! त्यासरशीं त्या निरोपावर विश्वसून आपल्या खलिफापदाचा येझिडनें छिनावून घेतलेला हक्क रणांगणावरच परत मिळवीन अशा निश्चयानें हा पैगंबराचा धर्मशील नातू हुसेन इराककडे उघडपणें चालून गेला. त्याच्याबरोबर त्याचे नातलग, दोन मोठे मुलगे, कांहीं निष्ठावंत अनुयायी, बायकामुलें, इतकी मूठभर सेना काय ती होती!

## हाय हसन! हाय हुसेन!

येझिडला तर हेंच पाहिजे होतें! तो जितका पराक्रमी तितकाच लुच्च्या!

त्यानें साऱ्या मुसलमानी साम्राज्यांत असा दरारा बसविला होता कीं, त्याच्या वर्तनांत तो कुराणाच्या आज्ञांचा उपमर्द जमेल तेव्हां करीत असतांही तोच खलिफा धर्मनिष्ठांचा धर्मगुरु !—म्हणून सारा मुसलमान त्याच्यापुढें चुपचाप गुडघा टेकीत होता. लाखो मुसलमानांची सहानुभूति प्रत्यक्ष महंमद पैगंबराच्या त्या संत्रस्त असतांही सत्यपारायण रहाणाऱ्या नातवाकडे—हुसेनकडे—होती. पण खलिफा येझिडच्या विरुद्ध ब्र काढण्याची कोणाची छाती होईना ! अशा स्थितींत हुसेन बंड करून उठतो आहे हें पाहून खलिफा येझिड उलट संतापला ! गुप्त हस्तकांकरवीं उत्क्षोभक बातम्या त्यानें होऊनच हुसेनला चहूंकडून धाडविल्या कीं. 'या ! आम्ही येझिडाविरुद्ध तुम्हांस तत्काळ मिळतों !!' त्या निरोपास सत्य मानून तो सत्यपरायण हुसेन त्या मूठभर बाजारबुणग्यांसारख्या टोळीनिशीं जों जों पुढें चालला तों तों त्याला कोणी अडविण्यास येईच ना ! त्यालाही हें आश्चर्यच वाटलें ! निष्ठावंत भाविक मुसलमान म्हणूं लागले "अल्ला सत्याचा अभिमानी ! प्रत्यक्ष पैगंबराच्या नातवाविरुद्ध असणाऱ्या शत्रूंचे डोळे अल्लानें आंधळे केले, बुद्धि भ्रंशिली ! नाहींतर खलिफा येझिड असा नांगी टाकून बसणारा प्राणी नव्हे !! देवाचा अद्‌भुत चमत्कार आहे हा !"

तो अद्‌भुत चमत्कार होता खराच ! पण तो देवाच्या दयेचा नसून येझिडच्या राजनीतीचा ! कारण हुसेनला असें खोट्या आशेच्या मागें लाववीत लाववीत त्यानें अशा ठिकाणीं आणून सोडलें कीं, जिथें निराशेच्या जाळ्यांत तो पैगंबराचा नातू अचानक नि पुरतेपणीं सांपडावा.

इराकच्या प्रांतानें त्यास बोलावलें होतें. तिथपर्यंत जायचेंच काय तें कठिण काम. तिथें जातांच तो प्रांतचा प्रांत 'अल्ला हो अकबर' करून हुसेनसाठीं उठणार. ह्या अपेक्षेंतील कठिण काम तेंच पार पडलें. हुसेन इराकमध्यें प्रवेशतों त्याला कोणीही अडविलें नाहीं. पण इराकमध्यें बंडाचा झेंडा घेऊन त्यानें पाय ठेवतांच जें सोपें वाटलें तेंच काम कठिण

ठरलें—हुसेन कान देऊन ऐकत राहिले पण इराकमध्यें निजेल्यांची झोंप मोडण्याइतकी देखील गडबड कुठें ऐकूं येईना, 'हुसेन की जय' गर्जेत एकही तरवार म्यानांतून खणखणेना !

तोंच तरवारी खणखणल्या; तीरही सोंसों सुटत चालले ! पण हाय हाय ! ते हुसेनला सहाय्य देण्याचें वचन दिलेल्या मुसलमानांचे नसून त्या लबाड खलिफा येझिडनें हुसेनला अचानक गांठून कापून काढण्यासाठीं धाडलेल्या मुसलमानी सैन्याचे होते !

'विश्वासघात !' हुसेनच्या टोळींत एकच हाहाःकार उडाला. निरुपायानें एका गांवच्या आश्रयास आपले तंबू ठोकून त्यांतल्यात्यांत रचतां येईल तितका व्यूह रचून हुसेननें ठाण मांडलें. शत्रूनें वेढ्याची तात त्या ठाण्याच्या गळ्याभोंवतीं घातली !

## करबलाची लढाई नव्हे, कत्तल !

त्या जागेचें नांव करबला होतें. खलिफा येझिडनें हुसेनला त्या पिंजऱ्यांत कोंडण्यासाठीं जो सेनानी धाडला होता, त्यानें हुसेनच्या टोळीवर चढून न जातां त्याचा छळ करावयाचाच तेवढा विडा उचलला होता. हुसेनची ती मूठभर टोळी—ती जरी तरवार उपसून उभी होती तरी तिलाही शत्रूवर चालून जाणें अशक्य होतें. लढाईचा प्रश्नच नव्हता तो ! शत्रूनें हुसेनचें पाणी तोडलें, दुरून दुरून तीरांचा वर्षाव चालविला. दिवसामागून दिवस हुसेनचे लोक पाण्यावांचून तळमळूं लागले. शत्रूशीं हुसेननें बोलणें केलें, 'मला सुखरूप परतूं द्या—मी लढणार नाहीं !' पण त्याच्या लढाईला भीत होता कोण ! महंमद पैगंबराचा तो नातू, हजारों मुसलमान पैगंबराच्या ज्या वंशास दैवी अंश मानीत त्या वंशाचा तो राजपुत्र !--पाण्यावांचून तडफडूं लागला, 'मी शरण येतों—पण मला खलिफा येझिडकडे न्याल तें बंदिवान म्हणून नेऊं नका, तर माननीय वीरपुरुष म्हणून न्या !' पण त्यास बंदिवानच नव्हे तर नीच, पापी म्हणून, अपराधी म्हणून आणा; आणलाच तर !

उत्तम मार्ग म्हणजे जिवंत आणूंच नका!—हीच तर त्याच्या शत्रूची—खलिफा येझिडची आज्ञा होती! शेवटीं तो न्यायपरायण हुसेन म्हणाला, "माझाच जीव तुम्हास हवा आहे ना? मग हा मी पुढें येतों, मला मारा नि वाद संपवा. पण निरपराध लेकरांना नि स्त्रियांना तरी तहानेनें तडफडत मारूं नका. त्यांना सुरक्षितपणें वेढ्याबाहेर काढून द्या!" पण हीहि विनंति खलिफाच्या सेनानीनें अमानली! आतां मृत्यूवांचून गत्यंतर नाहींसें पाहून हुसेननें आपल्या अनुयायांस सांगितलें, "तुम्ही व्यर्थ मरूं नका, ज्यास जाणें त्यानें मला सोडून जावें हेंच उचित; त्यांतच मला समाधान वाटेल!" पण कोणी गेला नाहीं, उलट आपल्या मुसलमानी धर्मसंस्थापकाच्या प्रत्यक्ष नातवावर तलवार चालविण्यास कचरून, झुंजणें तर त्याच्या वतीनेंच झुंजू अशा निश्चयानें येझिडच्याच सैन्यांतील कांहीं धर्मशील मुसलमान सैनिक हुसेनच्या छावणींत निघून आले.

तीरामागून तीर एकसारखा येझिडच्या सैन्यांतून सुटत चालला. हुसेनच्या मूठभर लोकांतील वीरामागून वीर वेंचक वेंचक पडत चालला. शेवटीं तो पैगंबराचा नातूही घायाळ झाला. त्यानें पाणी मागितलें. मोठ्या प्रयासानें पाण्याच्या प्रवाहाशीं त्यास नेण्यांत आलें. तोंच शत्रूंच्या तीरांची झोड उडाली. तहान तहान करीत हुसेन पुन्हा तंबूच्या दाराशीं आला. स्त्रिया ओक्साबोक्शीं रडूं लागल्या. हुसेनचे लटते पुत्र मरून पडले होते. एक अर्भक उरलेलें, त्यांचें शवटचें चुंबन घेण्यास हुसेननें तें लेकरूं उचललें—शत्रूनें तोंच त्यास एका तीक्ष्ण बाणानें खिळून टाकलें! त्यासरशीं 'अल्ला' असें ओरडून तो राजपुत्र हुसेन तंबूपुढें मटकन बसला. पाणी! पाणी!! एका सतीनें प्रयत्नांची शर्थ करून एक पेला पाणी मिळविलें.

पाणी! पाणी! त्या घायाळ राजपुत्राच्या हातांत तो पाण्याचा पेला येतांच त्यानें तो पिण्यास आवडीनें उचलला. घोट घेण्यास कोरड पडलेलें तोंड पटकन उघडून आ केला; तोंच पाण्याच्या घोटाआधींच शत्रूचा नेमका बाण त्याच्या तोंडांत सूं सूं करीत शिरला. एक कर्कश

किंकाळी फोडून तो वीरपुत्र तलवार उचलून उठतो तों चोंहोंकडून हाणा, मारा करीत शत्रू धांवला नी हुसेन तरवारींच्या घावांनीं छिन्नविछिन्न होऊन ठार झाला !

मुसलमानी धर्मसंस्थापकाच्या नातवाचें, त्या मुसलमानांच्या दैवी खलिफाचे देहावर त्या मानवी खलिफा येझिडचे ते क्रूर मुसलमान थै थै नाचले, त्याच्या प्रेतास त्यांनीं हाणलें, ठोकरलें, त्याचें शिर भाल्यास टोंचून मिरवीत निघाले ! ! पण देवानें त्या "दैवी" पण दुबळ्या खलिफाच्या सहाय्यार्थ हूं का चूं केलें नाहीं ! ( अमीरअल्ली, पृ. ८६ ) मानवी पण प्रबळ अशा खलिफा येझिडपुढें देवसुद्धां असंतोषाचा एक ब्रही काढूं धजला नाहीं !

येझिडचा तो सेनानी ओबाअिदुल्ला त्या राजपुत्र हुसेनची ती दुर्दशा पहात राहिला. त्याच्या त्या क्रूर सैनिकांनीं हुसेनचें शिर आणून त्याच्यापुढें जेव्हां टाकलें तेव्हां तो अगदींच पिसाळला. हुसेन विषयींचा त्याचा राग अनावर होऊन त्यानें हातांतल्या छडीनें मृत राजपुत्राच्या कापून आणलेल्या रक्ताळ मस्तकाच्या तोंडावर नी ओंठावर सपासप मारलें !

येझिडच्या त्या क्रूर सैनिकांत देखील तें बीभत्स दृश्य पाहून हळहळणारा एक तरी प्राणी होता हीच गोष्ट विशेष. तो एक वृद्ध मुसलमान पुटपुटला, "हाय हाय ! दैवी पैगंबराच्या ह्याच लाडक्या नातवाच्या ह्याच ओठांचें, त्या पैगंबराचे ओंठ चुंबन घेतांना मीं स्वतः पाहिलें होतें ! !"

हुसेनच्या स्त्रियांना, फाटकींतुटकीं लक्तरें ज्या नेसलेल्या, मळलेल्या, तळमळलेल्या त्या मुसलमानी पैगंबरांच्या मुली–लेकी–सुनांना, मुसलमान सैनिकांच्या पहाऱ्यांत येझिड खलिफाकडे धाडण्यासाठीं दमास्कसला पाठविलेल्या टोळीच्या पुढें भाल्यावर टोंचलेलें हुसेनचें मस्तक मिरवत चालविलेलें होतें ! करबलाच्या अत्यंत क्रूर कत्तलीचा तो विजयध्वज होता ! !

खलिफा येझिडच्या भव्य राजवाड्याच्या तट्टाखालीं भिंतीला टेकून महंमद पैगंबराच्या त्या मुली–लेकी–सुना लक्तरें नेसलेल्या, मळलेल्या, हुसेनचें तें कापून आणलेलें मस्तक ज्यांच्यापुढें पडलें आहे अशा त्या राजस्त्रिया ओक्साबोक्शीं रडत बसल्या ! आपले केस तोडतोडून मोठमोठ्यानें त्यांनीं एवढा आक्रोश मांडला कीं, सारी राजधानी रडूं लागली, चिडूं लागली. येझिड देखील थोडा गडबडून गेला, त्यानें त्यांची झाली ती निर्भत्सनाच बस झाली असें समजून त्यांना परत मक्केमदीनेकडे आपापल्या गांवीं जाऊं दिलें.

अशी करबलाची कत्तल झाली ! मुसलमानी पैगंबराचे प्रत्यक्ष नातू जे हसन–हुसेन त्या राजपुत्रांचा असा अत्यंत शोचनीय शेवट झाला ! महंमदाच्या वंशाची करबलाला अशी दुर्दशा झाली, असा नायनाट झाला ! तीच करुणकथा आठवून आठवून करबलाच्या त्या कत्तलीच्या दिवशीं प्रतिवर्षी कोट्यवधि मुसलमान ताबुतांच्या स्मृतिदिनीं ‘ शोक ! हाय, शोक ! ’ असें वारंवार आक्रंदत धायधाय रडूं लागतात. करबलाची हीच करुणकथा ताबूताची गोष्ट होय ! हसन–हुसेनच्या या हृदयद्रावक शेवटाचा तो शोकदिन असतो, तें दुःखस्मारक असतें !

हुसेनच्या ह्या दुर्दशेची बातमी पोंचतांच मुलमानांची जीं प्रमुखतम धर्मक्षेत्रें नी पैगंबर महंमद स्वतः जींत रहात, त्या मदीना नगरींत लोक अत्यंत खवळून गेले. त्यांनीं येझिडचें खलिफापद रद्द केलें व त्याचा अधिकारी पिटून घालविला. ही बातमी पोंचतांच तो पराक्रमी येझिड डवचलेल्या सिंहासारखा चवताळला आणि सिंहाहूनही हिंस्र अवतार धरून ससैन्य मदीनेवर येऊन कोसळला ! त्याच्या क्रोधानें तो सारा अरब देश थरथर कापूं लागला. येझिड, मुसलमानी साम्राज्याचा मुख्य धनी, मुसलमानी धर्माचा धर्माध्यक्ष खलिफा ! पण त्या मुसलमानी खलिफानेंच मुसलमानी धर्मक्षेत्रांची राखरांगोळी उडविली ! महंमद पैगंबराचे निवडक अनुयायी लहानमोठे वेंचून वेंचून कत्तल करण्यांत आले. जे उरले त्यांना दास बनविण्यांत आलें. त्यांच्या मानेवर डाग

देऊन ठेवले. अल्लीच्या खिलापतीपासून जीं रुग्णालयें, सार्वजनिक कार्यालयें, उठविलेलीं होतीं तीं सारीं धुळीस मिळविली; फार काय—त्या मुसलमानी पुण्यक्षेत्रांतील ती पैगंबराची पुण्यतम मशीद, तिची खलिफा येझिडनें घोडशाळा बनविली, नी पवित्र स्थलांची अनन्वित विटंबना केली ! (हिस्टरी ऑफ सारासेन्स पृष्ठ ८८) मदीनेला धुळीस मिळवून येझिड मक्केवर चालून गेला आणि तेथील पवित्र 'काबा' आणि इतर पुण्यस्थळें यांचीहि यथेच्छ नासधूस करण्यांत आली !

येझिड हाच शेवटीं अप्रतिरथ खलिफा ठरला. ऐहिक राज्य, यश, दरारा, विजयश्री हीं सारीं त्याच्या पायाशीं कुर्निसात करीत होतीं !

हा एवढा विजय त्या येझिडला मिळाला आणि हसन–हुसेनादिक पैगंबराच्या पुत्रपौत्रांचीही धुळधाण झाली. कां बरें ? येझिड हा त्या हसन–हुसेनहून कुराणाच्या आज्ञा अधिक एकनिष्ठपणें पाळीत होता, कुराणीय सदाचारांत अधिक निष्ठावंत वा मानवीदृष्टया अधिक न्यायी होता म्हणून का हसन–हुसेन नाश पावले नी येझिड विजयी झाला ? नव्हे, नव्हे ! त्या खलिफा येझिडच्या धर्मनिष्ठेविषयीं मुसलमानी ग्रंथकारहो काय म्हणतात तें स्वतः जस्टिस अमीरअल्लीच थोडक्यांत असें समारे ।मतात:—

"खलिफा येझिड क्रूर नी विश्वासघातक होता—मुसलमानी धर्मांत अत्यंत पातक जें गणलें तें मद्यपान, पवित्र मशिदींची विटंबना, हत्या, विषप्रयोग, हलकट व्यसनें इत्यादि धर्मबाह्य दुराचारांनीं ग्रस्त असा हा खलिफा येझिड मुसलमानी धर्मपुरोहितांची चेष्टा करण्यासाठीं एका माकडास मुल्ला मौलवीचें सोंग देववून एका सजविलेल्या गाढवावर बसवी नी त्यास आपण जाई तेथें मागेंमागें मिरवीत चालवी ! !

※ ※ ※

महंमद पैगंबरानें आपला मूर्तिभंजक धर्म स्थापिल्यानंतर, पूर्वी मूर्तिपूजक धर्मास पाळीत असलेल्या मक्केवर हल्ला केला, तें नगर जिंकलें नी स्वतः तेथील जुन्या मूर्ती धडाधड फोडून तोडून टाकल्या. जयोन्मादांत मुसलमान ओरडले, " हे पहा तुमचे लांकडी दगडी देव ! महंमदाच्या हातोड्याखालीं चूर्ण झाले ! किती दुबळे हे देव!! " ( हिस्टरी ऑफ सारासेन्स पृ. १६ ) महंमदाचे हें तर्कशास्त्र खरें होतें.

महंमद पैगंबरानें मूर्तिपूजकांच्या देवास दुबळें म्हटलें आणि मूर्तिभंजक देवाच्या मशिदी बांधल्या, पण खलिफा येझिडनें त्या माशिदी उध्वस्त करून त्यांच्या घोडशाळा केल्या, ती मक्कामदीना धुळीस मिळविली, त्या मूर्तिभंजक पैगंबराच्या वंशाचा क्रूरपणें नायनाट केला !—मग आतां त्याच तर्कशास्त्रानें हेंही सिद्ध होत नाहीं का कीं, मूर्तिभंजकाचा देवही तितकाच दुबळा आहे ? हतोडा धडधाकट असला कीं तो मूर्तिपूजकाच्या देवळासारखाच मूर्तिभंजकाच्या मशिदीही चूर्ण करतो, त्यांचे वंशही निर्वंश करतो ? खरा देव महंमदाचा हातही धरीत नाहीं— येझिडचाही नाहीं ! ऐहिक राज्यें ऐहिक सत्ता, ज्यांच्या हातीं तीं तीं ऐहिक साधनें प्रबळ त्यांच्याच हातीं पडणार. मग तें पुराणांत विश्वसोत वा कुराणांत ! आध्यात्मिक मोक्षाचा प्रश्न ह्या लेखाचा विषयच नाहीं.

यज्ञपूर्वक इंद्राचे अनुयायीच विजयी होतात हीं पुराणवचनें जशीं अनुभवानें अतथ्य ठरलीं तशींच यज्ञध्वंसक मूर्तिभंजक अल्लाचे अनुयायीच 'फत्ते' पावतात हीं कुराणवचनेंही अतथ्यच ठरलीं आहेत. ज्यू लोकांनाच जगाचें राज्य देईन म्हणून 'जेहोवानें' बायबलांत वचनें दिलीं. पण आज जगांत जर कोणाचें टीचभरही राज्य नसेल तर तें " ज्यू "चेंच !

जर वेद, कुराण, बायबल, तौलिद, इंजिल प्रभृति धर्मग्रंथ, त्यांचे त्यांचे अनुयायी मानतात तसे, ईश्वरप्रदत्त, ईश्वरकृतच असते तर ईश्वरानें त्यांचीं वचनें अशीं खोटीं पडूं दिलीं नसतीं ! त्याच्याच पैगंबराच्या नी

ऋषींच्या वंशाची अशी धुळधाण उडूं दिली नसती. कधीं पुराणाचे आचार पाळणाऱ्यांचाही सत्यानाश; कधीं कुराणांचें आचार पाळणाऱ्यांचाही सत्यानाश; कधीं बायबलवाल्यांचीही दुर्दशा ! किंबहुना या धर्मग्रंथांत 'गाय पूज' नि त्या धर्मग्रंथांत 'गाय पुजूं नकोस, खा !' अशा धडधडीत उलटसुलट फसवेगिरीच्या आज्ञा देऊन मनुष्यांत नसता कलह चेतविण्याचें दुष्ट काम—निदान देवासारख्यानें तरी करावयास नको होतें !

पण देवानें तें केलें हें म्हणण्यांतच खरी चूक आहे. हे सारे वेद, बायबल, कुराण प्रभृति धर्मग्रंथ मनुष्यकृत आहेत. त्यांतील अनेक वचनें जीं आज खोटीं पडलीं आहेत तीं टाकून, जें ज्ञान आज लटकें ठरतें तें खोडून, आजही जें उपयोगी वा सत्य वाटलें तेवढें मानावें हेंच उचित. कोणत्याही मानवी ग्रंथाप्रमाणेंच तेही आहेत एवढें मानतांच तो ग्रंथ मनुष्यजातीचीच ऐतिहासिक नी सामाईक संपत्ति होते. देवाचे नांवें डोकीं फोडणें बंद पडतें. आपण सर्वांनींच बाबीलोनच्या इष्टिका ग्रंथाप्रमाणें, त्यांस सादर संरक्षावें, साभार आदरावें, सावधान अभ्यासावें; पण देव न्यायाचा वाली आहे, सत्य पक्ष विजयी होतोच, पुराण वा कुराणवाल्यांचा जय हा ठेवलेलाच प्रभृति मिथ्या आशांवर न विसंबतां राज्य संपादिणें वा जोडे शिवणें—तर त्या त्या ऐहिक साध्यांस ज्या ऐहिक साधनांची आवश्यकता प्रत्यक्षपणें भासते तीं साधनें संपादावीं.

ऐहिक जगापुरता खरा धर्म म्हणजे ऐहिक विज्ञान, (एक्सपेरिमेंटल सायन्स) हेंच होय.

—१९३४

★

## " तोतया " राजा झाला ! : ११ :

☆ चितेवरून उठलेलें प्रेत !

☆ नागा गोसाव्यास गादी !

★ बारा वर्षें आपलीच ओळख विसरलेला राजकुंवर !

☆ आपल्या पतीसच तोतया पति ठरविणारी राणी !

☆ मरून बारा वर्षें झालेल्या भावास भेटणारी बहीण !

वरील मथळ्यांपैकीं कोणताहि एक मथळा जरी एकाद्या कथेस देतां आला, तरी ती कथा मनास चटका लावून सोडती; मग हे सगळे मथळे ज्या कथेस लावतां येतात असें कथानक कल्पित असलें तरीहि किती रम्याद्भुत (रोमँटिक) असलें पाहिजे !

मग वरील सर्व चमत्कारिक घटनांनीं परिपूर्ण असें कथानक जर कल्पित नसतां खरोखरच घडलेलें असेल तर तो योगायोग एक अलौकिक

आश्चर्यच नव्हे काय? ब्रह्मदेवच कादंबऱ्या लिहूं लागला तर इतिहासदेखील कादंबरीहूनहि रम्याद्‌भुत झालाच पाहिजे! केव्हां केव्हां घटनाच (फॅक्ट) कल्पिताहूनहि आश्चर्यकारक असते खरी!

बंगालमध्यें अलीकडेच जो 'भोवाल संन्यासी' नांवाचा खटला निकालांत निघाला आणि न्यायालयांत पुराव्याची सूक्ष्मातिसूक्ष्म छाननी होऊन त्याच्या स्वतःच्या पत्नीनेंहि 'तोतया' म्हणून नाकारलेल्या एका राजकुवरास खरा राजपुत्र म्हणून जें ठरविण्यांत आलें, ती घटनाहि असेंच एक, कल्पित कथांनासुद्धां मागें सारणारें, आश्चर्य आहे!

## तोतये!

कोणत्याहि तोतयाची कथा बहुधा मुळांतच थोडीबहुत आश्चर्यकारक असणारच! मग तो तोतया लबाड असो, किंवा त्याला तोतया ठरवूं पाहाणारे लबाड असोत. हें खरें कीं खोटें, याविषयीं तुमुल कुतूहल वाटूं लागलें, कीं त्या प्रश्नाचा मनास चटका लागल्यावांचून रहात नाहीं. तोतयाचा प्रश्न मुळांतच 'हें खरें कीं खोटें' असें कोडें घालणारा असत्यामुळें तोतयांच्या कथा लोकांना हटकून आश्चर्यकारक वाटतात. तें कोडें उलगडेतों सहस्रावधि लोकांच्या मनास सारखा चटका लावून सोडतात. कित्येकदां तोतयांनीं लक्षावधि लोकांना चकविलें आहे. कित्येकदां लक्षावधि लोकांनीं खऱ्यालाच तोतया ठरविलें आहे!

## मेलेल्यांचे तोतये!

उदाहरणार्थ, पानपतच्या संग्रामाची गोष्ट घ्या. सुप्रसिद्ध भाऊसाहेबांच्या तोतयाचा झालेला बोलबाला, सहस्रावधि मराठ्यांना तो खराच भाऊसाहेब म्हणून पडलेला भ्रम, पुण्यावर चालून येण्याची धमक यावी इतका त्याच्या हाताखालीं त्याला खराच भाऊसाहेब समजून जमलेला दळभार, फार काय, प्रत्यक्ष पार्वतीबाईंना हा आपला खराच पति असावा असा झालेला संदेह, या गोष्टी प्रसिद्धच आहेत! चकला नाहीं

असा 'भला बुद्धिचा सागर' नाना फडणवीसच काय तो होता! म्हणून शेवटीं सर्व राष्ट्रास निर्विवाद वाटावा अशा पुराव्यानें तो भाऊसाहेब नसून तोतयाच आहे असें उमगलें आणि त्याचें डोकें मेखसूनें फोडून त्या तोतयास देहान्त शासन देण्यांत आलें.

त्याच पानिपतच्या संग्रामांत पडलेले जे दोन वीर जनकोजी शिंदे नी यशवंतराव पवार ह्यांचेहि तोतये त्या धामधुमीत निर्माण झाले होते आणि त्यांनीं ग्वाल्हेरच्या नी धारच्या संस्थानांवर अधिकार सांगून बरीच गडबड माजविली. त्यांचेंहि कपट शेवटीं असेंच उघडकीस आलें तरी कांहीं काळ अनेक लोकांना त्यांनींहि भुरळ पाडलींच होती!

## इंग्लंडमधील एक उदाहरण

आपल्याइकडेच अशा मोठमोठ्या ऐतिहासिक व्यक्तींचे नामधारी तोतये उत्पन्न होऊन सहस्त्रावधि लोक फसत गेले असें नसून, तोतयाच्या मायाजालांत यूरोपमधील जनताहि वारंवार अशीच कशी फसते, सामान्य जनांची चमत्कारलोलुपतेची सहज प्रवृत्ति 'तोतया' उठतांच युरोपमध्येंहि कशी उत्तेजित होऊन उठते, याचेंहि एक उदाहरण म्हणून सर रॉजर 'ढिचबोर्न' या मनुष्याचें प्रकरण सांगतां येईल. आपण सर रॉजर ढिचबोर्न हेच असून कित्येक वर्षांपूर्वी नाहींसे झाल्यामुळें बिनवारसी समजली जाणारी आपली मत्ता आपल्यास मिळावी असा एकजणानें दावा आणला. त्यावर प्रतिवादीचें म्हणणें पडलें कीं, हा मनुष्य खरा बेपत्ता झालेला सर रॉजर ढिचबोर्न नसून क्वीन्सलंडमधील 'वाग्गावाग्वा' नांवाच्या गांवांतील एक खाटीक आहे! सर रॉजर सडपातळ होते तर हा लठ्ठ, ते फ्रेंच भाषापंडित तर ह्याला फ्रेंचचें अक्षर बोलतां येईना, ते सुशिक्षित नी सभ्य तर हा निरक्षर नी अडाणी. सर रॉजरच्या कुटुंबांतील बहुतेक मंडळींनींहि तो तोतयाच आहे असें स्पष्ट सांगितलें. पण तरीदेखील तोच सर रॉजर आहे असें प्रामाणिकपणें वाटणाऱ्या जवळजवळ शंभर भिन्न भिन्न वर्गांच्या प्रमुख गृहस्थांनीं तोच

खरा सर रॉजर असें न्यायालयांत शपथेवर सांगितलें ! फार काय, सर रॉजरची प्रत्यक्ष मातासुद्धां चकली. तिच्या पोटच्या मुलाची मुख्य खूण जी कानाची विशेष ठेवण ती त्या मनुष्याचे कान बघतांच तिला तंतोतंत पटली आणि प्रथमदर्शनींच तो आपला पुत्र म्हणून त्या आईनें जो ध्यास घेतला तो शेवटपर्यंत सोडला नाहीं ! आईनेंच मुलास ओळखलें ह्या एका बातमीचा सामान्य जनतेवर इतका पगडा बसला कीं सहस्त्रावधि इंग्रज लोकांनीं त्या मनुष्यासच खरा खरा सर रॉजर म्हणून उचलून धरलें ! सामान्य जनतेची समज कांहीं कांहीं प्रसंगीं एक स्पर्शजन्य सांथ कशी असते आणि पांचामुखीं परमेश्वर ही म्हणसुद्धां भाबडेपणाचेंच एक सूक्त कसें ठरतें, तें इंग्लंडसारख्या प्रगत देशांतील लोकहि अशा हुलडीला जेव्हां बळी पडतात तेव्हां सहजीं दिसून येतें. शेवटीं, जेव्हां सर जॉन कोलेरिजनें त्या मनुष्याच्या इत्थंभूत वृत्ताचा छडा लावून तें कपट चव्हाट्यावर मांडलें आणि त्या आईला एककल्ली वेडगळपणाची बाधा असल्याचें डॉक्टरांनीं सिद्धिलें, तेव्हांच काय तो अतोनात द्रव्याची राखरांगोळी करून शंभर दिवस अव्याहत चाललेल्या त्या खटल्याचा निकाल लागला आणि पंचांच्या एकमतानुरूप न्यायाधिशानें तो धाडसी मनुष्य सर रॉजर नसून एक लुच्चा तोतयाच काय तो आहे, असा निर्णय दिला !

## मेलेल्यांचेच नव्हत तर मुळीं जन्मलेच नाहींत त्यांचेसुद्धां निघालेले तोतये !

जन्मून हरवलेल्या किंवा मेलेल्या माणसांचे तोतये जसे इतिहासांत प्रसिद्ध आहेत तसेच कित्येक वेळां न जन्मलेल्या व्यक्तींचेहि तोतये निघाल्याचें इतिहास सांगतो ! त्याचेंहि एक उदाहरण घेऊं. कोल्हापूरचे राजे संभाजी १७६० त निपुत्रिक वारले. त्या वेळीं त्यांची धाकटी बायको कुसाबाई गरोदर होती. पेशव्यांचें फार दिवसांचें धोरण म्हणजे मराठ्यांच्या साम्राज्यांतून पूर्वी फुटून निघालेल्या कोल्हापूरच्या राज्यास

सातारच्या राज्यास पुन्हा जोडून टाकावें नी सारी महाराष्ट्रीय शक्ति एक केंद्री नी एकमुखी करावी, त्यास अनुसरून माधवराव पेशव्यांनीं कोल्हापुरास औरस धनी उरला नाहीं असें पाहून पूर्वीच्या अंतःकलहामुळें दोन झालेलीं, पण वस्तुतः एकच राज्य असलेलीं, सातारा—कोल्हापूरचीं संस्थानें एकवटून मराठ्यांचें एकछत्र करावें असा घाट घातला. पण संभाजीच्या विधवा बायकांचा हट्ट कीं, कोल्हापूर निराळें ठेवावें. ह्यासाठीं त्यांनीं पत्र टाकलें. राज्य निपुत्रिक हा प्रश्नच मिटला. कारण 'कुसाबाई वैशाख वद्य ७ इंदुवासरीं प्रसूत झाली: राजकुवर ज़न्मास आले. तुम्हां—कारणें साखर घाडली आहे स्वीकारणें.' पण ह्या बातमीच्या खरेपणाचा पेशव्यांस संशय आला. तेव्हां रागावून आणखी एका पत्रांत संभाजीच्या बायकांनीं फटकारून लिहिलें कीं, 'आमचे वंशीं अशा क्लिष्ट कल्पना यामागें झाल्या नाहींत; पुढें होणें नाहींत. तुम्ही येऊन परीक्षा पाहून सांगाणाराशीं सांगावें. त्यांचें मुखें 'होय' म्हटल्यानें हा राजा होतो नाहींतर ब्रह्मदेवाचें लिहिणें लटकें पडतें असें नाहीं!'

परंतु माधवराव पेशवे कांहीं फसविल्यानें फसणारे थोडेच होते! शोध लावून खरा प्रकार त्यांनीं इतक्या पुराव्यासह उघडकीस आणला कीं, संभाजीच्या पत्नीनें शेवटीं आपल्या मुखें मान्य केलें, 'कुसाबाईस पुत्र झाला ही आमची बतावणी खोटी!' तेव्हां मुळांतच न जन्मलेल्या कोल्हापूरच्या राजाचा तो बनविलेला तोतया—तें मूल—खोटें पडलें, त्याचे खरे आईबाप धरून आणले आणि त्यांना शासनहि करण्यांत आलें. अशा खोडसाळ वर्तनानें जिजाबाई—कुसाबाईचा फार दुर्लौकिक झाला. पण पुढें तो क्षमा करून माधवराव पेशव्यानें बाईस दत्तकाची अनुज्ञा दिली. ( सरदेसाई मध्यविभाग ४ पृष्ठ १३४ ).

परंतु आपल्या वा इतर देशांच्या इतिहासांमध्यें असे जे अनेक तोतये निघाल्याच्या मनोरंजक कथा आहेत, त्या सर्वांमध्यें ह्या बंगाल-

मधील भोवाल संन्यासी खटल्यांतील प्रकरणाइतकें चमत्कारिक नी रोमहर्षण वृत्त अगदीं विरळा ! कारण ह्या प्रकरणीं नुसता कोणी तोतया उभा राहिला किंवा कोण्या खऱ्या पुरुषावर तोतयेपणाचा आरोप आला इतकीच चमत्कृति नसून, त्यांतील प्रत्येक घटना निरनिराळ्या प्रकारें तिच्या रम्याद्भूततेनें मनास चटका लावून सोडणारी आहे.

## भोवाल संस्थानच्या राजकुवराचे प्रकरण : चमत्कार पहिला !

बंगाल्यांत भोवाल नांवाचें एक वर्षाचें साधारणतः आठदहा लाखांच्या उत्पन्नाचें छोटेंसें संस्थान आहे. त्याचे विगत स्वामी कै. राजेंन्द्र-नारायण राय. ह्यांचा द्वितीय पुत्र कुमार रामेंद्र नारायण राय. त्यांची पत्नी विभावतीदेवी. वडील वारल्यानंतर आपल्या वांट्याच्या उत्पन्नाचा उपभोग घेत असतां इ. स. १९०९ मध्यें कुमार रामेंद्र नारायण हे आपली पत्नी विभावतीदेवी हिच्यासह दार्जिलिंग नामक रमणीय थंड प्रदेशीं वारा-पालट करण्यासाठीं गेले. त्यांच्यासह त्यांचे मेहुणे, विभावतीचे बंधु सत्येंद्र-नाथ बानर्जी, कौटुंबीय चिकित्सक डॉ. आशुतोष, अनेक सेवकसेविका असा परिवारहि होता. दार्जिलिंगला कांहीं दिवस शीतल जलवायूचा उपभोग घेतात न घेतात तोंच त्यांस अचानक संग्रहणीच्या रोगानें पछाडलें. चिकित्सा होऊन त्या डॉ. आशुतोष प्रभृति मंडळींनीं—कांहीं अघोर कटामुळें असो वा नसो, पण राजकुवरांना सोमल देण्यांत आला ! त्या विषानें जी बेशुद्धि आली तिचा विकोप होऊन शेवटीं राजकुवर वारले असें सर्वांनुमतें ठरलें. पत्नी विभावती, तिचा तो भाऊ, तो डॉक्टर प्रभृति सर्वांनीं मिळून रातोरात प्रेत स्मशानांत नेण्याचें योजून घाईघाईनें प्रेत हालविलें. स्मशानांत जाऊन चिता रचून प्रेत तीवर ठेवून आग जों लावणार तोंच आश्चर्यकारक योगायोगानें अकस्मात मोठें वादळ उठलें. पाऊस धो धो करीत वर्षूं लागला. सोसाट्याच्या वाऱ्यांत उभें राहणेंसुद्धां भयप्रद झालें. आग तर चितेस लागतां लागेना. तेव्हां त्या स्मशानांतील त्या भीषण वादळामधून आपला जीवच कसाबसा वांचविणें आधीं

अवश्य असें होऊन, प्रेत चितेवर तसेंच ठेवून ती सारी मंडळी धावऱ्या-घावऱ्या घरीं परत आली. तोंच एक

## दुसरा चमत्कार

घडून आला. चितेवर तें प्रेत ठेवतांच भयंकर वादळ नी मुसळधार पाऊस जसा अकस्मात् चालू होऊन त्या प्रेताचें अग्नीपासून रक्षण झालें, तसेंच ती मंडळी त्या प्रेतास चितेवरच टाकून घरीं पळून गेली असतां, त्याच वादळांत त्याच रात्री तिथें नागा संन्यासी कांहीं दुसऱ्या चमत्कारिक योगायोगानें भटकत आले ! क्वचित् राजकुवराच्या घाताच्या ह्या कटाची बातमी कटांतीलच कांहीं व्यक्तीच्या वेंधळेपणानें ह्या नागा संन्याशांना त्या स्थानीं निवसत असतां आगाऊ कळली असावी !

जें अघोर, त्याच स्थळीं; जी अघोर, नेमक्या त्याच वेळीं, जें अघोर त्याच संकटांस उडी घेणें, सहन करणें, भटकत राहाणें, आणि स्मशानीं रानींवनीं हिंस्र श्वापदांतून असें भटकत असतां अनेक जीवांना दारूण संकटांतून सोडविणें—हेंच ह्या अघोरपंथी, सर्वसंगपरित्यागी पण प्रबळ अशी एक संघटित मठसंस्था असलेल्या ह्या नागसंप्रदायाचें ब्रीद आहे !

## तिसरें आश्चर्य

ते नागसंप्रदायी साधु त्या स्मशानांत येऊन पहातात तों चितेवर 'प्रेत' म्हणून जें पडलें होतें तें अगदीं प्रेतच नसून एक मरणासन्न बेशुद्धींतील माणूस होतें ! गाद्यांगिरद्यांवर पथ्यपाण्याची पराकाष्ठेची व्यवस्था नि शुश्रूषा असतांहि अशा घातक बेशुद्धींत आजारी मनुष्य सुधारणें असाध्य !— पण आजाराच्या तशा भयंकर मरणासन्न अवस्थेंत लांकूडगवऱ्यांच्या चितेंत कोंबलेल्या आणि वादळाच्या वाऱ्यांत नि पावसाच्या शिळंधार वर्षावांत स्मशानांत पडलेला तो आजारी मेला नाहीं— तर उलट असाध्य अशा मृतावस्थ बेशुद्धींतून सुधारून, गेलेली जीवनाची धुगधुगी त्याच्या हृदयांत, नि बंद पडलेले ठोके त्याच्या

नाडींत पुन्हां संचरले ! 'विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमी-श्वरेच्छया !!'

त्या परोपकाररत नागा गोसाव्यांनीं ती धुगधुगी पाहून त्या 'प्रेतास' उचलून निर्जन नि एकान्त अशा गुहेंत नेलें. औषधोपचारांत ते गोसावी अत्यंत निष्णात. वनस्पत्यादिक उपचारांनीं त्यांनीं त्या राजकुवरास पुन्हां जन्मच दिला आणि त्यास त्याचें कांहीं एक पूर्ववृत्त न सांगतां आपल्या संप्रदायांत सामावलें. त्याची प्रकृति पुन्हां अगदीं धडधाकट झाली.

## पण चवथं आश्चर्य

असें कीं, त्या मरणासन्न बेशुद्धीच्या तडाक्यांत त्या राजकुवराची पूर्व-स्मृति अमूलात् नाहींशी झाली ! आपण कोण, कोठील, कोणाचे, हें त्याला मुळींच आठवत नव्हतें, त्यास तें कोणी सांगणारेंहि भेटत नव्हतें. नागांच्या महंतांना ती माहिती—त्यांनीं ती गुप्त राखलेली, अशी ती विस्मृति बारा वर्षें टिकली !

त्या राजकुवराला त्या अद्भुत विस्मृतीमध्येंहि मधून मधून जिज्ञासा होई—आपण मूळचे कोण ? तो विचारीहि महंतांना तो प्रश्न. पण ते म्हणत, 'बेटा, यथासमय तुझें तुलाच तें सगळें आठवेल; थोडा थांब !' कारण कांहीं दैवी नव्हतें तरी अद्भुत होतें— असा पूर्वस्मृतिभ्रंश जसा तीं स्मृतिकेंद्रें दुखावल्यानें अकस्मात होतो तसाच हळुहळु मज्जापिंड पुन्हां बळावत जाऊन जर पूर्ववत् निरोगी झाला तर तीच स्मृतिकेंद्रें पुन्हा स्वकार्यक्षम होतांच तो स्मृतिभ्रंश तितकाच अकस्मात् नाहींसा होऊन पूर्वस्मृति पुनरुदित होते.

नागसंप्रदायाप्रमाणें त्या नवशिष्याची यथाक्रम बढती होतां होतां काश्मीरचे बाबा धरमदास नागा ह्या मुख्य महामहंतांच्या हस्तें त्यास नागसंप्रदायाची महादीक्षाहि देण्यांत आली. एकंदर बारा वर्षें

तो राजकुवर, आपण राजकुवर आहोंत ही जाणीव लेशमात्र उरली नसल्यानें, नागा गोसावी म्हणूनच काय तो स्वतःस समजत त्या संप्रदायानुरूप उलिंग अवस्थेंत महंताच्या आदेशानुसार प्रदेशोप्रदेशीं भटकत राहिला.

## इकडे काय झालें ?

राजकुवर रामेन्द्र नारायणाचें प्रेत त्या वादळांत चितेवर तसेंच टाकून जे त्यांचे मेहुणे प्रभृति पळून गेले होते ते, वादळ कांहीं शांत होतांच ती रात्र संपण्याच्या आधीं स्मशानांत ती चिता पेटविण्यासाठीं पुन्हां आले– पण पाहातात तों प्रेतच नाहींसें झालेलें ! तरीहि त्यांनीं धीर न सोडतां रातोरात आणखी एक कपटव्यूह रचला, आणि सकाळीं गांवांत त्या समयींच मेलेल्या कोणा एकाचें प्रेत नेऊन राजकुवराचें तेंच प्रेत अशा वहाण्यानें त्याला अग्नि दिला ! ह्या गोष्टीवरून तर राजकुवराला सोमल देण्यांत आणि त्या बेशुद्धीसच मृत्यु समजून त्यांना झटपट जाळण्यासाठीं नेण्यांत त्या चांडाळचौकडीचा प्रथमपासूनच एक नृशंस कट असला पाहिजे असें उत्कट अनुमान संभवतें !

राजकुवराचें म्हणून असें एक दुसरेंच प्रेत जाळल्यानंतर त्या लोकांनीं राजकुवर रामेंद्र मेले असल्याची द्वाही सर्वत्र फिरवली. राजकुवराची पत्नी विभावती ही बारातेरा वर्षांचीच त्या वेळीं होती. अर्थात् तिचें चालकत्व तिच्या त्या भावाकडे आलें. त्यानें तिच्या हस्तें त्या मृत म्हणून प्रसिद्धिलेल्या नवऱ्याची उत्तरक्रिया यथासांग करविली, तिच्या वांट्याचें संस्थानचें तिसऱ्या भागाचें दोनतीन लाख रुपयांचें वार्षिक उत्पन्न तिच्या नांवें सरकारांतून रीतसर करून घेतलें, तिच्या चालकत्वाच्या नि पालकत्वाच्या मिषें त्याचा सगळा भोगवटा आपल्या हातीं घेतला आणि तिला आपल्याच घरीं नेऊन ठेवलें.

त्या उत्पन्नाचा असा यथेच्छ उपभोग घेत तीं दोघें भाऊबहीण

तिकडे अशा प्रकारें जीं नांदत राहिलीं तीं एकसारखीं भरभक्कम बारा वर्षें !

इकडे त्या पुनर्जीवित राजकुवरास नागा संन्यासी मंडळीनें त्या चांडाळचौकडीकडून पुन्हां कांहीं अपाय होऊं नये ह्या सद्बुद्धीनें पंजाबांत नेलें. तिकडे तो राजकुवर स्वतःचा स्वतःसहि पूर्णपणें विसरून आणि नागा संन्यासी मंडळांत आपल्याला तसाच एक पूर्वापार नागा संन्यासीच समजून बारा वर्षें भटकत राहिला. परंतु तो काळ संपत येतांच—

पांचवें आश्चर्य असें घडविलें कीं त्याची प्रसुप्त पूर्वस्मृति आपण होऊन हळुहळु जागूं लागली ! ! तो पुनः पुनः 'आपलं खरें खरें पूर्ववृत्त काय; मला आतां असें स्मरतें कीं, मी भोवालचा राजकुमार रामेंद्र नारायणच असलों पाहिजे; मला माझ्या मंडळींना एकदां नुसतें बघावयाचें आहे !' असें विनवूं लागला. त्याच्या जिवाला अपाय होऊं नये म्हणून नागा गोसाव्याच्या रूपांतच त्यानें स्वग्रामीं जावें असें योजून नागा महंत महाशयांनीं शेवटीं त्यास बंगाल्यांत जायची अनुज्ञा दिली आणि त्याचें सारें पूर्ववृत्त त्यास कळविलें. त्याप्रमाणें १९२० सनांत तो राजकुवर नागा गोसाव्याच्या रूपांत डाक्का स्टेशनवर येऊन उतरला. भोवाल त्याच जिल्ह्यांत. तिथें पाय टाकतांच त्याला तें वातावरण नी दृश्य पूर्वीं अनेकवार पाहिलेंसें वाटलें. त्या त्या वस्तु पाहातांच अनेक पूर्वस्मृति अंधुकपणें जागूं लागल्या. तो डाक्का नगरांतून प्रवासत एका नदीतीरीं जाऊन आपला डेरा टाकता झाला. त्याची लांब दाढी, मस्तकीं जटाजूट, सारें शरीर विभूतिचार्चित, आचार नामपरंपरा नागा सांप्रदायाची, परंतु तरीही बोलतां बोलतां लोकांमध्यें कुजबूज चालूं झाली कीं, होय ना होय, हाच तो भोवालचा मधला राजकुवर असला पाहिजे ! साऱ्या नगरभर ही अद्भूत बातमी पसरतांच आजूबाजूच्या गांवचे लोकहि त्याला पाहण्यास येऊं लागले. सन १९२१ त जवळील काशीमपूरच्या भूमिदारानें त्या जटाजूटधारी गोसावी महाशयास

आपल्या गांवीं नेलें. तिथें ते उतरतांच साऱ्या लोकांनीं एकमुखानें 'भोवालचे मधले राजकुवर' ह्या नांवानें त्यांचा जयजयकार केला. भोवाल तेथून सन्निधच. तिथें ही बातमी पोंचतांच साऱ्या संस्थानांतील गांवो-गांवचे लोक आपल्या राजकुवराच्या दर्शनार्थ लोटूं लागले. ज्याच्या त्याच्या तोंडी 'हेच ते! हेच ते!' झालें. नंतर लोकांनीं आग्रहपूर्वक त्यांना जयदेवपुरास, जिथे त्यांची बहीण ज्योतिर्मयीदेवी आणि मातामही राणी सत्यभामादेवी होती तिथें, आणलें. ते तिथेंहि नागा गोसावीच होते. परंतु त्यांची सूक्ष्मातिसूक्ष्म परीक्षा घेव घेत त्या दोघींचीहि पक्की निश्चिति पटली कीं, हाच तो आपला भाऊ, आपला नातू! तेव्हां प्रजेचा फार आग्रह पडला कीं, राजकुवरानें आतां प्रकटावें. राजकुवरानें आढेवेढे घेतले, पण शेवटीं जवळजवळ बळानें त्याचे जटाजूट काढण्यांत येऊन त्याचें मूळ रूप सर्वत्रांना दाखविण्यांत आलें. सर्वांनीं 'हेच! हेच!' म्हणून जयजयकार केला, तेव्हां राजकुवरानें स्वमुखें आपलें रोमहर्षण वृत्त, जें त्या नागा संन्याशांनीं ज्यांना शेवटच्या दिवशीं कळविलें, तें प्रकटिलें. त्या दिवशीं साऱ्या संस्थानांतून लोटलेल्या चाळीस सहस्र जनतेच्या प्रचंड सभेंत प्रजाजनांनीं ठराव करून उद्घोषिलें कीं, 'कुमार रामेन्द्र नारायण ते हेच होत!' इतकेंच नव्हे, तर आपला संस्थानिक या नात्यानें शेंकडों लोक आपण होऊन त्यांना आपला करभारहि अर्पूं लागले!

## सहावें आश्चर्य!—

### नागा गोसाव्याचा जो राजपुत्र ठरला तोच तत्काळ राजपुत्राचा 'ठग' ठरला!!

भोवाल संस्थानांतील प्रजेंत ही चळवळ फैलावत चाललेली पाहून कोर्ट ऑफ वॉर्डस्च्या हातीं तें संस्थान त्या वेळीं असल्यामुळें डाका जिल्ह्याच्या कलेक्टरांना तिला पायबंद घालणें अवश्य वाटून त्यांनीं ह्या नागा गोसाव्याला राजपुत्राचा ठग (तोतया) म्हणून उद्घोषिलें.

आणि ३ जून १९२१ ला संस्थानाचा कारभार प्रभृति घेण्याची बंदी करून तेथून निघून जाण्यास आज्ञापिलें ! त्यामुळें राजपुत्राचें दैव पुन्हा उलटलें. त्यानें आपण ठग–तोतया–नसून खरे खरे राजपुत्र आहों, हें निर्विवादपणें सिद्ध करण्यासाठीं आपली पत्नी जी विभावतीदेवी तिलाच आपल्याकडे बोलाविलें ! पण सर्वांत मोठें आणि सर्वांत दुःखद आश्चर्य हें कीं त्या राणी विभावतीदेवीनें ' हा गोसावडा माझा पति नसून माझ्या मृत पतीचा ठग आहे ( तोतया आहे ! ) असें सरकारांत नि लोकांत चक्क प्रसिद्ध करून त्याच्या बोलावण्याप्रमाणें त्याच्याकडे जावयाचें साफ नाकारलें. अर्थातच ती ज्याच्याकडे गेलीं बारा वर्षें राहात आली, त्या तिच्या भावानेंहि तिच्या म्हणण्याचा प्रथम पाठपुरावा करून बहुतेक उच्च सरकारी अधिकाऱ्यांचाहि, उत्पन्नाची धनीण वहिवाटीप्रमाणें जी ठरलेलीच होती त्या विभावतीलाच, पूर्ण पाठिंबा मिळविला.

आपल्या धर्मपत्नीनेंच आपणांस ठग ठरविलेलें ऐकतांच राजकुवरास पराकाष्ठेचें दुःख झालें. ' तिला वैधव्यांतच आनंद वाटतो तर तिच्या सुखांत माती कां कालवा आणि हें प्रकरण पुढें कोर्टांत आणून आपल्याच अशा अत्यंत लज्जास्पद दुर्लौकिकाचा डांगोरा जगभर कां पिटा ? ' असें बोलून तो स्वस्थ राहिला. पण त्याच्या बहिणीनें आणि आजीनें अगदीं त्रागा करून आपला वारसा तूं सिद्ध केलाच पाहिजेस, असा अगदीं हट्ट धरला. तेव्हां सन १९३० च्या एप्रिल महिन्यांत राजकुवर रामेंद्र नारायण ह्यानें कोर्टांत संस्थानावर आपलाच अधिकार असल्याचा दावा आणला.

## जगांतील एक अत्यंत भानगडीचा, चमत्काराचा आणि लांबीचा खटला.

खटला कोर्टांत चालूं होतांच त्याकडे सहस्रावधि लोकाचें लक्ष वेधून गेलें. हा खटला एकंदर सहा वर्षें चालला होता. विभावतीनें भर

कोर्टांत सांगितलें कीं 'ह्या गोसाव्याची मुद्रा माझ्या पतीशीं कोणच्याहि प्रकरणीं जुळत नाहीं. माझ्या पतीचें शव माझ्यासमक्ष जाळण्यांत आलें. दुसरें कोणाचें तरी शव आम्हीं जाळलें हें साफ खोटें ! हा मनुष्य पंजाबांतील औजला गांवचा निवासी असून धरमदास नांवाच्या नागा संन्याशाचा शिष्य आहे. ह्या लोकांनीं हा सारा कपटव्यूह रचलेला असून हा माझ्या मृत पतीचा एक नीच ठग आहे ! (तोतया आहे ! )'

विभावतीच्या आणि राजकुवराच्या अशा दोन्ही पक्षांच्या वतीनें कित्येक मोठेमोठे इंग्रजी, हिंदी, सरकारी अधिकारी, डॉक्टर, रावसाहेब, वकील आणि जनिक नेते साक्षीला बोलावण्यांत आले. पंजाबांतून नागा संन्यासी, इंग्लंडकडून सेवानिवृत्त सरकारी अधिकारी, देशीविदेशी मानसविज्ञानतज्ज्ञ, मोठेमोठे बॅरिस्टर, संस्थानांतील शेंकडों प्रजाजन स्त्री-पुरुष येऊन एकमेकांच्या अगदीं उलट अशा साक्षी शपथेवर देऊन गेले. डॉ. मुकर्जी; डॉ. रॉय; प्रि. सुरेंद्रनाथ मित्र; जे. गुप्त, आय. सी. एस्.; डॉ. जे. कॉलबर्ट; ले. क. बर्कले हिल अशी अनेक थोर मंडळी रामेंद्र नारायणाच्या वतीनें साक्ष देऊन गेली. वास्तविक बारा वर्षांनंतर इतक्या असंभव घटनांतून जगून आलेला मीच तो, हें सिद्ध करणें आणि स्वतःच्या पत्नीनेंच ठग ठरविलें असतां, तिच्या बारा वर्षांच्या वहिवाटीस, व जनांस नि वशिल्यांना खोटें पाडणें आणि तेंहि मोठमोठे सरकारी अधिकारी, स्वतःचेच अनेक नातेवाईक आणि शिष्टजन राणी विभावतीच्या वतीनें शपथेवर सांगत असतांना कीं हा मनुष्य ठग आहे– राजकुवर नव्हे ! असा बलवत्तर पुरावा हाणून पाडणें रामेंद्रकुमाराला फारच दुर्घट गेलें असल्यास कांहीं नवल नाहीं. यामुळेंच उभय पक्षांच्या वतीनें मिळून या खटल्यांत एकंदर पंधराशें साक्षीदार आले, दोन हजार निवडक निदर्शकें ( एक्झीबिट्स ), दीडशें निवडक छायाचित्रें दाखविण्यांत आलीं. या खटल्यांत शेवटीं शेवटीं लोकांचें इतकें लक्ष वेधलें कीं 'भोवाल दैनिक' नांवाचें एक विशेष वृत्तपत्र प्रसिद्ध होऊन तें अडीच वर्षें चाललें ! !

राजकुवर ते हेच, हें ठरवितांना आनुवंशविज्ञानाचे अनेक चमत्कृतिजनक पुरावे जे पुढें आले, त्यांची कांहीं कल्पना येण्यासाठीं आणि सामान्यतःहि ती माहिती उपयुक्त म्हणून, कांहीं उदाहरणें देत आहों.

राजकुवराच्या ' मृत्यू ' पूर्वींच्या जोड्यांचा एक जोड प्रतिवादीनेंच पुढें आणला त्यावरून राजकुवराच्या पायांची एक विशिष्ट ठेवण होती, ती ह्या ' ठगा 'च्या पायाची नाहीं, हा विभावतीचा पक्ष. पण तो जोडा निरीक्षितां वादीच्या पायाची तीच ठेवण नि तो जोडा त्याच्या पायास तंतोतंत जुळतो असें सिद्ध झालें !

पूर्वीच्या फोटोंत राजकुवराची उजव्या हाताचीं बोटें असमान लांबीचीं, पण डाव्या हाताचीं समान दिसत. हा विशेष ' ठगा 'च्या बोटांतहि तंतोतंत आढळतो, असें छायाचित्रणतज्ज्ञ ( फोटोग्रॅफिक स्पेशियालिस्ट ) मि. विंटरटर्न ह्यांनीं दाखविलें आणि रामेंद्र नारायण ते हेच असें मत दिलें.

याहूनहि आश्चर्यकारक पुरावा म्हणजे हा कीं, कै. राजेंद्र नारायण, त्यांची बहीण कृपामयी, त्यांची मुलगी ज्योतिर्मयी आणि त्यांचा वडील नि धाकटा मुलगा यांच्या सर्वांच्या घोट्यावरील कातडें जाड, रठ्ठ आणि सुरकुतलेलें असे. कर्नल मॅकजिल ख्राइस्ट ह्यांनीं सांगितलें कीं, हा आनुवंशिक रोग असतो. आणि परीक्षेंत त्या कुटुंबांतील ह्या रोगाचा ठसा ' ठग ' (तोतया) म्हणून म्हटल्या जाणाऱ्या त्यामधल्या मुलाच्या, वादी रामेंद्र नारायण याच्याहि घोट्यावर जसाचा तसाच उमटलेला आहे ! अर्थात् तेच रामेंद्र नारायण खरे राजकुवर होत !

साऱ्या न्यायालयास चकित करून सोडणारा आणखी एक पुरावा पुढें आला. विभावतीनेंच ' मृत ' राजकुवराचीं कांहीं छायाचित्रें पुराव्यांत दाखल केलीं होतीं. तीं बारकाईनें पाहातां, प्रसिद्ध छायाचित्रक ( फोटोग्राफर ) श्रीयुत गांगोली ह्यांनीं न्यायाधिशास दाखविलें कीं, ह्या प्रत्येक छायाचित्रांत डोळ्यांच्या पापणीखालीं एक प्रकाशबिंदु

आढळतो. हा प्रकाशबिंदु येण्याचें एकच कारण असें असलें पाहिजे कीं, त्या ठिकाणीं राजकुवराच्या तोंडावर कांहींतरी शारीरिक वैशिष्ट्य असलें पाहिजे. त्याप्रमाणें वादी रामेंद्र नारायणाची मुद्रा न्याहाळतां अगदीं त्याच ठिकाणीं पापणीपाशीं एका तिळासारखी एक मांसाची पुढकुळी नित्याची उठलेली आढळली! प्रत्येक छायाचित्रणतज्ज्ञानें ( फोटो-स्पेशियालिस्ट ) हा पुरावा अखंडनीय असाच मानला.


बारा वर्षें, एखाद्या प्रबल मानसिक धक्क्यासरशीं, पूर्वस्मृति सर्वस्वीं विलोपणें आणि नंतर ती हळुहळु पुन्हां जागणें हें शक्य नाहीं, असें कांहीं मानसविज्ञानीं सांगितलें; तर उलट कांहीं प्रख्यात मानस-विज्ञानतज्ज्ञांनीं ती घटना शक्य आहे असें शपथेवर प्रतिपादिलें!!

अशा अत्यंत किचकट नि अत्यंत विस्तृत नि विविध पुराव्यांची छाननी होऊन शेवटीं जज्ज श्री. पन्नालालजी यांनीं २४ ऑगस्ट १९३६ ला या अभूतपूर्व खटल्याचा निकाल दिला कीं, वादी हे

**ठग नसून, तोतया नसून, राजकुंवर रामेंद्र नारायण ते हेच होत!!**

या निकालासरशीं भोवाल संस्थानच्या प्रजाजनांमध्यें तुमुल हर्षाची एकच लाट उसळली! घरोघर दीपोत्सव झाला! शेंकडों वृद्ध तरुण स्त्री-पुरुषांच्या डोळ्यांतून घरोघरीं आनंदाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या!

न्यायाधिशानें विभावतीविषयीं लिहिलें कीं, द्रव्यलोभानें आणि वैधव्याच्या स्थितींत सर्व उत्पन्नावर तिचीच अबाधित चाललेली सत्ता सोडण्याचें तिच्या जिवावर येत असल्यामुळेंच या स्त्रीनें जाणून बुजून आपला पति हा ठग आहे, तोतया आहे, असा कांगावा केला. या दुष्कर्मास तिला तिच्या कुटिल भावानेंच उद्युक्त केलें असून त्याला साहाय्यक असणाऱ्या चांडाळचौकडीनेंच हा अधम कट बारा वर्षांपूर्वींच प्रथमपासून रचला होता. त्या भावाच्या हातींच नि घरींच विभावतीदेवी



असल्यानें त्याला नि त्याच्या साग्यालाग्यांना तिच्या उत्पन्नावर जें राजवैभव भोगतां येई, तें सोडण्याचें त्यांच्या जिवावर आलें आणि म्हणूनच त्यांनीं हा सारा अधम उपद्व्याप केला.

या सहा वर्षें चाललेल्या खटल्याचा लक्षावधि रुपयांचा व्यय राजकुवराच्या भगिनीनेंच प्रमुखतः केला होता. पण आतां तिच्या पक्षाचा जय झाल्यानें आणि संस्थानची सत्ता राजकुवर रामेंद्र नारायण यांच्याच हातीं आल्यानें तिला त्या व्ययाचें वा कष्टांचें झालेलें दुःखच आनंदप्रद होत आहे ! क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ! !

ती संस्थानची राज्यलक्ष्मीच नव्हे तर ती पतीस मेला–चितेवर जळला–म्हणून ठरवूं पाहाणारी विभावतीहि त्याच पतीच्या हातीं आज पुन्हां निदान नैर्बंधिक अधिकारानें तरी पत्नी म्हणून सोंपविली गेली आहे ! ! ! किती विजोड जोड हा ! !

— १९३६

★

# अंगरख्याला माणसें बेतणारा शिंपी ! : १२ :

माणसाच्या अंगास जुळेल असा अंगरखा बेतणारे शिंपी आपणां सर्वांच्या चांगल्या परिचयाचे आहेतच. माणूस उंच असेल तर अंगरखा लांब होईल इतकें कापड फाडून त्या माणसाच्या छातीचा घेर जितका रुंद असेल तितका अंगरख्याचाही घेर रुंद धरून आणि ज्या माणसाला अंगरखा शिवायचा असेल त्याच्या हाताच्या लांबीप्रमाणें अंगरख्याच्या बाह्या लांब वा आंखूड अशा कापून, एकंदरींत त्या माणसाला ठीकठाक बसेल असा अंगरखा शिंपी बेततात; मनुष्याच्या आकाराप्रमाणें अंगरखा मोठा वा लहान कापतात.

पण अंगाला जुळेल असा अंगरखा न कापतां अंगरख्याला जुळेल असें अंगच कापणारा शिंपी तुम्ही पाहिला आहांत काय ? त्याच्या अंगरख्याचा आकार ठरलेला आहे. तो अंगराख्याचा आकार कांहीं कधींहि बदलणारा नाहीं, इतका घोळ, इतकी लांब बाही, इतकी मोठी मान. त्या ठरलेल्या आकारापेक्षां निराळा अणुमात्र अधिक मोठा किंवा अधिक

लहान असा अंगरखा शिवणें वा घालणें हे त्या जातीच्या शिंप्यांच्या शास्त्रांत पाप समजलें जातें. प्रत्येक माणसानें अंगरखा म्हटला कीं, तसाच घातला पाहिजे. अगदीं शिवणाचे टाके देखील ठरलेले. ह्या नियमामुळें त्या जातीच्या शिंप्यांच्या दुकानीं कोणीही मनुष्य गेला कीं, ते शिंपी त्या मनुष्याच्या अंगाप्रमाणें अंगरख्याचें कापड फाडीत नाहींत, तर त्यांच्या त्या ठराविक अंगरख्याप्रमाणें त्या माणसाचें अंग बेतून घेतात. त्या अंगरख्यापेक्षां माणूस लहान असेल तर त्यानें अंगरख्याइतके मोठें होईतों उघडें फिरावें किंवा अंग लहान असले तरी तो अंगरख्याचा लफ्फालोळ तसाच, जसा जमेल तसा, अंगावर वागवावा. अंगरखा अंगांत घालण्याच्या ठायीं अंगच अंगरख्यांत घालावें. बरें, पण जर अंगरखा अंगास लहान होईल असा मनुष्य आला तर ? तरी देखील शिंप्याची ही जात अंगरख्याच्या त्या ठराविक प्रमाणापेक्षां अधिक मोठ्या आकाराचा अंगरखा बेतणार नाहीं, ठराविक प्रमाणाहून जास्त कापड कापणार नाहीं, तर अंगरख्यास अंग बेतून घेईल. अंगरख्याची बाही शास्त्राप्रमाणें जितकी लांब असावी म्हणून त्यांचा पूर्वापार जातिनियम आहे त्या बाहीहून जास्त लांबीचा हात असल्यास ते शिंपी गिऱ्हाइकाचा हात कापतील, बाहीची लांबी वाढविणार नाहींत, अंगरख्याच्या शास्त्रीय मानेहून त्या माणसाची मान अधिक घेराची असल्यास हे शिंपी ती मान तासून बेताची करतील, पण अंगरख्याच्या मानेचा घेर वाढवून त्यांच्या जातीचा परंपरागत कुलधर्म ते मोडणार नाहींत.

त्यांच्या जातीच्या ज्या कोण्या एका महनीय पूर्वजानें ह्या सृष्टीच्या उत्पत्तीच्या पहिल्या दिवशीं ब्रम्हदेवानें दिलेल्या कापडाचा पहिला अंगरखा शिवला त्या कापडापेक्षां अधिक पातळ वा अधिक जाड कापड वापरणें किंवा कोणास वापरूं देणें म्हणजे हे शिंपी एक अधार्मिक कृत्य समजतात. एक ठराविक प्रकारच्या कापडाचा तो ठराविक सांच्याचा अंगरखा घालून माणसानें अत्यंत थंड अशा उत्तर ध्रुवावर असो किंवा अत्यंत उष्ण अशा सहारा वाळवंटाच्या आसपासचे प्रदेशांत असो,

राहिलें पाहिजे. जर तें त्यास करवत नसेल तर त्याहूनही उत्तम मार्ग म्हणजे त्या कापडाचा अंगरखाच वापरणारे धार्मिक लोक ज्या गांवांत बसत आले त्या गांवाच्या बाहेर कांहीं झालें तरी जाऊंच नये. गांवांत भीक मागण्याचा प्रसंग आला आणि बाहेर कुठें जरी सोन्याच्या खाणींत फुकट सोनें धुवायची सोय असली तरी त्यानें त्या त्या सोयीसाठीं आपल्या गांवची अढक ओलांडतां कामा नये. कारण न जाणों तिकडे तो अंगरखा बदलण्याचा मोह पडायचा !

ह्या शिंपीधर्माचा आणखी एक महत्वाचा सिद्धान्त आहे. तो हा कीं, मनुष्य पापी कीं पुण्यवान, थोर कीं हलकट, उच्च कीं नीच हें त्या मनुष्याच्या अंगच्या गुणावगुणांवरून ठरविणें पाखंड आहे. तर तो मनुष्य ह्या ठराविक प्रकारच्या लांबी–रुंदीचा हा धार्मिक अंगरखा घालतो कीं आपल्या अंगास येईल नी बदलत्या वायुमानास जुळेल असे भिन्न आकाराप्रकाराचे अंगरखे बदलीत रहातो ह्यावरून तो धार्मिक वा अधार्मिक, सात्विक वा तामसी, साधु वा ठक आहे तें ठरविलें पाहिजे. जर तो अंगरखे अंगास बेतील तर तो हलकट असलाच पाहिजे; जर तो आपलें अंग त्या शास्त्रीय अंगरख्यास बेतील तरच तो थोर होय, साधु होय, धार्मिक होय.

अशा या शिंपीधर्माच्या शिंपीमंडळीस त्यांच्या अंगरख्यांस आपलीं अंगें बेतू देणारीं माणसें तरी, गिऱ्हाईकें तरी, कसचीं मिळणार ? असें जर आपणांस वाटेल तर ती चूक ठरेल. कारण ह्या ठराविक अंगरख्या-वांचून दुसऱ्या प्रकारच्या अंगरख्यांस मनुष्य केवळ आपल्या अंगच्या लांबीरुंदीच्या वा वायुमानाच्या सोयी गैरसोयीच्या बदलत्या आवश्यकते-प्रमाणें वापरील तो माणूस घोर अशा नरकांत ‘ सान्वय ’ पडेल असा शाप देणारी एक पोथी ह्या शिंपीजातीच्यापाशीं आहे; आणि ती पोथी कोण्या मनुष्यानें लिहिलेली नसून प्रत्यक्ष ईश्वरानें स्वतःच्या चाकूनें स्वतःचा बोरू तासून त्या स्वतःच्या लेखणीनें स्वतः लिहिलेली आहे.

त्या पोथीवर विश्वास ठेवणारीं हजारों माणसें असल्यानें ह्या शिंप्यास गिऱ्हाइकांची तूट पडण्याची भीति सहसा भिववीत नाहीं.

माणसाला अंगरखा बेतणारे साधे शिंपी तुम्हांस सर्वत्र माहित असतात. पण अंगरख्यास माणसें बेतणारे हे अद्‌भुत शिंपी तुम्हांस त्या अर्थीं माहित नसले तरी तसेच सर्वत्र विखुरलेले आहेत. ते हिंदूंत आहेत, तसेंच ते मुसलमानांतही आहेत, आणि दोन शतकांच्या आधीं यूरोपमध्येंही त्यांचा सुळसुळाट झालेला होता. पण आतांशीं मात्र यूरोपमध्यें माणसाप्रमाणें अंगरखे बेतणारी शिंप्याची जात तेवढी ठेवून ही अंगरख्याप्रमाणें माणसें बेतणारी शिंप्याची विक्षिप्त जात नाहींशी होत आली आहे. कारण तिच्या त्या विलक्षण अट्टी पाळून आपलीं अंगेंच अंगरख्यास जुळेशीं कापून तासून बेतून घेणारें मूर्ख गिऱ्हाईक तिकडे यूरोपमध्यें फारसे उरलेलें नाहीं.

या जातीचें शिंपी आपल्या जातीस 'सनातनी' शिंपी म्हणवितात. आणि ज्या एका ठराविक लांबीरुंदीच्या अंगरख्यास ते प्रमाणभूत, शास्त्रशुद्ध अंगरखा मानतात आणि माणसाच्या आवश्यकतेप्रमाणें त्या अंगरख्याचा आकार प्रकार न बदलतां त्या अंगरख्याप्रमाणें माणसांसच बेतून घेतात त्या अंगरख्यास ते " आचार " असें म्हणतात ! !

* * *

कांहीं दहा पांच हजार वर्षांपूर्वी 'आर्यावर्तांत' दोनतीन हजार वर्षांपूर्वी पॅलेस्टाईन–सिरीयांत; किंवा हजार दीड हजार वर्षांपूर्वी अरेबियांत त्या त्या काळच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, परिस्थि-तींत त्या लोकांच्या राष्ट्राचें हित व्हावें म्हणून कांहीं आचार पाळण्याची आवश्यकता होती. त्या परिस्थितींत ते आचार त्या त्या लोकांच्या मनास, देहास नी राष्ट्रीय प्रगतीस मानवणारे होते, पोषकही होते. त्या विशिष्ट परिस्थितींतील संकटाच्या थंडीवाऱ्यापासून त्या त्या राष्ट्रांचें अंग सुरक्षित राखणारें ते 'अंगरखे' होतें. ते आचार त्या काळीं ज्यांस उपयुक्त वाटले त्यांनीं त्यास " दैवी " " ईश्वरी " " खुदाई "

" डिव्हाइन " अशा विशेषणांनीं गौरवण्यास आरंभ केला. कारण जें चांगलें तें दैवी, ते आचरलें कीं मनुष्य स्वर्गास जातो, न आचरलें कीं मनुष्य नरकांत पडतो, असें मानण्याची त्या काळची एक भाबडी भावना असे. चांगलें याला दैवी वा डिव्हाइन हा एक प्रतिशब्दच होऊन बसला होता. मनुष्यास हितकारक तें चांगलें अशी चांगल्याची मानवी व्याख्या करण्याइतके त्या काळचे समाज पुढारलेले नव्हते. देवास आवडतें तें चांगलें, चांगलें तें देवास आवडतें, अशी उलट सुलट अर्थी चांगल्याची दैवी व्याख्या त्या वेळेस करीत. त्यामुळें जे आचार त्या त्या काळीं त्या राष्ट्रांस चांगले वाटले तेच दैवी आचार होत. त्या आचारांविरुद्ध वागणें म्हणजे देवाविरुद्ध वागणें होय, ते आचार ज्यांनीं घालून दिले तीं माणसें माणसें नसून देवदूत, पैगंबर, प्रॉफेट्स होत, आणि ज्या ग्रंथांत ते आचार गोंवले गेले ते ते ग्रंथ देव--दत्त, अपौरुषेय, ईश्वरकृत होत अशी त्यांची समजूत असे.

इतक्यावरच थांबतें तरी पुरवतें; पण ह्या समजुतीच्या पोटीं अपरिहार्यपणें पुढची समजूतही जन्मली कीं, देवानें दिलेले हे आचार केवळ त्या काळीं आणि त्या त्या लोकांनींच पाळणें हितावह असें नसून मनुष्यमात्रानें यावच्चंद्रदिवाकरौ ते पाळलेच पाहिजेत. तेच पाळिले पाहिजेत. ते हितकर होते व आहेत म्हणून नव्हे–तर देवानें सांगितलें, त्या देवदत्त अपौरुषेय ग्रंथांत ते आज्ञापिले गेले म्हणून ते मनुष्यमात्रानें पाळले पाहिजेत. ते आचार त्रिकालाबाधित आहेत. ज्या राष्ट्राच्या अंगास राखण्यासाठीं म्हणून तो आचाराचा अंगरखा मुळांत शिवला त्या राष्ट्राचें अंग वाढतें झालें तर तें अगदीं एकवेळ कापून टाकावें पण तो आचाराचा अंगरखा बदलतां कामा नये; किंवा त्या राष्ट्राच्या बदलत्या आवश्यकतांस नी वाढत्या अंगास जुळेल अशा बदलत्या प्रकाराचें वा वाढत्या लांबीरुंदीचें अंगरखे शिवतां कामा नयेत ! एष धर्मः सनातनः !

हिमाद्रि, नी विंध्याद्रि यांच्या मधल्या " यज्ञीय " भूमींत आर्यांनीं

रहावें म्हणून हजारों वर्षांपूर्वी ' आचार " ठरला त्या वेळेस क्वचित् त्या भूमीबाहेर जाण्याची आर्यांस आवश्यकता नसेल, सुरक्षितता नसेल; पण पुढें त्या भूमींत न मावण्याइतकें आर्यराष्ट्राचें अंग वाढलें, इतर देशांस जिंकून राज्यें संपादण्याइतकी शक्ति वाढली तरी देखील यज्ञीय भूमींत राहिलें पाहिजे हा आचार बदलणें पाप झालें. परदेशगमन निषिद्ध झालें. त्या अपुऱ्या अंगरख्यासाठीं राष्ट्राच्या वाढत्या अंगास खुजदवून घेतलें, पण त्या वाढत्या अंगास जुळेल असा अंगरखा वाढविला नाहीं ! वाढवितां कामा नये ! जे वाढवितील तें ' पतन्ति नरके घोरे ! '

एकदां ब्राह्मण जात श्रेष्ठ ठरली, अवध्य ठरली, त्यांनींच पौरोहित्य करावें; क्षत्रिय शूर ठरले, त्यांनींच लढावें; शूद्र नीच ठरले, त्यांनीं ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्यांबरोबर एकासनावर, एका मंडपांत बरोबरीनें बसूं नये, असा आचार ठरला. त्यावेळेस तें आर्यराष्ट्राच्या हिताचें असेलहि. ब्राह्मण तसा साधू, क्षत्रिय शूर, शूद्र हीन असेलहि क्वचित्; पण हजारों वर्षे उलटली, ब्राह्मणांत शेंकडों हीन निघाले, क्षत्रियांत भ्याड निघाले, विद्वान्‌ही निघाले; शूद्रांत शूर, विद्वान्, साधु निघाले; तरी देखील या बदलत्या वायुमानास जुळेल असा त्या जुन्या आचाराचा अंगरखा बदलतां कामा नये ! भ्याड झाला तरी क्षत्रियच राजा हवा. शूर नी विद्वान् वा साधू झाला तरी शूद्राला गंधाचा अग्रमान नाहीं ! कोणा निरक्षर भट्टाचार्य, विलायती बूट विकणाऱ्या, पण 'ब्राह्मण' छापाच्या मूर्खालाच तो मिळणार. चोखा मेळ्याला देवाच्या सभामंडपांत जातां येणार नाहीं–मुसलमानी सरदारांच्या घोड्याची लीद उचलीत मागें धांवणाऱ्या कोणा 'क्षत्रिय' छापाच्या गेहलोट वा राठोड भागुबाईचाच तो मान ! राज्य कमावणारा शिवाजी " शूद्र, " राज्य कमावलें तरी त्यास आम्ही राज्याभिषेक करणार नाहीं ! पण राज्य गमावणाऱ्या एखाद्या मुर्दाड मेवाडी राण्याला तो वेदोक्त राज्याभिषेक करूं ! कारण तो मुर्दाड असला तरी ' क्षत्रिय ' छापाचा मुर्दाड आहे ! ! ! मनुष्याच्या अंगच्या गुणांवरून हे " सनातनी " शिंपी मनुष्याची योग्यता

ठरवीत नसून त्याच्या अंगावरील या पुरातन छापाच्या ‘ आचाराच्या ’ अंगरख्यावरून तो माणूस चांगला कीं वाईट ठरवितात !

इतकेंच नव्हे, तर हजारों वर्षांपूर्वींच्या माणसांनीं प्रमाण मानलेल्या ह्या “ आचारांत ” मनुष्यानें वेष कसा करावा, दाढीमिशी कशी नि किती लांब आंखूड ठेवावी, डोकी-दाढी कोणच्या तिथीस करावी, शौचाला माती किती घ्यावी, लघ्वीला कोणच्या दिशेस तोंड करून बसावें, इत्यादिविषयींहि नियम ठरविले असल्यानें; ते नियमही त्याच देवप्रणीत, अपौरुषेय, त्रिकालाबाधित अशा मानलेल्या त्या ग्रंथांतच आज्ञापून समावलेले असल्यानें; आणि त्या त्रिकालाबाधित ग्रंथांच्या लांबी-रुंदीच्या अंगरख्याइतकेंच मनुष्य जातीनें सदोदित लांबरुंद असलें पाहिजे, चांगलें वाईट असलें पाहिजे अशी ह्या सनातनी जातीच्या शिंप्याची भाबडी भावना असल्यामुळें; तें लोक, माणूस चांगला कीं वाईट, थोर कीं हलकट, हें त्याच्या वागणुकीवरून वा गुणावरून न ठरवितां त्याचे केस ठराविक लांबीचे आहेत कीं नाहींत, त्याची दाढी वा डोई त्या त्या तिथीस तशी तशी न्हाव्यानें कातरली वा केली कीं नाहीं, ह्या अशा बाह्य लक्षणांवरून आणि बहुधा त्यावरूनच ठरवितात. दाढी तितकी लांब नसली तर दाढीसाठीं मुंडकेंच उडवितील !

ह्याच “ सनातनी ” शिंपी जातीच्या मंडळींनीं लाक्षणिक अर्थींच नव्हे, तर अगदीं शब्दार्थीं, अक्षरशः अंगरख्याला माणूस बेतल्याची जी एक घटना मुसलमानांच्या इतिहासांत घडली ती जितकी मनोरंजक तितकीच उद्‌बोधकही असल्यामुळें वरील सनातनी, अपरिवर्तनीय आचारवाद्यांच्या प्रवृत्तीचा एक उत्कृष्ट दाखला म्हणून खालीं देत आहों.

ती गोष्ट अशी—

बगदाद नगरीं मुसलमानांचे खलिफा राज्य करीत असत. महंमद पैगंबरांना मुसलमान लोक ईश्वरदूत ( पैगंबर ) मानतात आणि ईश्वरानें दूताहातीं जे संदेश धाडले तेच महंमदसाहेबांनीं कुराणांत सांगितले,

अशी मुसलमानांची निष्ठा आहे. म्हणजे हिंदूंच्या वेदाला ज्या अर्थी हिंदू "श्रुति" म्हणतात त्याच अर्थी "कुराण" ही मुसलमानांची "श्रुति" आहे. यास्तवच त्यांत दिलेले बारीक सारीक आचारदेखील त्रिकालाबाधित म्हणून मानले जाऊं लागले. इतकेंच नव्हे तर महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर त्यांचा घालावयाचा जो अंगरखा असे तो देखील त्यांच्या राजदंडाप्रमाणेंच मुसलमानी धर्मपीठाच्या आाण राजपीठाच्या अध्यक्षत्वाचें एक प्रतीक--न बदलतां येणारें दिव्यचिन्ह—समजलें गेलें. महंमदमहाशयांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गादीचा धनी आणि मुसलमानांचा सर्वोच्च धर्माध्यक्ष म्हणून जो झाला त्यास खलिफा म्हणत. आणि खलिफासच काय तो महंमद पैगंबरांचा पवित्र अंगरखा घालण्याचा अधिकार असे. खलिफाच्या पदवीसाठीं अनेक इच्छुक उभे रहात, लढत, परस्परांच्या हजारों सैनिकांच्या कत्तली करीत, मुसलमान मुसलमानांच्या रक्ताचे या यादवींत पाऊस पाडीत आणि एकेका वेळीं निरनिराळ्या भागांत तीन तीन निरनिराळे प्रबळ सेनापती स्वतःस खरा खलीफा तो मीच म्हणून म्हणवीत राज्य करीत. त्यांत बगदादच्या ओमेयेड खलिफांचा वंश मोठा प्रबळ निघाला. महंमदचा राजदंड, धर्मदंड नी हा पवित्र अंगरखा त्यांच्याच हातीं असे.

ह्या बगदादच्या खलिफांत कांहीं खलिफा मोठे प्रबळ आणि साधुशील असे निपजले. ते महंमदाचा हा पविल अंगरखा धर्मोपदेशाच्या वेळीं घालीत.

जो खलिफापदास योग्य ठरेल किंवा तें पद छिनावून घेण्याइतका प्रबळ ठरेल त्याला खलिफा होतांच अंगरखा घालण्याला अधिकार येई. पण भावड्या धर्मभावनेची शेवटीं जी विकृति होत जाते तीच मनुष्यस्वभावानुसार मुसलमानांतही होत जाऊन जो पूज्य खलिफा असेल त्याच्या अंगांत हा पवित्र अंगरखा असतो हें पहातां पहातां हा पवित्र अंगरखा ज्याच्या अंगांत असतो तो खलिफासारखा पूज्य होय अशी वृत्ति बोकाळली.

आपल्या इकडे पूज्य संन्यासी असतो, तो भगवी कफनी घालतो, हें पहातां पहातां ज्याच्या अंगावर भगवी कफनी दिसते तो संन्याशासारखाच सहजगत्या पूज्य वाटूं लागला आणि भगवी कफनी पाहिली कीं संन्यासी म्हणून चोरांनाही सन्मान नी भिक्षा मिळविणें अगदीं सोपें होऊन बसलें. तशीच हीहि गोष्ट.

अशा बुद्धिहीन धर्मभोळेपणाची शेवटीं त्याच बगदादच्या मुसलमानी राजधानींत इतकी पराकाष्ठा झाली कीं, खलिफाचा हा अंगरखाच जवळजवळ खलिफा होऊन बसला! खलिफापदाला योग्य ते गुण त्या व्यक्तींत असोत वा नसोत तिच्या अंगावर हा पवित्र अंगरखा आहे का? असल्यास तो खलिफा! दुबळ्या खुळ्या अनुयायांचे पुढारीहि दुबळे खुळे असेच निपजतात. ओमेयेड खलिफांचीहि तशीच अवनति झाली. खलिफापदावर विक्षिप्त व्यक्ति येऊं लागल्या. पण बाह्य आचाराच्या पोकळ मुखवट्यालाच जिथें मुख म्हणून समजलें जाऊं लागलें तिथें मुखवटा तेवढा संभाळला कीं पुरे होई. अशाच पडत्या काळीं या पवित्र अंगरख्यानें मोठ्या गमती केल्या! उदाहरणार्थ, या ओमेयेड वंशांतील या पडत्या काळचा खलिफा दुसरा वालिद याचीच गोष्ट पहा!

ह्या खलिफा वालिदला, मुसलमानी साम्राज्याचा सम्राट नी अवघ्या जगाचा धर्माध्यक्ष, 'शंकराचार्य' ह्या नात्यानें राजधानींतील भव्य मशिदींत प्रार्थना चालवायची असे; त्या समारंभासाठीं जायचें असतां एका वेळीं त्याला आळस आला. यास्तव त्यानें आपल्या एका सुंदर रमणीला आपल्या खलिफापदाचें मुख्य प्रतीक असा तो 'पवित्र' अंगरखा घालून प्रार्थनेचें पौरोहित्य करण्यास धाडली! * अवघ्या मुसलमानी साम्राज्याच्या वतीनें मुसलमानी धर्माचा खलिफा म्हणून तिनें प्रार्थना चालविली आणि खलिफाच्या त्या पवित्र वेषाचा तो अधिकार खलिफाप्रमाणेंच समजून त्या रमणीची ती प्रार्थना खलिफाच्या प्रार्थनेप्रमाणेंच त्या धर्मनिष्ठ अनुयायांनीं अनुवादिली!! व्यक्ति कोणीहि,

* हिस्टरी ऑफ सारासेन्स–अमीरअली पृ. १९६:

कशीहि असो– तो मुख्य खलिफा नव्हे; मुख्य खलिफा म्हणजे तो खिलाफतीचा पवित्र अंगरखा !

पुढें अनेक उलाढाली होत होत अरबी मुसलमानांची सत्ता आपसांतील हाणामारींत इतकी दुर्बळ झाली कीं, बगदादच्या खलिफांच्या वाडयांत पगारी तुर्क मूळचे मुसलमानी धर्माचे अनुयायी नसून ते आपल्या शौर्याच्या बळावर ह्या मुसलमानी खिलाफतीचे सत्तेस खाऊन टाकीत आले होते. खलिफा त्यांच्या हातांतलें बाहुलें झालें. कोणास गादीवर बसवावें, कोणास काढावें तें ह्या भाडोत्री तुर्की सैन्याचे सरदार ठरवीत ! अशा एका प्रबळ तुर्क सेनापतीचें प्राबल्य असतां आबासाईड खलिफा वासिक हा वारला. मरणाच्या आधीं आपला वारस सांगण्याचा अधिकार खलिफांकडे असे. त्याप्रमाणें त्या खलिफा वासिकनें मरणाच्या आधीं सांगितलें कीं, ‘ माझ्या मागें माझा मुलगा खलिफा व्हावा. ’

ती रीतच होती. मुसुलमानी समाजानें खलिफाची आज्ञा शिरोधार्य करून म्हटलें, ‘ तें मूलच खलिफा करावयाचें ! ’

पण तें त्या तुर्क सेनापतीस इष्ट नव्हतें. त्याला त्याच्या पुढयांतील एका खलिफावंशीयास खलिफा बनवावयाचें होतें. तें खरें कारण न सांगतां तो इतकेंच म्हणाला, ‘ छट्, खलिफाचा मुलगा, तें मूल, खलिफा होण्यास अयोग्य आहे ! ! ’

‘ कां अयोग्य ? ’

खलिफाच्या आज्ञेला लाथाडून दुसरा मनुष्य खलिफा करण्यास त्या मुसलमानांच्या धर्मभावनेस पटेल असें कांहींतरी कारण सांगणें भाग होतें. तुर्क सेनापतीस आपल्या मनांतलें कारण सांगतां येईना; कारण तें धार्मिक कारण– ‘सनातनी’ कारण नव्हतें. बरें, तो मुलगा लहान आहे म्हणून खलिफापदास शोभेसा दुसरा कोणी पराक्रमी वा साधुशील पुरुष हवा हें कारणही अप्रस्तुत होते. कारण पराक्रमाच्या दृष्टीनें व्यक्ति योग्य कीं अयोग्य हा प्रश्न त्या मुसलमानी बहुजनांचा

मुळीं नव्हताच. ते बहुतेक त्या धर्मभोळ्या 'सनातनी' शिंपी जातीचेच लोक! व्यक्ति कशी असो—तो योग्यतेचा ठराविक जुनाट मुखवटा तिनें घातलेला आहे ना? येवढाच त्यांचाही प्रश्न असणार! खलिफा सांगेल तो त्याचा उत्तराधिकारी; हा धर्मदंडक. त्याप्रमाणें तो मुलगाच खलिफा व्हावयास योग्य! मग तो अयोग्य कां म्हणावा?

केवळ धर्मभोळेपणाच्याच आक्षेपाची अडचण असल्यानें त्या धूर्त तुर्क सेनापतीनें धर्मभोळेपणालाच तंतोतंत पटेल असें, त्या मुलाची अयोग्यता निर्विवादपणें सिद्ध करणारें, कारण सांगितलें.

तो तुर्क सेनापति म्हणाला, "जरी खलिफानें मरतांना त्या आपल्या मुलास, खलिफा करण्यास सांगितलें असलें तरी तो त्या खलिफापदास अयोग्य आहे. कारण, तो इतका लहान आहे कीं, खलिफा होण्यास जो एक मुख्य संस्कार करावा लागतो तोच त्यास करतां येणार नाहीं. खलिफास जो अवश्यमेव घातलाच पाहिजे तो पवित्र अंगरखाच मुळीं त्या मुलाच्या अंगास येत नाहीं, तो अंगरखा नी तो धर्मदंड त्यास झेपणार नाहीं, फार मोठा होईल. यास्तव तो मुलगा खलिफापदास अयोग्य. तो अंगरखा ज्याच्या अंगास होईल नी तो धर्मदंड ज्यास झेपेल असा माणूस खलिफा हवा!"

'सनातनी' जातीच्या शिंपीशास्त्रास तो शास्त्रनिर्णय अगदीं धरून होता. खलिफापदास शोभेल असा योग्य पुरुष कोण! खलिफापदाचा तो जुनाट पवित्र अंगरखा ज्याच्या अंगास होईल तो! त्याप्रमाणें त्यांनी तो अंगरखा ज्याच्या अंगास होईल असा खलिफा नेमला! अंगरख्यास माणसें बेतणारा शिंपी असावा तर असा!

—१९३

[library stamp] ... वाचनालय शाखा

मुळीं नव्हताच. ते बहुतेक त्या धर्मभोळ्या 'सनातनी' शिंपी जातीचेच लोक! व्यक्ति कशी असो–तो योग्यतेचा ठराविक जुनाट मुखवटा तिनें घातलेला आहे ना? येवढाच त्यांचाही प्रश्न असणार! खलिफा सांगेल तो त्याचा उत्तराधिकारी; हा धर्मदंडक. त्याप्रमाणें तो मुलगाच खलिफा व्हावयास योग्य! मग तो अयोग्य कां म्हणावा?

केवळ धर्मभोळेपणाच्याच आक्षेपाची अडचण असल्यानें त्या धूर्त तुर्क सेनापतीनें धर्मभोळेपणालाच तंतोतंत पटेल असें, त्या मुलाची अयोग्यता निर्विवादपणें सिद्ध करणारें, कारण सांगितलें.

तो तुर्क सेनापति म्हणाला, "जरी खलिफानें मरतांना त्या आपल्या मुलास, खलिफा करण्यास सांगितलें असलें तरी तो त्या खलिफापदास अयोग्य आहे. कारण, तो इतका लहान आहे कीं, खलिफा होण्यास जो एक मुख्य संस्कार करावा लागतो तोच त्यास करतां येणार नाहीं. खलिफास जो अवश्यमेव घातलाच पाहिजे तो पवित्र अंगरखाच मुळीं त्या मुलाच्या अंगास येत नाहीं. तो अंगरखा नी तो धर्मदंड त्यास झेपणार नाहीं, फार मोठा होईल. यास्तव तो मुलगा खलिफापदास अयोग्य. तो अंगरखा ज्याच्या अंगास होईल नी तो धर्मदंड ज्यास झेपेल असा माणूस खलिफा हवा!"

'सनातनी' जातीच्या शिंपीशास्त्रास तो शास्त्रनिर्णय अगदीं धरून होता. खलिफापदास शोभेल असा योग्य पुरुष कोण! खलिफापदाचा तो जुनाट पवित्र अंगरखा ज्याच्या अंगास होईल तो! त्याप्रमाणें त्यांनीं तो अंगरखा ज्याच्या अंगास होईल असा खलिफा नेमला! अंगरख्यास माणसें बेतणारा शिंपी असावा तर असा!

—१९३

ग्रंथालय शाखा

IRBK-0101223
IRBK-0101223

IRBK-0101223